## घटक–१

# राजा राम मोहन रॉय (२२ मे १७७२ ते २७ सप्टेंबर १८३३)

## (Raja Ram Mohan Roy)

**अनुक्रमणिका:**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ प्रारंभीचे जीवन

१.२.२ भारतीय सामाजिक सुधारणा चळवळीचे जनक

१.२.३ ब्राह्मो समाज

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ


---

**१.० उद्दिष्टे:**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील उद्दिष्टे पूर्ण करता येतील–

* १८ व्या आणि १९व्या शतकातील भारतीय सामाजिक व धार्मिक परिस्थिती समजून घेण्यास मदत होईल
* राजा राम मोहन रॉय यांचे कौटुंबिक जीवन, त्यांची जडणघडण व त्यांचे शिक्षण यांची सविस्तर माहिती घेता येईल.
* राजा राम मोहन रॉय यांनी केलेल्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय सुधारणांचे आकलन होण्यास मदत होईल.
* राजा राम मोहन रॉय यांची ग्रंथसंपदा आणि पत्रकारिता यातील योगदान स्पष्ट करता येईल.
* राजा राम मोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजाची उद्दिष्टे, तत्त्वे, त्यांची विचारधारा, कार्य यांची सांगोपांग चर्चा करता येईल.
* महर्षी देवेंद्रनाथ टागोर व केशवचन्द्र सेन यांचे ब्राह्मो समाजातील कार्य, तसेच ब्राह्मो समाजात पडलेली फूट यांची कारणमीमांसा करणे सोपे होईल.
* राजा राम मोहन रॉय यांचे विदेशातील कार्य स्पष्ट करता येईल.
* 'भारतीय समाज प्रबोधनाचे जनक' या नात्याने राजा राम मोहन राय यांचे योगदान विद्यार्थ्यांना समजण्यास मदत होईल.

### १.१ प्रास्ताविक:

प्राचीन काळापासूनच भारतीय समाज हा चार वर्णांमध्ये विभागला होता. त्यामुळे येथील समाजात समानतेचा अभाव नेहमीच दिसून येतो. मध्ययुगात भक्ती सांप्रदायाने केलेले कार्य भरीव आहे. त्या काळात भारतात सर्वत्र मुस्लिम सत्तांचा अंमल होता. परिणामी तत्कालीन सामाजिक परिस्थितीत फार काही सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही. त्यातच भर म्हणजे सतराव्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांचे भारतातील आगमन व त्यांचे भारतात सत्ता स्थापनेसाठी होत असलेले प्रयत्न. अठराव्या शतकापर्यंत भारतात अनेक प्रकारच्या रूढी, परंपरा, प्रथा, धार्मिक कर्मकांडे, मूर्तीपूजा, अंधश्रद्धा, बालविवाह, विधवांना तुच्छ वागणूक, बहुपत्नीत्त्व, जरठ–कुमारी विवाह, पडदापद्धती, सतीप्रथा इत्यादी कुप्रथांचा सुळसुळाट होता. पण ब्रिटिशांच्या आगमनाबरोबरच भारतात इंग्रजी भाषेची व शिक्षणाची ओळख सुरू झाली होती. त्यातूनच १९ व्या शतकापर्यंत अनेक भारतीय इंग्रजी शिक्षण घेऊ लागले. विदेशात जाऊ लागले. त्यातून त्यांना आपल्या समाजातील उणिवा व इतर देशातील प्रगती यांची हळूहळू का होईना पण जाणीव होताना दिसू लागली. त्यावर ते गांभीर्याने विचार करू लागले आणि त्यातूनच उदय झाला, तो एका नव्या वर्गाचा, तो म्हणजे 'समाज सुधारकांचा'! देशाच्या विविध भागातील अनेक लोकांनी इंग्रजी शिक्षण घेऊन आपापल्या भागात समाज जागृती करण्यासाठी प्रयत्न चालविले. त्यामध्ये 'भारतीय समाज प्रबोधनाचे जनक' म्हणून प्रसिद्ध व लोकप्रिय असलेले आद्य समाजसुधारक म्हणजेच 'राजाराम मोहन रॉय'! त्यांनी आपले विचार, लिखाण व कृतीतून समाज जागृती करून समाज प्रबोधन करण्याचे महान कार्य केले. म्हणूनच 'भारतातील महान समाज सुधारक' या पेपरच्या पहिल्याच प्रकरणात आपण राजा राम मोहन रॉय यांची माहिती अभ्यासणार आहोत.

राजा राम मोहन रॉय हे त्यांच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणा, त्यांचे लेखन, त्यांची पत्रकारिता, सतीप्रथा बंदीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न, एकेश्वरवादाचा प्रचार, अंधश्रद्धा, रुढी, परंपरांना विरोध, आत्मीय सभा, ब्राह्मो समाजाची स्थापना इत्यादी कार्यासाठी ओळखले जातात. या प्रकरणात आपण त्यांचे बालपण, शिक्षण, समाज प्रबोधन, ब्राह्मो समाजाचे कार्य इत्यादी मुद्द्यांची सविस्तर चर्चा करणार आहोत.

### १.२ विषय विवेचन:

#### १.२.१ प्रारंभीचे जीवन:

राजा राम मोहन रॉय हे एक महान समाज सुधारक, विचारवंत आणि शिक्षणतज्ञ होते. त्यांनी सामाजिक व धार्मिक क्षेत्रात प्रचलित असलेल्या अनेक कुप्रथांविरोधात आवाज उठवून त्या समूळ नष्ट करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. या प्रकरणात आपण त्यांचे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणांबद्दलचे कार्य अभ्यासणार आहोत. तत्पूर्वी त्यांचे बालपण व शिक्षण यांचा थोडक्यात आढावा घेऊ. त्यातून आपणास ते व्यक्ती म्हणून कसे होते, त्यांची जडणघडण कशी झाली, त्यांचे बालपण व कौटुंबिक जीवन कसे होते याचे आकलन होईल.

**१. कौटुंबिक जीवन:**

आधुनिक भारतातील थोर समाज सुधारक राजा राम मोहन रॉय यांचे बालपण व शिक्षण याविषयी तपशीलवार माहिती उपलब्ध नाही. कदाचित ती बंगाली साधनांमध्ये असू शकेल. पण १८४५ पर्यंत राजा राम मोहन रॉय यांचे जीवन चरित्र एकाही भारतीयांनी लिहिले नव्हते. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. १८४५ मध्ये किशोरीचंद मित्र ( १८२२ ते १८७३) यांचा राजा राम मोहन रॉय यांच्यावरील चरित्रात्मक ग्रंथ

'कलकत्ता रिव्ह्यू खंड-४ क्र. ८' मध्ये प्रकाशित झाला होता. त्यानंतर राजा राम मोहन रॉय यांच्या जीवन व कार्यावर प्रामाणिक लिखाण करून त्याची पुनर्बांधणी केली, ती इतिहासकार आणि बंगाली साहित्यिक, समीक्षक ब्रजेंद्रनाथ बंडोपाध्याय (१८९१ ते १९५२) यांनी. त्यांनी १९२६ ते १९४६ च्या दरम्यान एकूण ३५ भागांमध्ये त्यांचे चरित्रात्मक निबंध आणि लेख प्रकाशित केले होते.

आपल्याला जेवढी माहिती उपलब्ध होते त्यावरून आपण असे म्हणू शकतो की, राजा राम मोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ मध्ये ब्रिटिश शासित बंगाल प्रांताच्या हुगळी जिल्ह्यातील राधानगर या गावी एका सनातनी आणि समृद्ध अशा ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे पणजोबा कृष्णकांत बंडोपाध्याय. मूलतः त्यांचे घराणे भिक्षुक प्रवृत्तीचे; पण झाले असे की, त्यांच्या पणजोबांनी बंगालमधील मुघल प्रशासनात नोकरी पत्करली. कालांतराने त्यांच्या कामावर खुश होऊन त्यांना 'राय-ए-रायन' (Rai-i-Rayan) ही पदवी देऊन त्यांचा मुघलांकडून सन्मान केला गेला. तेव्हापासून या घराण्याचे मूळ बंडोपध्याय किंवा बॅनर्जी हे उपनाव मागे पडून रॉय या नावानेच ते ओळखले जाऊ लागले. त्यानंतर राम मोहन रॉय यांचे आजोबा ब्रजविनोद बंडोपाध्याय / रॉय हे स्वतंत्रपणे निर्माण झालेल्या बंगाल राज्यातील नवाब अलीवर्दीखान यांच्याकडे नोकरी करीत होते. त्यांना एकूण सात मुले होती. त्यापैकी पाचवे होते रमाकांत बंडोपाध्याय/रॉय. हे राजा राम मोहन रॉय यांचे वडील! त्यांनीही मुर्शिदाबाद येथे बंगालच्या नवाबाकडे नोकरी केली होती. त्यांच्या वडिलांचा सुभद्रादेवीशी प्रथम विवाह झाला. तथापि या लग्नापासून ते निपुत्रिक असल्याने त्यांनी इतर दोन महिलांशी लग्ने केली. त्यापैकी दुसरी पत्नी तारिणीदेवी यांनी जगमोहन, राममोहन, व एका मुलीला (नाव अज्ञात) या अपत्यांना जन्म दिला. तर तिसरी पत्नी राममुनीदेवी यांच्या पोटी रामलोचन नावाचा मुलगा झाला.

राजा राम मोहन रॉय यांचे जवळचे मित्र विल्यम एडमंड यांच्या मतानुसार त्यांच्या वडिलांप्रमाणे त्यांचेही तीन वेळा लग्न झाले होते. त्यांची पहिली पत्नी लग्नानंतर लवकरच वारली. त्यांनी राधाप्रसाद (१८००) व रामप्रसाद (१८१२) या दोन मुलांना जन्म दिला. त्यांच्या दुसऱ्या पत्नीचे निधन (१८२४) ला झाले तर तिसरी पत्नी त्यांच्यापेक्षा जास्त काळ जगली.

### २. शिक्षण:

राजा राम मोहन रॉय यांना शिक्षणाची विलक्षण आवड होती. ते हुशार व व्यासंगी होते. त्यांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण घरच्या घरीच बंगाली, संस्कृत व फारशी भाषेत घेतले. राजा राम मोहन रॉय यांच्या आई तारिणीदेवी या धार्मिक स्वभावाच्या असल्यामुळे नेहमी देवपूजा करीत. त्यामुळे या अशा धार्मिक वातावरण असलेल्या घरात आणि आदर्श पालकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची जडणघडण झाली. त्या काळात पर्शियन व अरेबिक भाषा या प्रशासकीय कामासाठी वापरल्या जात होत्या. तसेच राजा राम मोहन रॉय यांच्या पूर्वजांनी मुघल नवाबांकडे नोकरी केल्यामुळे त्या भाषेचे ते चांगले जाणकार होते. त्यामुळेच या भाषा शिकण्यासाठी वडिलांनी त्यांना त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षी पाटणा येथे पाठवले. तेथे त्यांनी ग्रीक, हिब्रू, संस्कृत, फारशी, अरबी व इंग्रजी भाषेचे शिक्षण घेऊन त्यावर प्रभुत्व मिळवले. पाटणा येथे त्यांनी अरबी भाषेतील युक्लीडचे भाषांतर, ॲरिस्टॉटलच्या ग्रंथांची रूपांतरे व कुराण यांचा बारकाईने अभ्यास केला. पुढे आईच्या इच्छेखातर ते बनारसला गेले. तेथे त्यांनी वेद, उपनिषद, संस्कृत तसेच हिंदू धर्म ग्रंथांचे शिक्षण घेतले. अनेक महत्त्वाच्या संस्कृत धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केला. या विविध प्रकारच्या संस्कृती व तत्त्वज्ञानाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या विचारांवर एक सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. त्यातूनच ते वयाच्या

१५-१६ व्या वर्षीच मूर्तीपूजा विरोधी 'नास्तिक' बनले. परिणामतः आयुष्यभर त्यांनी सुधारणावादी विचारांचा प्रचार, प्रसार व अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले. म्हणूनच आधुनिक भारताच्या इतिहासात ते 'भारतीय समाज प्रबोधनाचे जनक' म्हणून उदयास आले.

१७९० मध्ये राजा राम मोहन रॉय यांनी उत्तर भारताचे भ्रमण केले. तेथेच त्यांची बौद्ध धर्म व त्यातील मूलभूत तत्त्वांशी ओळख झाली. त्यावेळी आपल्या विचारांद्वारे त्यांनी बौद्ध, हिंदू, इस्लाम व ख्रिश्चन धर्माच्या सिद्धांताचा व तत्त्वांचा अभ्यास करून त्याची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. अशा सर्व धर्माच्या धर्मतत्त्वांचा तौलनिक अभ्यास करणारे कदाचित ते पहिले धर्मसुधारक असावेत.

**३. राजा राम मोहन रॉय व ईस्ट इंडिया कंपनी संबंध:**

राजा राम मोहन रॉय यांनी इंग्रजी भाषेचे ज्ञान संपादन केल्यामुळे ते चांगल्या पद्धतीने इंग्रजी लिहीत होते. किंबहुना त्यांच्या इंग्रजी लेखनापेक्षा ते अतिशय चांगल्या दर्जाचे इंग्रजी बोलत होते. त्यामुळेच त्यांनी १८०३ साली 'ईस्ट इंडिया कंपनी'च्या नोकरीत लिपिक म्हणून प्रवेश केला. त्यांना जॉन डिग्बी या ईस्ट इंडिया कंपनीच्या एका अधिकाऱ्याने नोकरी दिली. त्यांनीच रॉय यांना पाश्चात्य संस्कृती आणि साहित्यांची ओळख करून दिली, त्यांनी रॉय यांना इंग्रजी शिकविले. तसेच उदारमतवादी व भौतिकवादी विचारांची शिकवण दिली, पुढील दहा वर्षे रॉय ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सेवेत डिग्बी (Digby) यांच्यासोबत 'दिवाण' म्हणून काम करीत होते. असे असले तरीही ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी करीत असतानाच्या कारकिर्दीत त्यांना ब्रिटिशांच्या दडपशाहीचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागला. त्याचाच परिणाम म्हणजे सामाजिक आणि धार्मिक सुधारणांबद्दलची त्यांची वाढलेली वचनबद्धता होय. त्यांना परदेश भेटीदरम्यान आलेल्या अनुभवांचा परिणाम म्हणजे अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी त्यांच्या दृढनिश्चयाला मिळालेली बळकटी होय! त्यातूनच त्यांच्या विचार व कृतीने आधुनिक भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणांना वाट मोकळी करून दिली. कारण १८०३ ते १८१४ पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीत त्यांनी नोकरी केल्यानंतर १८१४ मध्ये ते कलकत्त्याला स्थायिक झाले आणि तद्नंतर त्यांच्या जनसेवा व समाजसेवेच्या नवीन प्रकाशमय प्रवासाला प्रारंभ झाल्याचे दिसून येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. १८४५ मध्ये सर्वप्रथम राजा राम मोहन रॉय यांच्यावरील चरित्र ग्रंथ........... यांनी लिहिला.

अ) लॉर्ड विल्यम बेंटिक ब) किशोरीचंद मित्र

क) केशवचंद्र सेन ड) देवेंद्रनाथ टागोर

२. ....... यांनी राजा राम मोहन रॉय यांचे ३५ चरित्रात्मक निबंध आणि लेख प्रकाशित केले.

अ) किशोरीचंद मित्र ब) विल्यम एडमंड

क) बजेंद्रनाथ बंडोपाध्याय ड) सत्येंद्रनाथ बंडोपाध्याय

३. राजा राम मोहन रॉय यांचा जन्म ...........रोजी झाला.

अ) २२ मे १७७२ ब)२२ मे १७७३

क) २२ मे १७७१ ड) २२ मे १७७५

४. राजा राम मोहन रॉय यांच्या पणजोबांना 'राय-ए-रायण' ही पदवी.......... यांनी दिली.

अ) ब्रिटिश ब) कुतुबशहा

क) आदिलशहा ड) मुघल

५. राजा राम मोहन रॉय यांनी........... या ब्रिटिश अधिकाऱ्यासोबत ईस्ट इंडिया कंपनीत दिवान म्हणून काम केले होते.

अ) विल्यम कॅरे ब) जॉन डिग्बी

क) अलेक्झांडर ड) लॉर्ड विल्यम बेंटिक

**१.२.२ भारतीय सामाजिक सुधारणा चळवळीचे जनक:**

राजा राम मोहन रॉय यांचे भारतीय समाजातील योगदान हे बहुआयामी, सर्वसमावेशक असे होते. त्यामध्ये राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक सुधारणांचा समावेश होतो. सामाजिक दुष्ट प्रवृत्तीचे उच्चाटन करण्यासाठी आणि प्रगतशील विचारांना प्रेरणा देण्यासाठी त्यांच्या अथक प्रयत्नामुळे भारतात उदारमतवादी विचारांचा पाया रचला गेला. पुढील मुद्द्यांमध्ये आपण त्यांनी केलेल्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची माहिती घेणार आहोत.

**अ) सामाजिक सुधारणा:**

वर्णव्यवस्थेच्या प्रभावामुळे प्राचीन काळापासूनच भारतात अनेक क्लेशदायक, स्त्रियांची दडपशाही करणाऱ्या, समानता प्रस्थापित करायला आव्हान देणाऱ्या, जाचक रूढी, प्रथा अस्तित्वात होत्या. त्यांच्याविरोधात आवाज उठवून त्या नष्ट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे, भारतातील पहिले समाजसुधारक म्हणजे राजा राम मोहन रॉय. समाजात न्याय व समानता देण्यासाठी ते नेहमी स्वतःला प्रेरित करीत असत. सामाजिक कार्यातील त्यांचे सर्वात उल्लेखनीय कार्य आपल्याला दिसते ते म्हणजे आत्मीय सभेच्या स्थापनेत, सती प्रथा बंदीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानात, बालविवाह व बहुपत्नत्त्वाच्या विरोधात राबविलेली मोहीम, तसेच विधवा विवाह व मुलकी हक्कांसाठी दिलेल्या लढ्यात त्यांनी बजावलेल्या भूमिकेमध्ये. त्यामुळे पुढील भागात आपण या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करणार आहोत.

**१. आत्मीय सभा (१८१५)–**

१८१४ साली राजा राम मोहन रॉय कलकत्त्याला स्थायिक झाले. त्यानंतर लगेचच १८१५ मध्ये त्यांनी कलकत्ता येथे केलेली आत्मीय सभेची स्थापना म्हणजे आधुनिक युगाची सुरुवातच म्हणावी लागेल. 'आत्मीय सभा' ही संघटना भारतातील एक तात्त्विक चर्चा मंडळ होते. या सभेमध्ये तात्त्विक विषयांवर चर्चासत्रे व वादविवाद आयोजित केले जात असत. त्याद्वारे राम मोहन रॉय लोकांमध्ये मुक्त व सामूहिक विचारसरणी रुजविण्याचा प्रयत्न करीत असत. अशा विचारसरणीतून सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य या सभेच्या माध्यमातून केले जात असे.

**१.१ आत्मीय सभेचे उद्देश–**

१) धार्मिक आणि सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन देणे.

२) तत्त्वज्ञानावर आधारित चर्चासत्रे आणि वादविवाद यांचे आयोजन करणे.

३) हिंदू धर्मातील कर्मकांड, मूर्तीपूजा आणि जातीय भेदभाव यासारख्या गोष्टींना कडाडून विरोध करणे.

**१.२ आत्मीय सभेचे विविध उपक्रम–**

आत्मीय सभेच्या स्थापनेनंतर माणिकतला येथील राजा राम मोहन रॉय यांच्या बागेतच सभेच्या बैठका होत असत. आठवड्यातून एकदा सर्वजण एकत्र येत असत. या बैठकांचे स्वरूप हे अनौपचारिक असे आणि काही मोजकीच बंगाली बुद्धिजीवी मंडळी या बैठकांसाठी हजर राहत असत. ही औपचारिक संघटना नसल्यामुळे रीतसर सदस्य नोंदणी केली जात नसे. आत्मीय सभेमध्ये काम करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने द्वारकानाथ टागोर, प्रसन्न कुमार टागोर, नंदा किशोर बोस, वृंदावन मित्र, हरिहरनंद तीर्थस्वामी आणि शिवप्रसाद मिश्रा यांचा उल्लेख करावा लागेल.

या सभेमध्ये हिंदू धर्म ग्रंथांचे वाचन करून त्यावर चर्चा केल्या जात असत. तसेच हिंदू धर्मातील अनेक कर्मकांडे आणि समाजातील असमानता इत्यादी समस्यांवर विचार विनिमय केला जात असे. त्यातूनच ते एकेश्वरवादाचा प्रसार करण्याला प्राधान्य देत होते.

**१.३ परिणाम–**

आत्मीय सभेमध्ये विविध सामाजिक व धार्मिक प्रकारच्या प्रश्नांवर चर्चा व विचारविनिमय होत असल्याने त्याचा परिणाम असा झाला की, त्यामुळे हळूहळू सामाजिक व धार्मिक सुधारणांना चालना मिळाली. त्यातूनच पुढे ब्राह्मो समाजाची स्थापना झाली असावी. थोडक्यात, आत्मीय सभेचे व्यासपीठ हे विविध सामाजिक आजारांचे निर्मूलन करण्यासाठी बौद्धिक आणि सामाजिक चर्चासत्रांचे ठिकाण बनले होते.

**२. सती प्रथा निर्मूलन–**

सामाजिक कार्यातील राजा राम मोहन रॉय यांचे सर्वात उल्लेखनीय व महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे त्यांची क्रूर अशा सती प्रथेविरुद्धची मोहीम होय. ज्या प्रथेमध्ये विधवा स्त्रीला तिच्या पतीच्या निधनानंतर त्याच्या चितेवर स्वतःला जिवंत जाळून टाकण्यास भाग पाडले जात असे. राजा राम मोहन रॉय यांनी या क्रूर सती प्रथेविरोधात आवाज उठविला व ती प्रथा बंद करण्यासाठी मोठे कार्य केले. सतीचे अनेक प्रकार ऐच्छिक होते तर काही सक्तीचे होते. राजा राम मोहन रॉय यांच्या जीवनात अशी एक घटना घडली की, त्या घटनेने त्यांचे पूर्णपणे मतपरिवर्तन झाले. त्या घटनेनंतर म्हणजेच १८१२ नंतर त्यांनी सती प्रथा बंदीसाठी नेटाने प्रयत्न सुरू केले. झाले असे की, १८११ मध्ये त्यांच्या वहिनींना म्हणजेच त्यांचे बंधू जगमोहन यांची पत्नी अलकमंजिरी यांना आपल्या पतीच्या निधनानंतर सती जाण्यास भाग पाडले. तेव्हा राजा राम मोहन रॉय यांनी या प्रथेला विरोध केला व आपल्या कुटुंबीयांना हरएक प्रकारे समजविण्याचा प्रयत्न केला. पण तो व्यर्थ ठरला व त्या सती गेल्या. ही घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिली होती. त्या घटनेने त्यांचे मन हेलावून गेले. त्यानंतर त्यांनी सतीबंदी विरोधात उघडपणे विरोध दर्शविण्यास सुरुवात केली. समाजात या कुप्रथेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि ब्रिटिश सरकारने त्यावर बंदी घालावी यासाठी अथक परिश्रम घेतले.

त्यांनी या अमानवी प्रथेविरोधी अनेक लेख लिहून, तसेच आपल्या भाषणाद्वारे समाजात जाणीव जागृती निर्माण करण्याची चळवळ हाती घेतली. यापुढे जाऊन त्यांनी थेट अंत्यसंस्काराच्या ठिकाणी जाऊन लोकांना विरोध केला. त्यांना समजावून सांगण्यासाठी तेथे हस्तक्षेप केला. या कुप्रथेविरुद्ध इंग्रज मिशनरी विल्यम केरी यांनीही लढा दिला. राजा राम मोहन रॉय हे सती प्रथेविरुद्धचे जोरदार प्रचारक होते. वेद किंवा इतर प्राचीन हिंदू धर्मग्रंथ सती प्रथेला मान्यता देत नाहीत असा त्यांचा युक्तिवाद होता.

१८२८ मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिक हे भारताचे गव्हर्नर जनरल बनले. त्यांनी राजा राम मोहन रॉय यांना सती प्रथेसह, इतर अनेक स्त्रियांशी संबंधित असलेल्या कुप्रथा नष्ट करण्यासाठी मदत केली. त्यांनी ४ डिसेंबर १८२९ मध्ये ब्रिटिश-भारतातील कंपनीच्या संपूर्ण अधिकार क्षेत्रात सती प्रथेवर बंदी घालणारा (बंगाल सती विनियमन १८२९) हा कायदा मंजूर केला . या कायद्याने सती प्रथेला बेकायदेशीर, शिक्षापात्र आणि फौजदारी न्यायालयांनी ती दंडनीय ठरविण्यात आली. त्याचे सर्व श्रेय हे राजा राम मोहन रॉय यांच्या अथक प्रयत्नांना जाते.

**३. बालविवाह आणि बहुपत्नीत्त्वाला विरोध–**

१९ व्या शतकात भारतात बालविवाह व बहुपत्नीत्त्व या प्रथा अस्तित्वात होत्या. त्यामुळे कमी वयातच अजाणतेपणी मुलींचे विवाह होत असत. अशावेळी बालवयातच मुलींवर अत्याचार सहन करण्याची वेळ येत असे. बहुपत्नीत्वाचा अधिकार पुरुषांना होता. पण लग्नावेळी स्त्रियांना त्यांची आवड किंवा नकार सांगण्याचाही अधिकार नव्हता. यामुळे अशा स्त्रियांवर अन्याय सहन करण्याशिवाय पर्याय नव्हता. म्हणूनच स्त्रियांच्या समान दर्जाचा आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचा विचार करून राजा राम मोहन रॉय यांनी बालविवाह आणि बहुपत्नीत्त्वाला कडाडून विरोध केला. नवीन सामाजिक बदल घडविण्यासाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी स्त्री -शिक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणूनच त्यांनी महिला शिक्षणाचा पुरस्कार केला. बौद्धिक दृष्ट्या स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी असतात या मताचे त्यांनी स्पष्टपणे खंडन केले. त्यातूनच स्त्री-दास्यविमोचनाच्या प्रश्नाकडे त्यांनी लोकांचे लक्ष वेधले.

**४. विधवा विवाह व मुलकी हक्क–**

१९ व्या शतकात तत्कालीन भारतीय समाजात स्त्रियासंबंधीच्या अनेक जाचक प्रथा, परंपरा पहावयास मिळतात. त्यापैकीच एक म्हणजे विधवांना मिळणारी अतिशय हीन दर्जाची वागणूक! त्याकाळी समाजात बालविवाह व जरठ-कुमारी विवाह समाजमान्य होते. त्यामुळे बऱ्याचदा अगदी लहान वयातच मुली विधवा होत असत. त्यांना पुनर्विवाह करण्याची परवानगी तर नव्हतीच पण दुसरीकडे त्यांना अतिशय कष्टप्रद जीवन जगावे लागत असे. याचा विचार करून रॉय यांनी विधवा विवाहाला पाठिंबा दिला. याशिवाय त्यांचे आणखीन एक महत्त्वाचे कार्य म्हणजे, त्यांनी मुलींना संपत्तीत हक्क म्हणजेच मुलकी हक्क मिळवून देण्याचा आग्रह धरला. हिंदू कायद्याप्रमाणे मुलींना संपत्तीत कोणताही हक्क दिला जात नव्हता. पण राजा राम मोहन रॉय यांनी या प्रश्नाकडेही समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावरून आपण असे म्हणू शकतो की स्त्री हक्कांचे ते पहिले पुरस्कर्ते होते.

**५ इतर सामाजिक कार्य–**

भारतीय समाजात वर्णव्यवस्थेमुळे जातीव्यवस्था, जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यता आणि अस्पृश्यतेमुळे असमानता यांचे अस्तित्व दिसून येते. राजा राम मोहन रॉय यांनी या जातीव्यवस्थेच्या कडवटपणाविरुद्ध बुलंद

आवाज उठविला आणि जातीभेद संपविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जातीव्यवस्था, अस्पृश्यता, अंधश्रद्धा आणि मादक पदार्थांचे सेवन या विरुद्ध मोहीम राबविली.

राजा राम मोहन रॉय यांचे सामाजिक कार्य म्हणजे उपेक्षित शोषित लोकांबद्दलच्या त्यांच्या खोल सहानुभूतीचे प्रतिबिंब होते.

**ब) धार्मिक सुधारणा:**

**१. एकेश्वरवादाचा पुरस्कार व प्रचार–**

राजा राम मोहन रॉय यांनी हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन व इस्लाम धर्माचे अनेक ग्रंथ वाचून त्यातील दोष, तत्त्वे आणि समानता शोधण्याचा व बारकाईने अभ्यासण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच त्यांनी या सर्व धर्मातील तत्त्वांचा तौलनिक अभ्यास केला. त्यातून ते या निष्कर्षाप्रत पोचले की, ईश्वर एकच आहे. शिवाय त्यांनी परदेश दौरा केल्याने त्यांना भारतातील व इतर देशातील सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती व प्रगती यातील फरक ठळकपणे लक्षात आला. त्यामुळे त्यांनी पाश्चात्यांप्रमाणे वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून धार्मिक सुधारणा करण्याची मोहीम हाती घेतली. त्यांच्या धार्मिक सुधारणांचा मूळ हेतू म्हणजे, एकेश्वरवादावरील विश्वास आणि हिंदू धर्माला अंधश्रद्धेपासून शुद्ध करणे हे होते. लोकांनी धर्माकडे तर्कसंगत व प्रगत दृष्टिकोनातून पहावे या विचारांचा त्यांनी प्रचार केला. त्यांनी सर्व धर्माच्या एकतेचा पुरस्कार केला. त्यांनी केलेल्या धार्मिक सुधारणांमध्ये खालील सुधारणांचा समावेश होतो.

**२. मूर्तिपूजा, कर्मकांडे अमान्य–**

राजा राम मोहन रॉय यांनी सर्व धर्मांचा अभ्यास केल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की, इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म हे एकाच देवाच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतात. या दोन धर्मातील एकेश्वरवादी श्रद्धेचा राजा राम मोहन रॉय यांच्या मनावर खोल प्रभाव पडला. त्यामुळे त्यांनी एकाच दैवी अस्तित्वाच्या उपासनेवर भर देऊन हिंदू धर्मात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी एकेश्वरवाद व धार्मिक तर्कसंगत विचारांचे समर्थन करणारा 'तुहफत-उल-मुवाहिद्दीन' ('एकेश्वरवाद्यांना भेटवस्तू') हा ग्रंथ १८०३ मध्ये प्रकाशित केला. धर्माचे सार हे धार्मिक विधी, समारंभापेक्षा त्यांची नैतिक शिकवण आणि नैतिक मूल्ये यामध्ये असते, असा युक्तिवाद करून त्यांनी धार्मिक सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले.

**४. धार्मिक सहिष्णुता आणि आंतरधर्मीय संवाद–**

राजा राम मोहन रॉय हे धार्मिक सहिष्णुता आणि आंतरधर्मीय संवादाचे पुरस्कर्ते होते. धार्मिक सहिष्णुता म्हणजे वेगवेगळ्या धर्म आणि श्रद्धाबद्दल आदर आणि संयम असणे होय, तर आंतरधर्मीय संवाद म्हणजे, वेगवेगळ्या धर्मांच्या लोकांमध्ये घडून येणारा सकारात्मक व रचनात्मक संवाद होय! ज्याचा उद्देश एकमेकांना समजून घेणे, आदर देणे आणि त्यातून सहकार्याने काम करणे होय! राजा राम मोहन रॉय यांचा असा विश्वास होता की, सर्व धर्मामध्ये काही समान मूल्ये आहेत. ती समान मूल्ये वेगवेगळ्या धर्म समुदायांमध्ये सुसंवाद वाढविण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच सर्वांनी आंतरधर्मीय संवाद व धार्मिक सहिष्णुता यांचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले.

वरील चर्चेवरून आपण असे म्हणू शकतो की धार्मिक सुधारणांच्या बाबतीत राजा राम मोहन रॉय यांचा दृष्टिकोन हा प्रगल्भ व प्रगत असा होता.

**क) शैक्षणिक सुधारणा:**

राजा राम मोहन रॉय हे एक दूरदर्शी शिक्षणतज्ञ होते. म्हणूनच त्यांनी सामाजिक आणि धार्मिक सुधारणांबरोबरच शैक्षणिक सुधारणांकडेही आपले लक्ष केंद्रित केले. समाज घडविण्यात शिक्षण हे परिवर्तनकारी शक्ति म्हणून काम करते. हे त्यांनी ओळखले होते. त्यांच्या शैक्षणिक सुधारणांचे उद्देश खालील प्रमाणे होते.

१) शिक्षण व्यवस्थेमध्ये समीक्षणात्मक विचार करण्याचा अवलंब करणे.

२) कोणत्याही गोष्टीचे वैज्ञानिक चौकशीद्वारे विश्लेषण करणे.

३) बदलत्या जगाच्या आव्हानांसाठी भारतीयांना तयार करू शकेल असा आधुनिक अभ्यासक्रम तयार करण्यावर भर देणे.

४) आधुनिक शिक्षणाचा प्रसार करणे.

वरील उद्देश साध्य करण्यासाठी राजा राम मोहन रॉय यांनी हिंदू कॉलेज, अँग्लो-हिंदू शाळा आणि वेदांत कॉलेजची स्थापना केली.

**१. हिंदू कॉलेज** (Presidency College, Kolkata)-

राजा राम मोहन रॉय यांनी इंग्रजी भाषेतून आधुनिक शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न केले. मात्र, त्यांनी बंगालमध्ये बौद्धिक आदान-प्रदानाची भाषा म्हणून बंगाली भाषेचा पुरस्कार केला. शिक्षण विषयक सुधारणांमध्ये सर्वप्रथम १८१७ मध्ये 'डेव्हिड हेअर' आणि रॉय त्यांच्या सहकार्यातून कलकत्ता येथे प्रसिद्ध 'हिंदू कॉलेज'ची स्थापना करण्यात आली. डेव्हिड हेअर हे एक डच 'घड्याळजी' (watch maker) होते. ते १८०० साली भारतात आले. त्यांनी आपले संपूर्ण जीवन भारतात आधुनिक शिक्षणाच्या प्रसारासाठी घालविले. राजा राम मोहन रॉय यांच्या शैक्षणिक कार्यात त्यांचे चांगले सहकार्य मिळाले.

**२. अँग्लो- हिंदू शाळेची स्थापना-**

राजा राम मोहन रॉय यांनी सन १८२२ मध्ये अँग्लो हिंदू शाळेची स्थापना केली. त्यांनी त्यांचे एकेश्वरवादी विचार शिकविण्यासाठी या शाळेची स्थापना केली होती. ही एक अग्रणी शैक्षणिक संस्था होती. या शाळेमध्ये पारंपारिक भारतीय विषय, पाश्चात्य विज्ञान आणि मानवी विकास यांची सांगड घालणारा अभ्यासक्रम शिकवला जात असे. कारण बंगाल सरकारने पारंपारिक संस्कृत शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्याला विरोध करत राजा राम मोहन रॉय यांनी आधुनिक शिक्षण देण्यावर भर दिला. पाश्चात्य शिक्षण आणि भारतीय संस्कृतीचा संगम साधणे हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून त्यांनी या शाळेची स्थापना केली होती. त्यामध्ये हेतूपूर्वक आधुनिक आणि पाश्चात्त्य शिक्षण पद्धतीचा अवलंब केला गेला. तेथे एकेश्वरवाद आणि वेदांवर आधारित शिक्षण, यांत्रिकी, विज्ञान तसेच व्हॉल्टेअरच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास शिकवला जात असे. याचा सकारात्मक परिणाम असा झाला की, भारतीय शिक्षण पद्धतीत आधुनिकतेचा प्रवेश झाला. म्हणजे राजा राम मोहन रॉय हे खऱ्या अर्थाने 'आधुनिक शिक्षण व्यवस्थेचे जनक' होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

राजा राम मोहन रॉय यांनी सुरू केलेल्या 'अँग्लो-हिंदू शाळे'ला अपेक्षित यश मिळाले होते. त्याचा परिणाम असा झाला की, भारतात पाश्चात्य शैक्षणिक पद्धतीचा अवलंब करण्यास मदत झाली. तसेच, पुढील शैक्षणिक सुधारणांना प्रेरणा मिळाली. ज्यामुळे इंग्रजी व विज्ञान शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यांचे असे म्हणणे होते की, युवा वर्ग बदलत्या समाजाशी जुळण्यासाठी आधुनिक शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे. आजमितीला २०२० च्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पारंपारिक ज्ञान प्रणाली (Indian Knowledge System) नव्याने अवलंबण्यात आली. पण १९व्या शतकात राजा राम मोहन रॉय यांनी अँग्लो हिंदू स्कूलची स्थापना व त्यामध्ये पारंपारिक व पाश्चात्य शिक्षणाची दिलेली जोड म्हणजे त्यांचे काळाच्या पुढचे पाऊल होते. यावरून राजाराम मोहन रॉय यांची शैक्षणिक सुधारणेबाबतची दूरदृष्टी किती व्यापक होती याचा प्रत्यय येतो.

**३. वेदांत कॉलेज-**

राजा राम मोहन रॉय यांनी स्थापन केलेली दुसरी महत्त्वाची शिक्षण संस्था म्हणजे वेदांत कॉलेज होय! याची स्थापना १८२५ मध्ये कोलकत्ता येथे करण्यात आली. त्यामध्ये वेदांत, भारतीय तत्त्वज्ञान, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि इतर पाश्चात्य विज्ञान विषयांचे शिक्षण दिले जात असे. या शिक्षणाचा भारतीय युवा वर्गाची विचारसरणी समृद्ध बनविण्यासाठी चांगला फायदा होणार होता. म्हणून वेदांत कॉलेजची स्थापना म्हणजे भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो.

**४. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार-**

राजा राम मोहन रॉय यांचे शैक्षणिक कार्य पाहता एक गोष्ट लक्षात येते की, त्यांनी स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. लिंग-समानता आणि सामाजिक प्रगती साध्य करण्यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. त्यांच्या मते, स्त्रियांना शिक्षित केल्याने समाजाचा सर्वांगीण विकास होईल. कारण साक्षर स्त्री कुटुंब आणि समाज कल्याणासाठी योगदान देऊ शकतात यावर त्यांचा विश्वास होता.

**५. स्कॉटिश चर्च कॉलेज-**

अलेक्झांडर डफ आणि राजा राममोहन रॉय या दोघांनी एकत्र येऊन १८३० मध्ये स्कॉटिश चर्च कॉलेजची स्थापना केली होती. हे दोघेही १९ व्या शतकातील भारतीय सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळीतील महत्त्वाचे व्यक्ती होते. डफ स्कॉटिश मिशनरी होते. त्यांनी भारतात शिक्षण आणि धर्मांतराच्या क्षेत्रात काम केले होते. या दोघांच्या कार्यातील मुख्य फरक म्हणजे राजा राम मोहन रॉय हे भारतीय संस्कृती आणि परंपरेचा आदर करत सामाजिक सुधारणा घडवून आणण्यावर भर देत होते. तर डफ पाश्चात्य शिक्षण आणि ख्रिश्चन धर्माच्या माध्यमातून बदल घडविण्याचा प्रयत्न करत होते. विचारधारा भिन्न असली तरीही या दोघांनी भारतीय समाजात शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक सुधारणा यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**ड) राजकीय सुधारणा:**

१९ व्या शतकात राजकीय प्रश्नाबाबत जी चळवळ सुरू झाली त्याचे अग्रणी म्हणून राजा राम मोहन रॉय यांना मानले जाते. त्यांच्या राजकीय सुधारणांचा उद्देश ब्रिटिश वसाहतवादी राजवटीखालील भारतीयांना अधिकाधिक हक्क आणि स्वातंत्र्य मिळवून देणे हा होता. त्यांनी आपल्या विचार व कृतीतून लोकांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करण्याचे काम केले होते, याअर्थाने त्यांनी राष्ट्रवादी चळवळीचे नेतृत्व केले होते. तसेच घटनात्मक सुधारणा आणि प्रशासनात भारतीयांचे प्रतिनिधित्व असावे यासाठी त्यांनी वकिली केली.

त्यांनी ब्रिटिश राजवटी विरुद्ध आवाज उठवला आणि भारतीयांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी भारतीयांमध्ये स्वतंत्र विचारधारेचा प्रसार केला. ज्यामुळे लोकांना गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी प्रेरणा मिळाली.

**१. कर सुधारणा–**

राजा राम मोहन रॉय यांनी बंगाली जमीनदारांच्या दडपशाही पद्धतीवर टीका केली. त्यांच्या जुलमी वर्तणुकीचा निषेध केला. ब्रिटिशांच्या शोषणामुळे शेतकऱ्यांची स्थिती दयनीय बनली होती. राजा राम मोहन रॉय यांची अशी मागणी होती की, जमीनदाराप्रमाणेच शेतकऱ्यांनीही द्यावयाचा जास्तीत जास्त (महत्तम) खंड सुद्धा कायमस्वरूपी निश्चित करण्यात यावा. तसेच त्यांनी करमुक्त असलेल्या जमिनीवरील कर रद्द करण्याची मागणीही केली.

**२. नागरी हक्कांची मागणी–**

राजा राम मोहन रॉय हे त्यांच्या प्रारंभीच्या काळात ईस्ट इंडिया कंपनीकडे नोकरी करीत होते. तेथे त्यांनी ब्रिटिशांच्या दडपशाहीचा अनुभव घेतला होता. त्यामुळे पुढील काळात त्यांनी ब्रिटिशांच्या दडपशाहीला विरोध करण्याचा हर प्रकारे प्रयत्न केला. त्यामुळे नागरी हक्क, न्याय प्रशासन आणि कायदेशीर न्याय व्यवस्थेचा त्यांनी पुरस्कार केला. ब्रिटिश राजवटीत भारतीयांनी प्रशासकीय भूमिका बजावावी अशी त्यांनी ब्रिटिशांना विनंती केली. त्यासाठी त्यांनी पुढील मागण्या केल्या.

१) कंपनीचे व्यापार हक्क रद्द करावेत.

२) भारतीय वस्तूवरील उच्च निर्यात कर रद्द करावेत.

३) कार्यकारी व्यवस्थेस न्यायव्यवस्थेपासून विभक्त करावे.

४) ज्युरीच्या साहाय्याने खटले चालवावेत.

५) भारतीय व युरोपीय व्यक्तींमध्ये न्यायिक समानता प्रस्थापित व्हावी. इत्यादी

ब्रिटिश राजवटीत भारतातून किती पैसा बाहेर नेला जात होता आणि तो कोठे गायब होत होता याचा अंदाज लावणारे राजा राम मोहन रॉय हे पहिले भारतीय होते. त्यांनी असा अंदाज लावला की, भारतात गोळा होणाऱ्या एकूण महसुलापैकी सुमारे अर्धा भाग हा इंग्लंडला पाठवला जात होता; तर उर्वरित पैसा समाज कल्याणासाठी वापरला जात होता.

**इ) ग्रंथसंपदा /साहित्यिक योगदान–**

राजा राम मोहन रॉय हे एक जाणकार लेखक व अनुवादक होते. त्यांनी सर्व प्रकारचे लेखन करून भारतीय साहित्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामध्ये राजकीय, सामाजिक, धार्मिक विषयावरील निबंध, वैदिक ग्रंथांचे भाषांतर, तात्विक ग्रंथ इत्यादीचा समावेश होतो. राजा राम मोहन रॉय हे त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर मुर्शिदाबाद येथे राहायला गेले. तेथेच त्यांनी फारशी भाषेत ‘तुहफत–उल–मुवाहिद्दीन’ हा छोटासा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये ते म्हणतात, ‘सृष्टीकर्ता व पालनकर्ता परमेश्वर हा एकच आहे, असाच सर्व धर्माचा पाया आहे. पण त्यावर विविध धर्माच्या लोकांनी आपापल्या भलत्या कल्पनांचा डोलारा चढविला. त्यामुळे त्या त्या धर्मांना भिन्न रूपे आली आहेत. प्रत्येक धर्मातील लोक आपला धर्म खरा व इतर धर्म खोटे असे

म्हणतात. अशा परिस्थितीत खरा धर्म कोणता हे ठरविण्यासाठी प्रत्येक धर्मातील खऱ्या व खोट्या गोष्टींचा विचार झाला पाहिजे'.

कलकत्त्यात असताना त्यांनी वेदसूत्रे, उपनिषदे इत्यादी ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली. १८१५ साली 'वेदांत' ग्रंथाचे तर १८१६ मध्ये 'संक्षिप्त वेदांत' (वेदांतसार) या ग्रंथांचे इंग्रजी आणि बंगाली भाषेत प्रकाशन केले. त्यानंतर 'मांडुक्क्य उपनिषद', 'कठोपनिषद' यांचा बंगालीमध्ये अनुवाद केला. १८१८ मध्ये त्यांचा 'सती' या विषयावरील पहिला लेख प्रकाशित झाला. 'दि प्रीसेप्टस ऑफ जीजस' (The Precepts of Jesus, The Guide to Peace and Happiness-1820) या पुस्तकात त्यांनी बायबल (नवीन करार) मधील शिकवण व नैतिक मूल्यांचा आढावा घेतला आहे. इ. स. १८२० मध्येच त्यांचे 'येशूच्या आज्ञा, शांती व सुखाचा मार्ग' हे ७० पानांचे पुस्तक प्रकाशित झाले. इ. स १८२३ मध्ये त्यांनी 'ब्रिफ् रिमार्क्स रिगार्डिंग मॉडर्न इन्क्रोचमेंट्स ऑन एनशंट राईट्स ऑफ फीमेल्स अकॉर्डिंग टू द हिंदू लॉ ऑफ इनहेरिटन्स' हे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकात वडील आणि पती यांच्या संपत्तीत स्त्रियांना वाटणी मिळाली पाहिजे अशी त्यांनी मागणी केली.

राजा राम मोहन रॉय यांनी बंगाली भाषेत इतिहास, भूगोल, व्याकरण इत्यादी अनेक विषयांवर पुस्तके लिहिली. त्यांनी लिहिलेले 'गौडिया व्याकरण' हे बंगाली भाषेतील पहिले संपूर्ण व्याकरण आहे. ते १८३३ मध्ये कलकत्ता स्कूल बुक सोसायटीने प्रकाशित केले होते. बंगाली व्याकरणाच्या अभ्यासासाठी ते एक महत्त्वाचे साधन मानले जाते. त्यांनी १८२७ मध्ये 'वज्रसूची' या ग्रंथाचा अनुवाद करून ते प्रकाशित केले. 'वज्रसूची' अश्वघोषांनी लिहिलेला बौद्ध ग्रंथ आहे. तो जातीव्यवस्थेवर परखड हल्ला करणारा आहे. याशिवाय त्यांनी 'अखेरचे आवाहन' (Final Appeal) व 'प्रथ्यप्रदान' ही पुस्तकेही लिहिली आहेत. यावरून असे लक्षात येते की त्यांनी केलेले लिखाण हे सर्वंकष व तात्कालीन सामाजिक, धार्मिक, राजकीय प्रश्नांची चर्चा करणारे होते.

**ई) राजा राम मोहन रॉय यांची पत्रकारिता:–**

राजा राम मोहन रॉय हे वृत्तपत्र स्वातंत्र्याचे कट्टर समर्थक होते. माहितीपूर्ण व सार्वजनिक भाषणाला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रांचे महत्त्व ओळखले होते. त्यासाठी त्यांनी 'ब्राह्मनिकल मॅगझीन' हे इंग्रजी, बंगाली साप्ताहिक 'संवाद कौमुदी' आणि पार्शियन साप्ताहिक 'मिरत–उल–अखबार' ही वृत्तपत्रे सुरू केली. याद्वारे त्यांनी लोकांमध्ये महत्त्वाच्या विषयाची जाणीव, जागृती करण्याचे मोठे कार्य केले. वैज्ञानिक, साहित्यिक व राजकीय ज्ञान लोकांपर्यंत पोहोचावे, तत्कालीन मुद्द्यावर लोकांचे प्रबोधन व्हावे, तसेच सरकार समोर लोकांच्या मागण्या व गाऱ्हाणे मांडण्यासाठी या वृत्तपत्रांचा त्यांनी उपयोग करून घेतला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –२**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. .............. या साली राजा राम मोहन रॉय यांनी आत्मीय सभेची स्थापना केली.

| | |
|---|---|
| अ) १८१६ | ब) १८१५ |
| क)१८१८ | ड)१८२१ |

२. राजा राम मोहन रॉय यांच्या प्रयत्नांमुळे.... यांनी १८२९ मध्ये सतीप्रथा बंदीचा कायदा मंजूर केला.

| | |
|---|---|
| अ) लॉर्ड विल्यम बेंटिक | ब) विल्यम कॅरे |
| क) विल्यम ऍडमंड | ड) विल्यम ब्रूक |

३. 'तूहफत-उल-मुवाहिददीन' (एकेश्वरवाद्यांना भेट) हे पुस्तक यांनी लिहिले.

| | |
|---|---|
| अ) राजा राम मोहन रॉय | ब) स्वामी दयानंद सरस्वती |
| क) केशवचन्द्र सेन | ड) स्वामी विवेकानंद |

४. पारंपारिक ज्ञान तसेच पाश्चात्य आणि आधुनिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून ...........यांनी अँग्लो - हिंदू स्कूलची स्थापना केली.

| | |
|---|---|
| अ) राजा राम मोहन रॉय | ब) स्वामी दयानंद सरस्वती |
| क) रवींद्रनाथ टागोर | ड) चार्ल्स वूड |

५. राजा राम मोहन रॉय यांनी ............हे बंगाली वृत्तपत्र सुरू केले.

| | |
|---|---|
| अ) सुलभ समाचार | ब) अमृतपत्रिका |
| क) समाचार दर्पण | ड) संवाद कौमुदी |

**१.२.३ ब्राह्मो समाज:**

भारतात ब्रिटिशांच्या आगमनामुळे भारतीयांना पाश्चात्य शिक्षणाची ओळख झाली. त्यामुळे भारतातील बरेच लोक इंग्रजी शिक्षण घेऊन तयार झाले. काही तरुणांनी परदेशात शिक्षण घेतले. विविध विषयावर वाचन केले. धर्मग्रंथांचा अभ्यास केला. तेव्हा भारतीय समाजव्यवस्था व धर्मव्यवस्था त्यातील दोष त्यांच्या लक्षात येऊ लागले. तेव्हा ते सुधारणे त्यांना गरजेचे वाटू लागले. त्यामुळे त्यांनी त्याविरुद्ध आवाज उठवण्याचे ठरविले. त्यांच्या असे लक्षात आले की, हिंदू धर्म व संस्कृतीमध्ये ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या स्वीकारणे गरजेचे आहे, त्याचबरोबर जे दोष आहे ते नाहीसे करणे तितकेच निकडीचे आहे. आपल्या समाजाची उन्नती व्हायची असेल तर हिंदू धर्म पुनर्जीवित करावा लागेल. हा विचार त्या सुशिक्षित वर्गाने जाणला. त्या जाणिवेतून या सुधारणेसाठी काही व्यक्ती तसेच काही संस्था पुढे सरसावल्या. त्यामधील महत्त्वाच्या संस्था म्हणजे ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, थिऑसॉफिकल सोसायटी, सत्यशोधक समाज, इत्यादी होत! १९ व्या शतकात या संस्थांच्या माध्यमातून त्या संस्थांशी संबंधित व्यक्तींनी भारतातील विविध भागात अनेक समाजसुधारणा व धर्मसुधारणा चळवळी सुरू केल्या. पुढील काळात त्या अधिक गतिमान, बळकट करण्यासाठी लोकांना प्रेरणा दिली. त्यामधील महत्त्वाची व अग्रणी संस्था म्हणजे ब्राह्मो समाज होय! या प्रकरणाच्या पुढील भागात आपण ब्राह्मो समाजाची स्थापना, त्याची उद्दिष्टे, त्यांचे कार्य व भारतीय समाजावरील त्याचा परिणाम इत्यादींची सविस्तर चर्चा करणार आहोत.

## १. ब्राह्मो समाजाची स्थापना–

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात ब्रिटिश राजवटीचा अंमल होता. त्यांची दडपशाही होती. शिवाय सामाजिक धार्मिक क्षेत्रात जातीव्यवस्था, धर्माचा पगडा, असमानता, अन्यायकारक, अनिष्ट रूढी यांचे प्राबल्य होते. त्यासाठी सामाजिक धार्मिक सुधारणा सुरू झाल्या. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणांचा आपण विचार करतो अथवा अभ्यासतो तेव्हा आपल्या डोळ्यासमोर सर्वप्रथम दिसतात ते 'राजा राम मोहन रॉय'! आधुनिक भारताच्या समाजसुधारणेच्या इतिहासात राजा राम मोहन रॉय यांचे कार्य अग्रक्रमाने येते. म्हणूनच भारतीय इतिहासात त्यांना 'आधुनिक भारताचे जनक' तसेच 'भारतीय समाज प्रबोधनाचे जनक' या नावाने ओळखले जाते.

राजा राम मोहन रॉय यांनी द्वारकानाथ टागोर, कालिनाथ रॉय आणि मथुरानाथ मलिक या तीन मित्रांच्या सहाय्याने 'ब्रह्म सभा' स्थापन केली. या सभेलाच पुढे ब्राह्म समाज किंवा 'ब्राह्मो समाज' म्हणू लागले. या समाजसुधारणा चळवळीत नीतिमत्ता व समानता या तत्त्वावर आधारित कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली. काही काळातच प्रसन्नकुमार ठाकूर, चंद्रशेखर देव आणि रामचंद्र विद्यावागिष हे या कार्यात सहभागी झाले. हळूहळू या सभेच्या सदस्यांची संख्या वाढू लागली. राजा राम मोहन रॉय यांनी ब्राह्मो समाज स्थापन करून त्याद्वारे भारतीय समाज सुधारणा व धार्मिक सुधारणा करण्यासाठी भरीव कार्य केले आहे. खऱ्या अर्थाने तेव्हापासूनच भारतात सामाजिक व धार्मिक चळवळीची सुरुवात झालेली दिसते.

राजा राम मोहन रॉय यांनी इस्लाम, ख्रिश्चन, जैन व बौद्ध धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. त्यावरून त्यांच्या लक्षात आले की, सर्व धर्माचे सार एकच असून 'ईश्वर' हा एकच आहे. तसेच त्यांनी वेद, वेदांत, उपनिषदे याचाही सर्वांगाने अभ्यास केला होता. हिंदू धर्मात प्रचलित असलेल्या काही अंधश्रद्धा, जाचक रूढी, परंपरा, कर्मकांडे, मूर्तिपूजा, चमत्कार, भ्रामक समजूती इत्यादींना नष्ट करण्यासाठी आणि एकेश्वरवादाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी कलकत्ता येथे ब्राह्मो समाजाची स्थापना केली.

ब्राम्हो समाज स्थापनेपूर्वी एकेश्वरवादाचा प्रसार व धार्मिक सुधारणा करण्यासाठी त्यांनी १८१५ मध्ये आत्मीय सभा तर सप्टेंबर १८२१ मध्ये 'द कलकत्ता युनिटॅरियन कमिटी स्थापन केली होती. त्यापैकी आत्मीय सभेविषयी आपण या प्रकरणाच्या प्रारंभीच्या भागात सविस्तर चर्चा केली आहे. एकतावादी समितीची (युनिटेरियन कमिटी) स्थापना कलकत्ता येथे राजा राम मोहन रॉय यांनी विल्यम ॲडम (Adam) आणि द्वारकानाथ टागोर यांच्यासोबत मिळून केली. याचे उद्देश एकेश्वरवादाचा प्रसार करणे, समाजसुधारणा करणे आणि सर्व धर्मामध्ये एकता निर्माण करणे हे होते.

१८२८ मध्ये स्थापन झालेल्या ब्राह्मो समाजाने भारतीय समाजात आमुलाग्र बदल घडवून आणले. त्यातूनच सामाजिक सुधारणांच्या चळवळींना चालना मिळाली. त्याची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे होती.

## २. ब्राह्मो समाजाची प्रमुख उद्दिष्टे–

हिंदू धर्मातील दोष नाहीसे करून हिंदू धर्माचे शुद्धीकरण करणे.

१) भारतीयांना खऱ्या धर्माची ओळख करून देणे.

२) सती प्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्त्व इत्यादी सामाजिक कुप्रथा विरोधात आवाज उठविणे व त्या नष्ट करणे.

३) एकाच देवाची उपासना करण्यासाठी एकेश्वरवादाचा प्रचार, प्रसार करणे.

४) मूर्तीपूजेला विरोध करणे.

५) सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी समानतेचा व न्यायाचा पुरस्कार करणे.

६) समाजात बुद्धिवादाला प्रेरणा देण्यासाठी अंधश्रद्धेपेक्षा तर्क आणि विवेकाला महत्त्व देणे.

७) शिक्षणाने मनुष्याच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात, त्यामुळे समाजात शिक्षण व ज्ञानाचा प्रसार करणे.

८) हिंदू धर्मावर टीका करणाऱ्या व भारतात धर्मांतर घडवून आणणाऱ्या ख्रिश्चन मिशनऱ्यांचे धर्मांतराचे कार्य थोपविणे.

**३. ब्राह्मो समाजाची मुख्य तत्त्वे:–**

ब्राह्मो समाज हा काही महत्त्वपूर्ण तत्त्वांवर आपले कार्य करीत होता. ब्राह्मो समाजाचे कार्य हे या तत्त्वांना अनुसरून असे होते. त्यामुळे ही तत्त्वे समजून घेणे आवश्यक आहे.

१) ब्राह्मो समाज एकेश्वरवादाचा पुरस्कार करणारा होता. त्यामुळे तो एकाच देवाची उपासना करण्यावर विश्वास ठेवणारा होता. जो निराकार, सर्वव्यापी व सृष्टीचा निर्माता आहे.

२) ब्राह्मो समाजास मूर्तीपूजा अमान्य होती. त्यामुळे ब्राह्मो समाजाचे असे तत्त्व होते की, ईश्वराचे अस्तित्व कोणत्याही मूर्तीत, आकारात किंवा वस्तूमध्ये नसते. त्यामुळे मूर्तीपूजेस येथे स्थान नव्हते.

३) ब्राह्मो समाज हा सर्वधर्मसमभावाचे समर्थन करणारा होता. त्यामुळे सर्व धर्माचा आदर करणे, त्यांच्यात समानता मानणे हे या समाजाचे एक महत्त्वाचे तत्व होते.

४) हिंदू धर्मातील अनेक जाचक व अनावश्यक कर्मकांडांना ब्राह्मो समाजाचा विरोध होता. त्यामुळे तेथे कोणत्याही धार्मिक विधींना स्थान नव्हते.

५) सामाजिक समता प्रस्थापित करण्याला ब्राह्मो समाजाने महत्त्व दिले. त्यामुळे आपण सर्वजण एकमेकांचे बांधव आहोत. यावर त्यांचा विश्वास होता. परिणामी जाती व्यवस्थेला विरोध करणे हे तत्त्व त्यांनी अंगीकारले.

६) ही संस्था शुद्ध नैतिक आचरणाला महत्त्व देत असे. त्यामुळे चांगले नैतिक जीवन जगणे, मानवतेची सेवा करणे आणि समाजासाठी योगदान देणे, इत्यादीला त्यांनी महत्त्व दिले.

७) ब्राह्मो समाजाचा अवतारवादास विरोध होता. त्यांच्या मते ईश्वर निराकार असल्याने तो कोणत्याच रूपात प्रकट होऊ शकत नाही. म्हणून अवतारवाद ही एक चुकीची किंवा भ्रामक समजूत आहे.

८) मानवाने नेहमी परोपकारी राहून इतरांप्रती प्रेम, परोपकार व सेवाभावी वृत्ती बाळगावी.

९) ब्राह्मो समाजात बुद्धीवाद व तर्कशुद्ध विचारांना महत्त्व होते. त्यामुळे धर्मातील श्रद्धा आणि आचरणाकडे डोळसपणाने पाहून, बुद्धी व तर्काने विचार करणे आवश्यक मानले जात होते.

१०) स्त्रिया आणि पुरुष यांना समान संधी व अधिकार मिळाले पाहिजेत या मताचे समर्थक होते. त्यामुळे स्त्री-पुरुष समानता या तत्त्वाचे ते पुरस्कर्ते होते.

**४. ब्राह्मो समाजाचे कार्य–**

ब्राम्हो समाजाच्या स्थापनेनंतर त्याची उद्दिष्टे, तत्वे ठरविण्यात आली. त्यानुसार त्याच्या कार्यास सुरुवात झाली. लोकप्रियता वाढू लागली. ब्राह्मो समाजाची सदस्य संख्या हळूहळू वाढू लागल्यानंतर त्यांना स्वतंत्र उपासना मंदिराची आवश्यकता वाटू लागली. त्यानुसार २६ जानेवारी १८३० रोजी नव्या उपासना मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. ब्राह्मो समाजाच्या विश्वस्त आलेखात या उपासना मंदिराचे उद्दिष्ट नमूद करण्यात आले. त्यानुसार या मंदिरात विश्वनिर्माता, रक्षणकर्ता अशा एका शाश्वत, निर्विकार ईश्वराचीच उपासना केली जात असे. तेथे कोणतीही मूर्ती, चित्रे अगर पुतळा असे प्रतीक ठेवण्यास मज्जाव होता. तसेच, पूजा किंवा आहाराच्या निमित्ताने तेथे कोणत्याही जीवाची हत्या केली जात नसे. कोणताही पंथ किंवा व्यक्तीच्या उपासना पद्धतीसंबंधी, मूर्तीसंबंधी तेथे कधी टीका किंवा निंदा व्यक्त होईल असे भाषण केले जात नसे. भूतदया, परोपकार, पावित्र्य, सद्गुणांचा विकास व सर्व धर्मांमध्ये सलोखा वाढेल असाच उपदेश व संवाद येथे केला जात असे.

सार्वत्रिक एक धर्म निर्माण करणे हे ब्राह्मो समाजाचे उद्दिष्ट ठरले होते. जगातील सर्व धर्माचे तुलनात्मक अध्ययन करून राजा राम मोहन रॉय व त्यांच्या मित्रांनी आधुनिक जगाला पवित्र जीवन जगण्याकरता सार्वत्रिक एकच धर्म आवश्यक असल्याचे मत मांडले. सगळे धर्मग्रंथ माणसानेच लिहिले आहेत. मनुष्याच्या मनात स्वार्थ बुद्धी हा दोष आहेच, त्यामुळेच मानवी बुद्धीत सत्य असत्याची गल्लत होत असते. ईश्वर एकच आहे हे सार्वत्रिक धर्माचे मुख्य तत्त्व आहे असे, ते मानत.

ब्राह्मो समाजाची स्थापना केल्यावर प्रत्येक आठवड्याला सामूहिक उपासना सुरू केली. या उपासना कार्यक्रमाचे चार भाग केले होते. वैदिक मंत्राचे पठण, उपनिषदातील वेचक भागांचे वाचन व बंगाली भाषेत त्याचा अनुवाद असे. नंतर त्यावर प्रवचन आणि सामुदायिक संगीतमय भजन असे. या सामुदायिक उपासनेला सुशिक्षित वर्गाकडून उत्तम प्रतिसाद मिळू लागला. हिंदू धर्माला अधिक विशुद्ध स्वरूप देण्याचा हा प्रयत्न होता. त्यामुळे समाजातून समिश्र प्रतिक्रिया व्यक्त होत होत्या. पण ब्राह्मो समाजाच्या वतीने राजा राम मोहन रॉय यांनी मोठ्या जिद्दीने समाजसुधारणा चळवळ उभारली. हिंदू धर्मातील क्रूर व अमानुष अशी सतीची चाल कायद्याने बंद करण्यासाठी ब्रिटिश सरकारला भाग पाडले. त्यामागे ब्राह्मो समाजाची तत्त्वे व विचारधारा होती.

ब्राह्मो समाजाचे मुख्य कार्य सामाजिक आणि धार्मिक सुधारणा करणे हे होते. त्यांनी मूर्तीपूजा, बालविवाह, बहुपत्नीत्त्व, जातीभेद इत्यादी सामाजिक कुप्रथांविरोधात लढा दिला. तसेच विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण आणि सामाजिक समता, इत्यादी सुधारणांना प्रोत्साहन दिले. ब्राह्मो समाजाने त्याच्या कार्यातून १९ व्या शतकात भारतीय समाजात मोठी सुधारणा घडवून आणली. सामाजिक धार्मिक सुधारणांसाठी लोकांना प्रेरणा दिली. त्यामुळे अशा इतर सुधारणावादी चळवळींना चालना मिळाली. एकूणच काय तर ब्राह्मो समाजाचे कार्य भारतीय समाज सुधारणेच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पर्व मानले जाते.

कालांतराने सुमारे १८३० च्या नोव्हेंबर महिन्यात रॉय हे इंग्लंडला गेले. तत्पूर्वी त्यांनी महाराजा रामनाथ टागोर, कालीनाथ मुन्शी आणि स्वतःचा मुलगा राधाप्रसाद यांना ब्राह्मो समाजाचे 'विश्वस्त' म्हणून नेमले. पण दुर्दैव असे की इंग्लंड मुक्कामी असतानाच २७ सप्टेंबर १८३३ मध्ये राजा राम मोहन रॉय यांचा मृत्यू झाला. त्यानंतर काही काळ ब्राह्मो समाजाच्या कार्याला उतरती कळा लागली आणि ब्राह्मो समाजाचे मोठे नुकसान झाले.

ब्राह्मो समाजाचे संस्थापक राजा राम मोहन रॉय होते. परंतु त्यांचे मृत्यूनंतर ब्राह्मो समाजाचे विचार व त्यांचे कार्य यांना नवी दिशा देण्याचे काम हे देवेंद्रनाथ टागोर यांनी केले. तर ब्राह्मो समाजाच्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्याचे काम हे केशवचंद्र सेन यांनी केले. त्यामुळे राजा राम मोहन रॉय यांचे मृत्यूनंतर ब्राह्मो समाज, ब्राह्मो समाजाची शिकवण, त्याचे कार्य, त्याचे महत्त्व व विस्तार याचा अभ्यास करताना महर्षी देवेंद्रनाथ टागोर व केशव चंद्रसेन यांनी ब्राह्मो समाजाद्वारे दिलेल्या त्यांच्याही योगदानाबद्दल चर्चा करणे हे परिपूर्ण ठरेल.

**५. महर्षी देवेंद्रनाथ टागोर (१८१८–१९०५)–**

राजा राम मोहन राय यांचे पश्चात १८४१ साली महर्षी देवेंद्रनाथ टागोर यांनी ब्राह्मो समाजाची धुरा हाती घेतली. त्यांनी ब्राह्मो समाजाची तत्त्वे सांभाळून मूर्तीपूजा, कर्मकांडे, प्रायश्चित्त घेणे, इत्यादीपासून अनुयायांना परावृत्त केले. टागोर यांनी 'तत्वबोधिनी सभा' नावाची संस्था स्थापन केली. प्रारंभी ती ब्राह्मो समाजापासून वेगळी ठेवली. १८४३ मध्ये देवेंद्रनाथांचे मित्र अक्षयकुमार दत्त यांनी 'तत्त्वबोधिनी पत्रिका' नावाचे नियतकालिक सुरू केले. तत्त्वबोधिनी पत्रिकेने बंगाली गद्याला मोठी प्रसिद्धी दिली. त्यानंतर देवेंद्रनाथ यांनी ब्राह्मो समाजाचे प्रचारक शिकवून तयार करण्यासाठी 'तत्त्वबोधिनी पाठशाळा' स्थापन केली. ख्रिस्ती धर्म प्रसारकांना पायबंद घालणे हा त्यामागे हेतू होता. १८४३ मध्ये रामचंद्र विद्यावागिश यांना समाजाचे आचार्य म्हणून नियुक्त केले. देवेंद्रनाथांनी ब्राह्मो समाजाच्या सदस्यांना बंधनकारक अशी नियमावली तयार केली. त्यात मूर्तीपूजेला बंदी होती. त्यामुळे त्यांना गृहत्याग करावा लागला होता. देवेंद्रनाथ यांनी तयार केलेले प्रचारक पंजाब ते बंगाल पर्यंतची प्रमुख शहरे, तीर्थस्थाने या ठिकाणी नेहमी ब्राह्मो समाजाच्या प्रचारासाठी जात असत. अशा प्रकारे ब्राह्मो समाजाचे आंदोलन गतिशील होत गेले. दरम्यान १८५७ मध्ये केशवचंद्र हा तरुण ब्राह्मो समाजास येऊन मिळाला. त्यानंतर ब्राह्मो समाजास एक नवी दिशा मिळाली. त्यामुळे त्यांच्या कार्याची चर्चा करणे आवश्यक आहे.

**६. केशवचंद्र सेन (१८३८–१८८४) व ब्राह्मो समाजातील पहिली फूट–**

केशवचंद्र सेन यांनी ब्राह्मो समाजात प्रवेश केल्यानंतर प्रारंभी ते काही काळासाठी देवेंद्रनाथांचे उजवे हात बनले. प्रत्येक कार्यात देवेंद्रनाथांना त्यांचे चांगले सहकार्य असे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे या समाजाला नवी दिशा मिळाली. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वामुळे व उदारमतवादी विचारांमुळे हा समाज अधिक लोकप्रिय झाला. त्यांनी आंतरजातीय व विधवा विवाहाचा पुरस्कार केला. मात्र कालांतराने दोघांमध्ये तत्कालीन सामाजिक प्रश्नांबाबत 'ब्राह्मो समाजाचा दृष्टिकोन कसा असावा' यावरून तीव्र मतभेद निर्माण झाले. त्यातूनच ब्राह्मो समाजात पहिली फूट पडली. या मतभेदांमुळे केशवचंद्र सेन यांचा गट ब्राह्मो समाजातून बाहेर पडला. मूळच्या गटाला 'आदि ब्राह्मो समाज' असे नाव पडले. तर १८६६ मध्ये नवीन 'भारतीय ब्राह्मो समाज' किंवा 'नवविधान' ची स्थापना केली.

केशवचंद्र सेन यांनी ब्राह्मो समाजाची शिकवण भारताच्या इतर प्रदेशात पसरविण्याचा प्रयत्न केला. केशवचंद्रांनी आंतरजातीय विवाह व विधवा विवाह यास प्रोत्साहन देणे, बालविवाहास विरोध करणे, स्त्री मुक्ती, शिक्षण प्रसार व मद्यपान निषेध इत्यादी कार्यक्रमावर भर दिला. त्यांनी समाज सुधारणेच्या सर्वसमावेशक पद्धतींचा अवलंब केला. त्यांनी १८७० मध्ये 'इंडियन रिफॉर्म असोसिएशन'ची स्थापना केली. ज्याचा उद्देश सामाजिक आणि नैतिक सुधारणा हा होता. त्यांनी ब्रिटिश सरकारला 'नेटिव्ह मॅरेज ॲक्ट १८७२' संमत

करण्यासाठी भाग पाडले. या कायद्याने ब्राह्मो विवाहास संमती देऊन विवाहाचे संमती वय मुलासाठी १८ आणि मुलीसाठी १४ वर्षे इतके करण्यात आले.

ब्राम्हो समाज चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून त्यांनी सामाजिक सुधारणा, साक्षरता आणि शिक्षणाचे समर्थन केले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा पाया रचला गेला. त्यातून त्यांनी भारतीय राष्ट्रवादाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**७.ब्राह्मो समाजातील दुसरी फूट –**

ब्राह्मो समाजाचे असे सर्वसमावेशक कार्य चालू असतानाच १८७८ मध्ये या समाजात दुसरी फूट पडली. केशवचंद्र सेन यांच्या अनुयायांचा एक गट आनंदमोहन बोस व शिवनाथ शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली बाहेर पडला. त्यांनी साधारण ब्राह्मो समाजाची स्थापना केली. या फुटीची कारणे म्हणजे ब्राह्मो समाजाच्या व्यवस्थापनाचा प्रश्न आणि सेन यांनी १८७२ च्या कायद्याचे केलेले उल्लंघन ही होती. सेन यांनी आपल्या ज्येष्ठ मुलीचा विवाह कुच बिहारच्या राजाशी केला होता. मात्र त्या दोघांनीही संमती वय पार केलेले नव्हते. साधारण ब्राह्मो समाजाने सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक कार्य हाती घेतले. बालविवाह व पडदा पद्धतीला विरोध केला. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.

अशा प्रकारे १८२८ ला स्थापन झालेल्या ब्राह्मो समाजाने व नंतर स्थापन झालेल्या त्यांच्या इतर संस्थांनी भारतीय समाज सुधारणेच्या चळवळीत मोलाची भर घातली आहे.

**राजा राम मोहन रॉय यांचे विदेशातील कार्य:**

राजा राम मोहन रॉय यांनी विदेशात फारसे कार्य केले नसले तरी त्यांनी समाज सुधारणेच्या उदात्त हेतूने काही युरोप दौरे केले आहेत. त्यामागे त्यांचे दोन हेतू होते.

१) भारतीय सुधारणांच्या विचारांचा प्रसार करणे.

२) ब्रिटिश शासनाकडे भारतीयांच्या न्याय्य हक्कांच्या मागण्या मांडणे.

भारतीयांच्या समस्या आणि सामाजिक सुधारणांची गरज ब्रिटिश शासनासमोर रॉय यांनी ठामपणे मांडली. इंग्लंडमध्ये त्यांनी सती प्रथेविरोधात जोरदार मोहीम चालविली. त्यांनी भारतीय जनतेचे प्रतिनिधी म्हणून काम पाहत असताना ब्रिटिशांकडे भारतीयांसाठी न्याय मागितला. शिक्षण आणि सामाजिक सुधारणांच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. त्यांनी पाश्चात्य जगाला भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञानाचे महत्त्व समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. इंग्लंडमध्ये ते युनिटेरियन मंडळींशी विशेषतः डॉ.लँट कारपेंटर आणि जेरेमी बँथम यांच्याशी घनिष्ठ संपर्कात होते. बँथम यांनी त्यांना 'अत्यंत आदरणीय सहकारी' म्हणून संबोधले. राजा राम मोहन रॉय हे १८३० मध्ये मुघल सम्राट दुसरा अकबर (१८०६ ते १८६७) यांचे वकील म्हणून इंग्लंडला गेले होते. त्यांनी ब्रिटिशांना मुघल शासकाचे पेन्शन व इतर अधिकार वाढविण्यासाठी विनंती केली. ते मुघल सम्राटाचे मानधन ३०००० पौंड एवढे वाढविण्यात यशस्वी झाले. त्याचवेळी इंग्लंडमध्ये ब्रिटिश शासकांकरवी मुघल सम्राट अकबर दुसरा यांनी राम मोहन रॉय यांना 'राजा' ही पदवी देऊन सन्मानित केले. अशा प्रकारे राजा राम मोहन रॉय यांनी इंग्लंडमध्ये भारतीयांच्या न्याय्यहक्कांचे समर्थन केल्याचे दिसते.

**राजा राम मोहन रॉय यांचा मृत्यू:**

राजा राम मोहन रॉय हे मुघल सम्राटाचे राजदूत म्हणून काम पाहत होते. यांचे 'दूत' म्हणून ते इंग्लंडला गेले होते. सप्टेंबर १८३३ च्या सुरुवातीला ते त्यांचे युनिटेरियन मित्र डॉ. लँट कारपेंटर यांना भेटण्यासाठी 'ब्रिस्टल' ला गेले. समाजसुधारणा व धार्मिक सुधारणा यांवर ते त्यांच्याशी चर्चा करत. तेथे त्यांनी त्यांची मुलगी आणि भावी समाज सुधारक मेरी कारपेंटर यांच्यावर आपल्या विचारांची छाप पाडली. सप्टेंबरच्या मध्यात ते आजारी पडले आणि त्यांना मेंदूज्वर (Meningitis) चे निदान झाले. या आजारानेच ब्रिस्टल येथे सप्टेंबर २७ सप्टेंबर १८३३ रोजी राजा राम मोहन रॉय यांचा मृत्यू झाला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. २० ऑगस्ट १८२८ रोजी राजा राम मोहन रॉय यांनी........... ची स्थापना केली.

अ) आत्मीय सभा ब) युनिटेरियन कमिटी

क) ब्राह्मो समाज ड) आर्य समाज

२. १८६६ मध्ये......... यांनी भारतीय ब्राह्मो समाजाची स्थापना केली.

अ) रासबिहारी बोस ब) आनंद मोहन बोस

क) केशवचंद्र सेन ड) राजा राम मोहन रॉय

३. ............... यांनी ऽसिव्हिल मॅरेज ॲक्ट चा भंग केला.

अ) देवेंद्रनाथ टागोर ब) उमेशचंद्र दत्त

क) शिवदत्त चंद्र ड) केशवचंद्र सेन

४. राजा राम मोहन रॉय यांना 'राजा' ही पदवी ................. यांनी दिली.

अ) औरंगजेब ब) मुघल सम्राट अकबर दुसरा

क) जहांगीर ड) बाबर

५. राजा राम मोहन रॉय यांना ............ म्हणून ओळखले जाते.

अ) वृत्तपत्राचे जनक ब)असंतोषाचे जनक

क) भारतीय समाज प्रबोधनाचे जनक ड) पहिले क्रांतिकारी

**१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ:**

१. प्रबोधन– प्रबोधन म्हणजे समाजातील रूढीवादी विचार आणि कल्पनांना आव्हान देऊन नवीन विचार आणि ज्ञानाचा स्वीकार करणे.

२. वेद– वेद म्हणजे भारतीय हिंदू संस्कृतीमधील अत्यंत महत्त्वाचे आणि प्राचीन धार्मिक ग्रंथ. 'वेद' या शब्दाचा अर्थ ज्ञान किंवा विद्या होय! उदा: ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद.

३. उपनिषदे- उपनिषदे म्हणजे 'जवळ बसून मिळवलेले ज्ञान' किंवा 'गुरूजवळ बसून प्राप्त केलेले ज्ञान' उपनिषदे वेदांच्या शेवटच्या भागात आढळतात आणि ती भारतीय तत्त्वज्ञानाची महत्त्वपूर्ण पुस्तके आहेत. त्यांना वेदांत असेही म्हणतात.

४. तत्त्वज्ञान- तत्त्वज्ञान म्हणजे 'ज्ञानशास्त्र'. तत्त्वज्ञान आपल्याला जगाला आणि अस्तित्वाला विविध दृष्टिकोनातून पाहण्यासाठी प्रोत्साहित करते. तत्त्वज्ञान हे अस्तित्व, ज्ञान, सत्य, नैतिक विचार आणि मानवी अस्तित्वासारख्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करते.

५. उदारमतवादी- उदारमतवादी म्हणजे ज्या व्यक्ती किंवा विचारसरणी लोकांचे वैयक्तिक अधिकार आणि स्वातंत्र्य यांचा आग्रह धरतात त्या व्यक्ती किंवा विचारसरणी उदारमतवादी असतात. त्यात कायद्याचे राज्य, भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य आणि खाजगी मालमत्तेचे संरक्षण यासारख्या गोष्टींचा समावेश असतो.

६. स्त्रियांचे मुलकी हक्क- यामध्ये स्त्रियांच्या जमिनीवरील आणि मालमत्तेवरील कायदेशीर अधिकार यांचा समावेश होतो. तसेच यामध्ये वडीलोपार्जित संपत्तीतील वाटा, स्वतःच्या कमाईतून घेतलेली मालमत्ता आणि इतर कोणताही प्रकारे मिळालेली मालमत्ता यांचा समावेश होतो.

७. एकेश्वरवाद- एकाच देवावर विश्वास ठेवणे; म्हणजे जगात फक्त एकच देव आहे आणि त्याची पूजा केली पाहिजे असे मानणे.

८. नास्तिक- ईश्वर किंवा देव अस्तित्वात आहे, त्यावर विश्वास नसलेली व्यक्ती, वेद प्रामण्य न मानणारे ग्रंथ व व्यक्ती वेनांना न मानणाऱ्या व्यक्ती.

९. नागरी हक्क- नागरिकांना (व्यक्तींना) त्यांच्या देशात आणि समाजात समान संधी व संरक्षण मिळवण्याचा हक्क. यामध्ये भेदभाव, अन्याय न करता कायद्यासमोर समानता, जगण्याचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार. विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य. सामाजिक तसेच राजकीय जीवनात सहभागी होण्याचा अधिकार यांचा समावेश होतो.

१०. बायबल (नवीन करार)- बायबल मधील 'नवा करार' म्हणजे ख्रिस्ती लोकांच्या पवित्र शास्त्राचा दुसरा भाग. यामध्ये येशू ख्रिस्ताच्या जीवनाबद्दल शिकवणीबद्दल आणि ख्रिस्ती धर्माच्या सुरुवातीच्या इतिहासाबद्दल सांगितले आहे.

**१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.**

**स्वयं अध्ययन प्रश्न -१ ची उत्तरे-**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. ब- किशोरीचंद मित्र

२. क- ब्रजेंद्रनाथ बंडोपाध्याय

३. अ- २२ मे १७७२

४. ड- मुघल

५. ब-जॉन डिग्बी

**स्वयं अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे–**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. ब–१८१५

२. अ– लॉर्ड विल्यम बेंटिक

३. अ– राजा राम मोहन रॉय

४. अ– राजा राम मोहन रॉय

५. ड– संवाद कौमुदी

**स्वयं अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे–**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. क–ब्राह्मो समाज

२. क–केशवचंद्र सेन

३. अ–देवेंद्रनाथ टागोर

४. ब–मुघल सम्राट अकबर दुसरा

५. क–भारतीय समाज प्रबोधनाचे जनक

**१.५ सारांश:**

भारतात १९ व्या शतकापर्यंतची सामाजिक परिस्थिती पाहिली तर असे लक्षात येते की, १९ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत येथे अनेक प्रकारच्या सामाजिक व धार्मिक अनिष्ट प्रथा, परंपरा प्रचलित होत्या. धर्माचा पगडा लोकांच्या मनावर खोलवर रुजला होता. धार्मिक कर्मकांडे, अंधश्रद्धा, बहुदेवतावाद, अवतारवाद, चमत्कार इत्यादींवर लोकांचा विश्वास होता. सामाजिक जीवनात जातीभेद, बालविवाह, पडदा पद्धत, विधवा विवाह बंदी, सती प्रथा इत्यादी प्रथांचे ठळकपणे अस्तित्व जाणवत होते. अशा परिस्थितीत पाश्चात्य शिक्षणाने प्रेरित होऊन शिक्षित झालेल्या एका वर्गाने समाजात आशेचा किरण दाखविण्याचे काम केले. त्यातून अनेक समाजसुधारकांचा उदय झाला. त्यातीलच अग्रणी समाज सुधारक म्हणजे ‘राजा राम मोहन रॉय’ होय!

राजा राम मोहन रॉय यांनी १९ व्या शतकाच्या प्रारंभी सामाजिक व धार्मिक व्यवस्थेतील गुणदोष ओळखून आपला भारतीय समाज व धर्म दोषमुक्त करण्याची मोहीम हाती घेतली. त्यांनी ग्रीक, हिब्रू, संस्कृत, इंग्रजी, बंगाली, अरबी, फारशी, फ्रेंच इत्यादी भाषेचे शिक्षण घेतले होते. त्यामुळे त्यांनी सर्व भाषातील धर्मग्रंथ व लेखन यांचे वाचन केले. त्यांनी सर्व धर्मांचा अभ्यास करून त्यातील समान तत्त्वे व ईश्वर एकच आहे हे धर्माचे सार जगासमोर आणले. म्हणूनच त्यांना ‘धर्माच्या तौलनिक अभ्यासाचे जनक’ म्हटले जाते.

त्यांनी समाजातील सतीसारख्या क्रूर प्रथेवर प्रचंड हल्ला चढवून ती कायद्याने बंद करण्यास सरकारला भाग पाडले. तसेच इतर अनेक सामाजिक कुप्रथांचे उदा. बालविवाह, विधवा विवाह बंदी, बहुपत्नीत्त्व इत्यादींचा निषेध केला. त्यांनी महिला शिक्षणाचा आग्रह धरला. त्यांनी पिता व पती यांच्या संपत्तीतील

महिलांच्या हक्कासाठी लढा दिला. त्यांनी आत्मसभा, ब्राह्मो समाज या संस्थांच्या माध्यमातून आपल्या सहकाऱ्यांच्या सोबत अनेक सामाजिक व धार्मिक सुधारणांचा पाया रचला. म्हणूनच त्यांना 'भारतीय समाज प्रबोधनाचे जनक' म्हटले जाते.

राजा राम मोहन रॉय यांनी तत्कालीन विविध समस्या विषयांवर महत्त्वपूर्ण लेख आणि पुस्तके लिहून प्रकाशित केली. वेगवेगळ्या भाषांमधील त्यांच्या लिखाणामुळे त्यांची लेखन शैली समृद्ध झालेली दिसते. या लिखाणाद्वारे त्यांनी अनेक सामाजिक, धार्मिक व न्याय हक्क प्रश्नांना वाचा फोडली. त्यांनी वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्याचा आग्रह धरला. त्यांनी बंगाली, फारशी व इंग्रजी भाषेतील वर्तमानपत्रे सुरू केली. म्हणून त्यांना 'वर्तमानपत्रांच्या चळवळीचे अग्रणी' असेही म्हणतात. या वर्तमानपत्राद्वारे त्यांनी ब्रिटिशांच्या जुलमी कारभाराविरोधी त्यांना जाब विचारण्याचे धाडसी काम केले.

राजा राम मोहन रॉय हे स्वतः पाश्चात्य शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. तसेच भारतीय पारंपरिक ज्ञानाचे महत्त्वही ते जाणत होते म्हणूनच त्यांनी तरुण वर्गाला सहजपणे शिक्षण घेता येतील अशी महाविद्यालये स्थापन केली. तेथे त्यांनी पारंपारिक आणि पाश्चात्य शिक्षणाची सांगड घालून अभ्यासक्रम तयार करून शिकविण्यावर भर दिला. म्हणजे आज आपण २१ व्या शतकात '२०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात' जी पारंपारिक ज्ञान प्रणाली शिकतो, ती त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी अवलंबिली होती. त्यातूनच त्यांची दूरदृष्टी स्पष्ट होते.

राजा राम मोहन रॉय यांनी इंग्लंड व फ्रान्स या देशांचे दौरे केले होते. इंग्लंडमध्ये मुघल सम्राटचे 'राजदूत' म्हणून गेले असताना त्यांनी मुघल शासकांचा भत्ता वाढविण्याची यशस्वी कामगिरी केली. तसेच तेथील ब्रिटिशांसमोर त्यांनी भारतीयांच्या न्याय हक्कांसाठी मागणी केली. भारतीयांचा प्रतिनिधी म्हणून तेथील सामाजिक सुधारणांच्या विचारांचा प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यामुळे तेथील काही युनिटेरियन विचारांचे लोक रॉय यांचे चांगले सहकारी बनले.

राजा राम मोहन रॉय यांनी जाचक ब्रिटिश राजवटीत जिथे ब्रिटिशांविरोधात एक शब्द काढणेही अशक्य होते, अशा परिस्थितीत त्यांच्या विरोधात आपल्या भाषणातून, लेखनातून व कृतीतून आवाज उठविला. धार्मिक शुद्धीकरणाची चळवळ बळकट केली. सामाजिक प्रश्नांवर वेळोवेळी आवाज उठविण्यास लोकांना प्रवृत्त केले. म्हणजे एका अर्थाने ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे जनकही होते. कारण ब्राह्मो समाजाने जे कार्य केले त्याचा परिणाम म्हणजे नंतरच्या काळातील भारतातील सामाजिक व धार्मिक चळवळींचा उदय होय.

अशा हुशार, व्यासंगी, तात्विक विचारसरणी, दूरदृष्टी असणाऱ्या अग्रणी समाजसुधारकाचा मृत्यू इंग्लंड मधील ब्रिस्टल येथे झाला. तिथे लोकांनी त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे स्मारक उभारले आहे आणि प्रत्येक वर्षी त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना अभिवादन केले जाते. अशा या महान व्यक्तीचे विचार व कार्य हे तत्कालीन समाजाचा विचार करता खूपच धाडसाचे, पुरोगामी व विज्ञाननिष्ठ होते. म्हणूनच त्यांना भारतातील सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक सुधारणांचा अग्रदूत म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

**१.६ सरावासाठी स्वाध्याय:**

**अ) टिपा लिहा.**

१) राजा राम मोहन रॉय यांचे सामाजिक व धार्मिक विचार

२) आत्मीय सभा

३) ब्राम्हो समाज

४) केशवचंद्र सेन

५) देवेंद्रनाथ टागोर

६) संवाद कौमुदी

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) राजा राम मोहन रॉय यांनी कोणत्या सुधारणांचा आग्रह धरला?

२) राजा राम मोहन रॉय यांचे लिखाण.

३) राजा राम मोहन रॉय यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान.

४) वैचारिक मतभेदातून ब्राह्मो समाजात कशा प्रकारे फूट पडली?

५) ब्राह्मो समाजाची तत्त्वे आणि उद्दिष्टे स्पष्ट करा.

६) राजा राम मोहन रॉय यांनी सती प्रथा बंदीसाठी कोणते प्रयत्न केले?

७) राजा राम मोहन रॉय यांच्या विदेशातील कार्याची चर्चा करा.

८) राजा राम मोहन रॉय यांनी आपल्या पत्रकारितेतून कशाप्रकारे समाज जागृती केली ते सांगा.

**क) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) राजा राम मोहन रॉय यांनी कोणत्या सामाजिक व धार्मिक सुधारणांसाठी आग्रह धरला ते स्पष्ट करा.

२) राजा राम मोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून केलेल्या कार्याचा आढावा घ्या.

३) राजा राम मोहन रॉय यांनी आपल्या लिखाणातून कशाप्रकारे समाज प्रबोधन घडवून आणले?

४) राजा राम मोहन रॉय यांचे शैक्षणिक कार्य सांगा.

५) राजा राम मोहन रॉय यांना 'भारतीय समाज प्रबोधनाचे जनक' का म्हटले जाते ते स्पष्ट करा.

**१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके–**


१. पांचाळ घ. ना., महापुरुषांचे वाचन वेड, अथर्व पब्लिकेशन, जळगाव, (द्वितीय आवृत्ती), १८ मार्च २०२०.

२. बोधनकर, पात्रीकर, राजा राम मोहन रॉय: व्यक्ती आणि कार्य, विजय प्रकाशन, नागपूर, २००६.

३. ग्रोवर बी. एल., बेल्हेकर एन. के. आधुनिक भारताचा इतिहास एक नवीन मूल्यांकन, एस. चांद.

४. कवी माधवी, साठ महामानव, विद्याभारती प्रकाशन पा. नं. ३०-३२.

५. कुरकुरे एल. बी., राजा राम मोहन रॉय, साकेत प्रकाशन, २००९.

6. Sharma H. D., Raja Ram Mohan Roy, The Renaissance Man, Rupa and Company.
7. Sarakar Hemachandra,(edi.),The Life and Letters of Raja Ram Mohan Roy,1914.
8. Kenneth W. Jones, Socio-religious reform movements in British India, Cambridge University Press, 1994.
9. David Kopf, The Brahmo Samaj and the Shaping of the Modern Indian Mind, Princeton, 1979.
10. Ganachari A. G., Nationalism and Social Reform in a Colonial Situation, Kalpaze, Publication, New Delhi, 2005.
11. Amiya P. Sen, Social and Religious Reform, Oxford University Press, 2005.
12. https://www.britanica.com
13. https://vishwakosh.marathi.gov.in
14. https://hritambhara.com
15. https://en.wikipedia.org
16. https://education.vikaspedia.in - A government of India
17. https://www.prabhatkhabar.com

❑❑❑

### घटक–२

# स्वामी दयानंद सरस्वती (२२ मे १७७२ ते २७ सप्टेंबर १८३३)

# (Swami Dayanand Saraswati)

अ. सुरुवातीचे दिवस (Early Days)

ब. आर्य समाज (Arya Samaj)

क. सत्यार्थ प्रकाश (Satyarth Prakash)

**अनुक्रमणिका :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ सुरुवातीचे दिवस

  २.२.२ आर्य समाज

  २.२.३ सत्यार्थ प्रकाश

२.३ सारांश

२.४ परिभाषिक शब्द

२.५ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

..............................................................................................................

**२.० उद्दिष्टे**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील उद्दिष्टे सांगता येतील.

१. स्वामी दयानंद सरस्वती यांचे सुरूवातीचे दिवस समजून घेता येतील.

२. स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाची माहिती सांगता येईल.

३. आर्य समाजाच्या योगदानाचे आकलन होईल.

४. स्वामी दयानंद सरस्वती यांनी लिहिलेल्या सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचे महत्व स्पष्ट करता येईल.

**२.१ प्रास्ताविक:**

एकोणिसावे शतक हे भारतासाठी एक परिवर्तनाचे युग होते.एकोणिसाव्या शतकात भारतात अनेक सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक बदल घडून आले. हे शतक आधुनिक भारताचा पाया रचणारे ठरले. या शतकात भारतीय समाजाच्या वैचारिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात मोठे परिवर्तन घडले. एकोणिसाव्ये शतक हे भारताच्या समाजिक व धार्मिक प्रबोधनाचे सुर्वणयुग मानले जाते. या शतकात भारतात

सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींची एक मोठी लाट निर्माण झाली. या प्रबोधनामुळे समाज समतावादी, प्रगत आणि जागरूक बनला. समाजातील सर्व घटकांना समान मानण्याचा विचार रुजवला. आधुनिक व प्रगत भारत घडवण्यामध्ये समाज सुधारणा चळवळींचे योगदान मोठे आहे. एकोणिसाव्या शतकाची सुरुवात हा भारतीय नवविचारांचा आरंभबिंदू होय! भारतामध्ये एकोणिसाव्या शतकात आधुनिक विचारप्रवाहाची सुरुवात झाली. पाश्चिमात्यांच्या संपर्कामुळे प्रबोधनाची सुरूवात होऊन बुद्धीवादी दृष्टिकोन भारतीय समाजात निर्माण झाला. त्यामुळे सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीला गती मिळाली. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय तरुणांना उदारमतवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, समानता या तत्त्वाचे ज्ञान मिळाले.भारताच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक जीवनात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे कार्य या शतकाने केले. आपल्या समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीप्रथा, रुढी-परंपरा, बालविवाह, बालहत्या, बहुपत्नीत्त्व, सतीप्रथा, केशवपन या सारख्या अनिष्ट प्रथा परंपरांनी भारतीय समाज जीवनात थैमान घातले होते. धार्मिक जीवनामध्ये तंत्र-मंत्र, जादुटोणा, उपवास-तापास, चेटूक, नवस, भूतपिशाच्च विद्या यांना महत्त्व प्राप्त झाले होते. या अनिष्ट प्रथा, परंपरा दूर सारून भारतीय समाजाला मूळ धर्म तत्त्वाची ओळख करून देताना त्यांच्यामध्ये उदारमतवादी, भौतिकवाद, बुद्धिप्रामाण्यावादी विचारांच्या आधारे भारतीय समाजाला गतिमान बनविण्याची आवश्यकता समाजसुधारकांना वाटू लागली. सामाजिक व धार्मिक चळवळींमुळे भारतीय समाजात नवा विचार, प्रबोधन, आणि सुधारणांचा उदय झाला. या समाजसुधारकांनी विविध संस्था व संघटना स्थापन करून भारतीय समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. एकोणिसाव्या शतकात भारतीय सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीला वेग आला. यातून खऱ्या अर्थाने भारतात सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक प्रबोधनाला सुरुवात झाली. या समाज सुधारणा चळवळीमुळे भारतीय जीवनामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून नवचैतन्य निर्माण झाले. यामध्ये स्वामी दयानंद सरस्वती या समाज सुधारकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारतीय प्रबोधन चळवळीला १९ व्या शतकामध्ये व्यापक लोकसंग्रह मिळवून देण्यामध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. या लोकसंग्रहातुनच भारतीयांमध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. भारतीय लोक संघटित झाल्याशिवाय या देशात खऱ्या सामाजिक सुधारणा होऊ शकणार नाहीत, हे त्यांनी ओळखले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी आध्यात्मिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. समाजसेवेची तळमळ व सतत ज्ञानाचा शोध यातून त्यांनी स्वतःचा व्यापक दृष्टिकोन तयार केला. समाजसुधारणेच्या संदर्भात काम करताना आर्य समाजाने भारतीय राष्ट्रवादाची प्रभावी बांधणी केली.

### २.२.विषय विवेचन:

### २.२.१ सुरुवातीचे दिवस (Early Days)

**प्रस्तावना:** स्वामी दयानंद सरस्वती हे १९ व्या शतकातील एक महान समाजसुधारक होत! भारताच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींमध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांचे कार्य श्रेष्ठ आहे. पाश्चिमात्यांचे धर्म, आचार, विचार हे श्रेष्ठ नसून आमच्या भारतीय संस्कृतीतील धर्म, आचार, विचार त्याहुन श्रेष्ठ आहेत, हे भारतीय समाजाला पटवून देण्याचे महान कार्य स्वामी दयानंद सरस्वती यांनी केले. भारताच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीतील आर्य समाज ही संस्था महत्त्वाची मानली जाते. आर्य समाजाने स्वदेश व स्वधर्म या विषयीच्या तत्त्वांना नवसंजीवनी देण्याचे महान कार्य केले. प्राचीन भारतीय संस्कृती विषयी निर्माण झालेली अनास्था व उदासीनता दूर करून त्याविषयी अभिमान जागृत केला. स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाज यांनी हिंदू धर्माचे पुनरूज्जीवन केले. हिंदू संस्कृतीची महानता जगाला दाखवून दिली. वैदिक काळात

भारतीय संस्कृती प्रगत आवस्थेत होती. ते तत्त्वज्ञान स्वामी दयानंद सरस्वती यांनी समाजासमोर आणले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाच्या माध्यमातून भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे कार्य अविरतपणे केले. त्यांच्या विचारांनी भारतीय समाजात नवे प्रबोधन युग सुरू झाले.

**जन्म व बालपण:**

स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८२४ रोजी गुजरात मधील काठेवाड प्रांतातील मोरवी संस्थानातील टंकारा या छोट्याशा गावी एका ब्राम्हण कुटुंबात झाला. स्वामी दयानंद सरस्वती यांचे खरे नाव 'मूळशंकर' असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव करशनजी लालजी तिवारी आणि आईचे नाव यशोदादेवी होते. त्यांचे वडील एक धर्मनिष्ठ ब्राम्हण होते. ते अंबाशंकर म्हणून ओळखले जात. त्यांचे वडिल अंबाशंकर हे धार्मिक व सनातनी वृत्तीचे होते. त्यांच्या घराण्याचे दैवत शिव हे होते. यशोदादेवी म्हणजे करशनजी लालजी तिवारी यांच्या पत्नी आणि स्वामी दयानंद सरस्वतींच्या आई होत! यशोदाबाई ह्या एक धर्मपरायणवादी स्त्री होत्या. त्यांचा संसार धार्मिक मूल्यांनी आणि संस्कारांनी परिपूर्ण होता.

यशोदादेवी यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणावर आणि संस्कारांवर विशेष लक्ष दिले. त्यांनी आपल्या घरात धार्मिक व सदाचाराचे वातावरण तयार केले होते. त्यांच्या संस्कारामुळे आणि प्रेमामुळे स्वामी दयानंद सरस्वती यांनी आपल्या जीवनातील अंधश्रद्धा आणि चुकीच्या प्रथांपासून दूर राहून सुधारणा चळवळीस सुरुवात केली. त्यांनी आपल्या मुलांना योग्य संस्कार आणि मूल्येही दिली. त्यामुळे त्यांनी समाज सुधारण्याचा मार्ग अवलंबला. यशोदादेवी यांचे धार्मिक संस्कार आणि सदाचाराचे पालन त्यांच्या कुटुंबात व समाजात आदराची भूमिका बजावणारे होते.त्यांच्या संस्कारामुळे त्यांच्या मुलाने समाजातील अनेक चांगली कामे केली.

अंबाशंकर हे शिवभक्त होते. घरामध्ये धार्मिक संस्काराचे वातावरण होते. संपुर्ण कुटुंबाचे जीवन श्रध्दा, कर्मकांड व परंपरांच्या पालनावर आधारित होते. या वातावरणात मूळशंकर लहाणाचे मोठे झाले. लहाणपणी त्यांना धर्माचे व संस्कृतीचे शिक्षण मिळाले. ते बालपणापासूनच अत्यंत बुद्धिमान, जिज्ञासू आणि अभ्यासू होते. स्वामी दयानंद सरस्वती यांचे बालपण खूपच धार्मिक आणि शिस्तबद्ध वातावरणात गेले. त्यांच्या वडिलांनी त्यांना लहानपनापासून संस्कृत, वेद, पुराणे, व्रत, विधी यांचे शिक्षण दिले. त्यामुळे मूळशंकर लहाणपणापासून धार्मिक विधी आणि वेदाध्ययनात रस घेऊ लागले. वयाच्या सातव्या वर्षी त्यांचे उपनयन संस्कार झाले. त्यानंतर त्यांनी नियमित वेदपाठ, संध्या, पूजा व इतर धार्मिक विधी करणे सुरू केले.

करशनजी लालजी तिवारी हे मोरबी संस्थानात कर-कलेक्टर म्हणून कार्यरत होते. त्यांना धर्म, संस्कृती आणि वैदिक परंपरेचा अभिमान होता. करशनजी लालजी तिवारी हे आपल्या पुत्रासाठी प्रेरणास्थान होते. त्यांनी स्वामी दयानंद सरस्वती यांच्यामध्ये धर्मनिष्ठा, शिस्त, आणि सत्याच्या शोधाची बीजे रोवली, त्यांचा प्रभाव भारतीय समाजावर शतकानुशतके राहणार आहे. करशनजी लालजी तिवारी हे एक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी भारतीय सामाजिक आणि धार्मिक इतिहासावर महत्त्वाचा ठसा उमटविला. ते हिंदू सुधारक म्हणून प्रसिद्ध आहेत. करशनजी लालजी तिवारी यांची जीवनशैली, संस्कार आणि विचार त्यांच्या मुलाच्या व्यक्तिमत्त्वावर आणि कार्यावर खोल प्रभाव टाकणारी ठरली. त्यांचा संसार साधा आणि धार्मिक मूल्यांनी परिपूर्ण होता. त्यांच्या घरात संस्कृती आणि परंपरेचे पालन मोठ्या मनाने केले जात असे. करशनजी लालजी तिवारी यांनी मुलाच्या शिक्षणाला आणि संस्काराला विशेष प्राधान्य दिले. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मूळशंकर यांना वेद आणि शास्त्रांचे सखोल ज्ञान मिळाले. करशनजींच्या धर्मदृष्टीनुसार, मूर्तीपूजा, अंधश्रद्धा

आणि अनेक चुकीच्या धार्मिक प्रथा यांचा निषेध करणे आवश्यक होते. या विचारांनी पुढे स्वामी दयानंद यांनी आर्यसमाज स्थापन केला. जो हिंदू समाजातील सुधारणा आणि प्रबोधनासाठी कार्यरत आहे.

**महाशिवरात्रीचा प्रसंग/जीवनाला कलाटणी देणारी घटना:**

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या वयाच्या १४ वर्षी त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली. महाशिवरात्रीच्या दिवशी मूळशंकर आपल्या वडिलांसोबत रात्रीच्या वेळी शिवाची उपासना करण्यासाठी शिव मंदिरात गेले. ते प्रसन्न मनाने व एकाग्रतेने देवाची उपासना करण्यात मंग्न होते. पिंडीकडे पाहिले असता त्यांना विचित्र चित्र दिसले. महादेवाच्या पिंडीवर उंदीर फिरत असताना देवापुढील नैवेद्य खात असल्याचे त्यांना दिसून आले. हा प्रसंग त्यांच्या आयष्यात फार निर्णायक ठरला. हे दृश्य पाहून मूर्तिपूजेबद्दल त्यांच्या मनात शंका निर्माण झाली. मूर्तिमध्ये परमेश्वर नाही, मूर्तिपूजा योग्य नाही, असे त्यांना वाटू लागले. आपल्या शंकेचे निवारण करण्यासाठी त्यांनी वडिलांना अनेक प्रश्न विचारले परंतु त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही. जर ही मूर्तीत देव असेल तर ती उदरांपासून स्वतःचे संरक्षण का करू शकत नाही. यामुळे त्यांच्या मनामध्ये देव, मूर्ती, पूजा आणि कर्मकांड, अंधश्रद्धा या विषयी शंका निर्माण झाली. यातून त्यांनी अंधश्रद्धा, रुढी, प्रथा, परंपरा आणि कर्मकांडांवर प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. मूळशंकर यांनी लहान वयातच विवेक, तर्क, आणि सत्याचा शोध घेण्याची वृत्ती स्विकारली. वैदिक तत्त्वज्ञानाच्या आधारे नवा सामाजिक आणि धार्मिक विचार मांडला. स्वामी दयानंद सरस्वती यांचे लहाणपण व पार्श्वभूमी हे त्यांच्या आयुष्यातील सर्वात निर्णायक आणि प्रेरणादायी टप्पे आहेत. त्यांच्या बालवयातच जो सत्याचा शोध, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि अंधश्रद्धेविरुद्धचा बंडखोर स्वभाव यामुळेच त्यांच्याकडून महान कार्य घडून आले. कॉलरामुळे त्यांच्या धाकट्या बहिणीचा आणि काकांचा मृत्यू झाल्यामुळे दयानंद सरस्वती यांनी जीवन आणि मृत्यूचा अर्थ काय आहे, यावर विचार करायला सुरुवात झाली. त्यांना वाटत होते की, सत्याचा शोध घ्यायचा असेल तर घर, कुटुंब, नातेसंबंध यापासून दूर जावे लागेल.

**आई-वडिलांकडून लग्नाचा आग्रह:**

इ.स.१८४५ साली त्यांच्या घरात लग्नाची बोलणी सुरू झाली. स्वामी दयानंद सरस्वती यांना त्यांच्या आई-वडिलांकडून लग्नाचा आग्रह झाला आणि हा प्रसंग त्यांच्या जीवनातील एक महत्त्वाचा वळणबिंदू ठरला. खरा धर्म समजून घेण्यासाठी व परमेश्वराचे सत्य स्वरूप जाणून घेण्यासाठी आणि परमेश्वराच्या नावाखाली माजलेली अराजकता बंद करण्याचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. ही सर्व अराजकता थांबविण्याचे त्यांनी ठरविले. आपण जर लग्नाच्या बेडीत आडकलो तर आपल्याला पडलेल्या प्रश्नाची उत्तरे मिळणार नाहीत. त्यांनी लग्न ही आत्म्याच्या मुक्तीच्या मार्गात अडथळा आहे असे मानले. म्हणून ते घराबाहेर पडले आणि संन्यासाची दीक्षा घेतली. स्वामी दयानंद सरस्वती यांनी वयाच्या २१ व्या वर्षी संसार, मूर्तीपूजा आणि कर्मकांडाचा त्याग करून सत्याच्या शोधासाठी घराचा त्याग केला.

**गृहत्याग:**

स्वामी दयानंद सरस्वती यांचा गृहत्याग हा त्यांच्या जीवनातील एक अत्यंत निर्णायक व क्रांतिकारी टप्पा होय! हा टप्पा त्यांनी सत्याच्या शोधासाठी पार केला. त्यांच्या वडिलांनी त्यांच्या पाल्याला समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे मूळशंकर निराश झाले. त्यांना वाटू लागले की अंधश्रद्धा, कर्मकांड, मूर्तीपूजा या गोष्टीमध्ये सत्य नाही. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांच्या वडिलांनी त्यांचे लग्न ठरवले होते. परंतु

मूळशंकर संसाराला आणि विवाहसंस्थेला नकार देऊन म्हणाले की, मी संसारासाठी नाही तर सत्यासाठी जन्मलो आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांनी वयाच्या २१ व्या वर्षी गृहत्याग केला. कोणालाही न सांगता ते गुपचुपपणे घरातून निघून गेले. घरातून बाहेर पडताना त्यांच्याकडे ना पैसे होते ना काही सामान अंगावर जे कपडे होते तसे ते घराबाहेर पडले. गृहत्यागाचा उद्देश म्हणजे केवळ संन्यास नव्हे. तर सत्य, ज्ञान, आणि समाजसुधारणेच्या मार्गावर चालण्याचा निर्धार होता. गृहत्यागानंतर त्यांनी विविध संत, संन्यासी, पंडित यांच्याकडे जाऊन वेद, उपनिषदे, तत्त्वज्ञान, योग यांचे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी तपस्वी जीवन स्वीकारले. स्वामी दयानंद सरस्वती यांचा गृहत्याग केवळ वैयक्तिक निर्णय नव्हता तर तो भारतीय समाजाला अंधश्रद्धा आणि कर्मकांडांपासून मुक्त करण्याच्या प्रवासाची सुरुवात होती. त्यांच्या गृहत्यागामुळे पुढे आर्य समाज ही चळवळ आणि सत्यार्थ प्रकाश सारखा श्रेष्ठ ग्रंथ शक्य झाला. त्यांनी हिंदू धर्मतत्त्वज्ञानाचे ज्ञान प्राप्त केले. त्याचबरोबर पाणिनी आणि पतांजलीचा अभ्यास केला. या कालखंडामध्ये त्यांनी प्रामाणिकपणे ज्ञान आणि सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. स्वामी दयानंद सरस्वती यांचा गृहत्याग हा त्यांच्या जीवनातील एक महत्त्वाचा आणि निर्णायक टप्पा ठरला.

**शिक्षण:**

स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिक्षण तीन प्रमुख टप्प्यांमध्ये विभागलेले आहे. त्यांचे शिक्षण प्रामुख्याने धार्मिक, वैदिक आणि तात्त्विक क्षेत्रात झाले. पहिल्या टप्प्यातील बालवयातील प्राथमिक शिक्षण टंकारा या त्यांच्या जन्म गावी पूर्ण झाले. वडील करशनजी तिवारी हे स्वतः एक विद्धान ब्राम्हण होते. त्यांनी मूळशंकरला लहाणपणापासुनच संस्कृत, वेदमंत्र, पूजा पाठ, संध्या, यज्ञ यांचे शिक्षण दिले. त्यांनी रामायण, महाभारत, पुराणे व उपनिषदे यांचे वाचन लवकरच सुरू केले. त्यांनी बालवयातच पारंपारिक शिक्षण आणि विधी आत्मसात केले. त्यांनी दुसऱ्या टप्यामध्ये गृहत्यागानंतरचे भ्रमंतीशील शिक्षण घेतले. त्यांना हिंदू धर्मातील तारतम्य भावाचे ज्ञान प्राप्त झाले. गृहत्याग केल्यानंतर त्यांनी संपूर्ण भारतभर ज्ञानाच्या शोधासाठी भ्रमंती केली. याकाळात त्यांनी विविध विद्वान, साधू, संत, वेदपाठी ब्राम्हण, तपस्वी यांना भेटून ज्ञान मिळवले. त्यांनी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद हे चार वेद उपनिषदे, संस्कृत, व्याकरण, तर्कशास्त्र, योगशास्त्र, मीमांसा, ब्रह्मसूत्र, न्यायशास्त्र, वैशेषिक, सांख्य, वेदांत, वेदांमधील विज्ञान, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र यांचे ज्ञान मिळविले.

त्यांनी तिसऱ्या टप्प्यामध्ये गुरू विरजानंद यांच्याकडील शिक्षण मथुरा येथे पूर्ण केले. स्वामी विरजानंद यांनी त्यांना अत्यंत कठोर आणि शिस्तबद्ध शिक्षण दिले. गुरु विरजानंद यांनी त्यांना अंधश्रद्धा, मूर्तीपूजा, पुराणवाद यांना विरोध करण्याची प्रेरणा दिली. त्यांनी स्वामी दयानंद सरस्वती यांना सांगितले 'हे वेद ज्ञान समाजात पोहोचवावे हीच माझी गुरूदक्षिणा आहे'. स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिक्षण हे केवळ पुस्तकी नव्हते तर वेदांवर आधारित विवेकशील, संशोधनात्मक आणि सामाजिक जागृती करणारे ज्ञानप्रिय होते. त्यांच्या शिक्षणाने त्यांना आर्य समाजाची स्थापना, सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचे लेखन आणि भारतीय समाजात वैचारिक क्रांती घडवून आणण्यासाठी सिद्ध केले.

**गुरु विरजानंद यांचे शिष्यत्व:**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी खऱ्या गुरुच्या शोधात इ.स. १८६० पर्यंत विध्यांद्री, अरवली, हिमालय हे प्रदेश पायाखाली घातले. जवळ-जवळ पंधरा वर्षे त्यांनी देशाच्या विविध भागात प्रवास केला. या कालावधीत त्यांनी खऱ्या ज्ञानाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. अनेक गुरूंचा शोध घेतला. अखेर मथुरेला त्यांना गुरू भेटले. त्यांनी थोर पंडित स्वामी विरजानंद सरस्वती यांचे शिष्यत्व पत्करले. गुरु विरजानंद सरस्वती हे स्वामी दयानंद सरस्वती यांचे आध्यात्मिक गुरू होत. ते अतिशय विद्वान, कठोर शिस्तीचे आणि वैदिक तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक होते.

विरजानंद हिंदु धर्माचे अभ्यासक व वेदशास्त्र संपन्न होते. त्यांचा वेदांचा गाढा अभ्यास होता. स्वामी विरजानंद हे भारतातील एक थोर पंडित, वेदवेदांताचे अभ्यासक आणि धार्मिक सुधारक होते. स्वामी विरजानंद हे वैदिक ज्ञानाचे दीपस्तंभ होते. त्यांच्या विचारांनी, शिक्षणाने भारतीय समाजावर फार मोठा प्रभाव टाकला. त्यांनी वैदिक धर्माचा पुनरुज्जीवनाचा मार्ग प्रशस्त केला. ते संस्कृत भाषेचे महान पंडित आणि विद्वान होते. त्यांनी कठोर परिश्रम करून संस्कृत व्याकरण, वेद, उपनिषद, व्यासभाष्य, मीमांसा, इ. ग्रंथांचे गाढ ज्ञान प्राप्त केले होते. त्यांनी हरिद्वार, मथुरा येथे गुरुकुल पद्धतीने अध्यापन केले. त्यांची अध्यापन पद्धती अत्यंत कडक आणि शिस्तबद्ध होती. विरजानंदांनी दयानंदांना वेदांचा मूळ अर्थ समजावून सांगितला आणि त्यांना अंधश्रद्धा, मूर्तिपूजा या विरोधात उभे केले. अनेक विद्वानांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतले. त्यातीलच त्यांचे एक महान शिष्य म्हणजे स्वामी दयानंद सरस्वती होत!

वेद हेच मूळ धर्मग्रंथ असून इतर पुराणे व ग्रंथ दोषपूर्ण आहेत, असे ते म्हणत. हाच प्रभाव स्वामी दयानंद यांच्यावर पडला व ते जीवनभर वेदप्रामाण्यावादी बनले. त्यांनी दिलेली शिक्षणपद्धती अत्यंत शिस्तबद्ध, पारंपारिक आणि वैदिक परंपरेशी निगडित होती. गुरूबरोबर राहून त्यांनी मथुरेला धर्म तत्त्वज्ञानाचे ज्ञान प्राप्त केले व त्यानंतर त्यांनीच त्यांना दयानंद हे नाव दिले. तेव्हापासुन ते दयानंद सरस्वती या नावाने ओळखले जाऊ लागले. दयानंद सरस्वती यांची स्वामी विरजानंद यांच्याशी झालेली भेट म्हणजे त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीतील निर्णायक टप्पा होता. गुरू विरजानंदांनी त्यांची प्रतिज्ञा घेतली. ती म्हणजे, तू आयुष्यभर वेदांचा प्रचार करशील आणि अज्ञान व अंधश्रध्दा दूर करशील. गुरु विरजानंद यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सत्याचा संदेश समाजाला देण्यासाठी चुकीच्या परंपरांविरूद्ध लढा सुरू केला. स्वामी दयानंद सरस्वती हे त्यांचे सर्वात तेजस्वी शिष्य ठरले.

**विविध भागात प्रवास:**

हिंदू धर्म व संस्कृतीचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी त्यांनी संपूर्ण भारत देशाचा प्रवास केला. ते जेथे गेले त्या ठिकाणी त्यांनी व्याख्याने व प्रवचने दिली. संस्कृतचे ते प्रकांड पंडित होते. २२ ऑक्टोबर १८६९ रोजी वाराणसी येथे झालेल्या वादविवादात त्यांनी २७ विद्वान आणि १२ तज्ञ पंडितांविरूद्ध विजय मिळवला. जागो-जागी जाऊन आपल्या प्रवचनातून त्यांनी जातिभेद मानू नका, मूर्तिपूजा करू नका, वेदांचे अध्ययन करण्याचा अधिकार सर्वांना आहे, असा उपदेश सर्व जनतेला केला. हिंदू धर्मातील वाईट प्रथांवर त्यांनी कठोर टिका केली. जातिव्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी हिंदू धर्माला शुद्ध स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय ऐक्य असलेला भारत त्यांच्या डोळयासमोर होता. आर्य धर्म हाच देशाचा धर्म असावा, अशी दयानंद सरस्वती यांची मनस्वी इच्छा होती. वेद हे ईश्वरी ज्ञान आहे. यावर त्यांची

श्रद्धा होती. वर्ण व्यवस्थेचा आधार धर्म नसून कर्म आहे. त्यामुळे सर्व मानव समान आहेत. ही समानतेची भावना खऱ्या अर्थाने दयानंद सरस्वती यांनी जागृत केली.

**सारांश:**

आर्य समाजाचे तत्वज्ञान विशद करण्यासाठी इ.स. १८७५ मध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यांनी इ.स. १८७५ मध्ये मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली. त्या बरोबरच 'वेदभाष्य भूमिका' आणि ऋग्वेद व यजुर्वेद यांवरील टीकात्मक समालोचन असलेले 'वेदभाष्य' हे ग्रंथ लिहिले. ३० ऑक्टोंवर १८८३ रोजी त्यांचे निधन झाले. जीवनभर त्यांना परंपराप्रिय सनातनी लोकांनी खूप त्रास दिला. त्यांच्या मृत्युनंतरही आर्य समाजाचे कार्य महात्मा हंसराज, लाला लजपतराय, पंडित गुरूदत्त, स्वामी श्रद्धानंद यांनी जोमाने पुढे चालु ठेवले.

**स्वंय अध्ययनासाठी प्रश्न–१**

**अ) खालील योग्य पर्याय निवडुन रिकाम्या जागा भरा.**

१. स्वामी दयानंद सरस्वती यांचे खरे नाव .............. असे होते.

| | |
|---|---|
| अ. मूळशंकर | ब. महादेव |
| क. रामदास | ड. घनश्याम |

२. स्वामी दयानंद सरस्वती यांनी वयाच्या.......... व्या वर्षी गृहत्याग केला.

| | |
|---|---|
| अ. २० | ब. २१ |
| क. २२ | ड. २३ |

३. स्वामी दयानंद सरस्वती यांचे गुरू .....................होत.

| | |
|---|---|
| अ. गुरू सदानंद | ब. गुरू महादेव |
| क. गुरू रामदास | ड. गुरू विरजानंद |

४. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या आईचे नाव ................. होते.

| | |
|---|---|
| अ. यशोदादेवी | ब. रमादेवी |
| क. सुमनताई | ड. शारदादेवी |

५. स्वामी दयानंद सरस्वती यांचे वडील ................ संस्थानात कर–कलेक्टर म्हणून कार्यरत होते.

| | |
|---|---|
| अ. नोरवी | ब. कोरवी |
| क.सोरवी | ड. मोरबी |

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. स्वामी दयानंद सरस्वती यांनी गुरू विरजानंद यांच्याकडील शिक्षण कोठे पूर्ण केले?

२. स्वामी दयानंद सरस्वती यांचे प्राथमिक शिक्षण कोठे झाले?

३. कोणत्या साली स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म झाला?

४. स्वामी दयानंद सरस्वती हे कोणत्या शतकातील महान समाजसुधारक होते?

५. वयाच्या कोणत्या वर्षी स्वामी दयानंद सरस्वती यांच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली?

### २.२.२ आर्य समाज (Arya Samaj)

**प्रस्तावना:**

स्वामी दयानंद सरस्वती यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी केलेली आर्य समाजाची स्थापना होय. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणणाऱ्या आर्य समाजाची स्थापना स्वामी स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजी मुंबई येथे केली. हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान लोकांना पटवून सांगण्यासाठी त्यांनी संपूर्ण भारताचा प्रवास केला. आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी त्यांनी अनेक ग्रंथ प्रकाशित केले. समाजसुधारणा चळवळींसाठी त्यांनी संपूर्ण भारत पालथा घातला. महाराष्ट्र व बंगालमध्ये सुरू असलेल्या धार्मिक व सामाजिक सुधारणा कार्याच्या धर्तीवर उत्तर भारतात या कार्याचा प्रसार करण्याचे श्रेय स्वामी दयानंद सरस्वती यांना आहे. आर्य समाजाने पंजाब बरोबरच महाराष्ट्र, गुजरात, उत्तर भारत, ईशान्य भारत, दक्षिण भारत, राजपुताना, संयुक्त प्रांत या क्षेत्रामध्ये आपली पाळेमुळे खोलवर रूजविली व समाज जागृतीला गती दिली. आर्य समाजाच्या शाखा आंतरराष्ट्रीय स्तरावरही अनेक देशांमध्ये कार्य करू लागल्या. स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाने भारतातील लोकांच्या आध्यात्मिक प्रगतीत महत्वाची भूमिका बजावली. वेदप्रामाण्यता हे आर्य समाजाचे बलस्थान होते. दयानंद यांच्यावर वेदांचा प्रचड प्रभाव होता. मानवी सभ्यता, संस्कृती, मानवी कल्याण व समाजाची प्रगती ही केवळ वेदांमुळेच होऊ शकते. यावर त्यांची प्रचंड श्रद्धा होती. आर्यावर्त हे आर्यांचे असून याच धर्माचा जगभर प्रचार केल्याने जगाचा उद्धार होईल, यासाठी आर्य समाजाचा प्रसार जगभर व्हावा, असे त्यांचे मत होते.

**आर्य समाजाचे उद्दिष्टे:**

आर्य समाजाचा मुख्य उद्देश म्हणजे वेदाधिष्ठित समाज निर्माण करणे असून मूर्तिपूजा, जातीभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक रूढी, प्रथा, परंपराचा नष्ट करणे होय.

आर्य समाजाचे ब्रीद वाक्य: 'या जगाला उदात्त बनवा' हे आर्य समाजाचे ब्रीदवाक्य होते. जगाचे कल्याण करणे हे आर्य समाजाला अभिप्रेत होते.'सतत कर्म करीत रहा' असा आर्य समाजाचा कर्तव्याला महत्त्व देणारा संदेश होता.

**आर्य समाजाची तत्त्वे:**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची तत्त्वे व स्वरूप निश्चित करण्याचे कार्य केले. आर्य समाजाचे सिद्धांत आणि नियम मुंबई येथे तयार करण्यात आले. त्यानंतर १८७७ मध्ये लाहोर येथे त्यावर संस्कार करून त्यांना निश्चित रूप देण्यात आले. वेदांना हिंदू धर्माचा मुख्य आधार व प्रेरणास्थान मानले. आर्य समाजाने ब्राम्हो समाज व प्रार्थना समाजातील आदर्श तत्त्वांचा स्वीकार केला. एकेश्वरवाद, वेदांचा सर्वोच्च आधिकार, सामाजिक सुधारणा, शुद्धी आंदोलन, जातिव्यवस्थेला विरोध, शैक्षणिक प्रगती यातून आर्य समाजाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करता येते. वैदिक धर्माच्या सुविचारांचा मूळ आधार आर्य समाजाच्या तत्त्वज्ञानाला दिला. अशा आर्य समाजाचे तत्त्वज्ञान पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. परमेश्वर हाच सर्व यथार्थ ज्ञानाचा उगम असून, सर्व वस्तू परमेश्वराच्या स्वरूपात ज्ञात आहेत.

२. परमेश्वर हा सर्व जगाचा निर्माता व पालक असून तो आनंदी, अनंत, निराकार, सर्वसाक्षी, सर्व शक्तिमान, दयाळू, अमर व पवित्र आहे.

३. वेद हे परमेश्वरापासून निर्माण झाले असून त्यात सर्व ज्ञानाचा उगम आहे. ईश्वराच्या शुद्ध स्वरूपाचे ज्ञान वेदांमध्ये आहे. म्हणून वेदाचा अभ्यास करणे व त्यांतील ज्ञानाचा प्रसार करणे हे प्रत्येक आर्याचे पवित्र कर्तव्य आहे.

४. अज्ञान नष्ट करून ज्ञानाचा प्रसार करणे हे प्रत्येकाने ध्येय ठेवावे.

५. प्रत्येकाने असत्याचा त्याग करून सत्याचा स्वीकार करावा.

६. प्रत्येक व्यक्तीने नीतिनियमांना अनुसरून आणि चांगल्या वाईटांचा विचार करून सद्गुणांचे संगोपन व संवर्धन होईल अशा प्रकारची कृती करावी.

७. मानव जातीची भौतिक सामाजिक व आधात्मिक उन्नती करून मानव जातीच्या सर्वांगीण कल्याणाचा विचार प्राधान्याने करावा.

८. समाजाच्या कल्याणासाठी वैयक्तिक मतभेद बाजूला सारून प्रयत्न करावेत परंतु वैयक्तिक हिताच्या बाबतीत प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास परवानगी आहे.

९. वैदिक धर्माची दारे सर्व धर्मियांना खुली असावीत. परधर्मातील कोणाही व्यक्तीस शुद्धीकरणाने वैदिक धर्मात पवेश मिळावा.

१०.वेद अध्ययनाचा हक्क सर्व स्त्री-पुरुषांना आहे.

११.प्रत्येक व्यक्तीने केवळ स्वतःच्या कल्याणात धन्यता न मानता दुसऱ्याच्या कल्याणासाठी प्रयत्नशील राहावे.

१२ प्रेम, न्याय व वैयक्तिक सद्गुण यावर आधारित वर्तणूक ठेवणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

आर्य समाजाची तत्त्वे म्हणजे समाजाचे सामाजिक, धार्मिक व नैतिक असे आधारस्तंभ आहेत. यातून एकेश्वरवाद, सत्य, समानता, स्त्री सन्मान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी ही तत्त्वे श्रेष्ठ अशी आहेत.

**आर्य समाजाचा विस्तार :**

आर्य समाजाची स्थापना महाराष्ट्रातील मुंबई या ठिकाणी झाली असली तरीही त्याचा विस्तार मात्र भारतातील अनेक प्रदेशामध्ये झाला. महाराष्ट्र, गुजरात, उत्तर भारत, ईशान्य भारत, दक्षिण भारत या प्रदेशामध्ये आर्य समाजाने आपले कार्य केले आहे. उत्तर भारतामध्ये पंजाब, दिल्ली, हरियाणा, राजस्थान या राज्यात आर्य समाजाने अत्यंत प्रभावी कार्य केले. ईशान्य भारतामध्ये आसाम, त्रिपुरा व अरूणाचल प्रदेश येथे आर्य समाजाने वेद, शिबिरे व सामाजिक कार्यक्रम घेतले आहेत. दक्षिण भारतामध्ये कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा येथे शाखा असून येथे शैक्षणिक कार्य केले आहे. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, बीड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नाशिक याठिकाणी शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक कार्य मोठ्या प्रमाणात केले. आर्य समाजाला भारतीय संस्थानिक राजांचा पाठिंबा असल्यामुळे त्यांची शक्ती वाढत गेली.

**आर्य समाजाची धार्मिक मते :**

आर्य समाजाचे  धार्मिक विचार वेदांवर आधारित आहेत. आर्य समाजाने जनतेच्या हितासाठी व कल्याणासाठी जसे आपले विचार मांडले त्याच पद्धतीने धार्मिक मतेही मांडली व ती भारतीय समाजामध्ये

प्रसारित झाली.

१. ईश्वर हा सर्वशक्तिमान, निराकार, सर्वव्यापी व सर्वज्ञ आहे.

२. सर्वांना वेदाच्या अध्ययनाचा हक्क आहे. वेद हेच सर्वोच्च आणि सत्य ज्ञानाचे मूळ आहेत.

३. वैदिक काळातील वर्णाश्रम समाजरचना परिपूर्ण आहे.

४. वेदांचा प्रत्येक हिंदू धर्मियांने अभ्यास केला पाहिजे. कारण परमेश्वराच्या शुद्ध स्वरूपाचे ज्ञान वेदात आहे.

५. वेद हेच आर्यांचे अंतिम पवित्र धर्मग्रंथ आहेत. त्यामुळे त्यातील प्रामाण्य सर्वांनी मानावे.

६. चार्तुवर्ण्य हे जन्मसिद्ध नसून गुण व कर्मावर अवलंबून आहेत.

७. सर्व मानव एक समान आहेत. वैदिक धर्माचे दरवाजे सर्वांसाठी खुले आहेत.

८. आर्य धर्माचा प्रचार व प्रसार संपूर्ण जगभर व्हावा.

**आर्य समाजाचे कार्य:**

१९ व्या शतकात भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा कार्याचा आरंभ झाला. आर्य समाजाचे मुख्य कार्यालय लाहोर या ठिकाणी निर्माण केले. या भागामध्ये आर्य समाजाला प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकृर्त्ते मिळाले. पंजाबमधील आर्य समाजाचे कार्य लाला हंसराज, लाला मुन्शीराम उर्फ श्रद्धानंद आणि लाला लजपतराय या तीन थोर नेत्यांनी वाढविले. स्वामी दयानंद सरस्वती त्यांच्या मृत्युपर्यंत आर्य समाजाच्या वाढीसाठी संपर्ण भारतभर फिरत राहिले. आर्य समाजाचे कार्य वाढवण्याकरीता भारतातील निरनिराळया ठिकाणांना भेटी देऊन, प्रवचने करून त्यांनी आर्य समाजांच्या शाखांची उभारणी केली.

**१. वैदिक धर्माचे व वेदांचे महत्व सांगितले:**

'वेदाकडे पुन्हा चला' ही आर्य समाजाची मुख्य शिकवण होती. विश्वाचे व ईश्वराचे स्वरूप समजावून घेण्यासाठी प्रत्येक हिंदूने वेद अध्ययन केले पाहिजे. यातुन खऱ्या हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान समजून घेतले पाहिजे. वेद हे शुद्ध व परिपूर्ण आहेत. वैदिक धर्म हा हिंदूचा खरा धर्म आहे. त्यामध्ये कर्मकांड व मूर्तिपूजेला थारा नाही. कारण वेदातील ज्ञान ईश्वरप्रणीत आहे. सर्व ज्ञानाचा उगम वेदात असल्यामुळे वेदाचे अध्ययन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. वेद म्हणजे केवळ धार्मिक ग्रंथ नसून वैज्ञानिक ज्ञानाचा खजिना आहे, असे त्यांचे मत होते. रूढी, प्रथा, परंपरा यांमध्ये गुरफटलेल्या हिंदू धर्माला वाचवण्यासाठी स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'वेदाकडे पुन्हा चला' असा संदेश दिला.

**२. सामाजिक कार्य:**

सर्व जाती-धर्मातील लोकांचा आर्य समाजात प्रवेश होता. स्वामी दयानंद सरस्वती यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा करताना त्यांनी समाजात प्रचलित असलेल्या सतीप्रथा, बालविवाह, बालहत्या, हुंडा प्रथा, पडदा पद्धती, अस्पृश्यता, बवहुपत्नीत्त्व, देवदासी प्रथा या रूढी व परंपरांवर हल्ले केले. स्त्री शिक्षणाला चालना देऊन स्त्रीयांमधील आंतरजातीय विवाहाला व विधवा विवाहाला उत्तेजन दिले. स्त्रियांना धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक समान हक्क मिळण्यासाठी मोठे कार्य केले. जातिभेद निवारण, अस्पृश्यता निवारण, आदि समाजसुधारणा केल्या. सहिष्णु व उदार मानवतावादी विचारांचा समाजात प्रसार केला. आर्य समाजाने हिंदू समाजात निर्माण झालेला न्यूनगंड आपल्या शिकवणुकीव्दारे दूर करून समाजामध्ये नवी चेतना निर्माण

करण्याचे महान कार्य केले. भारतीय संस्कृतीच्या महान परंपरेची जाणीव आपल्या लोकांना करून दिली. त्यांनी सर्व जाती, धर्म व स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार केला. दयानंद यांनी जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेला कडाडून विरोध केला. सर्व मानव समान आहेत. मालमत्तेवर महिलांचा अधिकारही प्रतिपादित केला. आर्य समाजाने आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. त्यांच्या या सुधारणांमुळे महिलांना नैतिक प्रोत्साहन मिळाले. त्यांच्या प्रगतीला मोठा हातभार लागला.

**३. धार्मिक कार्य :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाने धर्म क्षेत्रात क्रांतीकारी कार्य केले. आर्य समाजाने धार्मिक सुधारणा चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. आर्य समाजाने मुर्तीपूजेला कडाडून विरोध केला. एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. वेदाधिष्ठित धर्माचा प्रचार व प्रसार केला. कर्मकांड, अंधश्रद्धा, पाखंडीपणा या समाजघातक रूढी, प्रथांना विरोध केला. आर्य समाजाने इतर धर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात आणले. या कार्यातून आर्य समाजाने हिंदू समाजातील एकता आणि सशक्तीकरणाला बळ दिले. शूद्धी चळवळ व धर्म परिवर्तन यासाठी या समाजाने मोठे कार्य केले.

४. **प्रबोधन व प्रचार कार्य :**

समाज प्रबोधनात महत्त्वाची भूमिका बजावण्यात आर्य समाजाचे कार्य मोठे आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांनी सत्यार्थ प्रकाश, संस्कार विधी यासारखे ग्रंथ प्रकाशित करून प्रबोधन चळवळीला गती दिली. वेद, तत्त्वज्ञान, धर्म, सामाजिक सुधारणा अशा विविध विषयांवर व्याख्याने व शिबिरांचे आयोजन करून जागृतीचे कार्य केले. आर्य समाजाच्या माध्यमातुन कार्यकर्ता प्रशिक्षणाव्दारे मोठ्या प्रमाणात युवा संघटन उभे केले. हरिव्दार येथे कुंभ मेळा असताना त्यात सामील होण्यासाठी त्यांनी अबू पर्वत येथून हरिव्दारपर्यंत पायी प्रवास केला. त्यांनी प्रवासात ठिकठिकाणी व्याख्याने व प्रवचने दिली.

**५. शैक्षणिक कार्य:**

आर्य समाजाने शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली 'शिक्षणाशिवाय देशाची व समाजाची प्रगती नाही' हे ब्रीद डोळयासमोर ठेऊन भारतीय समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक गुरुकुले, विद्यालये आणि उच्च शिक्षणसंस्था स्थापन केल्या. आर्य समाजाचे आघाडीचे कार्यकर्ते लाला हसंराज यांनी लाहोर येथे 'दयानंद अग्लो वैदिक स्कूल' ही संस्था स्थापन केली, त्याचे पुढे 'दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज' असे महाविद्यालयात रूपातंर झाले. हे महाविद्यालय अभिमानी व प्रखर राष्ट्रवादी तरुण निर्माण करणारे केंद्र बनले. तेथे इंग्रजीबरोबरच वैदिक धर्माचे शिक्षण दिले जात असे. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या मनातील 'गुरुकुल' साकार करण्यासाठी स्वामी श्रद्धानंद यांनी हरिद्वाराजवळ कांगडी येथे इ.स. १९०२ मध्ये शिक्षण देण्याच्या उद्देशााने गुरुकुल स्थापन केले. पुढे त्यांच्याच नेतृत्वाखाली उत्तर भारतात गुरुकुल पद्धतीच्या शाळा सुरू झाल्या. तेथे हिंदी भाषेतुन शिक्षण दिले जात होते. या गुरुकुल शिक्षण पद्धतीतून पारंपारिक व आधुनिक निक्षणाचा संगम साधण्यात आला. स्वामी दयानंद सरस्वती यांची गुरुकुल शिक्षणपद्धती ही एक जीवनदायी होती. जिथे शिष्य केवळ विद्यार्थी नसून जीवन तत्त्वांचा शोधक होता. आर्य समाजाने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून स्त्रियांसाठी शाळा सुरू केल्या. स्त्री व पुरुष यांना समान शैक्षणिक संधी मिळावी व शिक्षण हे सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजे हा त्या पाठीमागचा हेतू होता.

स्वामी दयानंद सरस्वती यांना नैतिक पायावर आधारलेले शिक्षण हवे होते. ते सक्तीच्या शिक्षणाचे

समर्थक होते. भारताची जागृती शिक्षणावर अवलंबून आहे असे त्यांचे मत होते. ज्यामध्ये त्यांनी तत्त्वज्ञान, व्याकरण, वेद, विज्ञान, वैदिक, संगीत आणि कला यावर भर दिला. आर्य समाजाने गरीब, अनाथ व विधवा यांच्यासाठी आश्रम उघडले. मोफत शिक्षण आणि वसतिगृह सुविधांद्वारे शिक्षण क्षेत्रात क्रांती केली. आर्य समाजाच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्येही शैक्षणिक चळवळीला गती आली. राजर्षी शाहू महाराजांच्या राजाश्रयामुळे इ.स.१९१८ मध्ये कोल्हापूरात आर्य समाजाची एक शाखा कार्यरत होती. कोल्हापूरचे प्रसिद्ध असे राजाराम कॉलेज इ.स. १९१९ ते १९२४ पर्यंत आर्य समाजाकडे चालविण्यासाठी दिले होते. कोल्हापूरात आर्य समाजाने चालविलेले 'शाहू दयानंद हायस्कूल' हे समाजातील अस्पृश्य व गरीब विद्यार्थ्यांचे आश्रयस्थान ठरले होते. आजही सोलापूरात दयानंद महाविद्यालयाच्या रूपात आर्य समाजाचे शैक्षणिक कार्य सुरूच आहे. आर्य समाजाच्या वतीने महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, ठाणे, कोल्हापूर, सोलापूर येथे शैक्षणिक कार्य केले. आर्य समाजाने शैक्षणिक क्षेत्रामध्ये फार मोठी क्रांती घडवून आणली. आर्य समाजाचे शिक्षण क्षेत्रातील योगदान मोठे आहे. भारत देशाबरोबरच परदेशातही आर्य समाजाने शैक्षणिक कार्याद्वारे आपले कार्य सुरू ठेवले आहे.

**६. जनकल्याणाची कामे :**

आर्य समाजाने सर्व सामान्य जनतेसाठी आरोग्य शिबिरे, वृद्धाश्रम, अनाथालये, मदत केंद्रे उभी करून जनतेचे हीत साधले. पूर, दुष्काळ, भूकंप या आपत्तीकालीन संकटाच्या वेळी सर्वत्तोपरी मदत केली. स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन उपक्रम, शुद्ध पाण्याचे प्रकल्प राबवून जनसेवेला महत्त्व दिले. या कार्यातून आर्य समाजाने सामाजिक सेवा व जनकल्याण साधले. प्रत्येकाने स्वतःच्या प्रगतीऐवजी इतरांच्या प्रगतीत आपली प्रगती आहे असे मानावे. आर्य समाजाने वास्तववादी दृष्टीकोनातून समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य केले.

**७. शुद्धीकरण चळवळ :**

शुद्धीकरण चळवळीच्या माध्यमातून आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक सुधारणा क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले. भारतीय समाजामध्ये एकता निर्माण करणे हा शुध्दीकरण चळवळीचा मुख्य उद्देश होता. जबरदस्तीने धर्मांत्तरित केल्या गेलेल्या अनेक हिंदूंना त्यांनी शुद्धीकरणाच्या मोहिमेद्वारे हिंदू धर्मात परत घेतले. आर्य समाजाचे हे कार्य क्रांतिकारक असेच होते. हिंदू धर्माच्या वाईट प्रथांमुळे धर्मांत्तर केलेल्या व्यक्तिंना परत हिंदू धर्मात येण्यास मज्जाव होता. परंतु आर्य समाजाने परत हिंदू धर्मात येण्याची वाट मोकळी केली. त्यांच्या या कार्यामुळे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मांत्तराच्या कार्याला प्रतिबंध घातला गेला. यामुळे हिंदूचे इतर धर्माकडे आर्कर्षित होण्याचे प्रमाण थांबले. अनेक हिंदूंना पुन्हा हिंदू धर्मात घेण्याचे कार्य आर्य समाजाने केले. अशा प्रकारे हिंदू धर्माचे संरक्षण करण्यात आले. आर्य समाजाने सुरू केलेल्या शुद्धीकरण चळवळीमुळे परिवर्तनाला एक वेगळी गती मिळाली. हे एक सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते.

**८. स्वराज्यप्रेम व राष्ट्राभिमान निर्माण :**

दयानंद सरस्वती हे महान राष्ट्रवादी होते. स्वराज्य प्रेम व राष्ट्राभिमान निर्माण करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. भारतीयांच्या मनामध्ये स्वातंत्र्याची व राष्ट्रभक्तीची भावना निर्माण केली. आर्य समाजाच्या अनुयायांनी स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षणावर भर दिला. आर्य समाजाने भारत देशाच्या धर्म व संस्कृतीबद्दल आदर व अभिमान निर्माण केला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्वामी दयानंद सरस्वती यांनी महत्त्वपुर्ण भूमिका बजावली. १८५७ च्या उठावात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. ब्रिटिश सरकार भारतीयांचा छळ करत

असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर भारतीय जनतेला इंग्रजी अत्याचाराविरोधातील लढ्यास प्रोत्साहन दिले. सामान्य नागरिकांना स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रेरित केले. दयानंद सरस्वती यांच्या आर्य समाजाचे सेवक क्रांतीलढयाचे संदेश एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहचवत असत. त्यांना दयानंद सरस्वती प्रोत्साहन देत असत. १८५७ च्या उठावातील अनेक क्रांतीकारक स्वामी दयानंद सरस्वती यांच्या संपर्कात होते. भारतीयांना १८५७ च्या संग्रामात अपयश आले तरीही भारतामध्ये खऱ्या अर्थाने राष्ट्रवादास सुरुवात होऊन प्रत्येकाच्या मनामध्ये देशभावना प्रेरित झाली. राष्ट्रभक्त, समाजसुधारक व तत्त्ववेक्ते यांची एक नवी पिढीच या समाजाने राष्ट्राच्या चरणी अर्पण केली. यातूनच लाला लजपतराय, बिपिनचंद पाल, स्वामी श्रद्धानंद, श्यामजी कृष्ण वर्मा, आदि. देशभक्तांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग घेतला.

**९. राजकीय कार्य :**

स्वामी दयानंद सरस्वती यांचे भारताच्या राजकीय विचारांच्या इतिहासात अव्दितीय स्थान आहे. प्रगतशील विचारांचे प्रवर्तक म्हणून त्यांच्या विचारांना महत्त्वपुर्ण स्थान आहे. राज्याचा सिद्धांत, सरकारचे स्वरूप, त्रिकेंद्रीय कायदे, सरकारची कार्ये, कायद्याचे राज्य आदि.वरील त्यांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी पाश्चिमात्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वर्चस्वाविरूद्ध मोठे काम केले. आध्यात्मिक नेत्यांकडून राजकीय नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदार युक्तीवाद केला. दयानंद यांनी त्यांचे लोकशाही निवडक तत्त्व आर्य समाजाच्या कार्यपद्धती आणि संघटनात्मक रचनेत विस्तारले. विकेंद्रीकरणाचे मूर्त स्वरूप असलेल्या राजकारणाची संकल्पना त्यांनी मांडली. एका माणसाच्या राजवटीला त्यांचा विरोध होता. ते सर्वांना वैदिक ग्रंथातील शिकवण लक्षात ठेवण्याचा आग्रह करतात. न्याय कायदा हाच खरा धर्म आहे. कायदा हाच सर्व जनतेचा रक्षक आहे. हे त्यांचे राजकारणातील विषय आदर्शवत आहेत. राज्याचे उद्दिष्ट केवळ नागरिकांच्या धर्मनिरपेक्ष आणि भौतिक कल्याणाकडे पाहणे नाही तर मानवी जीवनाच्या चारही उद्दिष्टांचे म्हणजेच धर्म, समृद्धी, उपभोग आणि मोक्ष यांचे आश्वासन देणे आहे. लाला लजपतराय यांनी राजकीय कार्यकर्ते तयार करण्यासाठी 'टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स'ही संस्था सुरू केली.

**१०. सरकारची कार्ये :**

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या मते सरकार हे समाजाचे प्रतिनिधी आहे. पुढे ते म्हणतात, 'सरकार हे अशा लोकांचे पालक आणि संरक्षक आहे जे वृध्दापकाळ आणि अशक्तपणामुळे किंवा स्वत:ची काळजी घेण्यास असमर्थ असल्यामुळे आपली उपजिवीका करू शकत नाही', असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. मृत अधिकाऱ्यांच्या पत्नी आणि अल्पवयीन मुलांना सरकारच्या मदतीचा हक्क आहे. सरकारने मानवी जीवनाच्या सर्वोच्च उद्दिष्टांना प्रोत्साहन द्यावयाचे आहे.

**११. स्वदेशी :**

स्वदेशी या शब्दाला आर्य समाजाने सुरुवातीपासून महत्त्व दिले. आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तू आपल्या असल्या पाहिजेत कारण यामुळे आपला पैसा बाहेर जाणार नाही, हे आर्य समाजाने स्पष्ट केले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा यामागे खरा दृष्टिकोन होता. शासनाविषयी आर्य समाजाचे मत असे होते की, 'चांगल्यातल्या चांगल्या परकीय शासनापेक्षा कसलेही स्वदेशी शासन केव्हाही चांगले कारण ते आपले असते'. धर्म स्थापनेच्या संदर्भामध्ये नवविचार पुरस्कृत केला व नवीन दृष्टिकोन लोकांसमोर मांडला. यामुळे या काळात आर्य समाजाला मोठी लोकप्रियता मिळाली.

**१२. जागतिक स्तरावरील कार्य :**

आर्य समाजाने संपूर्ण भारतभर सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळीचे कार्य केले. त्याचबरोबर परदेशातही आर्य समाजाने आपला ठसा उमटविला. फिजी, अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, मॉरिशस, दक्षिण आफ्रिका, नेदरलँड्स, आणि ऑस्ट्रेलिया आदि. देशांमध्ये आर्य समाजाने आपली केंद्रे उभी करून आंतरराष्ट्रीय स्तरावर ही आपले कार्य पोहचविले आहे.

**सारांश :**

आर्य समाज ही भारतातील एक महत्त्वपूर्ण सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ आहे. आर्य समाजाच्या कार्यामुळे भारतीय समाजात वेदाधिष्ठित मूल्य, समानता, स्त्री सक्षमीकरण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा विकास झाला. आजही आर्य समाजाच्या शाखा सामाजिक सुधारणा, आरोग्य, धर्म प्रसार, शिक्षण यामध्ये सक्रिय कार्य करत आहेत. आर्य समाजाचे कार्य भारतात व विदेशात सुरू आहे. आर्य समाजाच्या कार्याबद्दल राजकीय विचारवंत बिपिनचंद्र पाल म्हणतात, 'हिंदू समाजात धार्मिक व सामाजिक जागृती करून त्यात राष्ट्रीयत्त्वाची भावना निर्माण करण्याचे श्रेय काही अंशी आर्य समाजाला द्यावे लागते'. सुप्रसिद्ध पाश्चिमात्य लेखक हान्स कोहन्स आर्य समाजाच्या कार्याविषयी म्हणतात, 'विसाव्या शतकातील भारताची पायाभरणी आर्य समाजाने केली'. आर्य समाजाने प्राचीन वैदिक संस्कृतीचे श्रेष्ठत्व सिद्ध केले. या समाजाच्या कार्यामुळे हिंदू धर्माला परत तेज आले. भारताच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रामध्ये आर्य समाजाने महत्त्वपूर्ण योगदान दिले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी भारतीयांमध्ये देशहिताची भावना निर्माण करण्याचे महान कार्य केले. वेलेंटाईन चिरोल आर्य समाजालाच खऱ्या अर्थाने 'भारतीय असंतोषाचा जनक मानतो'. हिंदू वेद अद्यायनात तयार झालेले सहिष्णू विचार सामान्य व्यक्तींपर्यंत पोहोचवण्याचे काम आर्य समाजाने केले. आदर्श भारत तयार करण्यावर आर्य समाजाचा भर होता.

**स्वंय अध्ययनासाठी प्रश्न–२**

**अ) खालील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१ आर्य समाजाचे मुख्य केंद्र .................येथे होते.

अ. लाहोर — ब. दिल्ली

क. पुणे — ड. बडोदा

२. इ.स. १९१८ मध्ये.................शहरामध्ये आर्य समाजाची एक शाखा कार्यरत होती.

अ. सोलापूर — ब. सातारा

क. सागली — ड. कोल्हापूर

३. 'टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स'ही संस्था ..................यांनी सुरू केली.

अ. लाला लजपतराय — ब. गुरू महादेव

क. गुरू रामदास — ड. गुरू विरजानंद

४. स्वामी श्रद्धानंद यांनी हरिव्दाराजवळ कांगडी येथे.................. साली गुरुकुल स्थापन केले.

अ. १९०० — ब. १९०१

क. १९०२ ड. १९०३

५. 'विसाव्या शतकातील भारताची पायाभरणी आर्य समाजाने केली' असे मत .......यांनी मांडले.

अ. हान्स टेलर ब. हान्स बेक

क. हान्स कोहन्स ड. हान्स मेकर

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'वेदाकडे पुन्हा चला' ही घोषणा कोणत्या समाजाने दिली?

२. कोणाच्या मते सरकार हे समाजाचे प्रतिनिधी आहे?

३. कोणत्या उठावात स्वामी दयानंद सरस्वती यांनी महत्वपूर्ण योगदान आहे?

४. आर्य समाजाची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

५. 'दयानंद अग्लो वैदिक स्कूल' ही संस्था कोणी स्थापन केली?

### २.२.३ सत्यार्थ प्रकाश (Satyarth Prakash)

**प्रस्तावना:**

सत्यार्थ प्रकाश हा आर्य समाजाच्या विचारांचा मूळ ग्रंथ आहे. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचे महत्व भारतीय समाज, धर्म, तत्त्वज्ञान आणि सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने अत्यंत व्यापक आणि मूलगामी आहे. सत्यार्थ प्रकाश हा सामाजिक जागृती, वैचारिक क्रांती आणि धार्मिक विवेक यांचा संगम आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांनी इ.स.१८७५ मध्ये हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. सत्यार्थ प्रकाश म्हणजे सत्य + अर्थ + प्रकाश म्हणजेच सत्याचा अर्थ स्पष्ट करणारा प्रकाश किंवा सत्याची झलक होय! १४ अध्यायात असलेला हा ग्रंथ दोन विभागात विभागलेला आहे. हा ग्रंथ २० भाषांमध्ये प्रकाशित झाला आहे. या ग्रंथात स्वामी दयानंद सरस्वती यांनी समाजातील विविध सामाजिक, धार्मिक व राजकीय समस्यांवर विश्लेषण केले आहे. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथात ते म्हणतात 'अंतर्गत विषमता, जातीय भांडणे, मानवतावादी धर्माचा लोप, निरक्षरता, संकुचित प्रथा, कर्मकांड, दारिद्रय व वेदाभ्यासाकडे दुर्लक्ष यामुळे येथे इंग्रजांचे राज्य आले. आपल्या चुकांमुळे ते येथे स्थिर झाले. म्हणून उदात्त सामाजिक भान, ऐक्य व एकसंघता, प्रखर राष्ट्रभक्ती, राष्ट्र व समाजासाठी आत्मसमर्पणाची भावना, वेदांचा अभ्यास व नवमानवदावादी धर्म आपण स्वीकारत नाही तोपर्यंत आपली या राजकीय गुलामगिरीतून मुक्तता होणार नाही'. भारतीय समाज आदर्श व सद्गुणी बनावा ही त्यांची अपेक्षा होती. त्यामध्ये मूर्तीपूजेला विरोध, अंधश्रद्धा व अज्ञान निवारण, स्त्री शिक्षण व स्त्रियांचे हक्क यांचा समावेश होतो. स्वामी दयानंद सरस्वती यांनी मूळ हिंदू धर्माच्या वेदाधिष्ठित स्वरूपाला पुर्नस्थापित करण्यासाठी हा ग्रंथ लिहिला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी सत्यार्थ प्रकाश, ऋग्वेदादिभाष्य, ऋग्वेद, यजुर्वेद, संहितापाठ, संदेह निवारणी आदि. महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथात हिंदू धर्मातील अंधश्रध्दा, कर्मकांड यावर प्रखरपणे टीका केली. यात त्यांनी वेदांवर आधारित सत्य जीवनाचे दर्शन घडविले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी लिहिलेल्या ऋग्वेदादिभाष्य या ग्रंथामध्ये वेदांचे अर्थ स्पष्ट करणारा एक आणि गंभीर भाष्यात्मक प्रयत्न केला आहे. ऋग्वेद या ग्रंथात ऋग्वेदाच्या मंत्रांची तर्कसंगत मांडणी केली आहे. यामध्ये त्यांनी मूळ

वैदिक धर्माचे पुनरूत्थान करण्याचा प्रयत्न केला आहे. युजर्वेद या ग्रंथामध्ये कर्मकांडाचा वेद व त्याचे त्यांनी तत्वज्ञानाशी जोडून अर्थ सांगितले आहेत. त्यांचा संहितापाठ ग्रंथ म्हणजे वेदांचे मूळ मंत्र एकत्रित करून केलेले संकलन आहे. संदेह निवारणी या ग्रंथात सामान्य जनतेच्या शंकांचे निरसन करणारे उत्तरमाला स्वरूपातील लेखन आहे. त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे विचारांचे भांडार आहेत. भारतीय तत्त्वज्ञानाचे एक अमूल्य आणि तेजस्वी पथदर्शक आहेत. याबरोबरच 'आर्य पत्रिका' या नियतकालिकातही त्यांचे विचार प्रतिबिंबीत होतात.

**सत्यार्थ प्रकाश ग्रंथाचे उद्देश :**

वेदांवर आधारित धर्माचा प्रचार, मूळ वेद धर्माची पुनर्स्थापना करणे, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, कर्मकांड, पाखंडीपणा यांचा निषेध करणे व विज्ञाननिष्ठ तर्कसंगत विचारांची मांडणी करणे. समाजसुधारणा, शिक्षण व नीतिमूल्यांचा प्रसार, विवेक, तर्क व वेदाधारित विज्ञानाचा प्रचार हे उद्देश होते. भारतीय समाजाला अज्ञान, अंधश्रद्धा व गुलामगिरीतून बाहेर काढून त्यांना वैचारिक स्वातंत्र्य आणि धार्मिक शुद्धतेकडे घेऊन जाणे.

**सत्यार्थ प्रकाश या ग्रंथातील तत्त्वज्ञान :**

सत्यार्थ प्रकाश हा मूळ ग्रंथ संस्कृत मिश्रित हिंदी भाषेत आहे. सत्यार्थ प्रकाशचे तत्त्वज्ञान हे भारतीय वेदाधिष्ठित परंपरेवर आधारित आहे. त्यात धार्मिक, सामाजिक, नैतिक व बौद्धिक मुल्यांचा समावेश आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांनी या ग्रंथातून सत्य, तर्क, विवेक आणि नैतिकतेवर आधारित जीवनशैलीचे समर्थन केलेले आहे.

**१. वेद हे सर्वोच्च धर्मग्रंथ :**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी वेद हे सर्वोच्च धर्म ग्रंथ आहेत. वेद हे अनादि आणि सर्वोच्च ज्ञानसंपन्न ग्रंथ आहेत असे म्हटले आहे. सर्व सामाजिक आणि धार्मिक आचार, विचार वेदांवर आधारित असावेत असे त्यांचे मत होते. विज्ञान, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान यांचे मूलभूत स्रोत वेद हे आहे.

**२. परमेश्वराचे स्वरूप :**

परमेश्वर एकच आहे. तो निर्गुण, निराकार, सर्वव्यापी सर्वशक्तीमान, न्यायकारी आहे, परंतु तो मूर्तीत नाही. मूर्तिपुजा ही अज्ञानातून आलेली आहे. पृथ्वीचा निर्माणकर्ता व पोषणकर्ता तोच आहे. त्यांनी मूर्तिपूजा ही अज्ञान आणि अंधश्रद्धेचे लक्षण मानले आहे. गुण व कर्म व्यक्तीला श्रेष्ठत्त्व पाप्त करून देतात.

**३. सत्याचा शोध हेच खरे धर्माचे लक्षण :**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथातून ते सत्याचा शोध घेतात, धर्म म्हणजे सत्याचा शोध होय! विवेक,तर्क व अनुभवाच्या आधारावर सत्य शोधावे. कोणत्याही घटनेवर विश्वास ठेवण्यापूर्वी तिला अनुभवाने व वेद युक्तिवादाने तपासणे आवश्यक आहे.

**४. कर्तव्यकर्म आणि पुनर्जन्म :**

मानवाने सत्कर्म करावे. कारण त्याच्या कर्मानुसार पुनर्जन्म ठरतो आहे. आत्मा अमर आहे आणि कर्मचक्रातून मुक्त होण्यासाठी मोक्ष मिळवणे हे अंतिम ध्येय आहे.

**५. सर्व धर्माचा सन्मान परंतु सत्यासाठी टीका आवश्यक:**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथात ते म्हणतात 'इतर धर्मातील सत्य गोष्टीचा आदर केला पाहिजे. परंतु जेथे अंधश्रद्धा, अन्याय किंवा तर्कहीन घटना असतील तिथे टीका करणे आवश्यक आहे'.

**६. मुक्ती:**

सत्कर्म आणि आत्मज्ञानामुळे मोक्ष पाप्त होतो. कोणीही मुक्ती विकू शकत नाही. मानवी जीवनामध्ये सत्कर्म हेच श्रेष्ठ आहे.

**७. समाजसुधारणा आणि समता:**

जातिव्यवस्था ही गुण, कर्म आणि शिक्षणावर आधारित असावी. ती जन्मावर नसावी असे त्यांचे मत होते. बालविवाह, सतीप्रथा, अंधश्रद्धा याला त्यांनी विरोध केला. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार द्यावा. त्यांना शिक्षण, विवाह व पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य द्यावे. स्वावलंबन आणि राष्ट्रप्रेम वाढीस लागावे असे त्यांचे मत होते.

**८. तर्क आणि विज्ञानाचा पुरस्कार:**

प्रत्येक घटनेकडे तात्त्विक व विवेकवादी दृष्टीने पाहावे. त्यामध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, स्वतंत्र विचारसरणी आणि अभ्यास यांचा आग्रह असावा.

**९. मानवाचा धर्म म्हणजे कर्तव्य:**

मानवाचा धर्म म्हणजे कर्तव्य होय! धर्म म्हणजे केवळ पूर्जा-अर्चा नव्हे तर कर्तव्यकर्म, नैतिकता आणि समाजसेवा होय! आपल्या जीवनाचा हेतू सत्याचा शोध घेणे, ईश्वराची ओळख करून घेणे आणि सत्कर्म करणे हा होय! ईश्वर फक्त न्याय देतो. जे कराल तसेच फळ मिळेल. त्यामुळे कर्तव्य श्रेष्ठ असावे.

**सत्यार्थ प्रकाश या ग्रथाचे विभाग:**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी सत्यार्थ प्रकाश या ग्रंथात धार्मिक तत्त्वज्ञान, समाज सुधारणा, जीवनमूल्ये, वेदाचे महत्त्व या विषयांचा समावेश केलेला आहे. हा ग्रंथ दोन भागांमध्ये विभागला आहे. यामध्ये एकूण १४ अध्याय आहेत. पहिल्या भागात अध्याय १ ते १० आहेत. तर दुसऱ्या भागात ११ ते १४ अध्याय आहेत.

**पहिला भाग अध्याय १ ते १०-**

**अध्याय १-** अध्याय एकामध्ये धर्म म्हणजे काय? धर्माचे उद्देश आणि स्वरूप स्पष्ट केले आहे. याबरोबरच सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा, मनुष्यजन्माचे महत्त्व व जीवनाचा हेतू, आदि. विषयांवर प्रकाश टाकला आहे.

**अध्याय २-** यामध्ये ईश्वर, आत्मा आणि सृष्टीचे रहस्य या घटकांकडे लक्ष देण्यात आलेले आहे. वेद हे विश्वातील सर्वात प्राचीन, शुद्ध आणि सर्वोच्च ज्ञानाचे स्रोत असल्याचे प्रतिपादन केले आहे.

**अध्याय ३-** अध्याय तीन मध्ये वेदांचे स्वरूप आणि श्रेष्ठता स्पष्ट केली आहे. वेद हे अपौरुषेय, अनादी आणि सर्वश्रेष्ठ ज्ञानस्रोत आहेत. ईश्वर, जीवात्मा आणि प्रकृती यांचे स्वरूप व त्यांचे परस्पर संबंध स्पष्ट केले आहेत.

**अध्याय ४-** अध्याय चारमध्ये मूर्तिपूजा, उपासना पद्धती आणि अंधश्रद्धा यावर प्रकाश टाकला आहे. याबरोबरच पूजा म्हणजे काय? ती कशी असावी हे सांगितले आहे. पुर्नजन्म व कर्म सिद्धांत यांची माहिती देण्यात आली आहे. मोक्ष म्हणजे काय? त्याचा अनुभव कसा असतो, तो कसा मिळवायचा याबद्दल स्पष्टीकरण केले आहे.

**अध्याय ५–** यामध्ये आचार धर्म, सदाचार, कर्मकांड, होमहवन यांचे महत्त्व सांगितले आहे. त्याचबरोबर यज्ञाची वैज्ञानिक व धार्मिक गरज लक्षात घेतली आहे.

**अध्याय ६–** अध्याय सहा मध्ये वर्णाश्रम, धर्म, आणि समतेचा विचार मांडला आहे. जातिव्यवस्था ही गुण कर्मावर आधारित असावी असे म्हटले आहे. यामध्ये विज्ञान व विचारशीलतेचा आग्रह धरला आहे.

**अध्याय ७–** अध्याय सातमध्ये सतीप्रथा, बालविवाह यांचा निषेध करून स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह, स्त्रियांचे हक्क यांवर भाष्य केले आहे.

**अध्याय ८–** यामध्ये सदाचार आणि मानसिक स्वास्थ याची मांडणी केलेली आहे. याबरोबरच आरोग्य, स्वच्छता आणि संयम असे विचार मांडले आहेत.

**अध्याय ९–** अध्याय नऊमध्ये नीतीनियम, न्याय व तार्किकता हे व्यवहारातील घटक स्पष्ट केले आहेत. यामध्ये तत्त्वज्ञान, निर्वाण या संकल्पनांचे विश्लेषण केले आहे.

**अध्याय १०–** अध्याय दहामध्ये धर्म, अर्थ, काम, मोक्ष या मनुष्याच्या चार पुरूषर्थांचे विवेचन केले आहे. यामध्ये इहलोक आणि परलोक, कर्मफळ सिद्धांत सांगितला आहे.

**दुसरा भाग अध्याय ११ ते १४**

**अध्याय ११–** यामध्ये इस्लाम धर्म, कुराण यावर विश्लेषण व विवेचन केले आहे. तर काही धार्मिक प्रथांवर टीका केली आहे. यामध्ये पाप व तारण, पुनरुत्थान यावर आधारित टीका केली आहे.

**अध्याय १२–** अध्याय बारामध्ये ख्रिश्चन धर्म, बायबल यावर विश्लेषण केले आहे. त्याचबरोबर तात्विक विरोधाभास दाखवले आहेत. वैदिक संस्कृती आणि जीवनपद्धतीचे वर्णन केले आहे.

**अध्याय १३–** यामध्ये बौद्ध धर्म आणि त्यातील तत्त्वज्ञानाचे विश्लेषण केले आहे. पुनर्जन्म न मानणे, आत्मा नाकारणे यावर टीका केली आहे. यामध्ये आर्य समाजाचे सामाजिक धोरण स्पष्ट केले आहे.

**अध्याय १४–** आर्य समाजाची भूमिका, देशप्रेम, स्वराज्य व शिक्षणावर भर देण्यात आला आहे.जैन धर्म आणि त्यातील तत्त्वांची समीक्षा केलेली आहे. त्यांनी अत्यंत अहिंसेचे टोक व आत्मा सृष्टीच्या संकल्पनांवरील प्रश्न मांडले आहेत.

थोडक्यात, या ग्रंथामध्ये तर्कशुद्ध व क्रमबद्ध मांडणी केली आहे. आध्यात्मिक, सामाजिक व बौद्धिक विकासासाठी आवश्यक विषयांची निवड केली आहे. सत्य, विवेक, सुधारणा, न्याय या चार तत्त्वांवर आधारित रचना केलेली आहे.

**सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचे महत्त्व:**

सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ भारतीय समाज, धर्म, तत्त्वज्ञान आणि सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने अत्यंत व्यापक आणि मूलगामी आहे. सत्य, विवेक, वेदांचा अभ्यास आणि समाजहिताचे कर्म करा असे त्यांचे विचार होते. त्यांचे हे तत्वज्ञान समाजसुधारणा, धर्मसुधारणा आणि शुद्धीकरण या तीन घटकांवर प्रकाश टाकते. याचे निरनिराळया प्रकारे महत्त्व विषद करण्यात आले आहे.

**१. समाजसुधारणेचा आधारस्तंभ:**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी लिहिलेला सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ भारतीय समाज सुधारणेचा आधारस्तंभ आहे. यामध्ये त्यांनी सतीप्रथा, अस्पृश्यता, बालविवाह, स्त्री शिक्षण या विषयांवर ठाम भूमिका मांडली आहे. स्त्रियांना विवाह, शिक्षण व सामाजिक समानतेचे अधिकार दिले जावेत, असा आग्रह त्यांनी या ग्रंथाद्वारे केला आहे. त्यांनी समाजातील विधवा पुनर्विवाह सारख्या सुधारणांचा जोरदार पाठपुरावा केला.

**२. धार्मिक शुद्धीकरणाचा प्रारंभ बिंदू:**

सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ म्हणजे धार्मिक शुद्धीकरणाचा प्रारंभ बिंदू होय. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामुळे मूळ वेदाधारित धर्माची पुनर्स्थापना झाली. या ग्रंथामध्ये मूर्तिपूजा, कर्मकांड, अंधश्रद्धा यांचा निषेध करून परमेश्वराच्या निर्गुण, निराकार, सर्वव्यापी रूपाची व्याख्या करण्यात आली.

**३. आर्य समाजाची स्थापना व विस्तार:**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामुळे इ.स.१८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना शक्य झाली. आर्य समाजाने संपूर्ण भारतभर धर्मशुद्धी, समाजसुधारणा, शिक्षण, राष्ट्रभक्ती यासाठी एकूणच मोठे कार्य केले. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामुळे आर्य समाजाच्या शाखा संपूर्ण भारत व विदेशात स्थापन झाल्या व त्या वाढतच गेल्या.

**४. विवेक, तर्क आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार:**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामुळे विवेक, तर्क आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा पुरस्कार करण्यात आला. रुढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, अंधानुकरण, चमत्कार याला मोठ्या प्रमाणात विरोध झाला. समाजाला प्रत्येक घटनेकडे बुद्धी, तर्कनिष्ठा, विवेकवाद आणि अनुभवाच्या आधारे पाहण्याची प्रेरणा मिळाली.

**५. शिक्षणाचा प्रसार :**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामुळे शिक्षण हे सर्वांसाठी हवे आणि त्यामध्ये स्त्री व पुरूष असा भेदभाव न करता दिले जावे असा विचार पुढे आला. या ग्रंथामुळे गुरुकुल प्रणाली आणि आधुनिक शिक्षणाचा समन्वय साधण्यात आला.

**६. धर्माच्या तुलनात्मक विश्लेषणाची नवी दिशा :**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथातून बायबल, कुराण, जैन, बौद्ध आदि. धर्माचे तर्कशुद्ध विश्लेषण करण्यात आले. ढोंगीपणा व पाखंडीपणावर कडाडून टीका करण्यात आली. इतर धर्मातील अंधश्रद्धा किंवा विसंगती दाखवून सत्य काय आहे, हे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**७. राष्ट्रीयतेचा आणि स्वाभिमानाचा संदेश :**

सत्यार्थ प्रकाश ग्रंथातून भारतीय संस्कृतीचा अभिमान व्यक्त करण्यात आला. वेदांचे गौरवगाण आणि स्वतंत्र विचाराची प्रेरणा निर्माण करण्यात आली. परकीय आक्रमक संस्कृतीपासून भारतीय धर्म आणि समाजाचे रक्षण करण्याचा प्रयत्न झाला.

**सत्यार्थ प्रकाश ग्रंथाचे परिणाम:**

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या सत्यार्थ प्रकाश ग्रंथाचे सामाजिक, धार्मिक व राजकीय पातळीवर खूप दूरगामी परिणाम झाले. सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ सामाजिक जागृती, वैचारिक क्रांती आणि धार्मिक विवेक यांचा संगम आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांचा हा ग्रंथ महत्त्वपूर्ण असा आहे. या ग्रंथामध्ये तर्कशास्त्र आणि विवेक याला महत्त्व दिले आहे.

**१. सामाजिक क्षेत्रातील परिणाम:**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामुळे समाज सुधारणा चळवळीला चालना मिळाली. बालविवाह, स्त्रीशिक्षण, सतीप्रथा, जातीय भेदभाव इत्यादींविरुद्ध त्यांनी आवाज उठवल्यामुळे समाज सुधारणेची चळवळ गतिमान झाली. स्त्रियांना समान अधिकार मिळवून देण्यात या ग्रंथाला महत्त्व आहे.

स्वामी दयानंद सरस्वती हे स्त्री शिक्षणाचे आणि विधवा विवाहाचे समर्थन करत होते. त्यामुळे महिलांना समाजात नव्याने स्थान मिळू लागले व त्यांची प्रगती सुरू झाली.

**२. धार्मिक क्षेत्रातील परिणाम :**

सत्यार्थ प्रकाश या ग्रंथामुळे लोक मूर्तिपूजा, अंधश्रद्धा, कर्मकांड यांवर प्रश्न विचारू लागले. स्वामीजींनी वेदांवर आधारित धर्माचे समर्थन केल्यामुळे 'वेद ही खरी धार्मिक प्रेरणा आहे' असा विचार सर्व सामान्यांना समजला. इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध आणि जैन धर्मातील काही गोष्टींवर त्यांनी केलेल्या टीकेमुळे भरतीय समाजामध्ये मोठ्या प्रमाणात विचार मंथनाला सुरुवात झाली.

**३. शैक्षणिक परिणाम :**

आर्य समाज शाळांची स्थापना सर्वत्र होऊ लागली. सत्यार्थ प्रकाशप्रेरित आर्य समाजाने देशभरात गुरुकुल, दयानंद अँग्लो वैदिक स्कूल्स, महाविद्यालये, वसतिगृहे सुरू केली. येथे वैदिक शिक्षणासोबत आधुनिक शिक्षणही दिले जाई.

**४. शुद्धी आंदोलन :**

सत्यार्थ प्रकाशच्या प्रभावामुळे मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात आणण्यासाठी 'शुद्धी आंदोलन' सुरू झाले.

**५. राजकीय परिणाम:**

भारतात इंग्रजविरोधी विचारांची बीजे मोठ्या प्रमाणात रुजली. स्वामी दयानंद यांचा 'स्वराज्य' आणि 'स्वधर्म' यावर भर होता. सत्यार्थ प्रकाशमुळे अनेक तरुणांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत झाले. लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांच्यासारख्या नेत्यांवर याचा प्रभाव दिसून येतो.

**६. वैचारिक जागृती:**

सत्यार्थ प्रकाशमुळे लोकांनी धर्मावर, जीवनावर, आचार धर्मावर विचार करण्यास सुरुवात केली. लोक पवित्र ग्रंथांचे भाषांतर व अर्थ समजून घेऊ लागले. यामुळे चिंतनशील समाजाची निर्मिती होण्यास मोठ्या प्रमाणात हातभार लागला.

**सारांश :**

स्वामी दयानंद सरस्वती यांचा हा ग्रंथ समाजासाठी प्रेरणास्थान आहे. या ग्रंथाची भाषा तर्कशुद्ध व स्पष्ट अशी आहे. तो एक सामाजिक, वैचारिक आणि तात्विक क्रांतीचा उद्घोष आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांनी भारतीय समाजाला वेदांच्या प्रकाशात चालण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या लिखाणामुळेच आर्य समाजाची विचारधारा व्यापक प्रमाणात पसरली. आजही स्वामी दयानंद सरस्वती यांचा हा ग्रंथ समाजाचा मार्गदर्शक म्हणून ओळखला जातो. सत्यार्थ प्रकाश हा फक्त एक ग्रंथ नव्हता तर तो एक वैचारिक आणि

सामाजिक क्रांतीचा दस्तऐवज ठरला. यामुळे धर्म आणि समाज यांच्यातील अनेक चूकीच्या समजुतींचे खंडन झाले आणि नव्या युगाचा पाया रचला गेला.

**स्वंय अध्ययनासाठी प्रश्न–३**

**अ) खालील योग्य पर्याय निवडुन रिकाम्या जागा भरा.**

१ सत्यार्थ प्रकाश हा मूळ ग्रंथ ………… भाषेत आहे.

अ. संस्कृत ब. हिंदी

क. संस्कृत मिश्रित हिंदी ड. कन्नड मिश्रित हिंदी

२. सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ ……….. अध्यायात विभागला आहे.

अ. १२ ब. १३

क. १४ ड. १५

३. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथात पहिल्या भागात ………. अध्याय आहेत.

अ. १० ब. १४

क. १३ ड. १५

४. सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ……………यांनी लिहिला आहे.

अ. स्वामी दयानंद सरस्वती ब. स्वामी विवेकानंद

क. ईश्वरचंद विद्यासागर ड. स्वामी हंसराज

५. ……….. ग्रंथ म्हणजे वेदांचे मूळ मंत्र एकत्रित करून केलेले संकलन आहे.

अ. संहितापाठ ब. ऋग्वेदादिभाष्य

क. वेद ड. संदेह निवारणी

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ऋग्वेदादिभाष्य हा ग्रंथ कोणी लिहिला.

२. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाच्या दुसऱ्या भागात किती अध्याय आहेत?

३. कोणत्या ग्रंथात ऋग्वेदाच्या मंत्रांची तर्कसंगत मांडणी केली आहे?

४. स्वामी दयानंद सरस्वती यांनी कोणत्या नियतकालिकात आपले विचार मांडले?

५. सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ किती भाषांमध्ये प्रकाशित झाला आहे?

## २.३ सारांश:

स्वामी दयानंद सरस्वती हे एक संत, एक क्रांतिकारी विचारवंत, एक समाजसुधारक आणि एक विज्ञानवादी धर्मगुरू होते. आधुनिक भारताच्या निर्मात्यांमध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांचे स्थान सर्वोच्च आहे. त्यांनी देशाच्या राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक मुक्तीसाठी अथक परिश्रम घेतले. आधुनिक जागृत समाजाचे जनक म्हणुन स्वामी दयानंद सरस्वती यांना श्रेष्ठ स्थान आहे. त्यांनी भारतीय संस्कृतीच्या

विकासासाठी खूप प्रयत्न केले. त्यांच्या महान विचारांमूळे भारतीय समाज प्रभावित झाला. आपले जीवन देशहितासाठी समर्पित करून त्यांनी समाजातील वाईट प्रथा, परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आधुनिक विचारांमुळे भारतीय संस्कृतीला श्रेष्ठत्व प्राप्त झाले. आर्य समाजाने प्राचीन वैदिक संस्कृतीचे महत्त्व समाजाला पटवून दिले. आर्य समाज या सुधारणा चळवळीने श्रेष्ठ कामगिरी करून स्वदेश, स्वधर्म याचा अभिमान भारतीय समाजामध्ये निर्माण केला. सनातनी परंपरावादावर कडक टीका करून उदार मानवतावादाचा पुरस्कार केला. आर्य समाजाच्या अनुयायानी त्यागी वृत्तीने लोकसेवेचे व्रत चालवून भारतीयांपुढे मानवसेवेचा नवा आदर्श निर्माण केला. आर्य समाजाच्या सेवकांनी सामाजिक, धार्मिक व राजकीय जागृतीचे सेवाभावी कार्य केले. सत्यार्थ प्रकाश हा एक अतिशय महत्त्वाचा धार्मिक व तात्त्विक ग्रंथ आहे. हा ग्रंथ आर्य समाज या धर्मसुधारणा चळवळीचा आधारस्तंभ मानला जातो. भारताच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीच्या वाढीमध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांच्या सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाला महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी आपल्या प्रगत विचारधारेव्दारे भारतीय समाजाला परंपरेच्या विळख्यातून बाहेर काढून आधुनिक काळात आणण्याचे महान कार्य केले. स्वामी दयानंद सरस्वती हे भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे आद्यपवर्तक होत. स्वामी दयानंद सरस्वती यांनी प्राचीन भारतीय संस्कृती विषयी निर्माण झालेली अनास्था व उदासीनता दूर करून त्याविषयी अभिमान जागृत केला. पाश्चिमात्यांचे धर्म, आचार, विचार हे सर्वश्रेष्ठ नसून आमच्याही संस्कृतीतील धर्म, आचार, विचार त्याहून श्रेष्ठ आहेत. हे भारतीय समाजाला पटवून देण्याचे महान कार्य केले. समाजाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दुरावस्था बाजुला सारून त्यांचे जीवनमान बदलून टाकले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी समाज सुधारणे बरोबरच भारतीयांना राष्ट्रवादाचा संदेश दिला. त्यातूनच भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला गती आली. भविष्य आणि वर्तमान घडविण्यासाठी स्वामी दयानंद सरस्वती यांच्या कार्याचे व विचारांचे चिंतन योग्य पद्धतीने झाले पाहिजे. हे भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी व विकासासाठी महत्त्वाचे आहे. स्वामी दयानंद सरस्वती हे राष्ट्रवाद व समाज सुधारणेतून एकसंघ मजबूत भारताचे स्वप्न बघणारे महान सुधारक होते.

**२.४ परिभाषिक शब्द**

वेद्प्रामाण्यावाद- वेदांना अंतिम मानणे

एकेश्वरवाद- ईश्वर एकच आहे

प्रबोधन- सुधारणा, नवा विचार

राष्ट्रवाद- देशाबद्दल आत्मियता, प्रेम, निष्ठा असणे

सनातनी- पारंपारिक, कर्मठ

बुद्धीप्रामाण्यवाद- बुद्धीवर विवेकाचा भर देणे

**२.५ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -१**

अ. १. मुळशंकर २. २१ ३. गुरू विरजानंद

४. यशोदादेवी ५. मोरबी

ब. १. मथुरा

२. टंकारा

३. १८२४

४. १९ व्या

५. १४ व्या

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –२**

अ. १. लाहोर

२. कोल्हापूर

३. लाला लजपतराय

४. १९०२

५. हान्स कोहन्स

ब. १. आर्य

२. स्वामी दयानंद सरस्वती

३. १८५७

४. १८७५

५. लाला हसंराज

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –३**

अ. १. संस्कृत मिश्रित हिंदी

२. १४

३. १०

४. स्वामी दयानंद सरस्वती

५. संहितापाठ

ब. १. स्वामी दयानंद सरस्वती

२. ४

३. ऋग्वेद

४. आर्य पत्रिका

५. २०

**२.६ सरावासाठी स्वाध्याय**

**अ. टिपा लिहा.**

१. आर्य समाजाची तत्त्वे

२. शुद्धीकरण चळवळ

३. स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिक्षण

४. महाशिवरात्रीचा प्रसंग

५. आर्य समाजाचे राजकीय कार्य

**ब. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. आर्य समाजाचा विस्तार सांगा.

२. आर्य समाजाचे सामाजिक कार्य स्पष्ट करा.

३. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचे विविध विभाग सांगा.

४. आर्य समाजाच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घ्या.

५. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचे परिणाम स्पष्ट करा.

**क. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. आर्य समाजाच्या कार्याची माहिती द्या.

२. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या सुरुवातीच्या जीवनाचा आढावा घ्या.

३. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचे महत्त्व सांगा.

४. आर्य समाजाच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घ्या.

५. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या सत्यार्थ प्रकाश ग्रंथातील तत्त्वज्ञानाची माहिती द्या.

**२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके**

१. तुंगार हरि सखाराम, महर्षि दयानंद सरस्वती यांचे चरित्र व कामगिरी, अहमदनगर, २०२२.

२. वाघमारे जनार्दन, स्वामी दयानंद सरस्वती, व्यक्ती, विचार आणि कर्तव्य, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, २०१०.

३. देशमुख गोपाळ हरी, पंडित स्वामी दयानंद सरस्वती, पुणे, १८८३.

४. आंबिके मेघा, स्वामी दयानंद सरस्वती, पुणे, २००५.

५. ओगले आनंद, दयानंद, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे, १९८५.

६. कुळगिरी प्रल्हाद, दयानंद सरस्वती, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००९.

७. ग्रोव्हर बी.एल, आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद आणि कंपनी, नवी दिल्ली,२००३.

८. कुमार विवेक, स्वामी विवेकानंद और स्वामी दयानन्द सरस्वती, राधिका प्रकाशन, दिल्ली, २०२१.

9. Vishwa Prakash, Life Teaching of Swami Dayanand, New Delhi, 2021.

10. Sarkar Sumit, Bibliographical Survey of Social Reform Movements in the Eighteenth and Nineteenth Centuries, New Delhi, 1975.

❑❑❑

घटक–३

# स्वामी विवेकानंद

## (Swami Vivekanand)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ सुरुवातीचे दिवस (Early Days)

    ३.२.२ श्री रामकृष्ण परमहंस (Shri Ramkrishna Paramhansa)

    ३.२.३ शिकागो परिषद आणि रामकृष्ण मिशन (Chicago Conference and Ramkrishna Mishan)

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


.........................................................................................................

**३.० उद्दिष्टे**

या घटकाच्या अभ्यासानंतर पुढील गोष्टींचे आकलन होईल.

१. स्वामी विवेकानंद यांची जडण-घडण समजून घेता येईल.

२. स्वामी विवेकानंद यांचे कार्य अभ्यासात येईल.

३. श्री. रामकृष्ण परमहंस यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकता येईल.

४. शिकागो परिषद व स्वामी विवेकानंद याचा अभ्यास करता येईल.

५. रामकृष्ण मिशनचे कार्य समजून घेता येईल.

**३.१ प्रास्ताविक**

प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत सामर्थ्यशाली गुरुंची जी अखंडित परंपरा भारताच्या अध्यात्मिक वाटचालीत लाभली आहे त्यामध्ये स्वामी विवेकानंदांचे नाव सदैव तेजाळत आहे. त्यांचे कार्य व प्रयत्नांनी भारतीय संस्कृतीला, आध्यात्मिक बैठकीस आधुनिक विचारधारेची जोड दिली. शतकांमागून शतके परकीय आक्रमणे, गुलामगिरी आणि विनाश यांमधून जी भारतीय संस्कृती आजही जिवंत आहे त्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे ही अध्यात्मिक गुरुंची सर्वश्रेष्ठ परंपरा हेच होय!

अठराव्या शतकाच्या शेवटी भारत हा एकंदरीतच नि:सत्व, शक्तिहीन, भग्न व खंडविखंड झालेला देश बनला होता. अर्थात यामुळे एक तर भारताचा सर्वंकष विनाश घडणे अथवा काही अपूर्व घडून पुनर्जीवित होणे असे दोनच पर्याय उरले होते. पण अशा संकट समयी भारताच्या अंतरीची अध्यात्मिक ऊर्जा पुन्हा एकदा उफाळून वर आली आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभी नवजीवनाचा स्त्रोत पुन्हा खळाळू लागला. नव्या युगाचे हे आव्हान भारताने स्वीकारून नवनिर्माणाचा आणि रचनात्मक पद्धतीने त्याला तोंड देण्याचा मार्ग पत्करला. यामध्ये स्वामी विवेकानंद आणि त्यांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांचा अत्यंत मोलाचा वाटा राहिला. पुनरुत्थानाची ही प्रक्रिया १९ व्या शतकामध्ये विविध क्षेत्रातील नेते, अध्यात्मिक विभूती आणि सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींच्या रूपात साकारत गेली. या शतकाच्या शेवटी या प्रक्रियेमध्ये अधिक परिपक्वता आणि पूर्णत्व आल्याचे दिसून येते. कारण रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारख्या तेजस्वी महात्म्यांचे जीवन, त्यांचे कार्य आणि शिकवण यांनी हा काळ निनादत राहिला. म्हणूनच हे दोघेही गुरु-शिष्य भारताच्या त्या महान परंपरेचे खरेखुरे शक्तिशाली वारसदार होते. ते जरी भारतात जन्मलेले असले तरी ते साऱ्या मानवतेच्या आध्यात्मिक आशा-आकांक्षांचे मूर्त रूप होते. म्हणूनच रोमा रोलाँच्या शब्दांमध्ये त्यांना विश्वात्मे म्हटले गेले आहे. एकूणच शतकानूशतके अलग पडलेल्या भारताला पुन्हा आंतरराष्ट्रीय विचार प्रवाहामध्ये आणून सोडण्याचे तसेच भारताच्या आध्यात्मिक सर्वश्रेष्ठ संस्कृतीची पताका संपूर्ण जगभर फडकविण्याचे महान कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले. एवढेच नव्हे तर आधुनिक युगाच्या गरजा आणि वस्तूस्थिती ओळखण्याचे भानही त्यांनीच भारताला प्रदान केले. म्हणूनच प्रस्तुत घटकांमध्ये स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण परमहंस यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ सुरुवातीचे दिवस (Early Days)

स्वामी विवेकानंद हे भारत मातेचे महान सुपुत्र होते. भारतावर हृदयापासून प्रेम करणारे, मानवाचे दुःख बघून व्यथित होणारे, मानवजातीच्या उद्धारासाठी आयुष्य वेचणारे आणि भारताच्या सर्वश्रेष्ठ अध्यात्मिक संपदेचा संपूर्ण जगाला परिचय करून देऊन भारतमातेचा गौरव वाढवणारे एक संन्याशी योद्धे म्हणजेच स्वामी विवेकानंद होय. शेकडो वर्षांच्या परकीय राजवटीमध्ये भारत आणि भारतीय संस्कृती जेव्हा मृतप्राय झालेली होती तेव्हाच्या आणीबाणीच्या बिकट प्रसंगी स्वामी विवेकानंद या भारतमातेच्या सुपुत्राने निद्रित भारताला जागृत केले. म्हणूनच त्यांचे जीवन कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्यांच्या जीवन कार्याची माहिती पुढीलप्रमाणे-

### १. घराण्याची पार्श्वभूमी

स्वामीजींच्या घराण्याला एक समृद्ध ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. कलकत्त्यामधील शीमुलीया नावाच्या भागातील दत्त कुटुंबात त्यांचा जन्म झाला. कलकत्त्याच्या सुप्रीम कोर्टाचे नामांकित वकील राममोहन दत्त यांच्या कारकीर्दीत शीमुलीयाच्या दत्त कुटुंबियांनी शहरात बरीच ख्याती आणि प्रतिष्ठा मिळवली होती. तर पुढे राममोहन यांचे चिरंजीव दुर्गाचरण यांनी तत्कालीन प्रथेला अनुसरून संस्कृत, फारसी व इंग्रजी भाषेचे शिक्षण घेऊन तरुण वयातच वकिलीच्या व्यवसायाला सुरुवात केली होती. ते ऐश्वर्याकांक्षापेक्षा धर्मशास्त्राच्या अध्ययनात आणि साधू संतांच्या संगतीत मग्न होऊन जातं. पुढे उत्तर-पश्चिम प्रदेशातून येणाऱ्या हिंदुस्तानी साधूंच्या भावाने प्रेरित होऊन त्यांनी भर तारुण्यात समस्त ऐश्वर्याचा व नावलौकीकतेचा मोह बाजूला सारून संन्यास ग्रहण केला. असे म्हटले जाते की, दुर्गाचरण बारा वर्षानंतर एकदा आपल्या जन्मस्थानाचे दर्शन घेण्यासाठी आले होते व

आपल्या अल्पवयीन विश्वनाथ नावाच्या पुत्राला आशीर्वाद देऊन गेले होते. त्यानंतर मात्र ते कधीही कुणाच्या दृष्टीस पडले नाहीत. त्यापूर्वीच विश्वनाथ यांची आई ही त्यांना पोरके करून परलोकी निघून गेली होती. हेच संन्याशी पुत्र विश्वनाथ दत्त हे विश्वविख्यात महान संन्याशी स्वामी विवेकानंद यांचे वडील होते. विश्वनाथांनी आपल्या आजोबांच्या पावलावर पाऊल टाकून वकिलीचा व्यवसाय सुरू केला. त्यांचा वाचनाचा व्यासंगही मोठा होता. त्यांनी फारशी भाषेवरही प्रभुत्व मिळवले होते. इंग्रजी साहित्य, इतिहास वगैरेंच्या अनुकरणामुळे त्यांच्यात प्रतिगामी धार्मिक कट्टरता उरली नव्हती. लखनौ, अलाहाबाद, दिल्ली, लाहोर इत्यादी शहरांतून प्रवास करण्याचा प्रसंग आल्याने तत्कालीन कितीतरी कुलीन मुसलमान घराण्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध जोडला होता. पण असे असूनही बायबल वरील त्यांचे प्रेम प्रकट होत असे. थोडक्यात, यथाशक्ती पैसा कमवावा आणि जीवनातील आनंदाचा उपभोग घ्यावा या सर्वसाधारण धोपट आदर्शानुसार त्यांचे वागणे असे. परंतु त्यांच्या पत्नी भुवनेश्वरी देवी मात्र जुन्या वळणाच्या हिंदू स्त्री होत्या. त्या बुद्धिमान व कुशल गृहिणीच्या प्रेमाने व कर्तव्यदक्षतेने कुटुंबाचे सर्व व्यवहार अगदीच अचूक आणि सुरळीत चालत असत. भुवनेश्वरी देवीला स्वतःची मातृभाषा बंगाली लिहिणे वाचणे अतिशय चांगले जमत होते. रामायण, महाभारत, पुराने वाचण्याचा त्यांचा नित्यनियम असे. दररोज स्वहस्ते शिवपूजा केल्याखेरीज त्या अन्नाला शिवत नसत. स्वतःच्या इष्टदेवतेवरील त्यांची ही जाज्वल्य निष्ठा बघून इतर स्त्रियांनाही आदर्श धर्मजीवन जगण्याची स्फूर्ती मिळत असे.

**२. जन्म व बालपण**

१२ जानेवारी १८६३ रोजी सूर्योदयापूर्वी सहा वाजून ३३ मिनिटांनी देवी भुवनेश्वरी यांनी विश्वविजयी पुत्राला जन्म दिला. म्हणजेच कलकत्त्याजवळील शीमुलीया येथे स्वामी विवेकानंदांचा जन्म झाला. दत्त कुटुंबाचे आनंदाचे काही दिवस लोटल्यानंतर नामकरणाचा सोहळा पार पडला. यावेळी प्रारंभी मुलाचे नाव दुर्गादास, वीरेश्वर ठेवून कुटुंबातील बहुतांश मंडळी ङ्गबिलेफ या संक्षिप्त टोपण नावाने हाक मारत असली तरी त्यांचे मुळ नाव नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त असे ठेवण्यात आले. त्यामुळे ते पुढे नरेंद्रनाथ या नावानेच प्रसिद्ध झाले. बालपणी जसजसे वय वाढू लागले तसतसा नरेंद्रनाथाचा खोडकरपणा वाढतच गेला. या स्वच्छंदी बालकाच्या मनस्वी खोड्यांनी सर्वांच्याच अगदी नाकीनऊ येत असे. सरतेशेवटी त्यांच्या आईने त्यांच्यासाठी एक अद्भुत तोडगा शोधून काढला की, शिव.. शिव... म्हणत म्हणत डोक्यावर पाणी ओतताच एखाद्या मंत्रमुग्ध संन्यासासारखा लहान नरेंद्र अगदी शांत होऊन जात असे. एक दिवस नरेंद्रांच्या धिंगाण्यामुळे अगदी जेरीस आलेल्या त्यांच्या आईच्या तोंडून सहजपणे वाक्य निघून गेले की, महादेवांनी स्वतः न येता कुठून हे भूत पाठवून दिले आहे कुणास ठाऊक. कारण स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागण्यास कोणी अडथळा केला तर नरेंद्र एवढ्या मोठमोठ्याने रडत असे की, घरातील एकूणएक माणूस बेजार होऊन जात असे. पण अशावेळी त्रासून गेलेली त्यांची आई जेव्हा म्हणे की, बघ हं बिले, तू ही अशी दांडगाई करशील तर महादेव तुला कैलासात येऊच देणार नाहीत बघ, तेव्हा मात्र बाल नरेंद्र भयभीत नेत्रांनी जननीकडे बघत शांत होऊन जात असे. रामायण आणि महाभारतातील सुरस गोष्टी आपल्या आईच्या तोंडून ऐकणे नरेंद्रनाथाला अतोनात आवडत असे. अर्थात पुराणातील त्या सर्व कथांचा बाल नरेंद्रच्या संस्कारक्षम मनावर प्रभाव पडला असेल यात शंका नाही. लहानपणापासूनच नरेंद्रनाथाला साधू संन्याशी दिसताच आनंद होत असे. त्यांची इच्छा पूर्ण करण्यास ते नेहमीच तयार असत. एकूणच लाडात वाढलेल्या स्वच्छंदी नरेंद्रांच्या बालमनावर मातापित्यांच्या विविध सदगुणांचा, नीतीशास्त्राचा, अध्यात्माचा खोल प्रभाव पडला होता.

### ३. शिक्षण

वयाची पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर नरेंद्रनाथांच्या शिक्षणास प्रारंभ झाला. प्रारंभी त्यांना शिकवण्यासाठी घरी येणारे गुरुजी या आपल्या शिष्यामुळे अनेक वेळा जिकरीस आले होते. कारण मारून मुटकून विद्या शिकवण्याच्या ज्या पद्धतीचा ते आपल्या सर्व शिष्यवृंदांवर प्रयोग करीत आले होते ती पद्धत या शिष्याच्या बाबतीत अगदीच निरूपयोगी ठरली होती. गुरुजींनी रुद्रावतार धारण करून डोळे वटारताच नरेंद्र आणखीनच अडेलतट्टूप्रमाणे वागू लागले. अखेरीस नाईलाजाने गुरुजींना आपली सनातन पद्धत सोडून या चिमुकल्या शिष्याला गोड शब्दांनी शिकवणे भाग पडले. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नरेंद्रनाथांना मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्यूशनमध्ये दाखल करण्यात आले. स्वतःच्याच वर्गात शिकणाऱ्या समवयस्क मुलांची संगत लाभल्याने ते आनंदीत होते. पण या नवीन सवंगड्यांची त्यांच्या नेतृत्वाखाली लवकरच एक टोळी तयार झाली. शाळेत एकाच अवस्थेत एकसारखे बराच वेळ बसून राहणे त्यांना फारसे जमत नसे. त्यामुळे शिक्षकांनाही मोठा पेच पडत असे. पण दटावण्याला भीक घालणारा नरेंद्र नाही हे कळून चुकल्यामुळे गोड शब्दांनीच त्यांची समजूत घालावी लागत असे. वैशिष्ट्य म्हणजे नरेंद्रनाथ लहानपणापासूनच चंचल आणि चळवळ्या स्वभावाचे असले तरी ते सर्वसाधारण मुलांपेक्षा काहीतरी वैशिष्ट्यपूर्ण वागत असल्याचे नेहमीच आढळून येत असे. न्यायी, उदार, क्षमाक्षिल, शक्तिमान व प्रतिभाशाली नरेंद्रांना त्यांच्या बरोबरचे विद्यार्थी आपोआपच आपले पुढारीपण अर्पण करत असत. ऐकलेल्या सर्वच गोष्टीवर विश्वास ठेवणे त्यांच्या स्वभावाविरुद्ध होते. कोणत्याही गोष्टीवर प्रत्यक्ष प्रमाणाखेरीज विश्वास ठेवणे त्यांना पसंत नसे आणि तरुणपणी पुस्तकी तत्त्वज्ञानाच्या केवळ वाचण्यानेच तृप्त न होता सत्याच्या प्रत्यक्ष प्राप्तीसाठी साधना करण्यास ते सदैव तत्पर असत.

विश्वनाथ बाबूंना पुत्राच्या प्रतिभेची जाणीव होती. म्हणूनच नेमलेल्या शालेय पुस्तकांखेरिज इतिहास, तत्त्वज्ञान व साहित्य विषयक विविध पुस्तके ते आपल्या मुलाला शिकवत असत. त्यांच्या घरी अनेक विद्वान व्यक्तींचे जाणे- येणे होत असे तेंव्हा नरेंद्रनाथ बहुदा तिथे हजर राहून साहित्य, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवर होणारी त्यांची चर्चा लक्षपूर्वक ऐकत असत. तर कधी कधी विश्वनाथबाबू त्यांना भाग घेऊन स्वतःचे मत देण्यास सांगत असत. वयाने ते अगदीच लहान असले तरी वयस्क विद्वान मंडळींना अनेकदा त्यांची तर्कयुक्त मते ऐकून मोठे कौतुक वाटत असे. एके दिवशी त्यांच्या वडिलांचे मित्र असलेले एक नामवंत साहित्यिक बंगाली साहित्यासंबंधी चर्चा करीत होते. वडिलांच्या सूचनेने नरेंद्रनाथांनी ही बैठकीत जाऊन त्या वादविवादात भाग घेतला. थोड्याच वेळात त्या श्रेष्ठ साहित्यिकाच्या लक्षात आले की, या मुलाने बहुतेक सर्वच प्रसिद्ध लेखकांचे ग्रंथ वाचून काडलेले आहेत. अत्यंत आनंदी होऊन ते नरेंद्रनाथाकडे पाहून उद्गारले की, मुला, तू बंगाली भाषेचे मुख उजळ करशील, अशी मला पक्की खात्री आहे. पुढे स्वामी विवेकानंदांनी लिहिलेली वर्तमान भारत, भाबबार कथा, प्राच्य, पाश्चात्य, वगैरे बंगाली पुस्तके वाचल्यावर त्या साहित्यिकाची भविष्यवाणी सफल झाली होती असेच म्हणावे लागते.

रायपूरच्या निवासातील दोन वर्षांच्या काळात त्यांच्या संस्कारक्षम कोवळ्या मनात पित्याच्या महान सद्गुणांची बीजे रोवली गेली होती. तेजस्वीपणा, दुसऱ्याच्या दुःखाने द्रवून जाणे, संकटकाळी धीर न सोडता शांतपणे आपले कर्तव्य बजावणे, वगैरे गोष्टी नरेंद्रनाथ आपल्या वडिलांपासूनच शिकले होते. शालेय विद्येबरोबरच पित्याच्या चारित्र्यातील वैशिष्ट्येही त्यांनी आत्मसात केली होती. अशा पद्धतीचे शिक्षण व वळण मिळत गेल्यामुळे नरेंद्रनाथाच्या हृदयात आपल्या वडिलांबद्दल गाढ श्रद्धेचा उदय झाला होता. वेळोवेळी आपल्या

मित्रांबरोबर वडिलांच्या गुणांची स्तुती करण्यात त्यांना मोठे भूषण वाटत असे. कारण मी एका थोर पुरुषाचा मुलगा आहे, ही आपली भावना ते मोठ्या गर्वाने व्यक्त करीत असत आणि या भावनेतूनच निर्माण झालेला प्रबळ आत्माभिमान त्यांच्या बोलण्या-चालण्यात प्रतिबिंबित होत असे. दोन वर्षे शाळेत गैरहजर राहिल्यामुळे मॅट्रिकच्या वर्गात भरती होताना त्यांना बरीच अडचण पडली. पण अखेरीस त्यांचे गुण जाणून त्यांच्या शिक्षकांनी अधिकाऱ्यांची खास परवानगी मिळवून त्यांना मॅट्रिकमध्ये घेतले. अतोनात मेहनत करून दोन वर्षांचा अभ्यास एका वर्षातच उरकून त्यांनी मॅट्रिकच्या परीक्षेची जय्यत तयारी केली आणि शेवटी जेव्हा त्यांनी बहुमानाने पहिल्या वर्गात पास होऊन शाळेचे नाव राखले तेव्हा घरातील मंडळी, मित्रमंडळी आणि शिक्षक, अधिकारी यांना मोठा आनंद झाला.

नरेंद्रांची वाचनाची गती इतरांहून फार जलद असे. कित्येक वेळा एकाच दृष्टिक्षेपात एखाद्या परिच्छेदातील समग्र आशय ते समजून घेऊ शकत असत. प्रत्येक शब्दच नाही तर संपूर्ण ओळही त्यांना त्यासाठी वाचावी लागत नसे. अशा विलक्षण गतीने ते पानामागून पाने भराभर हातावेगळी करत आणि तीव्र स्मरणशक्ती असल्यामुळे जे काही वाचले ते सारे त्यांच्या उत्तम प्रकारे लक्षात राहत असे. निसर्गदत्त देणे आणि अपार कष्ट करण्याची तयारी यांच्या बळावर शाळेचा उंबरठा ओलांडत असताना नरेंद्र यांच्या ज्ञानाचा पल्ला त्यांच्या वयाच्या मानाने फार विस्तृत होऊन गेला होता. विद्येच्या बरोबरीने त्यांनी विविध प्रकारचे खेळ आणि कला यातही कौशल्य संपादन केले होते. १८८० मध्ये त्यांनी प्रेसिडेन्सी महाविद्यालयात प्रवेश घेतला. इंग्रजी, गणित आणि इतिहास या जुन्या विषयाबरोबरच त्यांनी तर्कशास्त्र आणि मानसशास्त्र हेही विषय अभ्यासले. महाविद्यालयाच्या शिक्षणाच्या अवधीतच त्यांनी अनेक ग्रंथांचे वाचन केले. मलेरियाच्या साथीमुळे त्यांना बरेच दिवस महाविद्यालयात जाता आले नाही. तरीसुद्धा १८८१ मध्ये फर्स्ट आर्टची परीक्षा दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण होऊन पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. तत्त्वज्ञानाचा विशेष अभ्यास केला. तसेच या काळात हर्बर्ट स्पेन्सर, हॅमिल्टन, मिल, प्लेटो, लॉक, यांच्या ग्रंथांकडे नरेंद्रनाथ या काळात विशेष आकर्षित झाले होते. त्यांना साहित्याबद्दल विशेष आवड होती. संस्कृत, इंग्रजी आणि बंगाली या तीनही भाषेतील उत्तम साहित्यकृती त्यांनी वाचल्या होत्या. रामायण आणि महाभारत यांची बंगालीत झालेली भाषांतरेही त्यांनी दृष्टीखाली घातली होती. अशा चौफेर वाचनामुळे महाविद्यालयीन अध्ययनाच्या कालखंडात नरेंद्रांची बुद्धी आणि विचारशक्ती अधिकाधिक सतेज आणि धारदार होत गेली. इतर विद्यार्थ्यांना कठीण वाटणारे विषय त्यांना सहज आकलन होत असत आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांना ज्यांचे कष्टाने आकलन करून घ्यावे लागत असे त्या विषयातही ते तळाशी जाऊन पोहोचत असत. त्यांच्या महाविद्यालयाचे प्राचार्य विल्यम हेस्टी यांनी नरेंद्र बद्दल म्हटले होते की, नरेंद्रनाथ हा खरोखरी असामान्य बुद्धिमान आहे. मी खूप प्रवास केला, अनेक ठिकाणी गेलो पण नरेंद्राच्या ठायी जी बुद्धीची क्षमता आहे ती असणारा असा असामान्य प्रज्ञेचा तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी मी आतापर्यंतच्या आयुष्यात कधीही पहिला नाही. तो आयुष्यात आपल्या कर्तृत्वाची मुद्रा उमटविणार यात कोणताही संशय नाही. यावरून आपणाला त्यांच्या चौफेर शिक्षणाची कल्पना येते.

**४. रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद :**

रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद या दोन महान विभूती असून त्यातील एक गुरु तर दुसरा त्यांचा शिष्य होते. विविध क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाची मुद्रा उमटवणाऱ्या अनेक महान व्यक्ती भारताने गेल्या १५० वर्षात पाहिल्या. त्यातील अनेक व्यक्तींचे कर्तृत्व जगाच्या रंगभूमीवर सिद्ध झाले आहे, अशा श्रेष्ठ

व्यक्तिमत्त्वात रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांचा समावेश होतो. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नरेंद्रनाथांच्या विवाहाची बोलणी घरात चालू होती पण नरेंद्र यांचा विवाहाला कायम नकार राहिला. डॉ. रामचंद्र दत्त हे ब्राम्हो समाजात जात असत तसेच नरेंद्र ही जात असत व भक्तीपर गीते म्हणत असत. रामचंद्र दत्त एके दिवशी नरेंद्रला म्हणाले की, तुला खरोखरीच ईश्वर दर्शनाविषयीची जिज्ञासा असेल तर उगाच इकडे तिकडे भटकू नकोस ब्राम्हो समाजात जाण्याचाही काही उपयोग नाही तर तू सरळ दक्षिणेश्वराला श्रीरामकृष्णांकडे चल. रामकृष्ण परमहंस अधून मधून कलकत्त्यातील आपल्या भक्तांच्या घरी संध्याकाळ घालवीत असत. १८८१ च्या नोव्हेंबर मध्ये सुरेंद्रनाथांकडे श्रीरामकृष्ण येणार होते. अशाच प्रकारचा एक मेळावा जमणार होता. पण भजने म्हणू शकेल असे आज कोणी नव्हते. तेव्हा नरेंद्र जवळच राहत होता तो उपासना संगीत म्हणतो हे सुरेंद्रनाथांना माहीत होते म्हणून त्यांनी नरेंद्रला मुद्दाम बोलावून घेतले. त्यानुसार नरेंद्रनाथ आले आणि त्यांनी दोन-तीन भजने म्हटली. तेव्हा नरेंद्राच्या मधुर आवाजावर आणि त्याच्या म्हणण्याच्या पद्धतीतील भावाविष्कारावर श्रीरामकृष्ण अतिशय संतुष्ट होऊन गेले. त्यांनी नंतर नरेंद्रला मुद्दाम जवळ बोलावले आणि म्हणाले, एकदा दक्षिणेश्वराला ये. पुढे सुरेंद्रनाथ आणि रामचंद्र यांच्याबरोबर १८८१ च्या डिसेंबर महिन्यात नरेंद्रनाथ दक्षिणेश्वराला गेले. खऱ्या अर्थाने जगप्रसिद्ध असलेल्या श्रेष्ठ अशा श्री. रामकृष्णांच्या साधनेचा हा पवित्र परिसर होता. त्यांच्या अलौकिक आध्यात्मिक वास्तव्यामुळे त्या मंदिर परिसराला एक आगळीवेगळे महात्म्य प्राप्त झाले होते. साऱ्या जगातून आजही ही जागा पहाण्यासाठी रामकृष्णांचे भक्त आणि जिज्ञासू सतत येत असतात. तेथे केशवचंद्रसेन आणि दयानंद सरस्वती अशी अखिल भारतीय कीर्तीचे माणसे येऊन गेली. नरेंद्र जेव्हा या कालीमंदिरात रामकृष्णांच्या भेटीसाठी गेले तेव्हा मात्र लोकांचे तेथील जाणे येणे काही मोजक्या सुशिक्षितांच्या पुरते मर्यादित होते. सारे दक्षिणेश्वर शांत होते. काली मंदिरातील वातावरण त्याहून शांत आणि गंभीर होते. मंदिरासमोरून वाहणारा गंगेचा विशाल प्रवाह तितकाच शांतपणे वाहत होता. सकाळच्या आणि संध्याकाळच्या प्रहरी पक्षांचा किलबिलाट कानावर पडल्यामुळे निसर्गाचे सानिध्य जाणवत होते. मंदिरातील आरत्यांच्या वेळी होणाऱ्या घंटा आणि झांजा यांच्या आवाजामुळे ईश्वरभक्तीपर वातावरणाचा प्रत्यय येत होता.

दक्षिणेश्वराला यावेळी श्रीरामकृष्ण आणि नरेंद्र यांची झालेली ही पहिली भेट होय. या भेटीबद्दल दोघांनीही आपापल्या परीने अतिशय सुरेख वृत्तांत दिलेला आहे. जसे की, रामकृष्णांनी यावेळी नरेंद्रास गाणी व भजन म्हणण्यास सांगितले. नरेंद्रचे भजन ऐकून सभोवताली बसलेल्या भक्तगणांकडे पाहत रामकृष्ण म्हणाले, पहा पहा साक्षात सरस्वती त्याच्या उज्वल दर्शनातनं प्रकट होत आहे. अगदी तरुण वय असलेल्या नरेंद्रविषयी रामकृष्णांनी काढलेले हे उद्गार ऐकून तेथील सर्वांनाच मोठे नवल वाटले. विवेकानंदांनीही या भेटीचे वर्णन करताना म्हटले आहे की, रामकृष्णांनी म्हटल्याप्रमाणे मी गाणं म्हटलं पण ते संपल्यावर ते एकदम उठले आणि माझा हात धरून मला उत्तरेकडेच्या पडवीत घेऊन गेले. खोलीचे दार बंद करून घेतले. अतिशय आनंदीत होऊन त्यांनी माझा हात आपल्या हातात धरला आणि त्यांच्या डोळ्यातनं आनंदाच्या भरात घळाघळा अश्रू येऊ लागले. पुढे ते म्हणाले, इतक्या उशिरा तू इथं आलास. मला एवढा काळ वाट पाहायला लावण्याइतका तू कसा निष्ठूर झालास. पुन्हा एकटा मला भेटायला येशील का असं वचन त्यांनी माझ्याकडून घेतले. रामकृष्णांचे जे काही बोलणे झाले होते त्यामुळे नरेंद्रच्या मनात प्रचंड संभ्रम निर्माण झाला होता. त्यांच्या मनात आलं की, हा माणूस कोणी श्रेष्ठ दर्जाचा गुरु असेल. म्हणून मी थोडासा त्यांच्याजवळ सरकलो आणि आतापर्यंत जो प्रश्न अनेकांना विचारला होता तो मी त्यांना विचारला, आपण देव पाहिला आहे काय? तेव्हा ते म्हणाले होय मी आता इथं तुम्हा सर्वांना पाहतो आहे तसा त्याला पाहत आलो आहे. फरक इतकाच आहे की, यापेक्षा कितीतरी

सुस्पष्टपणानं मी त्याला पाहिलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले मी तुम्हाला पाहतो आहे आणि तुमच्याशी बोलतो आहे अगदी तसंच कोणालाही ईश्वराला पाहणं शक्य आहे. त्याच्याशी बोलणं शक्य आहे. पण कुणाला तसी गरज वाटते का? आपली बायको आणि मुलं यांच्यासाठी पैसा मिळावावा किंवा मालमत्ता साठवता यावी यासाठी लोक रडत असतात पण ईश्वराचे दर्शन व्हावं यासाठी कोणाच्या डोळ्यातून अश्रू येतात का? जर कोणी त्याच्या दर्शनाचा ध्यास घेऊन अश्रू ढाळेल तर तो खात्रीनं त्याच्यासमोर प्रकट होईल. त्यांच्या या शब्दांचा नरेंद्राच्या मनावर एकदम परिणाम झाला. कारण ते म्हणतात, मला प्रथमच असा माणूस भेटला होता की, जो आपण ईश्वराला पहिलं आहे असं ठामपणाने म्हणत होता. तेव्हा मोठ्या विश्वासाने मला असं वाटून गेलं की इतर कोणी सामान्य प्रवचनकार नुसतं बोलतात तस यांचं बोलणं नाही तर त्यांना सखोल जी काही अनुभूती आहे तिच्या बळावर ते हे सारं बोलत आहेत. हा मनुष्य अतिशय पवित्र अंःतकरणाचा आहे, खराखुरा सत्पुरुष आहे व साऱ्या मानवजातींने त्याच्याबद्दल आदर बाळगावा, अशी यांची योग्यता आहे. अशा प्रकारचे उलट सुलट विचार मनात घोळवत मी त्यांना प्रणाम केला आणि कलकत्त्यात परत येण्यासाठी त्यांचा निरोप घेतला.

पुढे नरेंद्र दक्षिणेश्वराला दुसऱ्यांदा गेले त्यावेळच्या भेटीचा वृत्तांत सांगताना विवेकानंद म्हणतात की, ते छोट्या पलंगावर एकटेच बसले होते. मला पाहून त्यांना आनंद वाटला आणि अतिशय प्रेमाने मला बोलवून त्यांनी आपल्या बिछान्यावर शेजारी बसऊन घेतलं. पण पुढच्या क्षणी मला असं आढळून आलं की, ते कसल्यातरी तीव्र भावनेने झपाटून गेले आहेत, तोंडाने स्वतःशीच काहीतरी पुटपुटत आणि माझ्याकडे एकाग्र दृष्टीने पाहत ते हळूच माझ्याजवळ सरकले. त्यांनी आपला उजवा पाय माझ्या अंगावर ठेवला. तेव्हा मला एक विलक्षण अनुभव येऊन गेला. माझे डोळे सताड उघडे होते आणि तरी मला असं दिसू लागलं की चारी बाजूंच्या भिंती आणि खोलीतील साऱ्या वस्तू गरागरा भोवती फिरू लागल्या. मी अतिशय भयभीत होऊन गेलो आणि आपल्यासमोर आपला मृत्यूच उभा आहे असं मला वाटलं. तेव्हा स्वतःवरचा ताबा सुटल्याने मी एकदम ओरडून म्हणालो, हे तुम्ही माझं काय करीत आहात. हे ऐकून ते मोठ्यांनी हसले आणि माझ्या छातीवर थोपटत म्हणाले, ठीक आहे, सध्या हे राहू दे, योग्य वेळी सारं काही घडून येईल. अतिशय नवलाची गोष्ट अशी की, त्यांनी असं म्हटल्यावर मला येत असलेला तो सारा अनुभव नाहीसा होऊन गेला व मला माझी स्वतःची नीट जाणीव पुन्हा आली आणि खोलीच्या आतील तशाच बाहेरच्या बाजूच्या साऱ्या वस्तू पूर्वीसारख्या जशाच्या तशा आहेत असं मला आढळून आलं. पहिल्या भेटीच्या वेळीप्रमाणेच ते माझ्याशी अतिशय प्रेमाने आणि अगत्याने वागले. त्यांनी मला दिलेल्या त्या प्रेमाच्या वागणुकीमुळे माझं मन त्यांच्याकडे अधिकच अकृष्ट झाले. अखेर संध्याकाळची वेळ होत आली, दिवस संपत आला तेव्हा मी त्यांचा निरोप घेऊ लागलो. यावर ते मनाने फार कष्टी झालेले दिसले आणि मी पुन्हा लवकर येईल असं कबूल केल्यावरच त्यांनी मला जाऊ दिलं. पुढे थोड्याच दिवसात त्यांच्या भेटीसाठी नरेंद्र पुन्हा दक्षिणेश्वराला गेले. यदु मल्लिक यांच्या बागेत त्यांचे छोटे निवासस्थान आहे. यदू मल्लिक रामकृष्णांचे भक्त होते. रामकृष्ण नरेंद्रला घेऊन त्या बागेत गेले. थोडा वेळ हिरवळीवर फिरून ते दोघेही घराच्या बाहेरच्या बाजूस असलेल्या वसरीत बसले. तेथे बसल्यावर थोड्याच वेळात श्रीरामकृष्ण भावास्तेत गेले आणि त्यांनी नरेंद्रला स्पर्श केला. तेव्हा त्यांचे बाह्य विश्वाचे सारे भान पूर्णपणे नष्ट झाले आणि त्यानंतर काय झाले ते त्यांनाही काही समजले नाही. पण जे काही घडले ते श्रीरामकृष्णांनी आपल्या काही शिष्यांशी बोलताना सांगितले आहे. की थोड्या वेळाने नरेंद्र जेव्हा भानावर आला तेव्हा त्याला असे आढळले की श्रीरामकृष्ण आपल्या छातीवर हाताने हळुवारपणे थोपटत आहेत. त्याआधी काय घडले ते सांगताना श्रीरामकृष्णांनी म्हटले आहे की, नरेंद्र त्या स्थितीत असताना मी त्याला अनेक तऱ्हेचे प्रश्न विचारले, मी त्याची पूर्वकथा विचारली, तो

आधी कुठे होता, या जगात तो का आला आहे आणि किती काळ त्याचं वास्तव्य या भूमीवर असणार आहे. याबद्दल विचारलं तेंव्हा त्यांनी स्वतःच्या अंतरंगात खोलवर बुडी घेतली आणि माझ्या प्रश्नांना व्यवस्थित उत्तरे दिली. मला त्याच्या संदर्भात जे दर्शन झालं होतं आणि मी त्याच्याविषयी जे काही तर्क केले होते त्यांच्याशी ती पूर्णपणे जुळणारी होती. मला एवढं समजलं की, पूर्णावस्था प्राप्त करून घेतलेला तो एक ऋषी आहे. ध्यान करण्यात पूर्ण कुशल आहे आणि ज्या दिवशी त्याला आपल्या खऱ्या स्वरूपाचे भान होईल त्याक्षणी तो आपल्या इच्छेनुसार योगमार्गांनं आपल्या शरीराचा त्याग करून या जगातून निघून जाईल. एकूणच या साऱ्या भेटींचा विचार करता पहिले म्हणजे आपण ईश्वर पहिला आहे असे ठाम उद्गार काढणारे त्यांना रामकृष्ण भेटले याचे त्यांना समाधान वाटले. नरेंद्र यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आकाराला आले होते. त्यातूनच पुढे नाना प्रकारचे संदेश त्यांच्या मनात उठत राहिले. त्याचवेळी परावृत्त न झाल्यामुळे ते रामकृष्णांकडे जात राहिले. त्यामुळे वयाची १९ वर्षे पूर्ण होत असतानाच श्रीरामकृष्णांशी झालेल्या या भेटींमुळे नरेंद्रांच्या जीवनाला कलाटणी मिळून एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला.

### ५. प्रारंभीचे कार्य

स्वामी विवेकानंद यांच्यासारखा अध्यात्मिक गुरु जगामध्ये विरळच. स्वतः ईश्वर साक्षात्काराने परिपूर्ण असूनही ते सर्वसामान्य स्त्री–पुरुषांमध्ये वावरले. कारण त्यांच्या दृष्टीने हे दोन स्तर परस्परांपासून भिन्न नव्हतेच. हीच गोष्ट त्यांनी कर्म हीच उपासना या त्यांच्या महान विचार सूत्रातून प्रकट केली आहे. बाहेरील प्रत्येक कर्म सेवाभावाने करून समाजाची उन्नती साधने आणि प्रत्येक अंतरिक कर्म अध्यात्मिक उन्नतीसाठी आचरणे अशा प्रकारचे अभिनव तत्त्वज्ञान त्यांनी मानव जातीला शिकवले. भगवतगीतेच्या भाषेमध्ये हीच गोष्ट कर्म आणि ज्ञान एकच अशी सांगता येते. हे विचारसूत्र म्हणजेच स्वामी विवेकानंदांचा साऱ्या मानव जातीसाठी दिलेला संदेश होय. त्यांच्या प्रारंभिक कार्याचा विचार करत असताना एकदा शाळेत असताना नरेंद्रना त्यांचा काहीही दोष नसताना शिक्षा झाली होती. भूगोलाच्या शिक्षकांनी त्यांना एक प्रश्न विचारला होता आणि नरेंद्रने उत्तर बरोबर दिले होते. परंतु शिक्षकाला ते उत्तर चुकीचे वाटले होते म्हणून शिक्षकांनी नरेंद्र यांना शिक्षा केली. तेव्हा ते शिक्षकांना म्हणाले, सर माझी काही चूक नाही, माझी खात्री आहे की माझे उत्तर बरोबर आहे. या बोलण्याने शिक्षक अधिकच संतापले आणि नरेंद्रनाथांना छडीचा मार खावा लागला. नरेंद्र मग घरी आले तेव्हा त्यांचे डोळे पाण्याने डबडबलेले होते. त्यांनी आईला घडलेली सगळी हकीगत सांगितली. आईने जवळ घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि म्हणाली, बाळ तुझं बरोबर असताना तू का पर्वा करतोस, हे बघ, काही झालं तरी खऱ्याची कास कधी सोडायची नाही. आपल्या आईचा आदर्श नरेंद्रनाथांना रामकृष्णांमध्ये सतत जाणवत असे. कारण रामकृष्णही म्हणत असत की, काही झालं तरी सत्याची कास कधीच सोडायची नसते. त्यामुळे स्वामीजींच्या प्रत्येक कृतीत जो सत्यासाठी आग्रह दिसून येतो त्याचे मूळ त्यांच्या आईच्या आणि आध्यात्मिक गुरुंच्या सत्याप्रती असलेल्या आढळ निष्ठेत सामावलेले आहे. पुढे जगाला देखील त्यांनी हेच सांगितले की, सत्यासाठी सर्वस्वाचा त्याग करता येत असतो पण सर्वस्वासाठी सत्याला त्यागता येत नसते.

ब्राह्मो समाजात सभासद म्हणून भरती होण्याच्या आधीपासूनच नरेंद्रनाथांचा राजा राममोहन रॉय यांच्या साहित्याशी घनिष्ठ परिचय झाला होता. साधारण ब्राह्मो समाजाचे सदस्य होऊनही देवेंद्रनाथ व केशवबाबू यांच्याकडे तत्त्वचर्चेसाठी वरचेवर जाण्याचा त्यांचा हरिपाठ होता. अप्रतिम व्यक्ती आणि शक्तिशाली पुरुष अशा केशवचंद्रांविषयी हृदयात गाढ अनुराग असूनसुद्धा त्यांनी नुकत्याच स्थापलेल्या नवविधान ब्राह्मो समाजात न

जाता नरेंद्रनाथ साधारण ब्राह्मो समाजातच राहतात. कारण लहानपणापासूनच जातीभेदातील विषमतेचा त्यांना मनापासून तिटकारा वाटत असे. साधारण ब्राह्मो समाजाचे प्रचारक त्यावेळी जातीभेद प्रथेचा समुळ नायनाट करण्यासाठी कंबर कसून प्रयत्न करीत होते. हीच गोष्ट नरेंद्रनाथांच्या अत्यंत आवडीची होती. पण ब्राह्मो समाजात भरती होऊनदेखील उपासनेच्या बाबतीत समाजातील इतर सभासदांशी त्यांचे एकमत होऊ शकले नाही. बुद्धिमान आणि खंबीर मनाचे नरेंद्रनाथ विचाराने स्वतःला पटल्याखेरीज दुसऱ्यांची हवी ती मते दत्तक घेणाऱ्यांपैकी मुळीच नव्हते.

इंग्रजांचे अधिराज्य जेथे सर्वात आधी प्रस्थापित झाले, जेथे इंग्रजी विद्या घेतलेल्या तीन पिढ्या होऊन गेल्या होत्या. अशा कलकत्ता नगरीत नरेंद्रनाथ वाढले होते. अशा या आधुनिक वातावरणात जे जे म्हणून काही नवे होते ते सारे त्यांनी अनुभवलेले होते. त्यातील अनेक गोष्टीत ते स्वतः सहभागी झाले होते. लहानपणी आईच्या सहवासात मनावर उत्तम धार्मिक संस्कार झाले होते हे खरे असले तरी पाश्चात्य वैज्ञानिक संस्कृतीमधील जे जे म्हणून कसदार आणि सामर्थ्यसंपन्न होते त्याचा परिणामही त्यांच्या मनावर झालेला होता. जगातील अनेक देशांचा इतिहास त्यांना अवगत होता आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानातील अनेक विचारप्रवाह त्यांना ज्ञात होते. उदार मनोवृत्ती, स्वाभिमानाची जाणीव आणि बुद्धीवादी दृष्टिकोन यांचा संस्कार वडिलांकडून त्यांच्यावर झालेला होता. रामकृष्ण ईश्वरनिर्भर होते तर नरेंद्रनाथ आत्मनिर्भर होते. तर्काचा रस्ता विचारण्याचा खटाटोप रामकृष्णांनी कधी केला नव्हता तर तर्काला सोडून असणारी कोणतीही गोष्ट नरेंद्रांना मानवत नव्हती. रामकृष्णांची अविचल श्रद्धा स्पष्ट दिसणारी होती आणि त्यांची प्रज्ञा अंतरंगात खोलवर कार्यरत होती. नरेंद्रांची बुद्धी तलवारीच्या पात्याप्रमाणे लखलखत होती. वरवर पाहता नरेंद्रनाथ आणि रामकृष्ण विरूद्ध टोकला उभे असल्याचे वाटत असले तरी काही अंतरिक प्रेरणांच्या अंगाने त्यांचे अतिशय निकटचे नाते होते. कारण प्रखर अध्यात्मिक जिज्ञासा आणि अंतिम सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा हे नरेंद्रनाथांमध्ये रामकृष्णांप्रमाणेच होती. फरक इतकाच होता की नरेंद्रनाथ ज्याला अंतिम सत्य हस्तगत करणे म्हणत होते त्यालाच रामकृष्ण जगन्मातेचे दर्शन म्हणत होते. बालपणात केवळ खेळ म्हणून ध्यानाकडे मन वळवणे आणि पुढे आंतरिक श्रद्धेला हादरा देणारे विचार समोर येत असूनही ते ध्यान चालू राहणे ही नरेंद्रनाथ आणि रामकृष्ण यांच्यात आढळणारी समान अध्यात्मिक प्रवृत्ती होती. नरेंद्रांच्या अध्यात्मिक सामर्थ्याबद्दल रामकृष्णांचे उत्तर असे की, ज्ञानाचा अग्नी नरेंद्रांच्या ठायी एवढा धगधगता आहे की कोणतेही अशुद्ध अन्न खाल्ले तरी त्याचे भस्म होऊन जाते. यावरून त्यांच्या अध्यात्मिक शक्तीची कल्पना येते. ईश्वर मानव रूपाने अवतार घेतो हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सिद्धांत असून या सिद्धांताला स्वामीजींचा प्रखर विरोध होता. आपल्या मताचा पुरस्कार करणे ही त्यांची स्वभाव सिद्ध प्रवृत्ती होती. ऑगस्ट १८८५ रोजी रामकृष्णांचे एक मित्र विश्वनाथ उपाध्याय त्यांना भेटावयास आले होते. त्यावेळी बोलताना रामकृष्ण म्हणाले, नरेंद्र अलीकडे पूर्वी इतका आवाज करीत नाही. या वाक्यातील अभिप्राय असा की त्याच्या बोलण्यातील युक्तिवादाची प्रखरता कमी झाली आहे. यावर उपाध्याय म्हणतात की, तो अलीकडे आवाज करीत नाही याचं कारण तो आता आतून भरला आहे. पाण्याने पूर्ण भरलेला कुंभ असावा तसा झाला आहे.

दरम्यानच्या काळातच वडील विश्वनाथबाबूंचे आकस्मिक निधन झाले. कुटुंबाला विलक्षण धक्का बसला. कुटुंबाची परिस्थिती नाजूक बनली. कुटुंबाचा भार नरेंद्र यांच्यावरती आला. ते आई आणि भावंडे यांच्याशी गप्पा मारत असताना धीर देण्याचा प्रयत्न करताना म्हणत असत की, काही काळजी करू नका लवकरच मला एखादी नोकरी मिळेल आणि आपल्याला पुन्हा चांगले दिवस येतील. त्यानुसार नरेंद्र यांनी नोकरी

मिळवण्यासाठी खूप प्रयत्न केले. अनेक ठिकाणी खेटे घातले. अनेक कार्यालयातून अर्ज केले पण नोकरी काही मिळाली नाही. मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्यूटच्या शाळेत त्यांना शिक्षकाची नोकरी मिळाली. पण ती काही महिन्यांपूर्तीच होती. नंतर सिद्धेश्वरचंद्र गल्लीमध्ये सुरू झालेल्या नव्या शाळेत नरेंद्र शाळा प्रमुख झाले पण तेथे विद्यासागर यांचे एक जवळचे नातेवाईक संस्थेचे कार्यवाह होते. नरेंद्र आपल्या सांगण्याप्रमाणे काम करीत नाही असा आक्षेप त्यांनी घेतला आणि एका महिन्यातच त्यांना नोकरीतून मुक्त करण्यात आले. ब्राम्हो समाजाचे एक नेते पंडित विश्वनाथ शास्त्री यांच्याकडेही नरेंद्र नोकरीसाठी गेले होते पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. ज्या नातेवाईकांना पूर्वी आश्रय दिला होता त्या सर्वांनी पाठ फिरवली होती. एवढेच नव्हे तर स्थावर मालमत्तेतील त्यांचा न्याय वाटा त्यांना मिळू द्यायचा नाही, असा काहींनी चंगही बांधला होता. एवढा बुद्धिमान आणि गुणसंपन्न मुलगा पण नाना ठिकाणी प्रयत्न करूनही त्यांना नोकरी मिळत नव्हती. अखेर या दुःखपूर्ण संसाराकडे पाठ फिरवून ते संन्यास घेण्याच्या तयारीत होते. इतके सारे विपरीत प्रसंग घडत असतानासुद्धा त्यांच्या मनातून ईश्वर विषयक श्रद्धा कमी झाली नव्हती. दररोज सकाळी उठल्यावर परमेश्वराचे स्मरण करण्याचा त्यांचा नित्य नियम होता. भुवनेश्वरी यांच्या कानावर एक दिवस त्यांची प्रार्थना पडली. प्रतिकूल परिस्थितीमुळे त्याही गंजून गेल्या होत्या, चिंता त्यांचे मन सतत पोखरत होती. तेव्हा त्यादिवशी काहीशा तिरस्काराने नरेंद्रला उद्देशून म्हणाल्या की , पुरे कर तुझी ती प्रार्थना, लहानपणापासून सारखं भगवान, भगवान चालवल आहेस, काय केले त्या भगवंताने तुझ्यासाठी. रामकृष्णांच्या प्रभावाखाली सापडल्यामुळे आपला हातातोंडाला आलेला मुलगा संसाराकडे पाठ फिरवून एके दिवशी निघून तर जाणार नाही ना या संखेने भुवनेश्वरी यांचे मन कित्येक दिवस भयकंपित झाले होते. अशा स्थितीतच नरेंद्रांच्या मनात प्रश्न उभा राहिला की, खरोखरीच ईश्वर आहे का? आणि असेल तर माणसानं मनापासून केलेल्या प्रार्थनेला तो प्रतिसाद देतो का? जर देत असेल तर मी एवढ्या काकुलतीने त्याची विनवणी करतो आहे त्याला काहीच उत्तर का मिळालं नाही. परिणामी नरेंद्रांच्या आयुष्यात अवचितपणे एक रात्र अशी आली की, वडिलांच्या आकस्मिक निधनामुळे ते प्रपंचातील प्रश्नांच्या वावटळीत सापडले तर दुसरी एक रात्र तितक्याच अकस्मिकपणे अशी आली की, ऐहिकातील कर्तव्याचे सारे दोर कापून टाकून आपण आपल्या आध्यात्मिक प्राप्तव्याच्या दिशेने चालू लागायचे, असा निर्णय त्यांनी घेतला. पण हा निर्णय त्यांनी दुसऱ्या कोणी सांगितले म्हणून घेतला नाही तर केवळ स्वतःच्या अंत:प्रेरनेने घेतला होता. एकूणच भीषण अशा आपत्तींनी चाहूबाजूंनी वेढुन टाकलेले असताना असे कठोर निर्णय घेण्याचे दिव्य क्षण श्रेष्ठ महापुरुषांच्या जीवनातच अवतरत असतात. आणि त्या निर्णयामुळेच प्रकाशमय अशा जीवनाकडे जाण्याचे दरवाजे त्यांना खुले होत असतात. नरेंद्रनाथांच्या आयुष्यातील क्षणही त्याच प्रकारचा होता.

अशाप्रकारे स्वामी विवेकानंदांनी आई भुवनेश्वरी आणि गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या सानिध्यातून अध्यात्मिक व तात्त्विक शक्तीच्या बळावर आपल्या बौद्धिक व वैचारिक कार्याचा प्रारंभ केलेला होताच. पण त्याचबरोबर अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी आपण जीवन व्यतीत केले पाहिजे, या विचारांना आदर्श मानून ते पुढील वाटचाल करत राहिले.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक १**

**रिकाम्या जागा भरा**

१. स्वामी विवेकानंद यांचे मूळ नाव ........ होते

अ. देवेंद्रनाथ ब. नरेंद्रनाथ

क. केशवचन्द्र ड. सुरेंद्रनाथ

२. ........ हे स्वामी विवेकानंद यांचे गुरु होते

अ. छबिलदास ब. स्वामी दयानंद

क. राजाराम मोहन रॉय ड. रामकृष्ण परमहंस

३. ...... हे स्वामी विवेकानंद यांचे पिता होते

अ. विश्वनाथ दत्त ब. हरिप्रसाद दत्त

क. दुर्गाचरण दत्त ड. यापैकी नाही

४. स्वामी विवेकानंद यांचा जन्म ...... साली झाला

अ. १२ जानेवारी १७६३ ब. १२ जानेवारी १८६३

क. १२ जानेवारी १९६३ ड. यापैकी नाही

५ . स्वामी विवेकानंद यांनी भारताची परिस्थिती जाणून घेण्यासाठी .... साली संपूर्ण भारतभर प्रवास केला.

अ. १८९० ब. १८९१

क. १८९२ ड. १८९३

### ३.२.२ श्री रामकृष्ण परमहंस

सर्व धर्मांचे जणू मूर्तीमंत स्वरूप असे अवतार श्रेष्ठ श्री. रामकृष्ण परमहंस हे जगविख्यात स्वामी विवेकानंद यांचे गुरु होय. माणसाने धनसंपत्ती, मालमत्ता व भौतिक सुखाच्या मागे न लागता परमेश्वरचरणी केंद्रित करावे असा संदेश देणारे रामकृष्ण परमहंस हे एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्याच दिव्य सहवासाने आणि मार्गदर्शनाने स्वामी विवेकानंद यांनी मानवतेचे महत्त्वपूर्ण कार्य तर केलेच पण त्याचबरोबर त्यांच्या विचारांच्या प्रसारासाठी रामकृष्ण मिशनची स्थापना करून हिंदू धर्माचे व भारतीय संस्कृतीचे सर्वश्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

#### १. कौटुंबिक पार्श्वभूमी

कलकत्त्यापासून सुमारे शंभर कि. मी. दूर असलेलं कामरपुकुर हे एक छोटेसे खेडेगाव. याच खेडेगावात रामकृष्ण परमहंस यांचा जन्म १८३६ मध्ये एका सर्वसामान्य गरीब ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव गदाधर चटोपाध्याय असे होते. वडील क्षुदीराम चटर्जी, आई चंद्रामणीदेवी हे सर्वसामान्य कुटुंबातील दांपत्य अतिशय धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्याचबरोबर ते अतिशय सरळ आणि शुद्ध चारित्र्य असलेले माता-पिता होते. त्या छोट्याशा खेडेगावात त्यांच्या या चांगल्या गुणांमुळेच त्यांच्याबद्दल मोठा आदरभाव होता. या सुसंस्कारी

वातावरणातच लहान वयात गदाधरवर चांगले संस्कार झाले. मनाची शुद्धता, आचरणातील पावित्र्य, वृत्तीचा प्रांजळपणा, ईश्वरविषयक श्रद्धा इत्यादी परंपरागत सद्‌गुणांचा समृद्ध वारसा त्यांना आपल्या घरातूनच लाभला होता. साहजिकच अगदी लहानपणापासूनच त्यांचा परमेश्वराच्या भक्तीकडे ओढा होता. त्यांचे शिक्षण जेमतेम प्राथमिक शाळेतील दोन वर्गापुरतेच मर्यादित होते. पण असा हा गदाधर एका सर्वसामान्य गरीब कुटुंबात जन्माला आलेला अध्यात्मिक धारणेचे एक दैवी देणे जन्मताच घेऊन आला होता. वयाच्या १७ व्या वर्षी ते कलकत्त्याला आले आणि २१ व्या वर्षी कलकत्त्याजवळील दक्षिणेश्वराच्या कालीमातेच्या मंदिराचे पुजारी बनले. त्यांची कालीमातेवर एवढी नि:स्सिम श्रद्धा होती की, ते कालीमातेला आईच्या स्वरूपात पाहत असत. कारण त्यांना वेळोवेळी कालीमातेचा साक्षात्कार ही झाला होता. ते कालीमातेच्या भक्तीत अगदी तन व मनाने एकरूप झाले होते. पुढे शंकराचार्यांचे एक अनुयायी तोतापुरी यांनी त्यांना संन्यास घेण्यास प्रवृत्त केले आणि त्यांनीच गदाधर चटोपाध्याय यांना रामकृष्ण असे नाव दिले. पुढे त्यांचा शारदामनीशी विवाह सुद्धा झाला होता. पण विशेष म्हणजे ते आपल्या पत्नीलाही देवीच्या स्वरूपात पाहत होते.

**२. रामकृष्ण एक असामान्य व्यक्तिमत्त्व**

श्री रामकृष्ण यांच्याविषयी असे म्हटले जाते की, आता अपूर्व बुद्धी व विशाल हृदय या दोहोंनी युक्त अशी विभूती अवतीर्ण होण्याचा समय आला होता. ती विभूती अशी असावी की, तिच्या ठाई एकाच वेळी शंकराचार्यांची अद्भुत बुद्धी व चैतन्य महाप्रभूंचे अत्यंत विशाल हृदय असावे. सर्व संप्रदायात एकाच ईश्वराची शक्ती कार्य करीत आहे व प्रत्येक जीवात तोच ईश्वर विराजमान आहे असा अनुभव तिला आलेला असावा. तिचे हृदय भारतातील व भारताबाहेरील सर्व दीन- दुर्बल, पतीत व दलित यांच्या विषयीच्या कारुण्याने हेलावून जावे आणि त्याचबरोबर तिच्या महान तेजस्वी बुद्धीला केवळ भारतातीलच नव्हे तर भारताबाहेरीलही सर्व परस्पर विरोधी संप्रदायांमध्ये समन्वय घडवून आणतील असे उदार विचार स्फुरावेत आणि असा समन्वय साधून हृदय आणि बुद्धी या दोघांचा सुंदर संगम घडवून आणणारा सार्वजनिक स्वरूपाचा धर्म तिने प्रस्थापित करावा अशी विभूती अविर्भूत होण्याचा आता समय आला होता. आणि विशेष म्हणजे त्यांच्या रूपाने अशी विभूती जन्माला आली आणि तिच्या पायांशी बसून अनेक वर्षे शिक्षण घेण्याचे भाग्य आम्हाला लाभले. त्यांना कोणतेही पुस्तकी शिक्षण लाभलेले नव्हते. अत्यंत बुद्धिमान असूनही आपले नाव लिहावे एवढे शिक्षणही त्यांना मिळालेले नव्हते. परंतु आमच्या अनेक विद्वानांना त्यांच्यामध्ये असलेल्या असामान्य बुद्धिमत्तेचा प्रत्यय येतो असे हे रामकृष्ण परमहंस एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते.

कोणतीही शुल्लक गोष्ट त्यांच्या ठिकाणी ईश्वरविषयक भाव जागा करू शकत असे. निसर्गातील एखादे सुंदर दृश्य पाहिले तरी त्याच्या पलीकडे असलेल्या दिव्यशक्तीचे भान त्यांच्या ठायी उत्पन्न होत असे. आपल्या वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर गदाधर यांच्याहून तीस वर्षांनी मोठ्या असलेल्या रामकुमारवर प्रपंचाचा सारा भार पडला. तो कलकत्त्यामध्ये एक संस्कृत शाळा चालवीत होता. सोळा वर्षाच्या गदाधरला त्याने तेथे बोलावून घेतले. कारण आपल्या भावाने शाळेत नाव घालून शिक्षण घ्यावे अशी साहजिकच रामकुमारची इच्छा होती. पण एका आंतरिक प्रेरणेने गदाधर यांनी त्याला म्हटले की, मला भात भाकरी देणारी विद्या नको आहे. यावरून त्यांचा दृष्टिकोन लक्षात येतो. त्याचवेळी राणी रासमणीने दक्षिणेश्वराला नव्याने बांधलेले कालीमातेचे मंदिर उभारले होते. तेथे रामकुमारच्या पाठोपाठ गदाधर देखील पुजारी झाले. तेथेच त्यांच्या अंतरिक ईश्वरपरायण वृत्तीचा विकास करण्यास पूर्ण अवसर मिळाला. प्रथम त्यांच्या मनावर परंपरागत कल्पनांचा काही भार होता पण तोही त्यांनी आपल्या अंत:प्रेरणेने बाजूला सारला. त्यांना लाभलेली प्रज्ञा फार वरिष्ठ स्वरूपाची होती. ईश्वर

विषयक जिज्ञासा तितकीच प्रखर होती. तिला आवश्यक असा संपूर्ण समर्पण वृत्तीचा भाव होता. चित्ताला वासनेचा स्पर्श नव्हता. लखलखीत सुवर्णाप्रमाणे त्यांचे मन शुद्ध आणि वैराग्यशील होते. आईच्या म्हणण्यानुसार वयाच्या २३ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला होता. त्यांची पत्नी विवाहाच्या वेळी केवळ पाच वर्षांची होती. तर दोघांच्या वयात १८ वर्षांचे अंतर होते. पण त्या दोघांचे वैवाहिक जीवन देखील एक अद्भुत कथाच होऊन गेली. शरीरसौख्याला त्यात कोणतेही स्थान नव्हते. कारण रामकृष्णांनी कोणत्याच अर्थाने प्रपंच मांडला नव्हता. अठरा वर्षांची पत्नी दक्षिणेश्वराला आली तेव्हा तिला आपल्या साधनेत सहभागी करून घेऊन त्यांनी एका वासनामुक्त अशा पातळीवरील सहधर्मचरणीचे स्थान प्राप्त करून दिले. केवळ स्वतःच्या श्रद्धेच्या आणि भक्तीच्या बळावर जगन्मातेचे दर्शन प्राप्त करून घेण्यापर्यंत श्रीरामकृष्ण स्वतःच्या बळावर पोहोचले होते. त्यानंतर भैरवी ब्राह्मणी ही योगिनी आणि तोतापुरी हा संन्याशी असे दोन गुरु दक्षिणेश्वराला रामकृष्णांकडे आले. हा गुरु- शिष्य संबंधही त्यांच्या बाबतीत विस्मयकारक ठरला. कारण त्यांच्या आगमनामुळे रामकृष्णांच्या साधनेला निरनिराळी परिमाणे प्राप्त झाली आणि त्यांची आध्यात्मिक दृष्टी व्यापक झाली. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेला अगदी प्रारंभापासून सारासार विचारातून प्राप्त होणाऱ्या अंगभूत शहाणपणाची जोड होती. साकार आणि निराकार या दोन्हींच्या साक्षात्कारापर्यंत ते पोहोचले तरी कोणत्याही मार्गाने ईश्वराकडे जाऊ पाहणाऱ्या हरएक व्यक्तीशी संवाद साधण्याची, त्याला येणाऱ्या अनुभवांचा परिचय करून घेण्याची आणि आपणही त्या मार्गाने जाऊन त्या मार्गातील विशिष्ट प्रकारचा आनंद आपलासा करण्याची त्यांची विशाल वृत्ती होती.

**३. तत्त्वज्ञान तथा शिकवण**

रामकृष्ण परमहंस यांनी अत्यंत साध्या व सोप्या भाषेत आपले तत्त्वज्ञान सांगितले आहे. त्यांनी सर्व धर्मांच्या मुळाशी एक तत्त्व असल्याचा प्रमुख विचार मांडला. आत्मिक उन्नतीसाठी सर्व शक्तीमान परमेश्वराची मूर्ती स्वरूपात पूजा करणे त्यांना मान्य होते. मात्र कर्मकांडाला त्यांचा कडाडून विरोध होता. हिंदू समाज आपल्या अस्तित्वाला विसरू पाहत होता तेव्हा या गांगारलेल्या समाजात सत्व जागे करण्याचे अत्यंत मौलिक कार्य त्यांनी केले. ईश्वर प्राप्तीच्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही मार्गाचे स्वागत करण्यासाठी त्यांच्या मनाचा दरवाजा सदैव उघडा असे. आध्यात्मिक क्षेत्रातील ही एक प्रकारची रसिकताच त्यांच्या ठायी होती. त्यामुळे त्यांच्यामध्ये कोणताही दैवभेद नव्हता. साकार व निराकार असा विसंवाद त्यांना कधी जाणवला नाही. ईश्वरी अवताराचे भजन त्यांना आवडत असे आणि अद्वैताच्या साधनेतही ते तितकेच रमत असत. ही एक सर्वसमावेशक समन्वयशीलता असून एकंदर मानव जातीच्या साऱ्या धार्मिक इतिहासात असे उदाहरण दुसरे आढळत नाही. हेच त्यांचे अनन्यसाधारन महत्त्व होते. धर्माचा भेदही त्यांच्या ठिकाणी उरला नाही. कारण सारेच धर्म एकाच ईश्वराकडे जाण्याचे विविध मार्ग आहेत, निरनिराळे पंथ आणि संप्रदाय यांचेही तसेच आहे, हा त्यांचा अनुभवसिद्ध निश्चय होता. जो तो आपल्या प्रवृत्तीनुसार अंतिम विश्वतत्त्वाचा शोध घेत असतो अशी त्यांची दृष्टी होती. साऱ्याच आध्यात्मिकतेला मनाच्या शुद्धतेचा आणि आचरणातील नैतिकतेचा पाया असतो. याविषयीचे त्यांचे भान कधीही सुटले नाही. केवळ विद्वत्तेपेक्षा वा तत्त्विक चर्चेपेक्षा प्रत्यक्ष अनुभवाला ते अधिक महत्त्व देत. हा अनुभव त्यांनी आपलासा केला होता. त्या ईश्वरी अनुभवाच्या आनंदात ते सदैव डुंबलेले असत आणि कोणत्याही क्षणी त्यांचे जगन्मातेशी असलेले अनुसंधान सुटत नसे. जगन्माता आपल्या पाठीशी आहे, ती सारे करून घेते, तिचे आपण एक बालक आहोत ती आपल्याशी बोलते, संवाद करते, आपल्या सर्व प्रश्नांना उत्तरे देते आणि अशा या जगन्मातेच्या चरणी आपण आपले जीवनसर्वस्व अर्पण केलेले आहे, ही रामकृष्णांची सततची धारणा होती. ही धारणा एवढी जिवंत होती की, त्यांच्या प्रत्येक शब्दाने हर एक कृती त्या अलौकिक धारणेत नाहून निघत असे.

रामकृष्णांच्या अशा अनुभवसिद्ध साध्या साध्या शब्दातून ऐकणाऱ्याला जे प्रतीत होई त्यामुळे केवळ शब्दांचे ज्ञान असणारे भलेभले शास्त्रज्ञ आणि पंडित त्यांच्यासमोर निष्प्रभ होऊन जात असत. रामकृष्ण हे बाह्य विश्वात कधी गुंतले नाहीत. पण हे विश्वही त्या जगन्मातेचीच लीला आहे असा दृढ भाव असल्यामुळे त्यांना या विश्वात वावरणे कधी अवघड वाटले नाही. उलट त्यात वावरत असतानाही त्यातील बऱ्या-वाईटांच्या रूपाने आपल्याला सतत नाना रूपात तो ईश्वरच भेटत आहे असे त्यांचे जागरूक भान होते आणि त्याचा आनंद ते लुटत होते. आपल्याला हे जे काही जाणवले आहे ते इतरांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य ती जगन्माता आपल्याकडून करून घेणार आहे, अशी त्यांची धारणा होती. आपल्या निवडक शिष्यांची पुढील कार्यासाठी सिद्धता करून घेण्याकडे शेवटच्या पाच-सहा वर्षांत श्री रामकष्णांचे सारे लक्ष होते. अशा एका मनाच्या अवस्थेमध्ये असतानाच त्यांची आणि नरेंद्रांची भेट झालेली होती. भैरवी ब्राह्मणी यांच्या मार्गदर्शनानुसार ते साधनेच्या तांत्रिक मार्गाकडे वळले होते तर वैष्णवपंथांनी सांगितलेल्या मार्गाने त्यांनी भक्ती साधना केली होती.

सर्व धर्म सत्य असून ते परमेश्वराकडे नेतात. एका धर्माने दुसऱ्या धर्मावर टीका करण्याचे कारण नाही. धर्माधर्मातील संघर्ष निरर्थक आहेत. राम,कृष्ण, ख्रिस्त, अल्ला.. ही एकाच परमेश्वराची भिन्न-भिन्न रूपे आहेत, असे ते मानत असत. आत्मिक उन्नतीसाठी सर्व शक्तीमान परमेश्वराची मूर्तीरूपात पूजा करणे मान्य असले तरी ते कर्मकांडाऐवजी श्रद्धेला जास्त महत्त्व देत असत. याविषयी ते म्हणत असत की, मनुष्याचे एकमेव ध्येय परमेश्वर प्राप्तीचे असले पाहिजे. परमेश्वर प्राप्ती अध्यात्म मार्गाने होऊ शकते. त्यासाठी संसार सोडण्याची गरज नाही. संसारात रहा पण सत्कार्य करा, इच्छांवर लगाम ठेवून ते ईश्वर प्राप्तीकडे वळवा, ज्ञानापेक्षा शुद्ध चारित्र्य श्रेष्ठ आहे. विकाररहित बुद्धीशिवाय धर्मशास्त्राचे ज्ञान व पवित्र ग्रंथांचा अभ्यास व्यर्थ आहे. विवेक व वैराग्य याशिवाय अध्यात्मिक प्रगती होऊन परमेश्वराची प्राप्ती होणार नाही असे त्यांनी ठणकावून सांगितले आहे. त्यांनी अध्यात्मवादाचा विचार केला, हिंदू धर्मातील भक्ती, साधना, धार्मिक ग्रंथ व मूर्तीपूजेबद्दल विश्वास निर्माण केला. मनुष्यमात्राची सेवा व कल्याण हाच खरा धर्म मानला. त्यांची जीवनपद्धती हीच परमेश्वर प्राप्तीची एक वाट होती. रामकृष्णांनी आपल्या अनुयायांशी केलेली संभाषणे महेंद्रनाथ गुप्त या त्यांच्या एका अनुयायाने लिहून ठेवलेली आहेत. रामकृष्ण परमहंसांनी स्त्रियांना कुटुंबात व समाजात सन्मानाची वागणूक दिली. आपल्या शिष्यांना परस्त्रियांकडे माता म्हणून पहावयास व आदर राखण्यास सांगितले. त्यामुळे समाजातील स्त्रियांचे स्थान निश्चितच उंचावले. एकूणच विसाव्या शतकात खऱ्या धर्माला समजून सांगणाऱ्या एका महान आदर्शाची आवश्यकता निर्माण झाली होती आणि त्या आवश्यकतेची पूर्तता करणारा अविष्कार म्हणजेच भगवान रामकृष्ण परमहंस होय.

**४. रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद**

रामकृष्ण परमहंस हे स्वामी विवेकानंद यांचे गुरु होते तर स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य होते. रामकृष्ण परमहंस यांच्या भेटीने स्वामी विवेकानंदांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. जीवनातील छोट्या मोठ्या अनुभवातून जात असताना स्वामी विवेकानंदांना रामकृष्णांच्या होत असलेल्या भेटीमधून, संवादामधून आणि सहवासामधून फार मोठा आधार मिळत राहिला. नरेंद्रंची प्रवृत्ती आणि त्यांचा अध्यात्मिक आवाका याचा पुरता अंदाज रामकृष्णांना आलेला होता. त्यांच्याशी संवाद साधताना ते काही एक उद्गार काढत असत पण कधीही कोणतीही गोष्ट लादत नसत. कारण त्याचा मार्ग त्याचा त्याने काढावयाचा आहे हे ते जाणून होते. त्याचबरोबर हा सारा मार्ग तो अखेरपर्यंत चालून जाणार असा ठाम विश्वास त्यांना होता. पहिल्या दोन-

तीन भेटीनंतरही नरेंद्र दक्षिणेश्वराला जाऊ लागला तो स्वतःच्या अंतरिक उर्मीमुळे! रामकृष्णांच्या व्यक्तिमत्त्वातील काही गोष्टी तर नरेंद्रंचे मन त्यांच्याकडे खेचत होतेच पण आपल्याबद्दल त्यांना वाटणाऱ्या प्रेमाचा जो अनुभव त्याला येत होता तो त्याच्या मनाला अधिक आकर्षित करीत होता. गुरु-शिष्या मधील संवाद चालू असतानाच रामकृष्ण सांगतात की, लोक आपल्यावर टीका करतील पण आपण त्याकडे दुर्लक्ष करावे आणि आपला मार्ग सोडू नये, कुत्री भुंकत असतात पण हत्ती आपल्या मार्गाने जात राहतो तशी आपली वृत्ती असावी. असे विवेचन चालू असतानाच रामकृष्णांनी नरेंद्रला विचारले, काय नरेन, तुला काय वाटतं? तेव्हा नरेंद्रने उत्तर दिले की, ती माणसं म्हणजे उगाच भुंकणारी कुत्रे आहेत असं म्हणून मी त्यांच्याकडे साफ दुर्लक्ष करीन. यावर रामकृष्ण म्हणतात, नाही नरेन, एवढी कठोर प्रतिक्रिया होता कामा नये, कोणी कसाही वागू, त्याच्याबद्दल योग्य तो आदर आपण ठेवला पाहिजे. लोकांच्या टीकेकडे दुर्लक्ष करावे हेच खरे. पण त्या टीका करणाऱ्याबद्दलही आपण आपल्या मनात दुजाभाव धरू नये. जो वाईट वागतो त्याचेही आपण हित चिंतावे असा रामकृष्णांच्या म्हणण्याचा अन्वयार्थ होता. यावरून त्यांच्या मानवतावादी दृष्टिकोनाची कल्पना येते.

रामकृष्ण हे नरेंद्रचा अध्यात्मिक अधिकार, त्यांचे सुप्त सामर्थ्य आणि इतर अनेक गुण जाणून होते. त्यामुळे त्यांना त्याचे अपार कौतुक वाटत असे. शरीर क्रियावरूनही रामकृष्ण काही परीक्षा करीत असत. त्या संदर्भात त्यांनी एकदा नरेंद्रला म्हटले की, तुझी बाकीची सारी लक्षण ठीक आहेत. फक्त एकच दोष आढळतो तो असा की, झोप लागली असताना तुझा स्वासोच्छवास थोडा जड येतो. असा मनुष्य अल्पायुषी असतो. आणखी एका प्रसंगी ते म्हणतात की, तुझ्या डोळ्यावरून समजतं की, तु केवळ कोरडा ज्ञानी नाहीस तर प्रेमळ भक्तिभाव आणि सखोल ज्ञान यांचा संगम तुझ्या ठायी आहे. अगदी पहिल्या दुसऱ्या भेटीनंतरसुद्धा पुन्हा लवकर ये, असे म्हटल्याशिवाय आणि त्यांच्याकडून तसा शब्द घेतल्याशिवाय रामकृष्ण नरेंद्रला जाऊ देत नसत. कारण त्याची पुन्हा लवकर भेट झाली पाहिजे ही त्यांची प्रत्येक वेळची इच्छा असे. यावरून या गुरु -शिष्यांचे नाते किती अतूट होते हे पहावयास मिळते. एवढेच नव्हे तर दक्षिणेश्वराला नरेंद्रंनी आपल्याला भेटावयास यावे यासाठी व्याकुळ होणारे रामकृष्ण त्यांना भेटण्यासाठी आपण होऊन कलकत्त्यास गेल्याचेही पहावयास मिळते. स्वामी विवेकानंदांचे गुरु या दृष्टीने व्यक्त झालेली रामकृष्णांची एकंदर भूमिका जेवढी अपूर्व तितकीच त्या भूमिकेला आरंभापासून अखेरपर्यंत लाभलेली प्रेम आणि विश्वास यांची जोडही महत्त्वाची होती. वैराग्य हा अध्यात्मिकतेचा प्राण म्हणतात. सारा संसार सोडावयाचा अर्थ असा की, संसारातील कोणत्याही गोष्टीविषयी आसक्ती ठेवावयाची नाही किंवा कोणत्याही लोभात गुंतायचे नाही, भावनांच्या साऱ्या विश्वाला रजा द्यावयाची असा याचा अर्थ होतो. ना कशाचा खेद, न कशाची खंत, त्याचप्रमाणे ना कोणाविषयी राग व ना कोणाविषयी प्रेम अशी ही अनासक्त वृत्तीची अवस्था असते. पण रामकृष्णांचे सारेच काही अद्भुत आणि विलोभनीय होते. त्यांनी आपली अध्यात्मिक धारणा कधीही उणी पडू दिली नाही. किंबहुना ती त्यांची सहज प्रकृतीच होऊन गेलेली होती. पण तरी देखील भावनांचे जग त्यांनी बाजूला सारले नाही. प्रेम, वात्सल्य, करुणा, रसिकता, सहानुभूती अशा नानारूपांनी त्यांचे भावनाविश्व उमललेले आहे. त्यात वेदना, व्याकुळता, विरहाची व्यथा, शिष्याविषयची चिंता यांना अजिबात स्थान नव्हते. रामकृष्ण परमहंस आणि नरेंद्र या दोघांमधील संबंध एका वेगळ्याच पातळीवर पोहोचले होते. नरेंद्र त्याच्या अध्यात्मिक साधनेच्या दृष्टीने या किमान पातळीशी येऊन पोहोचाव्यास हवा अशी रामकृष्णांची इच्छा होती ती पूर्ण झाली होती. कारण नरेंद्रांनी मनोमन रामकृष्णांचा स्वीकार केला होता.

पुढे रामकृष्ण परमहंस व्याधींनी आजारी पडले. त्यांचे शरीर थकले होते, आजार गंभीर स्वरूप धारण करत होता त्यामुळे त्यांना दक्षिणेश्वरहून हलवण्यात आले होते. तेव्हा रामकृष्णांचा लाभ आपल्याला आता फार काळ होणार नाही याची कल्पना आल्याने आपणाला जे शिकता येईल, मिळवता येईल तेवढे मिळवण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. शिवाय त्यांची जेवढी म्हणून सेवा करता येईल ती करण्याची जबाबदारी आपण सर्वांनी घ्यायाला हवी हेही नरेंद्र आपल्या इतर शिष्यांना सांगत होते. गुरुंच्या सेवेची सारी जबाबदारी तरुण शिष्यांनी उचलली. या सर्वांचे पुढारीपण साहजिकच नरेंद्र यांच्याकडे होते. बरेच दिवस उपचार चालू असूनही रामकृष्ण यांच्या प्रकृतीत फारशी सुधारणा होत नव्हती. उलट अधिकच बिघाड होत चालला होता. दरम्यानच डॉ. सरकार यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार त्यांना मोकळी हवा मिळावी म्हणून काशीपूरला हलवण्यात आले. १८८५ पासून आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांचे वास्तव्य या जागेतच राहिले. सर्वच दृष्टीने त्यांच्या आयुष्यातील हे अखेरचे पर्व ठरले. काशीपूरच्या उद्यमगृहात अनेक महत्त्वपूर्ण घटना घडल्या. पुढे बऱ्याच दिवसानंतर रामकृष्णांनी आपल्या तरुण शिष्यांपैकी नरेंद्र, बाबुराव, निरंजन, काली, शशी अशा अकरा शिष्यांना आपल्या हाताने भगवी वस्त्रे आणि रुद्राक्षाच्या माळा दिल्या आणि म्हटले या संन्यास धर्माचे आयुष्यभर पालन करा. जात, पात, पंथ, संप्रदाय असा कोणताही भेदभाव मनात न ठेवता कोणाकडूनही अन्नग्रहण करा. त्यांची प्रकृतीही दिवसेंदिवस बिघडत चालली होती. घशाचा कर्करोग असल्याने दोन घास अन्न गिळणे सुद्धा हळूहळू त्यांना क्लेशदायक होऊ लागले. तर अधून मधून रक्तस्त्राव होत होता. अतिशय वेदना होत होत्या. शेवटी त्रास असाह्य झाल्याने रामकृष्ण कळवळून म्हणाले, एवढ्या वेदना होत आहेत पण प्राण काही जात नाही पण आपण गेलो तर साऱ्या भक्तांना अपार दुःख होईल हे ते पूर्ण जाणून होते. ते म्हणाले तुम्ही सारे शोकात पडून जाल म्हणून हे सारं सहन करतो आहे, तुम्ही तसं दुःख मानणार नसाल तर मी देह ठेवीन म्हणतो. यावेळी नरेंद्र व इतर शिष्य म्हणत की, आमच्यासाठी म्हणून आणखी काही काळ शरीर धारण करून रहा.

मे १८९७ साली जे जे गुडविन यांनी एक पत्र लिहिले आहे त्यात ते म्हणतात की, रामकृष्ण परमहंस यांचा अखेरचा क्षण जवळ आला तेव्हा त्यांनी स्वामीजी सोडून इतर सर्व शिष्यांना बोलावून घेतले आणि त्यांना स्पष्ट आदेश दिला की, त्यांनी स्वामीजीकडे सतत लक्ष ठेवावे आणि त्यांचे आरोग्य नीट राहण्याच्या दृष्टीने आणि सुखसुविधांमध्ये काहीही कमतरता राहू नये याची सर्व प्रकारे काळजी घ्यावी. नंतर त्यांनी त्या सर्वांना बाहेर पाठवले आणि स्वामीजींना एकट्याला बोलावून सांगितले की, आपल्या सर्व शिष्यांना आपल्या हाती सोपवले आहे. महासमाधीच्या आधी तीन-चार दिवस रामकृष्णांनी नरेंद्रला आपल्या खोलीत बोलावले, आपली दृष्टी त्यांनी त्याच्यावर स्थिर केली आणि ते समाधीत मग्न झाले. जणू एखाद्या विजेचा प्रवाह आपल्या शरीरात शिरतो आहे असा भास नरेंद्र यांना झाला. त्यांचे बाह्यविश्वाचे भान नष्ट झाले तेव्हा पुन्हा भानावर आल्यावर पाहतो तर रामकृष्णांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा लागल्या आहेत. काय झालं? असा प्रश्न नरेंद्रांनी केला तेव्हा रामकृष्ण म्हणाले, नरेन, माझ्याजवळ जे काही होतं ते सारं मी तुला आज देऊन टाकलं आहे आणि आता मी केवळ एक फकीर झालो आहे. मी ज्या शक्ती तुला दिल्या आहेत त्यांच्या बळावर तू महान कार्य करशील आणि ते पूर्ण झाल्यावर तु जिथून आला आहेस तिथं परत जाशील. मृत्यूच्या अखेरच्या क्षणी अपार वेदना होत असताना आणि वेदनांमुळे अं:तकरण पिटाळून जात असतानाच रामकृष्ण नरेनकडे पाहून आपली सर्व शक्ती एकवटून म्हणाले, अरे नरेन, अजूनही तुझी खात्री पटली नाही? पण ध्यानात ठेव जो राम होता, जो कृष्ण होता, तोच आता या देहाच्या ठाई रामकृष्ण आहे आणि तेही वेदांतातल्या सिद्धांताच्या अर्थाने नाही तर साक्षात. हे शब्द कानावर पडताच नरेंद्र केवळ निशब्द होऊन गेले. रामकृष्णांच्या जीवनातील अनेक गोष्टी आजवर प्रत्यक्ष

पहिल्या असूनही आपल्या मनात या क्षणी अशी शंका यावी यामुळे ते मनोमन शर्मिंदा होऊन गेले. पण हेही तितकेच खरे की, या लोकांचा निरोप घेता घेता आपल्याला अतिशय प्रिय असलेल्या या शिष्याचे मन रामकृष्णांनी आपल्या अद्भूत कृतीने नि:शंक करून टाकले होते. शेवटचे दोन दिवस तर अतिशय वाईट गेले. क्षणाक्षणाला रामकृष्णांच्या वेदना वाढत होत्या. १५ ऑगस्ट १८८६ च्या रात्री त्यांना समाधी लागली. ती नेहमीपेक्षा काही वेगळीच होती. नरेंद्र यांच्या सूचनेवरून सर्व शिष्यांनी हरी ओमचा घोष सुरू केला. मध्यरात्रीनंतर रामकृष्ण भानावर आले आणि म्हणाले भूक लागली आहे, त्यांनी थोडी लापशी घेतली व त्याही अवस्थेत ते नरेंद्रांशी काही तरी बोलत. होते अखेरचे चार शब्द सांगत होते. त्यानंतर ते तीन वेळा कालीमातेच्या नावाचा उच्चार करत मागे टेकले. काही तासानंतर अचानक त्यांचे सारे शरीर थरारले, अंगावरचे केस ताठ उभे राहिले, चेहऱ्यावर एक अपूर्व अशी ईश्वरी हास्य उमटले आणि ते गाढ समाधीत निघून गेले. रामकृष्णांनी आपल्या पार्थिव शरीराचा त्याग केला होता. तेव्हा शिष्यांच्या शोकाला पारावर उरला नाही कारण त्यांच्या जीवनातील एक चालता बोलता प्रकाश हरपला होता.

**५. समाजाला संदेश**

रामकृष्ण परमहंस यांचे जीवन हाच एक महान संदेश असला तरी त्यांनी आधुनिक जगाला संदेश दिला आहे की, केवळ मते, संप्रदाय, चर्च व मंदिरे इत्यादींमध्ये अडकून पडू नका. प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्यामी जे सत्य विद्यमान आहे ते सत्यच खरा धर्म होय आणि त्याच्या तुलनेने ही सारी मते, संप्रदाय इत्यादी तुच्छ होत. त्या अंतस्थ सत्याचा, त्या खऱ्या धर्माचा माणसांमध्ये जितका अधिक विकास होईल तितकी त्याची जगाची हीत करण्याची शक्ती अधिकाधिक वृद्धिंगत होईल. आधी तो धर्म आत्मसात करा. कोणावरही दोषारोप करू नका कारण सर्वच पंथ, सर्वच मते चांगली आहेत. आपल्या स्वतःच्या जीवनाद्वारे दाखवून द्या की, धर्म म्हणजे केवळ शब्द, नाव व संप्रदाय नव्हे तर धर्म म्हणजे अध्यात्मिक अनुभूती आहे. ज्यांना धर्माचा अनुभव आला आहे त्यांनाच धर्म कळेल. तेच धर्म नीट समजू शकतील. ज्यांना स्वतःला धर्मलाभ झाला आहे केवळ तेच इतरांमध्ये धर्मभाव निर्माण करू शकतील. तेच मानवजातीचे श्रेष्ठ आचार्य होऊ शकतील. केवळ तेच जगामध्ये ज्ञानाच्या शक्तीचा संचार करू शकतील. एखाद्या देशात अशा व्यक्तीचा जितका उदय होईल तितका तो देश अधिक उन्नत होईल आणि ज्या देशात अशा लोकांचा अभाव असेल त्या देशाचे पतन अनिवार्य असेल. कशानेच त्या दुर्दैवी देशाचा उद्धार होण्याची आशा नाही. आज गरज आहे त्यागाची, प्रत्यक्ष अनुभूतीची अशी प्रत्यक्ष अनुभूती लाभल्यावर मग जगातील सर्व भिन्न भिन्न धर्मांमध्ये एकता आहे, समन्वय आहे हे तुम्हाला स्पष्ट दिसून येईल. तुम्हाला मग कळून येईल की, परस्पर कलहाचे काहीच कारण नाही आणि तेव्हाच तुम्ही अखिल मानवजातीची सेवा करण्यास समर्थ होऊ शकाल. सर्व धर्मांमध्ये जे मूलभूत ऐक्य आहे ते स्पष्टपणे दाखवून देऊन त्याचा प्रसार करणे हाच माझ्या आचार्य देवांच्या जीवनाचा उद्देश होता. इतर आचार्यांनी विशिष्ट धर्माचा प्रचार केला. ते धर्म त्यांच्या त्यांच्या नावांनी परिचित आहेत. परंतु १९ व्या शतकात त्यांच्या रूपाने नावारूपास आलेल्या विचारप्रवाहाने कशावरच स्वतःचा हक्क सांगितला नाही आणि कोणत्याही धर्मावर कोणत्याच प्रकारचे आक्रमणही केले नाही.

अशाप्रकारे रामकृष्ण परमहंस यांचे जीवन म्हणजे शास्त्रात सांगितलेल्या सिद्धांताचे एक प्रात्यक्षिकच होय. ऋषीमुनींना व साधू संतांना खरोखर जे शिकवायचे होते ते त्यांनी आपल्या जीवनाने प्रत्यक्ष दाखवून दिले. ते आपल्या ५० वर्षांच्या आयुष्यात आपल्या देशाचे पाच हजार वर्षांचे आध्यात्मिक जीवन जगले आणि याप्रमाणे भावी पिढ्यांसाठी आदर्श म्हणून ते स्वतःचे जीवन घडवून मागे ठेवून गेले. आध्यात्मिक प्रगतीच्या

भिन्न भिन्न अवस्था असताना आपण दुसऱ्यांच्या धर्ममतांविषयी केवळ सहिष्णुताच बाळगावयाची नसून त्यांना आपले म्हटले पाहिजे. सत्य हाच सर्व धर्मांचा एकमेव आधार आहे, या श्री रामकष्णांच्या सिद्धांतानेच वेदांचा अर्थ लागू शकेल आणि शास्त्रांचा समन्वय होऊ शकेल. रामकृष्णाचे जीवन हेच सिद्ध करते की, असे औदार्य, अशी व्यापकता आणि अशी तीव्रतेची पराकाष्ठा एकाच व्यक्तीत एकाच वेळी वास करू शकते. या धर्तीवर आपण असा समाज घडवू शकतो. रामकृष्ण परमहंस यांच्या बद्दल महात्मा गांधीजी म्हणतात की, त्यांच्या जीवनाची कहाणी म्हणजेच धर्माचा जीवनात कसा उपयोग करावा याचीच कहाणी आहे. त्यांच्या जीवनात आम्हाला परमेश्वराचे दर्शन घडते. यावरून रामकृष्ण परमहंस यांच्या जीवन कार्याची उपयुक्तता लक्षात येते.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक २**

**रिकाम्या जागा भरा.**

१. रामकृष्ण परमहंस यांचा जन्म ......साली झाला

अ. १८३५ ब. १८३६

क. २८३७ ड. १८३८

२. रामकृष्ण परमहंस हे कलकत्त्याजवळील दक्षिणेश्वराच्या ........ मंदिराचे पुजारी बनले

अ. काली माता ब. लक्ष्मी माता

क. हनुमान ड. राम

३. रामकृष्ण परमहंस यांचा जन्म ..... या गावात झाला

अ. बंगाल ब. कोचीन

क. कामरपुकुर ड.कमलापूर

४. गदाधर चटोपाध्याय हे ...... यांचे मूळ नाव होते

अ. रामकृष्ण परमहंस ब. दयानंद सरस्वती

क. स्वामी विवेकानंद ड. यापैकी नाही

५. रामकृष्ण परमहंस यांचा मृत्यू ...... साली झाला

अ.१८८५ ब. १८८६

क. १८८७ ड.१८८८

### ३.२.३ शिकागो परिषद आणि रामकृष्ण मिशन

स्वामी विवेकानंदांचे आयुष्य जेमतेम चाळीस वर्षांचे होते. पण या अल्पशा काळामध्ये प्रथम शाळा कॉलेजमधील एक हुशार विद्यार्थी, त्यांचे महान गुरु रामकृष्ण यांचे उत्तम शिष्य, संबंध भारत उभा आडवा हिंडून पाहिलेले भिषण वास्तव आणि शेवटी पूर्व पश्चिमेचे महान अध्यात्मिक गुरु असे उत्तुंग जीवन ते जगले. १८९३ च्या शिकागो येथील जागतिक सर्वधर्मपरिषदेतील व्याख्यानाने त्यांच्या प्रचार कार्याचा श्रीगणेशा झाला. पुढे त्यांनी आपल्या गुरुंच्या स्मरणार्थ रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण कार्य केले.

## १ . शिकागो परिषद १८९३

रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंद यांनी आपल्या गुरुच्या कार्याला वाहून घेतले होते. प्रारंभी त्यांनी १८८७ मध्ये बारानगर येथे एक मठ स्थापन करून आपल्या सर्व अनुयायांना एकत्र केले होते. त्यांनी स्त्रीशिक्षण, बालविवाह निर्मूलन, शेती सुधारणा इत्यादी कार्याकडे प्रारंभी लक्ष दिले. पण त्यांच्या अनुयायांनी त्यांना फारसा प्रतिसाद न दिल्याने म्हणावे तसे यश आले नाही. परिणामी हिंदुस्तानची खरी परिस्थिती जाणून घेण्यासाठी तथा पाहण्यासाठी त्यांनी १८९२ साली संपूर्ण भारतभर प्रवास केला. याच प्रवासादरम्यान दक्षिणेत खेत्रीच्या राजाच्या सल्ला मसलतीवरून त्यांनी स्वतःला विवेकानंद असे नाव धारण केले. त्यांच्या या भारत प्रवासात त्यांना भारतीय लोकांच्यामधील दारिद्र्य, गरिबी, अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, विषमता यांची तीव्र जाणीव झाली. तेव्हा आपल्याच या लोकांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले.

कोलंबसने अमेरिकेचा शोध लावल्याच्या स्मृतिदिन सन १८९३ मध्ये त्याच्या ४०० व्या वर्धापन दिनानिमित्त अमेरिकेतील शिकागो येथे जागतिक धर्मपरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हा भारत भ्रमंती करून स्वामीजी खांडव्याला पुन्हा हरिदास चटर्जी यांच्याकडे आले होते. स्वामीजींचे विचार आणि व्यक्तिमत्त्व यांच्यायोगी ते अतिशय प्रभावित होऊन गेले. दरम्यानच शिकागो येथे भरणाऱ्या जागतिक सर्वधर्मपरिषदेची वार्ता त्यांच्यापर्यंत येऊन पोहोचली होती. तेव्हा विवेकानंदांनी तेथे जाऊन हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करावे असे हरिदास बाबूंनी बोलून दाखवले. तर पोरबंदरला शंकर पांडुरंग पंडित यांनी स्वामीजींनी पाश्चात्य देशात जाऊन आपले विचार मांडावेत, असे म्हटले होते. त्यामुळे ती कल्पना स्वामीजींच्या मनात कुठेतरी अस्पष्टपणे रेंगाळत असतानाच सर्वधर्मपरिषदेत आपले विचार व्यक्त करण्यासाठी योग्य असे जागतिक व्यासपीठ मिळणार होते. तेव्हा हरिदास बाबूंना स्वामीजी म्हणाले, प्रवास खर्चाची व्यवस्था करण्याचा भार कोणी जर उचलला तर सारं ठीक होईल आणि तसं झालं तर मी निश्चित जाईन. तेव्हा सर्वधर्मपरिषदेला जाण्यास तयार असल्याचा स्वामीजींनी काढलेला हा पहिला उद्गार होय! हरिदास बाबूंचे बंधू मुंबईत होते. त्यांच्यासाठी त्यांनी एक पत्र स्वामीजींना दिले रामदास छबीलदास हे मुंबईत बॅरिस्टर आहेत. आपले बंधू त्यांचा परिचय करून देतील आणि त्यांच्यामुळे सर्वधर्म परिषदेत जाण्यास काही सहाय्य होईल असे हरिदास बाबू म्हणाले. आणखी काही दिवस स्वामीजींनी राहावे असा हरिदास बाबूंचा आग्रह होता पण स्वामीजी म्हणाले तुमचे सर्वांचेच इतकं प्रेम आहे की मलाही राहायला आवडलं असतं पण मला रायरेश्वरला जायचं आहे. प्रत्येक ठिकाणी मी असं थांबत राहिलो तर मी तिथंपर्यंत कधी पोहोचणारच नाही. शेवटी हरिदास बाबूंनी त्यांना मुंबईचे तिकीट काढून दिले आणि मध्यप्रदेशातील तीन आठवड्यांचे वास्तव्य संपवून जुलैच्या प्रारंभी स्वामीजी मुंबईस आले. हरिदास बाबूंच्या बंधूंनी त्यांचा छबीलदासांशी परिचय करून दिला. त्यांनी स्वामीजींचे अस्थापूर्वक स्वागत करून त्यांना आपल्या घरीच ठेवून घेतले. स्वामीजी दोन महिने मुंबईत होते. छबीलदासांकडे त्यांना काही संस्कृत ग्रंथ मिळाले. त्यांच्या वाचनाचा आपल्याला फार उपयोग झाला असा उल्लेख त्यांनी एका पत्रात केला आहे. स्वामीजी ज्यांच्याकडे उतरले होते ते छबीलदास आर्य समाजी होते. त्यांना अवतार कल्पना मान्य नव्हती. ईश्वराचे साकार रूप त्यांना पटत नव्हते. या कल्पनांना वेदांतात काही आधार नाही तुम्ही तो काढून दाखवा मी आर्य समाज सोडून देईन असे ते म्हणाले आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, स्वामीजींनी आपले म्हणणे त्यांना पटवून दिले आणि त्यांनी आर्य समाज सोडला इतके सारे घडून गेल्यावर छबिलदासांना स्वामीजीविषयी अपार आदर उत्पन्न होणे स्वभाविक होते. पण

तरीही स्वामीजींना अमेरिकेत सर्वधर्म परिषदेसाठी जाण्याच्या दृष्टीने छबीलदासांकडून काही विशेष हालचाल झालेली दिसत नव्हती. तशी काही होईल या अपेक्षेने कदाचित स्वामीजी तेथे इतके दिवस थांबले असावेत. त्यातच आणखी एक अडचण म्हणजे प्रस्तुत परिषदेच्या नियमानुसार जे लोक परिचय पत्र घेऊन आले नसतील त्यांना परिषदेसाठी प्रतिनिधी म्हणून निवडले जाणार नव्हते. प्रतिनिधी म्हणून धर्म परिषदेत भाग घेण्यासाठी विनंती पत्र भरण्याची तारीख तर केव्हाच निघून गेली होती. अर्थातच हिंदू धर्माचा प्रतिनिधी म्हणून घेतले जाण्याची आता स्वामीजींना मुळीच आशा राहिली नव्हती. पण त्यामुळे ते निराश न होता समोर येऊन टाकलेल्या अडचणीशी आणि संकटाशी सामना करण्यासाठी भगवंतावरील विश्वासरूपी दृढ कवच घालून ते सिद्ध झाले. दरम्यानच हावर्ड विश्वविद्यालयातील ग्रीक भाषेचे विख्यात प्राध्यापक राईट हे आले असताना त्यांच्याशी स्वामीजींचा परिचय झाला. प्रसंग अवधान ओळखून प्रोफेसर साहेब स्वामीजींना म्हणाले, आपण शिकागोच्या धर्मसभेत हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून जा. याने आपले वेदांत प्रचाराचे कार्य अधिक सफल होईल. स्वामीजींनी अडचणी सांगताच प्रोफेसर साहेबांनी एक पत्र लिहून दिले, मला आढळून आले आहे की आपले सगळे विद्वान मिळून एकीकडे आणि हा अज्ञात हिंदू संन्याशी एकीकडे, त्या सर्वांपेक्षा हा अधिक विद्वान ठरेल. ते पत्र आणि प्रोफेसर साहेबांनी दिलेले एक रेल्वेचे तिकीट घेऊन स्वामीजींनी पुन्हा शिकागो शहराकडे मोर्चा वळविला आणि येणाऱ्या बऱ्याच अडचणीवरती मात करत करत स्वामी विवेकानंद शिकागोच्या सर्वधर्म परिषदेसाठी अमेरिकेत पोहचले.

परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे विस्तृत वर्णन करून स्वामीजींनी आपल्या एका शिष्याला पत्र लिहिले होते. त्यात ते इहितात, 'तिथे परिषदेच्या अधिवेशनासाठी एक मोठे आणि कित्येक लहान लहान सभागृहे उभारण्यात आली होती. सर्वच देशातील लोक एकत्र झाले होते. भारतातून आले होते ब्राह्मो समाजाचे प्रतापचंद्र मुजुमदार, मुंबईचे नगरकर, जैन समाजाचे प्रतिनिधी वीरचंद गांधी आणि थिऑसॉफिकल सोसायटीतर्फे डॉ. ॲनी बेझंट व चक्रवर्ती. मुजुमदारांची माझी पूर्वीचीच ओळख होती. चक्रवर्तींना माझे नाव ऐकून माहीत होते. राहत्या स्थानापासून आर्ट पॅलेसपर्यंत मोठ्या धुमधडाक्याने आम्हाला नेण्यात आले आणि सर्वांनाच व्यासपीठावरती ओळीओळीने बसवण्यात आले. समोर भव्य हॉल, त्यातच वर एक प्रचंड गॅलरी. खालीवर सर्वत्र अवघ्या अमेरिकेतील निवडक सहा-सात हजार सुशिक्षित स्त्री पुरुष एकमेकांना चिटकून बसलेले आणि व्यासपीठावर जगातील सर्व देशातील पंडित विराजमान झाले होते. रीतीनुसार प्रतिनिधींचा एका मागून एक अशा क्रमाने सभेला परिचय करून देण्यात आला. प्रतिनिधीही पुढे येऊन थोडेफार बोलत गेले. माझी छाती धडधडत होती, जीभ सुकून चालली होती. मी इतका घाबरून गेलो होतो की, दुपारपर्यंत तर भाषण करायचे मला धाडसच झाले नाही. मुजुमदार छान बोलले, चक्रवर्ती त्यांच्यापेक्षा चांगले बोलले, सारखा टाळ्यांचा गजर होत होता. ते सारेजण आपापली भाषणे तयार करून आले होते. पण मी काहीच तयारी केली नव्हती. पण भगवती सरस्वती देवीला प्रणाम करून कसा तरी मी पुढे झालो. बॅरोज साहेबांनी श्रोत्यांना माझी थोडक्यात ओळख करून दिली. माझ्या भगव्या कपड्यांनी श्रोता मंडळींचे चित्त थोडे आकर्षूण घेतले. ज्यावेळी मी अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधुंनो... म्हणून सभेला संबोधले त्यावेळी पुरी दोन मिनिटे असा काही टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला की, माणूस बहिराच होऊन जावा. नंतर मी बोलण्यास आरंभ केला. माझे भाषण समाप्त झाले. त्यावेळी हृदयाच्या आवेगानेच मी जणू अगदी थकून गेलो होतो. दुसऱ्या दिवशी झाडून सगळी वर्तमानपत्रे एकमुखाने म्हणू लागली की, त्या दिवशी माझेच भाषण सर्वांना अतोनात आवडले. अर्थातच मग सगळ्या अमेरिकेला मी माहित झालो. त्या दिवसापासून मी एक प्रसिद्ध व्यक्ती होऊन बसलो आहे. आणि ज्या दिवशी

मी हिंदू धर्मासंबंधी आपला निबंध वाचला त्या दिवशी सभागृहामध्ये इतकी गर्दी झाली होती की, अगदी न भूतो न भविष्यती. दुसऱ्या कोणत्याच दिवशी तशी गर्दी लोटली नाही.'

म्हणूनच ११ सप्टेंबर १८९३ हा जगाच्या इतिहासातील एक संस्मरणीय दिवस. पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील भिन्न- भिन्न धर्मांचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी एकत्र सम्मिलित झाले आहेत आणि त्या विराट सभेत आपली अद्वितीय आकाशवाणी उच्चारण्यासाठी स्वामी विवेकानंद उभे राहिले आणि त्यांनी भारताच्या सर्वश्रेष्ठ संस्कृतीची पताका संपूर्ण जगात फडकवित एक नवा इतिहास रचला.

एकूणच स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथील परिषदेत केलेल्या भाषणाचा सारांश असा होता, ङ्गआज तुम्ही जे आमचे ह्रदयापासून आणि अगत्याने स्वागत केले त्याच उत्तर देण्यासाठी मी इथे उभा आहे. शब्द सुचत नाहीत, ह्रदय अवर्णनीय आनंदाने भरून येत आहे. जगातील सर्वात प्राचीन अशा संन्याशी समाजातर्फे मी तुम्हाला धन्यवाद देत आहे, नाना धर्मांचे उगमस्थान जो सनातन हिंदू धर्म त्याचा प्रतिनिधी या नात्याने मी तुम्हास धन्यवाद देत आहे. या व्यासपीठावरून पूर्वेकडील प्रतिनिधी विषयी बोलताना काही सन्माननीय भक्तांनी असे मत प्रकट केले आहे की, दूर दूरच्या देशातून आलेले हे प्रतिनिधी सर्वत्र सहिष्णुतेचा भाव पसरवणारे म्हणून गौरविण्यास पात्र होत, यात काही शंका नाही. या वतक्त्यांचेही मी आभार मानतो. जो धर्म समस्त जगताला संहिष्णुता आणि सर्वच मतांना मानणे, या दोहोंची शिकवण निरंतर देत आला आहे, त्या धर्मात जन्मास आल्याबद्दल मला गौरव वाटतो. अन्य धर्मीयांविषयी आम्ही केवळ सहिष्णुताच बाळगतो असे नव्हे तर सर्वच धर्म सत्य आहेत असा आमचा दृढ विश्वास आहे. परकीयांच्या छळामुळे देशोधडीला लागलेल्या कोणत्याही जातीच्या आणि कोणत्याही धर्माच्या निराश्रितांना ज्या देशाने सर्वदा आश्रय दिला आहे त्या देशात जन्मास आल्याबद्दल मला अभिमान वाटतो. ज्या वर्षी रोमनांच्या निष्ठुर अत्याचारांनी यहुदी लोकांचे पवित्र देवालय भग्न होऊन मातीस मिळाले त्याच वर्षी काही यहुदी आश्रयास दक्षिण भारतात आले असता माझ्याच धर्माने त्यांना सादर ह्रदयाशी धरले हे सांगताना मला भूषण वाटत आहे. वैभवशाली पारशी जातीच्या उरलेल्या लोकांना ज्या धर्माने आसरा दिला आणि आजही जो धर्म त्यांचे प्रतिपालन करीत आहे त्याच धर्मात मी जन्मास आलो आहे. बंधुंनो, लक्षावधी हिंदू नरनारी ज्या स्तोत्रांचे प्रतिदिन पठन करतात आणि जे मी अगदी लहानपणापासून म्हणत आलो आहे त्याच स्तोत्रांतील काही ओळी मी आज तुमच्यासमोर उद्धृत करतो. भिन्न भिन्न उगमातून निघणारे विभिन्न जलप्रवाह ज्याप्रमाणे अंतिमत: सागरास मिळून एक होऊन जातात त्याचप्रमाणे विविध धर्मांतील विविध विचारप्रवाह हिंदू धर्मातील मानवतेत विलीन होतात. ज्यांनी जगामध्ये अनन्वित अत्याचार केलेले असून कितेकदा ही पृथ्वी रक्ताने नाहून काढली आहे. संस्कृतीचा विध्वंस करून त्यांनी कधी कधी राष्ट्रेच्या राष्ट्रे नैराश्यग्रस्त करून सोडली आहेत. हे भयंकर राक्षसी कृत्ये झाली नसती तर मानव समाज आज आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक उन्नत झाला असता. पण आता त्यांचीही घटका भरली आहे आणि मला अशी उत्कट अशा वाटते की, या धर्मपरिषदेच्या सन्मानार्थ आज प्रातःकाळी झालेला घंटानाद समुळ धर्मवेडाची, धर्माच्या नावाखाली शस्त्राने व लेखनीने केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या छळाचे आणि एकाच ध्येयाकडे आपापल्या मार्गांनी जात असलेल्या व्यक्तीतील एकमेकांविषयीच्या असहिष्णुतेच्या समस्त भावनांची मृत्यूघंटाच ठरेल. या सर्वधर्म परिषदेने जर काही जगाच्या निदर्शनास आणले असेल तर ते हेच. तिने अत्यंत सुंदरतेने हे सिद्ध करून दाखवले आहे की, पावित्र्य, चित्तशुद्धी, दया वगैरे गुणांचा मक्ता जगातील कोणत्याही एका विशिष्ट धर्माने घेतलेला नाही तर प्रत्येक धर्मात आदर्श चारित्र्याच्या नरनारींचा जन्म झालेला आहे हा एवढा भरभक्कम पुरावा दृष्टीसमोर असूनही

आपलाच तेवढा धर्म शेवटी जिवंत राहून इतर धर्म नष्ट होतील असे मनोराज्य कुणी रचित असेल तर त्या अभाग्याची आपण कीवच केली पाहिजे. त्या बापड्याला मी अगदी स्पष्ट शब्दात बजावून ठेवतो की, त्याच्यासारख्या लोकांनी कितीही अडथळे उभे केले तरी त्या साऱ्यांना तीळमत्र न जुमानता धर्माधर्माच्या ध्वजांवर लवकरच लिहिले जाईल की, संघर्ष नको.. परस्परांना सहाय्य करा. आत्मसात करा.. विनाश करू नका. कलह नको मैत्री हवी.. शांती हवी.'

अशाप्रकारे शिकागो धर्मपरिषदेमध्ये स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेत जगातील संपूर्ण लोकांना खऱ्या हिंदुत्वाचा, संस्कृतीचा परिचय करून दिला. परिषदेत त्यांनी केलेल्या भाषणाने व अभ्यासपूर्ण मांडणीने तेथील लोक अत्यंत प्रभावी झाले होते. त्यांनी अमेरिकन समाजाला हिंदू धर्म व भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व पटवून दिले. अमेरिकेत त्यांनी ठिकठिकाणी व्याख्याने दिली. पुढे ते पॅरिस व लंडनला गेले आणि तिथेही भारताच्या सर्वश्रेष्ठ संस्कृतीवर त्यांनी अनेक व्याख्याने दिली. याशिवाय प्रवासातही त्यांनी ठिकठिकाणी व्याख्याने दिली. जगातील विविध देशातून स्वामी विवेकानंदांना व्याख्यानासाठी पाचारण करण्यात येऊ लागले. तेथील विद्वतजनही विवेकानंदांच्या विचाराने प्रभावित झाले होते. त्यांच्या भाषणाचा सार म्हणजे अध्यात्मवाद आणि भौतिकवाद यांचा समन्वय साधून मानवजातीचे कल्याण साधने असा होता. तसेच त्यांनी पाश्चिमात्यांना हिंदू धर्माचे शुद्ध स्वरूप समजावून सांगितले. पुढे १८९६ मध्ये त्यांनी न्यूयॉर्क येथे वेदांत सोसायटीची स्थापना केली. त्यांनी योगावरील अनेक पुस्तके युरोप व अमेरिकेत प्रसिद्ध केली. परिणामी हिंदुत्ववादावर, हिंदू संस्कृतीवर, अध्यात्मावर, धर्मावर बोलणारा खरा प्रभावी वक्ता म्हणूनच संपूर्ण पाश्चात्य जगतात स्वामी विवेकानंद यांची ओळख निर्माण झाली.

**२. रामकृष्ण मिशन**

स्वामीजींच्या जीवनाचा अभ्यास करताना ते सर्व क्षेत्रात असामान्य होते, ही गोष्ट आपणाला कबूल करावी लागते. भारतावर इतके निस्सीम असे प्रेम करणारा, देशाविषयी अत्यंत स्वाभिमानी असणारा आणि देशाच्या भल्यासाठी इतका झटणारा असा विवेकानंदांसारखा दुसरा कोणीही नव्हता आणि नाही. त्याचबरोबर अकार्यक्षम विचारसरणीवर तुटून पडणारा आणि वैचारिक फटके मारणारा देखील दुसरा कोणी नव्हता. या दोन्हीही टोकांच्या भूमिका ते धारण करू शकले कारण त्यांना भारतीयांची मानसिकता कळली होती. एक प्रेमळ माता जसे बाळाचे मन जाणत असते आणि बाळापेक्षा जास्त त्याची गरज तिला कळत असते. अगदी त्याचप्रमाणे स्वामीजींनी भारताला जाणले होते. स्वामीजींच्या विचारातून भारताचे परिपूर्ण रूप दिसून येते. त्यातून भूतकाळ समजतो, वर्तमान काळाचे महत्त्व समजते आणि भविष्यकाळ ही खुणावतो. म्हणूनच रवींद्रनाथ टागोर यांनी म्हटल्याप्रमाणे, जर तुम्हाला भारत जाणून घ्यायचा असेल तर स्वामी विवेकानंदांचा अभ्यास करा हे म्हणणे अगदी यथार्थ वाटते. स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंस यांचे अत्यंत आवडीचे भक्त व शिष्य होते. आपल्या गुरुची शिकवण जिवंत ठेवण्यासाठी आणि तिचा प्रसार करण्यासाठी स्वामी विवेकानंद यांनी स्वत:ला पूर्णपणे वाहून घेतले होते. त्याचाच एक भाग म्हणून आपल्या गुरुची स्मृती चिरंतन राहावी म्हणून त्यांनी ५ मे १८९७ साली रामकृष्ण मिशनची स्थापना केली. तर पुढे १८९९ मध्ये त्यांनी बेलूर मठाची स्थापना केली. तेच पुढे रामकृष्ण मिशनचे मुख्य केंद्र बनले. पुढे बेलूर मठ केवळ आध्यात्मिक व सांस्कृतिक केंद्र न राहता समाज सेवेचे केंद्र बनले. जगभरातील या मिशनच्या विविध शाखांमार्फत सुरू झालेले सामाजिक व धार्मिक सुधारणांचे कार्य आजही अखंडपणे चालू आहे. वेदांताचे तत्त्व हे तिचे ध्येय होते तर माणसातील अध्यात्मिक शक्ती जागृत

करणे हा उद्देश होता. रामकृष्ण मिशनची प्रमुख तत्त्वे पुढील प्रमाणे–

१. रामकृष्ण यांनी सांगितलेले वेदांताचे तत्त्व लोकांना समजावून सांगणे.
२. वेदांता बरोबरच भौतिकशास्त्राच्या शिक्षणाला महत्त्व देणे.
३. सर्व धर्म सत्य व समान असून ते परमेश्वराकडे नेतात.
४. मनुष्याने धनदौलतीच्या अगर भौतिक सुखाच्या मागे न लागता परमेश्वर चरणी लक्ष केंद्रित करावे.
५. मोक्ष प्राप्ती ही आत्मानुभूतीची अवस्था असून मूर्तीपूजेने आत्मसाक्षात्कार होतो.
६. विवेक व वैराग्यानेच परमेश्वर प्राप्ती होते, कर्मकांडापेक्षा श्रद्धेला महत्त्व द्या.
७. संसारात राहून सत्कार्य करा परमेश्वराच्या प्राप्तीसाठी संसार सोडण्याचे गरज नाही.
८. मिशनच्या उद्दिष्टांच्या विकार विरहित बुद्धीने च पवित्र ग्रंथांचा अभ्यास करावा. प्रचारासाठी आवश्यक त्या वाङमयाची निर्मिती करावी.
९. सर्व प्रकारचे शिक्षण देऊन जनतेचे परिस्थिती सुधारावी.
१०. मानवता हाच खरा धर्म असून आपत्तीच्या वेळी लोकांना शक्य ते सहाय्य करावे.

सर्वसाधारणपणे वरील मुख्य तत्त्वांना आदर्श मानून रामकृष्ण मिशन ने पुढील प्रमाणे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

**१. हिंदू धर्म व संस्कृतीचे श्रेष्ठत्व पटवून दिले :**

स्वामी विवेकानंद आणि त्यांच्या शिष्यांनी भारतीय संस्कृती व हिंदू धर्म श्रेष्ठ आहे हे सर्व जगाला रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून पटवून दिले. सर्वधर्म समानता आणि मानवतेच्या सेवेचा संदेश त्यांनी सर्व जगाला दिला. शिकागो येथील जागतिक सर्वधर्म परिषदेच्या सभेला हजर राहून स्वामी विवेकानंदांनी अद्वैत तत्त्वज्ञानाचे स्वरूप सर्व जगाला पटवून दिले. त्याच बरोबर ख्रिस्ती धर्म उपदेशकांच्या टीकेमुळे भारतीयांच्या मनात जो न्यूनगंडपणा निर्माण झाला होता तो दूर करण्याचे कार्य केले.

**२. मानवी सेवेला प्राधान्य :**

स्वामी विवेकानंदांनी मिशनऱ्यांच्या समाजसेवा वृत्तीचे महत्त्व ओळखले होते. त्यांनी रामकृष्ण मिशन मधील सेवकांना मानव जातीची सेवा करण्याचा महान संदेश दिला. दवाखाने, अनाथाश्रम, व शाळा स्थापन करून गोरगरीब, अज्ञानी, अस्पृश्य, अशिक्षित, शारीरिक व मानसिक पीडितांची सेवा केली. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मानवतेचा दृष्टिकोन समोर ठेवून कार्य सुरू ठेवले. लोकांनाच परमेश्वर म्हणून सेवा करण्याची विशेष पद्धत अंगिकारली. त्यामुळेच या मिशनची अनेक केंद्रे लोकसेवेची केंद्रे बनली. माणसाच्या जीवनासाठी, विकासासाठी विचार व आचार स्वातंत्र्य गरजेचे असून त्यासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे. ज्यांच्या जीवावर तुम्ही शिकता त्या लोकांकडे लक्ष दिले नाही तर तुम्ही देशद्रोही आहात असे विवेकानंदांचे क्रांतिकारक विचार होते. त्यालाच अनुसरून मिशनमध्ये शिक्षणाच्या कार्याला विशेष महत्त्व दिले जाते.

**३. अनिष्ट चाली–रीतींना प्रखर विरोध :**

हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, कर्मकांड, अंधश्रद्धा, याला तर विरोध केलाच पण त्याच बरोबर धर्मतत्त्वाच्या नावावर रुढ असणाऱ्या अनेक चालीरीतींना ही मिशनने प्रखर विरोध केला. जाती व्यवस्थेवर त्यांनी कठोर टीका

केली. धार्मिक उदारता, समानता, सहकार्य याला प्राधान्य देण्यात आले. एकमेकांना मदत करा, आपापसांत भांडू नका, दुसऱ्याला समजून घ्या हा उपदेश मिशनद्वारे दिला.

स्वामी विवेकानंदांनी स्थापन केलेले मठ हे केवळ अध्यात्मिक व सांस्कृतिक केंद्रे न राहता ते समाजसेवेची केंद्रेच बनली आहेत. त्यांनी आपल्या अनुयायांसमवेत समाजसेवेचे कार्य हाती घेतले. लोकांच्या मदतीसाठी दुष्काळ निधी उभारला. १८९८ च्या प्लेगच्या साथीत लोकांना मदत केली. रामकृष्ण मिशनने धर्मदाय दवाखाने व अनेक शाळा सुरू केल्या. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी हॉस्टेलसह शैक्षणिक सुविधा उभारल्या. तर जनजागृतीसाठी 'प्रबुद्ध भारत' व 'उदबोधन' ही वर्तमानपत्र ही सुरू केली. अनेक संदर्भ ग्रंथ व पुस्तके प्रकाशित केली. त्यांनी जातीपद्धत व अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला. त्यांना हिंदूंच्या मधील अस्पृश्यता ही कल्पना आवडली नाही. श्रीमंतांकडून गरिबांचे होत असलेल्या पिळवणुकी विरुद्ध हिंदू धर्माने मौन पाळल्याबद्दलही त्यांनी खेद व्यक्त केला. उपाशी माणसाला धर्माचे ज्ञान शिकवणे हा देवाचा व मानवतेचा अपमान आहे, असे त्यांचे ठाम मत होते. मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे, असे ते म्हणत. स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माला एक नवा सामाजिक आशय प्राप्त करून दिला. त्यांनी भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाबाबत एक नवीन विश्वास ही निर्माण केला. हे अखंड कार्य करत असतानाच ४ जुलै १९०२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या कार्याविषयी सुभाषचंद्र बोस एके ठिकाणी म्हणतात की, 'आम्ही विवेकानंदांना आधुनिक राष्ट्रीय चळवळीचे अध्यात्मिक पिता म्हणू शकतो.'

इंग्लंडहून येतेवेळी एका इंग्रज मित्राने जेव्हा स्वामीजींना विचारले की, स्वामी या वैभवशाली व सामर्थ्यसंपन्न अशा पाश्चात्यभूमीत चार वर्ष राहिल्यावर तुम्हाला आता आपला मायदेश कसा काय वाटले? तेंव्हा उत्तरादाखल स्वामीजी म्हणतात की, पाश्चात्य देशात येण्यापूर्वी मी भारतावर प्रेम करीत आहे. आता तर भारतातील धूळही मला पवित्र वाटते. तेथील हवा देखील मला आता पवित्र वाटते. भारत आता मला परमपवित्र धाम वाटतो. तो माझ्या दृष्टीने आता तीर्थस्थान होऊन बसला आहे. पुढे ते नव्या पिढीला संदेश देताना म्हणतात की, भारताच्या सुपुत्रांनो आज मी तुमच्यापुढे प्रत्यक्ष करावयाच्या काही गोष्टींविषयी बोलणार आहे आणि तुमच्या प्राचीन वैभवाचे तुम्हाला स्मरण करून देण्याचाही माझा हेतू आहे. कारण पुष्कळदा मला असे सांगण्यात आले आहे की, भूतकाळाकडे पाहत राहिल्याने अधोगती होते व काहीच साध्य होत नाही आणि म्हणून आपण नेहमी भविष्यकाळाकडे नजर ठेवली पाहिजे हे खरे आहे. पण भूतकाळाच्या पायावरच भविष्याची उभारणी होत असते म्हणून शक्य तेवढा भूतकाळाचा मागोवा घ्या, प्राचीन काळापासून बजावलेल्या कामगिरीवर आपली श्रद्धा असली पाहिजे आणि ही श्रद्धा व प्राचीन महानतेची जाणीव याच्या बळावर आपण पूर्वीपेक्षाही अधिक थोर अशा भारताची उभारणी केली पाहिजे.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक ३**

**रिकाम्या जागा भरा**

१. ...... साली शिकागो येथे जागतिक सर्वधर्म परिषद भरली

| | |
|---|---|
| अ. १७९३ | ब. १८९३ |
| क. १९९३ | ड. १९९५ |

२.   स्वामी विवेकानंद यांनी आपल्या गुरुंच्या स्मरणार्थ ....... ची स्थापना केली

अ. ब्रह्म समाज    ब. आर्य समाज

क. सत्यशोधक समाज    ड. रामकृष्ण मिशन

३.  स्वामी विवेकानंद यांनी............. धर्माला एक नवा सामाजिक आशय प्राप्त करून दिला

अ. हिंदू    ब. ख्रिश्चन

क. इस्लाम    ड. जैन

४. विवेकानंद यांना आधुनिक राष्ट्रीय चळवळीचे अध्यात्मिक पिता म्हणू शकतो असे .... यांनी म्हटले आहे

अ. महात्मा गांधी    ब. पंडित नेहरू

क. सुभाचन्द्र बोस    ड. यापैकी नाही

५.  स्वामी विवेकानंद यांनी १८९६ मध्ये ..... येथे वेदांत सोसायटीची स्थापना केली

अ. शिकागो    ब. कलकत्ता

क. न्यूयॉर्क    ड. यापैकी नाही

**३.३ सारांश**

स्वामी विवेकानंद यांचे कार्य भारताच्या अध्यात्मिक वाटचालीत अत्यंत मौलिक मानावे लागते. त्यांच्या सर्वांगीण कार्याविषयी अनेक विद्वानांनी गौरव उद्गार काढले आहेत. जसे की, स्वामी विवेकानंद यांच्याविषयी व्हॅलेंटाईन चिरोल लिहितात की, प्राचीन भारतीय संस्कृतीची व नवजात भारतीय राष्ट्रवादाची पाश्चात्त्यांना प्रभावीपणे जाणीव करून देणारा पहिला हिंदू मणजे स्वामी विवेकानंद होय. रामकृष्ण मिशनद्वारे स्वामी विवेकानंदांनी अज्ञान व अंधश्रद्धा यांच्या भोवऱ्यात सापडलेल्या समाजाला जागे करण्याबरोबरच राष्ट्रीय बाणा, स्वाभिमान आणि अस्मिता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. प्रत्येक ठिकाणी आपला आध्यात्मिक वारसा जाणून घेण्याची शिकवण त्यांनी आपणाला दिली. प्रत्येक मानवाच्या अंतर्यामी असलेल्या ईश्वरी अंशाची जाणीव करून देणे हाच त्यांच्या साऱ्या शिकवणुकीचा प्रधान गाभा होता. म्हणूनच ही शिकवण राजकीय व धार्मिक विचारांनी लाभलेले भेदाभेद पूर्णतः नष्ट करण्याचे कार्य करते. या शिकवणुकीशी जर माणूस एकरूप झाल्यास त्याचे चारित्र्य सखोल आणि विशाल होऊन जाईल. प्रत्येक धर्माचा गाभा अध्यात्मिकच असतो असे त्यांचे ठाम मत होते. धर्मांधता आणि असहिष्णुता म्हणजे खऱ्या धर्माचे घटक नव्हेत. माणूस जसा अध्यात्मिक होत जाईल तसतसा तो अधिकाधिक वैश्विक बनत जाईल. प्रत्येक धर्माने अशा प्रकारचे शिक्षण आधुनिक काळात द्यायला हवे कारण अशा शिक्षणानेच सर्व मानवातील ईश्वराविषयीचे प्रेम मानव सेवेच्या रूपात प्रावाहित करण्यास सर्वजण शिकतील. जगातील सर्वच धर्मांना अध्यात्मिक दिशा देण्यासाठी त्यांनी जीवापाड मेहनत घेतली. एकूणच स्वामीजींचा प्रत्येक शब्द माणसाला आत्मविश्वास देणारा, विधायक कार्याकडे नेणारा, आणि खरेखुरे अध्यात्मिक जीवन जगण्यास प्रेरित करणारा आहे. म्हणूनच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, विनोबा भावे, योगी अरविंद, भगिनी निवेदिता इत्यादी थोर मंडळींनी स्वामीजींच्या विचार व कार्याचा गौरव केला आहे.

### ३.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१. निद्रित- झोपलेल्या अवस्थेत

२. चौफेर - सर्व बाजूंनी

३. पुरस्कार करणे- अंगीकार करणे

४. आकस्मिक - अचानकपणे

५. निष्प्रभ - निष्फळ

६. नैराश्यग्रस्त- उदास, निराश

७. विध्वंश- नाश

८. वैश्विक- जागतिक

९. साकार भक्ती- रूप असलेली देवता, मूर्ती समोर ठेऊन केली जाणारी भक्ती

१०. निराकार भक्ती- देवाला सर्वव्यापी मानणे (कबीर, नानक, इ.)

११. अद्वैत- ब्रह्म सत्य आहे, जगत मिथ्या आहे आणि जीव व ब्रह्म एकच आहे असे मानणे

### ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक १**

१. ब
२. ड
३. अ
४. ब
५. क

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक २**

१. ब
२. अ
३. क
४. अ
५. ब

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक ३**

१. ब
२. ड
३. अ
४. क
५. क

### ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ टिपा लिहा**

१. स्वामी विवेकानंद यांचे बालपण

२. स्वामी विवेकानंदांचे प्रारंभीचे कार्य

३. शिकागो परिषद

४. रामकृष्ण मिशनची तत्त्वे

५. रामकृष्ण परमहंस यांचा संदेश

**ब लघुत्तरी प्रश्न सोडवा**

१. स्वामी विवेकानंद व रामकृष्ण परमहंस यांच्यातील भेटीचा वृत्तांत लिहा.

२. शिकागो परिषद व स्वामी विवेकानंद यांवर चर्चा करा.

३ . रामकृष्ण परमहंस यांचे तत्त्वज्ञान तथा शिकवण सांगा.

**क दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा**

१. स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची सविस्तर माहिती द्या.

२. रामकृष्ण परमहंस यांच्या जीवन कार्याचा आढावा घ्या.

३. रामकृष्ण मिशनची सविस्तर माहिती द्या.

**३. ७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके**


१. विं. दा. करंदीकर, विश्वमानव स्वामी विवेकानंद, खंड १ - ३, रामकृष्ण मठ, धंतोली नागपूर, २०१९.

२. स्वामी ब्रह्मानंद, स्वामी विवेकानंद यांचे चरित्र, रामकृष्ण मठ, धांतोली नागपूर, २००३.

३. स्वामी श्रीकांतानंद, स्वामी विवेकानंदांचे विचारधन, रामकृष्ण मठ, सिंहगड रस्ता, पुणे, २०१२.

४. स्वामी श्रीकांतानंद, युवकांसाठी विवेकानंद, रामकृष्ण मठ, दांडेकर पूल, पुणे, २०१३.

५. स्वामी शिवतत्त्वानंद, स्वामी विवेकानंद ग्रंथावली, खंड १-१० रामकृष्ण मठ, नागपूर, १९६३.

६. स्वामी विमरूपानंद, स्वामी विवेकानंद ग्रंथावली संचयन, रामकृष्ण मठ नागपूर, १९८८.

७. स्वामी शिवतत्त्वानंद, ज्ञानयोग, रामकृष्ण मठ नागपूर, १९६२.

८. स्वामी ब्रह्मस्थानंद, कर्मयोग, रामकृष्ण मठ, नागपूर, १९५०.

९. स्वामी ब्रह्मस्थानंद, आदर्श शिक्षण स्मृति ग्रंथमाला, रामकृष्ण मठ नागपूर, २०१०.

१०. स्वामी ब्रह्मस्थानंद, विवेकवाणी (स्वामी विवेकानंदांची शिकवण स्मृति ग्रंथमाला, रामकृष्ण मठ, नागपूर, २०००.


❒❒❒

घटक–४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## (Dr. Babasaheb Ambedkar)

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ - सुरुवातीचे दिवस (Early Days)

 ४.२.२ - विचार आणि कार्य (Thoughts and Work)

 ४.२.३ - भारतीय राज्य घटना (Indian Constitution)

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वंय:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ


.....................................................................................................

**४.० उद्दिष्टे**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील उद्दिष्टे साध्य करता येतील.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुरुवातीचे दिवसातील सामाजिक विषमतेने त्याच्या जीवनावर काय परिणाम झाला व या कठीण दिवसातून त्यांचे चरित्र कसे घडत गेले याचा अंदाज येईल.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची महत्त्व व त्यांच्या कार्याची ओळख करून घेता येईल.

३) भारतीय राज्यघटना निर्मिती मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान लक्षात येईल.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मंदिर प्रवेशाच्या लढाचे महत्त्व जाणून घेता येईल.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय कार्याची ओळख होईल.

६) डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याची ओळख होईल.

**प्रास्ताविक**

आधुनिक भारताच्या इतिहासात समाजसुधारणेच्या चळवळीला महत्त्व प्राप्त झाले आहे. ब्रिटिश सत्तेच्या काळात भारतात सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचा उदय झाला. समाजातील अनिष्ट प्रथा परंपरा नष्ट करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी कार्य केले. या अनिष्ट प्रथे पैकी अस्पृश्यतेच्या प्रथेविरूध्द अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. या समाजसुधारकात अस्पृश्यतेच्या प्रथेविरुध्द लढणारे डॉ. बाबासाहेब

आंबेडकर याचे वेगळेपण लक्षात येते. त्याचा लढा अस्पृश्यांना मानवतेच्या हक्कापासून सुरू झाला. त्यांना मानवतेचे सर्व हक्क राज्यघटनेद्वारे प्रदान केले. पण त्यांचा लढा एवढा संकुचित नव्हता. तर राष्ट्र उभारणीसाठी त्यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुता या मुल्यांवर अधारित राज्यघटने द्वारा आधुनिक भारताचा पाया रचला. आपल्या भाषणातून लिखाणातून व कार्यातून मानवतावादी तत्त्वज्ञानाचा मूल्यांचा उद्घोष केला.

### ४.२ विषय विवेचन

भारतीय समाज हा चातुर्वर्ण्याधिष्ठित समाज आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे ते चार वर्ण आहेत. या चार वर्णात पुन्हा हजारो पोटजाती निर्माण झाल्या. जन्माधारित जातश्रेष्ठतेचे किंवा गुणवत्तेचे प्रमाण जातीवर निर्धारित असल्यामुळे सर्वात खालच्या वर्णातील जन्माला आलेले लोक शूद्र व अतिशुद्र गणले गेले. या वर्णातून हजारो जाती पोट जाती निर्माण झाल्या. अस्पृश्य जातीला कुत्र्या-मांजरापेक्षाही हीन दर्जाचे जीवन जगावे लागे.

त्यांना सार्वजनिक विहिरी, मंदिरे शाळा, रस्ते याचा वापर करण्यास मनाई होती. त्यांना अपवित्र मानले जात असे. त्यांची सावलीनेही सवर्ण लोक अपवित्र होतील अशी भीती त्यांना वाटत होती. त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांना मंदिरे, तिर्थक्षेत्रे येथे प्रवेश नव्हता. त्यांना गावगाड्यात निकृष्ट दर्जाची कामे करावी लागत होती. ही अस्पृश्यतेची प्रथा एक वर्ष नव्हे, दहा वर्षे नव्हे तर अशी शेकडो वर्षे अशीच चालत आली होती. या प्रथे विरुद्धच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाच्या जातीप्रथेची चिकित्सा केली व भारताला एक राष्ट्र बनण्यासाठी जातीप्रथा नष्ट झाली पाहिजे म्हणून जाती निर्मूलनाचा लढा उभा केला. व भारतीय समाजव्यवस्थेतील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या शूद्रातिशुद्र व स्त्रिया या दोन्ही अफाट जनसमुदायाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुलामगिरीची जाणीव करून देऊन मुक्तीच्या महामार्गावर आणून सोडले.

#### ४.२.१ – सुरुवातीचे दिवस (Early Days)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजात झाला. भारतीय समाजात अस्पृश्य जातीला कोणतेही स्थान नव्हते. सार्वजनिक ठिकाणे त्यांच्यासाठी वर्ज्य होती. शिक्षणाचा अधिकार नव्हता. सवर्णाची सेवा करणे हे त्यांचे काम असे. त्यांची जडण-घडण होत असताना त्यांना अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. या त्यांच्या स्वानुभवावर आधारित सामाजिक अन्यायाविरूद्ध लढण्याची दिशा निर्धारित झाली होती.

**बालपण :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म महार जातीत दि. १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू येथे रामजी व भीमाबाई यांच्या पोटी झाला. रामजी व भीमाबाई या दांपत्याला १८९१ पर्यंत चौदा अपत्ये झाली. भीमराव हे शेवटचे अपत्य! ते स्वत:स 'मी आई-बाबांचे चौदावे रत्न आहे', असे म्हणत. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील आंबावडे हे खेडे होते. त्यांच्या घराण्याचे कूळनाव संकपाळ असे होते. त्यांचे वडील रामजी हे कर्तबगार, बुद्धिमान, उद्योगी, महत्त्वाकांक्षी, शिक्षणाविषयी आवड असलेले व प्रागतिक विचारांचे पण वृत्तीने धार्मिक होते. आई भीमाबाई ही मेजर मुरबाडकर यांची मुलगी होती. ती मोठी बोलकी, मानी, हट्टी आणि धर्मशील होती. इ.स. १८९६ साली भीमाबाईचा मस्तकशूळाने मृत्यू झाला. भीम त्यावेळी

सहा वर्षाचा होता. मातेच्या निधनानंतर भीमाचा सांभाळ त्याची आत्या मीराबाई हिनेच केला. मातृहीन भीमावर तर तिचे निरातिशय प्रेम होते.

रामजी सुभेदार लष्करात नोकरीला होते. ते स्वत:च्या कर्तबगारीवर सुभेदार मेजर पदापर्यंत पोहचले होते. रामजींची शिक्षणाविषयी आस्था व आवड निर्माण झालेली होती. त्यांच्या घरातील बायका-मुलांनासुद्धा ऊत्तम लिहिता-वाचता येत होते. इतकेच नव्हे तर पांडवप्रताप, रामायणासारखे ग्रंथ वाचून त्यावर निरूपण करण्याची शक्तीही रामजीच्या प्रोत्साहनाने बाबासाहेब आंबेडकराच्या थोरल्या बहिणीत आली होती. ते स्वत: कबीरपंथी असल्याने कितीतरी भजन व अभंग त्यांना तोंडपाठ असत. बाबासाहेबाच्या जन्मानंतर काही वर्षातच रामजी सकपाळ लष्करातून निवृत्त झाले. निवृत्तीनंतर ते कोकणातील दापोली या गावी वास्तव्यास आले.

**शिक्षण :**

भीमाच्या शिक्षणाची सुरुवात त्यांच्या  वयाच्या पाचव्या वर्षी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे झाली. त्यांच्या कुटुंबाचे मूळचे आडनाव संकपाळ असे होते. पण गावाच्या नावावरून त्यांच्या पूर्वजांनी खेड तालुक्यातील आंबावडे ह्या गावावरून आंबावडेकर हे आडनाव लावले. याच शाळेत आंबेडकर नावाचे दुसरे एक ब्राह्मण शिक्षक होते. ते भीमावर अलोट प्रेम करत. भीमाचे आडनाव आंबावडेकर हे आडनीड आहे ते ठीक नाही म्हणून त्यांनी आंबेडकर हे सुटसुटीत नाव लावावे, असे एकदा आंबेडकर गुरुजींनी भीमाला सांगितले. लागलीच शाळेच्या दप्तरामध्ये तशी त्यांनी नोंदही करून टाकली.

पुढे लवकरच बाबासाहेबाच्या वडिलांनी सातारा येथे दुसरी नोकरी धरली. बाबासाहेबाचे बालपण सातारा येथे गेले. तेथील कॅम्पमध्ये असलेल्या सरकारी शाळेत इयत्ता पहिलीत टाकले. इ.स. १९०४ मध्ये रामजींची नोकरी समाप्त झाली. ते मुंबईला आले प्रथम त्यांनी परळच्या मराठा हायस्कूलात व नंतर एल्फिन्स्टनच्या सरकारी हायस्कूलामध्ये प्रवेश मिळवला. शालेय जीवनात त्यांना खूपच अपमान सहन करावे लागले व अग्निदिव्यातून जावे लागले. ते अस्पृश्य असल्यामुळे त्यांना प्यायला पाणी मिळत नसे, भाजी-भाकरी खाता येत नसे, इतरांसारखे बसून चर्चा, वादविवाद करता येत नसे. शिक्षक व विद्यार्थी शिवाशीव पाळीत. त्यांच्या  वह्या-पुस्तकांना स्पर्श करत  नसत. त्यांना कविता वाचायची-म्हणायची बंदी असे. ते अस्पृश्य असल्याने त्यांना संस्कृत शिकता आले नाही. त्यांची जागा इतरांपासून वेगळी असे. ते चर्नी रोडच्या बागेत अभ्यास करत. बालवयापासूनच समाजाकडून मिळणाऱ्या ह्या अपमानकारक वागणुकीचा त्यांच्यावर परिणाम झाला. अशा परिस्थितीला तोंड देऊन  बाबासाहेब  इ.स. १९०७ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाला, हे यश अपूर्व  होते. त्यावेळी अस्पृश्यांमधून मॅट्रिक उत्तीर्ण होणारे विद्यार्थी दुर्मिळच होते. त्यामुळे त्यांच्या अभिनंदनाची सभा सत्यशोधक समाजाचे व त्या वेळचे पुढारी रावबहादूर सीताराम केशव बोले यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांनी त्यांचा गौरव करून त्यांना त्यावेळी त्यांनी लिहिलेले 'बुद्ध चरित्र' हे पुस्तक दिले.

दि. ३ जानेवारी १९०८ रोजी भीमाचे नाव एल्फिन्स्टन कॉलेजात प्रीव्हिअसच्या वर्गात दाखल केले. एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये गेल्यावर बडोद्याचे सयाजी महाराज गायकवाड यांची दरमहा २५ रुपये  स्कॉलरशिप त्याला मिळाली. या काळात अवांतर वाचन हाच त्यांच्या आयुष्यातील  खरा आनंद होता. स्वत:ची पुस्तके असावीत, म्हणजे 'फक्त स्वत:च्या मालकीची' अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. त्यावेळीसुद्धा नवनवीन

पुस्तके आणून देण्यासाठी मी माझ्या वडिलांच्या जवळ हट्ट धरी. मी एखादे पुस्तक मागितले की, ते संध्याकाळपर्यंत माझ्या वडिलांनी आणून दिले नाही, असे कधी घडले नाही, असे बाबासाहेब त्यांच्या आठवणी सांगतात.

बाबासाहेब अभ्यासासोबतच ते अवांतर वाचन करत. ते इ.स. १९१२ मध्ये बी.ए. मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमधून पास झाले. कराराप्रमाणे सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानात नोकरी करण्यासाठी त्यांना आमंत्रित केले. लष्करातील लेफ्टनंटच्या जागेवर त्यांची नेमणूक करण्यात आली. तेथेही खालच्या अधिकाऱ्याकडून अपमानास्पद वागणूक देण्यात आली. येथे काम करत असतानाच वडिलांच्या आजारपणाची बातमी त्यांना समजली. ते त्वरित मुंबईस पोहोचल्यावर त्यांच्या वडिलांचे दि. २ फेब्रुवारी १९१३ रोजी निधन झाले.

याच वर्षी इ.स. १९१३ साली सयाजीरावांनी त्यांना 'गायकवाड स्कॉलर' म्हणून अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी पाठवले. या शिक्षणाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना फार लाभ झाला. तिथे त्यांनी अठरा-अठरा तास अभ्यास केला. 'प्राचीन भारतातील व्यापार' (Ancient Indian Commerce) या विषयावर प्रबंध लिहून ते इ.स. १९१५ साली एम.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. जून १९१६ मध्ये त्यांनी 'भारतातील जातिव्यवस्था' व 'भारतातील अर्थव्यवस्था व विकास' हे दोन प्रबंध लिहून ते कोलंबिया विद्यापीठाला सादर केले. त्याआधारे कोलंबिया विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. ही पदवी प्रदान केली. या वेळी प्रोफेसर एडविन सेलिग्मन हे त्यांचे पीएच.डी.चे मार्गदर्शक होते. प्रोफेसर एडविन सेलिग्मन यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक जडणघडणीवर मोठा प्रभाव होता.

जून १९१६ मध्ये त्यांनी अमेरिकेहून इंग्लंडला प्रयाण केले. तेथे त्यांनी कायदा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी अनुक्रमे ग्रेज-इन व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेत आपले नाव दाखल केले. लंडनमध्ये भीमरावांचा दिनक्रम पुढीलप्रमाणे होता. लंडन स्कूल, ब्रिटिश म्यूझिअम व इंडिया ऑफिस या संस्थांच्या ग्रंथालयात नियमितपणे ग्रंथ वाचनासाठी जाणे, तिथेच वाचून काढलेल्या ग्रंथाची टिपणे काढणे, ग्रेज-इनमध्ये जाऊन बारच्या वर्गात हजर राहणे, तेथील कायद्यावरील व्याख्याने ऐकणे. ते अभ्यासासाठी ग्रंथालयात सकाळी ८ वाजता जात ते ग्रंथालय बंद होईपर्यंत त्याचा अभ्यास चालत असे. मुक्कामाच्या जागी परत आल्यावर पुन्हा सोबत आणलेल्या ग्रंथांचे वाचन सुरू होई ते रात्री एक-दोन वाजेपर्यंत चाले. मध्ये एक-दोन तासांचा जो काही खंड पडे तो केवळ भोजन आणि विश्रांतीच्या निमित्ताने. लंडनमध्ये असा त्यांचा दिनक्रम सुरू होता.

असा दिनक्रम चालू असताना बडोद्याच्या दिवाणाकडून शिष्यवृत्ती संपल्याचे सांगण्यात आले व करारानुसार बडोद्यास नोकरीवर हजर राहण्याचे सांगण्यात आले. दि. २१ ऑगस्ट १९१७ रोजी आंबेडकर मुंबईस परत आले व बडोद्यास जाऊन बडोदा संस्थानात मिलिटरी सेक्रेटरी या पदावर हजर झाले. ऑफिस मध्ये शिपाई त्यांच्याकडे फाईल दुरून फेकून देई. बडोद्यास त्यांना भाड्याने राहण्यास तिथे जागा मिळेना अन् हॉटेलात आसरा मिळेना. त्यांनी एका पारशी खानावळीत जात तेथे त्यांनी चोरून आश्रय मिळवला. पण तेथेसुद्धा त्यांना हाकलून लावण्यात आले.

बाबासाहेब बडोदा सोडून मुंबईला आले. नोव्हेंबर १९१८ मध्ये मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी धरली व अर्धवट राहिलेले शिक्षण स्वत:च्या खर्चाने इंग्लंडला जाऊन

पूर्ण करण्याचा संकल्प सोडला. सर्व बाबतीत काटकसर करून त्यांनी दोन वर्षात सात हजार रुपये जमवले व अपूर्ण राहिलेला अभ्यासक्रम लंडनला जाऊन पूर्ण करण्यासाठी इ.स. १९२० मध्ये बाबासाहेब लंडनला रवाना झाले. त्यासाठी शाहू महाराजांनी आंबेडकरांना दीड हजार रुपये दिले होते. स्वसामर्थ्यावर पुन्हा लंडनला जाऊन खडतर अभ्यासाची तपश्चर्या करून अद्वितीय यश मिळवले. जून १९२१ मध्ये अर्थशास्त्रात लंडन विद्यापीठाची एम.एस्सी.ची पदवी प्राप्त केली. ऑक्टोबर १९२२ मध्ये 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा डी.एस्सी. या अर्थशास्त्रातील अत्युच्च पदवीसाठी विद्यापीठास सादर करण्याचा प्रबंध लिहून पूर्ण केला.

दि. ५ जून १९५२ रोजी एका खास मोठ्या पदवीदान समारंभात कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डी.लिट. ही सन्मान्य पदवी दिली. ज्या विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी दिली होती त्याच विद्यापीठाने त्यांना भारतातील प्रमुख नागरिक, समाजसुधारक व मानवी हक्कांचे विक्रमशाली उद्गाते म्हणून ही पदवी प्रदान केली होती.

डॉ. बाबासाहेब शिक्षणानिमित्त अमेरिका व इंग्लंड येथे असताना त्यांनी तेथील मुक्त समाज पाहिला होता. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, कायदा, इ. शास्त्रांचा अभ्यास त्यांनी केला. या विषयात ते पारंगत झाले. उच्च विद्याविभूषित होऊन भारतात परतलेल्या बाबासाहेबांना सामाजिक कार्य करणे सोपे नव्हते. त्यांना शतकानुशतकांच्या धर्म व रूढींच्या दास्यातून दलितांना मुक्त करायचे होते. प्रथम त्यांना त्या दास्याची जाणीव करून देणे महत्त्वाचे होते हे ओळखून बाबासाहेबांनी मंदिरप्रवेशाचे लढे उभे केले.

**विवाह :**

भीमराव मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर थोड्याच दिवसांत त्यांचा विवाह ठरला. विवाहासमयी भीमरावाचे वय १७ व मुलीचे वय ९ वर्षाचे होते. मुलीचे सासरचे नाव रमाबाई ठेवण्यात आले. रमाबाईच्या लहानपणीच तिचे आई-बाप निवर्तले होते. तिचे व तिच्या भावंडांचे पालनपोषण तिच्या चुलत्याने व मामाने केले. रमाबाई धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. पतीच्या कार्याला यश यावे म्हणून व्रतवैकल्ये करत. त्यांनी संसारात अनेक हालअपेष्टा व कष्ट सहन केले. वेळप्रसंगी शेण्या थापल्या व संसाराचा गाडा पुढे रेटत नेला. दि. २६ मे १९३५ रोजी स. ९.०० वाजण्याच्या सुमारास त्यांचे निधन झाले. इ. स. १९३५ ते १९४७ पर्यंत ते योगी पुरुषाप्रमाणे जगले. परंतु, ऑगस्ट १९४७ पासून ते आपल्या प्रकृतीविषयी चिंताक्रांत झाले होते. त्यांची प्रकृती झपाट्याने ढासळत होती. तेव्हा त्यांनी डॉ. शारदा कबीर यांच्याशी पुनर्विवाह करण्याचा निश्चय करून १५ एप्रिल, १९४८ रोजी सकाळी आंबेडकरांच्या दिल्ली येथील हार्डिंग अव्हेन्यू (Hardiage Avenue) येथील २६, अलिपूर रोड, सिव्हिल लाईन्स या निवासस्थानी त्यांच्याशी पुनर्विवाह केला. या लग्नानंतर डॉ. शारदा कबीर यांचे 'सविता' असे नाव ठेवण्यात आले.

**स्वंय - अध्ययन प्रश्न क्र. १**

**अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म ........... या ठिकाणी झाला.

अ) महू    ब) रत्नागीरी

क) आंबावडे    ड) वरील पैकी नाही.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मुळ आडनाव .............. हे होते.

अ) अंबावडे	ब) संकपाळ

क) आंबेडकर	ड) वरील पैकी नाही

३) .......... यांनी आंबेडकरांना 'बुध्द चरित्र' हे पुस्तक भेट दिले.

अ) प्रबोधनकार ठाकरे	ब) सिताराम केशव बोले

क) कृष्णाजी अर्जुन केळूसकर	ड) वरील पैकी नाही

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी .......... यांनी स्कॉलरशीप दिली.

अ) महाराज सयाजीराव गायकवाड	ब) राजर्षी शाहू महाराज

क) निजाम	ड) वरील पैकी नाही

५) १९२० मध्ये बाबासाहेब शिक्षणासाठी लंडनला जाण्यासाठी ........ यांनी आर्थिक मदत केली.

अ) कृष्णाजी अर्जुन केळूसकर	ब) महाराज सयाजीराव गायकवाड

क) राजर्षी शाहू महाराज	ड) वरील पैकी नाही

### ४.२.२– विचार आणि कार्य (Thoughts and Work)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या कार्याची सुरुवात अस्पृश्यांच्या मुक्तीच्या लढ्याने जरी केली असली तरी फक्त दलिताच्या मुक्तीचा त्यांचा लढा नव्हता तर आमुलाग्र सामाजिक राजकीय व सांस्कृतिक परिवर्तनाचा लढा होता.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे न्याय व समतेसाठीचे संघर्षात्मक लढे :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात इ.स. १९१९ मध्ये साऊथबरो कमिटीपुढे अस्पृश्यांच्या वतीने जी साक्ष दिली तेव्हापासून होते. त्या वेळेस ते सिडनेहॅम कॉलेजात प्राध्यापक होते. ते सरकारी नोकरीत होते तरी गव्हर्नरसाहेबांशी पत्रव्यवहार करून त्यांनी साऊथबरो कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी आपली निवड करून घेतली व कमिटीसमोर प्रदीर्घ व लेखी निवेदन सादर केले. यात दलितांसाठी स्वतंत्र जातवार प्रतिनिधीत्वाचा पुरस्कार केलेला होता.

अस्पृश्यांच्या वतीने भारतात चळवळी चालू होत्या. ठिकठिकाणी परिषदा बोलावून मागण्या मांडल्या जात होत्या. दि. २० मार्च १९२० रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांची परिषद माणगाव या ठिकाणी भरवली. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. या परिषदेत शाहू महाराज म्हणाले, प्रजाजनहो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढलात ह्याबद्दल मी तुमचे अंत:करणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील, अशी माझी मनोदेवता मला सांगते. ही परिषद म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होती. या परिषदेतून त्यांचे नेतृत्व उदयास आले. अस्पृश्यांना त्यांचा नेता प्रथमच लाभला.

**बहिष्कृत हितकारणी सभा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लंडमधून आपले शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर सरकारकडे अस्पृश्यांच्या मागण्या मांडण्यासाठी सामाजिक संघटना उभी करण्याचे काम हाती घेतले. या हेतूने चर्चा करण्यासाठी ९ मार्च १९२४ रोजी सायं. ४.०० वा. दामोदर ठाकरसी सभागृह, परळ, मुंबई येथे एक सभा बोलावण्यात आली. याचा परिणाम म्हणजे २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारणी सभा' या संस्थेचा जन्म झाला. या सभेतर्फे जळगाव, पनवेल व अहमदाबाद या ठिकाणी वसतिगृहे स्थापन करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघटितरीत्या समाजात जागृतीसाठी प्रयत्न करत होते. त्यांच्या या कार्याला गती खऱ्या अर्थाने महाड सत्याग्रहानंतर आली.

**महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह : २० मार्च १९२७**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्कांसाठी जो व्यापक लढा उभारला त्याची सुरुवात महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून झाली. म्हणून अस्पृश्यतेच्या चळवळीचा इतिहास त्यांच्या या सत्याग्रहाला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान लाभले आहे.

**रावबहादूर सीताराम केशव बोले यांचा मुंबई इलाखा कौन्सिलमध्ये केलेला ठराव**

संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. तसेच, पूर्वी न्यायालयात, ज्या अस्पृश्य व्यक्तीविरुद्ध खटला दाखल आहे, त्या व्यक्तीला न्यायालयात स्वतः उपस्थित राहण्याची परवानगी नसे. तिच्याऐवजी फक्त तिचा वकीलच युक्तिवाद करू शकत होता. या परिस्थितीत, अस्पृश्य व्यक्तीला न्यायालयात उपस्थित राहण्याची परवानगी नसल्यामुळे, तिला तिच्या वकिलावर पूर्णपणे अवलंबून राहावे लागत होते. तिला स्वतःचे म्हणणे मांडण्याची किंवा न्यायालयात स्वतःच्या बाजूने युक्तिवाद करण्याची संधी मिळत नव्हती. हे अन्यायकारक होते कारण यामुळे अस्पृश्य व्यक्तीला तिच्यावरील आरोपांना प्रभावीपणे उत्तर देण्याची संधी मिळत नव्हती.

या पार्श्वभूमीवर दि. ४ ऑगस्ट १९२३ रोजी मुंबई इलाखा कौन्सिलमध्ये ब्राह्मणेत्तर चळवळीचे नेते रावबहादूर सीताराम केशव बोले यांनी 'अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये, न्यायालये या सार्वजनिक ठिकाणी मुक्तपणे प्रवेश असावा' असा ठराव मांडला. मुंबई इलाखा कौन्सिलमधील हा ठराव कृतीत आणण्यासाठी सरकारने एक परिपत्रकही काढले. पण व्यवहारात या ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र होत नव्हती. त्यामुळे बोले यांनी १९२६ मध्ये या संदर्भात आणखीन एक ठराव मांडला त्या ठरावात अशी तरतूद होती की नगरपालिका, जिल्हा लोकल बोर्ड, यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी विधिमंडळाच्या आधीच्या ठरावाची अंमलबजावणी केली नाही तर संबंधित संस्थांचे अनुदान बंद करण्यात यावे हा ठरावही विधिमंडळाने मंजूर केला होता.

**महाड नगरपालीकेचा ठराव**

बोले ठरावानुसार महाड नगरपालिकेच्या नियामक समितीने महाड नगरपालिकेचे महाड येथील चवदार तळे महानगरपालिकेच्या ताब्यात असून ते सर्वांसाठी खुले आहे, असा ठराव पास केला होता. तसेच परिषदेने हा ठराव अंमलात आणण्याचा ठराव पास केला.

**महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन**

महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन १९ व २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या अधिवेशनात विधिमंडळाने अस्पृश्याच्या हक्कांसंबंधी मंजूर केलेला ठरावाची अंमबजावणी करावी, अशी मागणी सरकारकडे केली. परंतु, या बाबत सरकारकडे मागणी करून स्वस्थ न बसता आपणच पुढाकार घेऊन अस्पृश्यांचे हक्क प्रस्थापित करावे असे डॉ. आंबेडकर व अधिवेशनाचे प्रतिनिधी यांनी ठरविले. त्यानुसार २० मार्च १९२७ रोजी आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली महाड चवदार तळ्यावर एक विशाल मोर्चा काढण्यात आला.

चवदार तळ्यातील मोर्चा प्रसंगी डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना संदेश येताना असे म्हटले की, आपण माणसासारखी माणसे आहोत तरीही आपणांस जनावरांचे जिणे कंठावे लागत आहे. ही मोठी नामुष्कीकीची गोष्ट आहे, तुम्ही हाडामासाने हिंदू आहात, तरी तुम्हास पाणवठ्यावर पाणी मिळत नाही, देवळात जाऊन देवाची दर्शन घेता येत नाही किंवा सार्वजनिक ठिकाणी दिमाखाने फिरता- बसता येत नाही. कुत्रा, मांजर किंवा उंदीर असलेली मुके प्राणी सुद्धा मंदिरात बिनदिक्कत प्रवेश करतात. पण अस्पृश्य देवळात गेला की देव बाटतो ही कल्पना माणुसकीला काळीमा लावणारी आहे. माणूस म्हणून तुम्हास जगावयाचे असेल तर यापुढे अन्याय सहन करता कामा नये. अस्पृश्यांनी आपल्या हक्कांसाठी लढण्याची तयारी ठेवली पाहिजे असे त्यांनी निक्षून सांगीतले.

या प्रसंगी डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या हजारो अनुयायांनी त्या तळ्याचे पाणी प्राशन केले. अस्पृश्यांनी चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले ही बातमी महाड गावातील सवर्ण हिंदूंना समजताच त्यांनी परिषदेच्या मंडपावर हल्ला चढवला आणि तेथे उपस्थित असलेल्या अस्पृश्यांना मारहाण केले. अस्पृश्यांना पाणी घेतल्यामुळे चवदार तळे अपवित्र झाले असे सवर्ण हिंदूंना वाटले म्हणून त्यांनी चवदार तळ्याचे गोमूत्र टाकून शुद्धीकरण करून घेऊन आपल्या हीन मनोवृत्तीचे प्रदर्शन केले.

**२५ व २६ डिसेंबर १९२७ ची परिषद व मनुस्मृती दहन**

महाड येथील तळ्याचे शुद्धीकरण स्पृश्य लोकांनी केल्यामुळे या घटनेची डॉ. बाबासाहेबांना चीड आली व त्यांनी पुन्हा महाड येथे सत्याग्रह करण्याचे ठरवले. यासंदर्भात त्यांनी 'बहिष्कृत भारत' या आपल्या वृत्तपत्रात 'आपल्या अस्पृश्यतेचा कलंक ज्यांना धुवायचा असेल त्यांना सत्याग्रहात भाग घेण्यासाठी 'बहिष्कृत भारता'च्या कचेरीत आपले नाव नोंदवावे' अशी जाहिरात दिली. तर याउलट स्पृश्यांनी सत्याग्रह होऊ न देण्याची तयारी केली.

महाड नगरपालिकेने ४ ऑगस्ट १९२७ रोजी ठराव पास केला की, महाड नगरपालिकेने केलेला ठराव होता तो या ठरावाने मागे घेतला. म्हणजे तळे खाजगी असल्याचा ठराव केला व सरकारने बोले ठरावाची अंमलबजावणी नगरपालिकेच्या मालकीच्या जागेत करू नये असाही एक ठराव मंजूर करून हे ठराव सरकारकडे पाठवण्यात आले.

सवर्णानी १२ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथील दिवाणी न्यायालयात डॉ. आंबेडकर, शिवतरकर, आदींवर प्रतिबंधाचा आदेश मिळवण्यासाठी अर्ज दिला व त्याची नोटीस आंबेडकरांवर बजावण्यात आली.

तर सत्याग्रहासाठी प्रत्येक स्तरातून, गटातून मदतनिधी येत होता. प्रसिद्ध तमाशा कलाकार पठ्ठे बापूराव जोशी यांची मदत मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ते महार समाजातील स्त्रीला नाचवतात म्हणून

नाकारली होती. अनंत विनायक चित्रे १५ दिवस अगोदर सत्याग्रहाची तयारी करण्यासाठी महाडला गेले. सत्याग्रहासाठी काहीच सामान मिळू न देण्याचा घाट गाववाल्यांनी घातला होता. ही परिषद यशस्वी करण्यासाठी महाड येथे अस्पृश्य बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २४ डिसेंबर १९२७ रोजी या सत्याग्रहासंबंधी परिषद भरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणानंतर काही ठराव मांडण्यात आले. त्यावर प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली. या परिषदेत चार ठराव पारित करण्यात आले, त्यातील मनुस्मृती दहनाचा एक ठराव होता. त्या नुसार २५ डिसेंबर १९२७ रोजी रात्रौ ९.००च्या सुमारास तयार केलेल्या दहनभूमीत मनुस्मृती जाळण्यात आली. बापूसाहेब सहस्रबुद्धे व दुसरे पाच-सहा अस्पृश्य बैराग्यांच्या हातून मनुस्मृती जाळण्यात आली.

मनुस्मृति दहनाबद्दल समाजातून नापसंती व्यक्त केली होती. मनुस्मृती सारखे जुने बाड जळाल्याने कसला फायदा होणार आहे? असे त्यांचे म्हणणे होते. त्याला उत्तर देताना बाबासाहेबांनी असे म्हटले की, 'मनुस्मृती हे जुने बाड असते तर आम्हालाही आनंद झाला असता, परंतु वस्तुस्थिती मात्र तशी नाही. म्हणजे मनुस्मृती हा ग्रंथ जुना असला तरी हिंदू जनमानसावर अद्यापही त्याचा जबरदस्त प्रभाव आहे आणि हिंदू धर्मीय या ग्रंथातील वचने अजूनही प्रमाण मानतात, हे आंबेडकरांना स्पष्ट करायचे होते. त्यांनी असेही म्हटले होते की, मनुस्मृतीत शूद्र जातीची निंदा करणारी, त्यांचा उपमर्द करणारी, कुटाळ उत्पत्तीचा कलंक त्यांच्या माथी मारणारी व त्यांच्याविषयी समाजात अनादर वाढवणारी वचने ओतप्रोत भरली आहेत. त्यात धर्माची धारणा नसून असमानतेची धुळवड मात्र घातलेले आहे. असा ग्रंथ अस्पृश्य वर्गास मान्य नाही' हे दाखवून देण्याकरता महाड येथील त्याची होळी करण्यात आली.

ही परिषद चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह करण्यासाठी भरवण्यात आली होती. महाडच्या या परिषदेमध्ये मनुस्मृतीदहनाचा कार्यक्रम झाला. परिषदेच्या ठिकाणी जमा झालेले अस्पृश्य बांधव सत्याग्रहाच्या तयारीनेच आले होते. परंतु जिल्हाधिकाऱ्याने हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याचे कारण देऊन सत्याग्रहास मनाई हुकूम बजावला. त्यामुळे सत्याग्रहाचा कार्यक्रम स्थगित केला असल्याचे आंबेडकरांनी जाहीर केले.
शेवटी, इ.स. १९२७ च्या मार्चमध्ये उत्पन्न झालेल्या अस्पृश्यांच्या मानवी हक्कांचा लढा उच्च न्यायालयाच्या निर्णयाने १९३७ च्या मार्चमध्ये यशस्वी झाला.

महाड सत्याग्रहानंतर अस्पृश्यांमध्ये विलक्षण विचारप्रणाली आणि कार्य करण्याची शक्ती उत्पन्न झाली. हिंदूंच्या शास्त्रादिकांच्या शिकवणुकीच्या शृंखला त्यांच्या अस्तित्वाभोवती हजारो वर्षे जाम जखडून राहिल्या होत्या, त्या ढिल्या होऊ लागल्या व त्यातील काही दुवे निखळून पडू लागले. या सत्याग्रहामुळे स्पृश्य, अस्पृश्य यांच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल झाला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुढील सांस्कृतिक, राजकीय व धार्मिक लढ्यास या समुदायाने तन-मन-धनाने साहाय्य केलेले दिसते.

**नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह :**

महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहानंतर नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह नाशिकच्या अस्पृश्यवर्गाने सुरू करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी आपले नेते डॉ. आंबेडकरांशी इ.स. १९२९ मध्ये चर्चा केली. डॉ. आंबेडकरांनी सत्याग्रहास अनुमती दिली. त्यासाठी सत्याग्रह कमिटी तयार करून त्यामार्फत काळाराम मंदिराच्या पंचांना मंदिरप्रवेशाविषयी पत्र पाठवण्यात आले. परंतु, पाच महिने पत्र पाठवूनही पंचांचा काहीच खुलासा न आल्याने २ मार्च १९३० रोजी डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची एक जंगी

सभा होऊन ३ मार्च १९३० पासून नाशिक सत्याग्रहास सुरुवात झाली. सत्याग्रह चालू झाल्यानंतर ९ एप्रिल १९३० रोजी रामनवमी असल्यामुळे अस्पृश्य व सवर्ण यांच्यात काही तडजोडी होऊन रामाचा रथ दोन्ही मंडळींनी ओढावा असे ठरले. परंतु, सवर्णांनी ठरलेल्या वेळेच्या आधी रथ ओढून नेऊन अस्पृश्यांना फसवण्याचा प्रयत्न केला. परंतु, तरुण अस्पृश्यांनी पळत जाऊन रथ ओढण्याचा आपला अधिकार बजावण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना सवर्ण व्यक्तींकडून मार देण्यात आला. या वेळी अनेक अस्पृश्य स्त्री-पुरुष जखमी झाले. खुद्द डॉ. आंबेडकरांच्या डोक्यावर भाऊसाहेब गायकवाडांनी छत्री धरल्यामुळे डॉ. आंबेडकर या दंग्यातून बचावले. पोलिसांनी त्यावेळी संचारबंदी लागू केली. नंतर अशा दंगलींचे प्रमाण वाढत गेल्याने मध्ये-मध्ये काही काळ सत्याग्रह तहकूब करण्यात येत होता. शेवटी ३ मार्च १९३४ रोजी डॉ. आंबेडकरांनी भाऊराव गायकवाडांना पत्र लिहून सत्याग्रह तहकूब करण्यास सांगितले.

नाशिक येथील काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रहाचा उद्देश फक्त मंदिरप्रवेश किंवा पूजा-अर्चा करून मोक्ष मिळवणे हा नक्कीच नव्हता तर अस्पृश्यांना आपल्या मानवी हक्काची जाणीव उत्पन्न व्हावी व ते हक्क मिळवण्यासाठी त्यांच्यात प्रतिपक्षाशी सतत झुंजत राहण्याची चेतना व प्रवृत्ती उत्पन्न व्हावी हा होता व तो डॉ. आंबेडकरांनी ३ मार्च १९३५ रोजी भाऊराव गायकवाडांना पाठवलेल्या पत्रातून स्पष्ट होतो.

**पर्वती सत्याग्रह :**

पुणे येथे ब्राह्मणवर्गाने चालवलेल्या अस्पृश्यता निवारण मंडळामार्फत ल. बा. भोपटकर यांनी २७ ऑगस्ट १९२९ रोजी पर्वती देवस्थान अस्पृश्यांना खुले करावे अशा आशयाचे विनंती पत्र लिहिले. परंतु, देवस्थानाच्या पंचांनी याबद्दल काहीच खुलासा केला नाही. पर्वती मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश करावा आणि वेळ पडेल तर सत्याग्रह करावा याबद्दल विचारविनिमय करण्यासाठी अस्पृश्यवर्गानी २२ सप्टेंबर १९२७ रोजी सायं. ७.०० वा. रामेश्वराच्या देवळानजीक लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूटच्या भव्य हॉलमध्ये श्री. विनायकराव भुस्कुटे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली व त्यामध्ये शि. ज. कांबळे यांना अध्यक्ष, पां. ना. राजभोज यांना जनरल सेक्रेटरी, न. वि. गाडगीळ, वि. म. भुस्कुटे, वि. वा. साठे, ग. ना. कानिटकर, केशवराव जेधे यांचे सल्लागार मंडळ नेमण्यात आले. अशा प्रकारे सत्याग्रह कमिटी या दिवशी नेमण्यात आली. या पर्वती सत्याग्रहाविषयी आपल्या 'बहिष्कृत भारता'मध्ये डॉ. आंबेडकर म्हणतात, २/१०/१९२९ रोजी या अस्पृश्यवर्गातर्फे पर्वती देवस्थानच्या पंचांना त्यांचे मंदिर खुले करणेबाबत काय विचार आहे, हे तीन दिवसात सांगावे अशी नोटीस देण्यात आली. तेव्हा ८ ऑक्टोबर १९२९ रोजी वृत्तपत्रातून मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यात येणार नसल्याचे वृत्त देण्यात आले. त्यानंतर अस्पृश्यवर्गातर्फे १३ ऑक्टोबर १९२९ पासून पर्वती सत्याग्रह सुरू करण्यात आला व १६ ऑक्टोबर १९२९ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी परळ येथे एक जंगी सभा घेऊन या सत्याग्रहाला आपला पाठिंबा दिला.

त्यानंतर १३ ऑक्टोबर १९२९ रोजी पुण्यातील विविध भागांतील सत्याग्रही मंडळी काही स्त्रियादेखील दिंडीच्या स्वरूपात वाटेत मृदंग, पेटी वाजवत व 'छत्रपती शिवाजी महाराज की जय। चोखा मेळा की जय।' अशा घोषणा देत पर्वतीच्या पायथ्यापाशी जमा झाली. या सर्वांनी काही तुकड्या करून मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना सवर्ण मंडळींनी बेदम मारहाण केली. वि. रा. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन सत्याग्रहींना मारहाण करणाऱ्या हिंदूंचा निषेध करण्यात आला. पुढे २० नोव्हेंबर १९३० रोजी न. चिं. केळकर, ल. बा. भोपटकर, जमनालाल बजाज यांच्या मध्यस्थीने सत्याग्रह तहकूब केला.

डॉ. आंबेडकरांनी पर्वती सत्याग्रहात स्वत: भाग घेतला नसला तरी त्याला जंगी सभा घेऊन पाठिंबा मात्र दिला होता. या सत्याग्रहावर व इतर घडामोडींवर त्यांचे बारीक लक्ष होते. हे १५ नोव्हेंबर १९२९ च्या 'बहिष्कृत भारता'मध्ये त्यांनी सत्याग्रहावर लिहिलेल्या अग्रलेखातून व दिलेल्या विस्तारित वृत्तातून लक्षात येते.

**अमरावती येथील अंबादेवी मंदिर सत्याग्रह :**

वऱ्हाडातील अमरावती येथील अस्पृश्यांनी अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून १९२५ सालात चळवळ सुरू केली. या चळवळीचे सूत्रधार माधोराव गोविंदराव मेश्राम होते. या कामी दादासाहेब पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, वगैरे मंडळी होती. त्यांनी मंदिरप्रवेशाची मागणी मंदिर पंच कमिटीकडे या वेळी गणपतराव खापर्डे यांनी सत्याग्रहींना मी हिंदूंची मने वळवतो तीन महिने सत्याग्रह तहकूब करावा, असे म्हटले होते. परंतु, दोन वर्षे झाली तरी खापर्डे यांना हिंदूंची मने वळवता आली नाहीत. याच खोळंबलेल्या मंदिरप्रवेश सत्याग्रहाला चालना द्यावी म्हणून अमरावतीच्या स्पृश्य व अस्पृश्य समाजसेवकांनी अमरावती येथे ३ नोव्हेंबर १९२७ रोजी एक परिषद भरवली. या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बोलावण्यात आले होते. श्रीअंबेच्या देवळात जाण्याची परवानगी देता येत नाही, असे देवळाच्या कमिटीकडून उत्तर आल्यानंतर या बाबतीत सत्याग्रह करण्याचा ठराव पास केला. परंतु, स्थानिक पुढारी बॅ. बागवे यांनी तडजोडीची योजना तयार केली.

परिषदेतील एक ठरावात असे जाहीर केले होते की, मंदिराच्या व्यवस्थापकांची तडजोडीची योजना १५ फेब्रुवारी १९२८ च्या आंत यशस्वी झाली नाही तर अस्पृश्य लोक सामुदायिक रीतीने मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह करतील. त्याप्रमाणे मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाला सुरुवात झाली पण तो सत्याग्रह जोरात व उत्साहाने करण्यात आला नाही. हा सत्याग्रह पुष्कळ दिवस रेंगाळत चालला व पुढे बंद करण्यात आला.

समाजसुधारणेसाठी विविध चळवळी केल्या त्यात महत्त्वाच्या चळवळी यात मंदिरप्रवेशाची चळवळ, मनुस्मृतीचे दहन, पाण्यासाठी सत्याग्रह होय! त्यांनी शिक्षण आणि सामाजिक सुधारणा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्यांनी आतापर्यंत केलेली आंदोलनेही आपण हिंदू धर्माचे आहोत, हे गृहीत धरून केली. अस्पृश्यतेचा प्रश्न हा हिंदू धर्मांतर्गत मानला. पण प्रत्यक्षात हिंदूंचे हृदयपरिवर्तन होत नाही, असे दिसत होते. तेव्हा त्यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवले या गावी अस्पृश्यांची एक मोठी परिषद घेऊन धर्मांतराची घोषणा केली. हिंदू धर्म चातुर्वर्ण्यावर आधारलेला आहे. तो सुधारण्याच्या पलीकडे गेला आहे. त्यामुळे धर्मांतर करण्याशिवाय आम्हा अस्पृश्यांना तरणोपाय नाही, असे आपल्या भाषणात सांगितले. या घोषणेनंतर त्यांनी मंदिरप्रवेशाचा लढा मागे घेतला. त्यानंतर त्यांनी अन्य सामाजिक सुधारणांवर शक्ती खर्च करणे थांबवले आणि चळवळीची दिशा राजकारणाकडे नेली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राजकीय चळवळ :**

इ.स. १९२८ ते १९३० या काळात स्पृश्य लोक ब्रिटिशांविरुद्ध राजकीय हक्कांसाठी आंदोलने करत होती. मात्र सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्यासाठी ते मूग गिळून गप्प बसलेले होते. भारताला राजकीय हक्क मिळतील त्यात अस्पृश्यांचे स्थान बळकट करणे व त्याबाबतची अस्पृश्यांची भूमिका स्पष्ट करणे, यासाठी बाबासाहेबांनी 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस' या नावाची राजकीय संघटना काढली. या संघटनेचे पहिले अधिवेशन ८ व ९ ऑगस्ट १९३० रोजी कामटी, नागपूर येथे भरवले. त्याचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब

आंबेडकर होते. प्रथमच त्यांनी आपले अध्यक्षीय भाषण विचारपूर्वक इंग्रजीतून लिहून काढले. त्यात त्यांनी अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व तर दिले पाहिजेच पण त्यांना जादा संरक्षण म्हणून काही जादा राजकीय हक्कही दिले पाहिजेत असे प्रतिपादन केले. अस्पृश्यांना असे राजकीय अधिकार द्यावेत की, अस्पृश्यांना त्याचा उपयोग करून आपली सर्वांगीण प्रगती घडवून आणता येईल आणि अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांकडे कानाडोळा करून सरकार जर भारताला जादा राजकीय हक्क देईल तर ते राजकीय हक्क सवर्ण हिंदूंच्या हातातील जळती कोलिते होऊन बसतील व ती कोलिते अस्पृश्यांचे जीवन बेचिराख करून टाकतील, असा इशारा बाबासाहेबांनी सरकारला दिला. हे भाषण अस्पृश्यांच्या पाच-सहा हजार वर्षाच्या जीवनात राजकीय हक्कांचे पहिले पाऊल होते.

**सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदा :**

भारताला राजकीय अधिकार देण्यासाठी इंग्रजांनी पाठवलेल्या सायमन कमिशनच्या शिफारशी सर्व भारतीय राजकीय पक्षांनी नाकारल्या. तेव्हा इंग्रज सरकार व भारतातील विविध पक्षाचे, समाजाचे प्रतिनिधी यांनी एकत्र बसून याबद्दल निर्णय घ्यावा यासाठी इंग्रज सरकारने  लंडनमध्ये गोलमेज परिषदेचे आयोजन केले. अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकरांची निवड केली. पहिल्या गोलमेज परिषदेसाठी डॉ. आंबेडकरांना अस्पृश्य जनतेने २ ऑक्टोबर १९३० रोजी मानपत्र व थैली अर्पण करून मोठ्या उत्साहात त्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम परळ येथे पार पडला.

या परिषदेत बाबासाहेबांनी आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणाने अस्पृश्यांना राजकीय हक्कांची किती गरज आहे, हे पटवून दिले होते. तसेच, अस्पृश्यांवरील अन्याय जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी या परिषदेचा उपयोग करून घेतला. भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना होऊन सव्वाशे वर्षे झाली असली तरी अस्पृश्य मात्र पूर्वीच्या अवस्थेत आहेत आजही त्यांच्या स्थितीत काहीही बदल झालेल्या नाही. अस्पृश्यांना राजकीय सत्तेत वाटा मिळाल्या शिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. आपल्या भाषणात त्यांनी अस्पृश्यांची बाजू प्रभावीपणे मांडली.

**दुसरी गोलमेज परिषद**

दुसरी गोलमेज परिषद १ सप्टेंबर १९३१ पर्यंत चालली. दुसऱ्या गोलमेज परिषदेला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधी उपस्थित राहिले होते. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास त्यांचा विरोध होता. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ दिल्याने ते सवर्ण हिंदूपासून कायमचे दुरावतील अशी भीती त्यांनी व्यक्त केली होती. परंतु आंबेडकरांनी त्या गोलमेज परिषदेतही अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह धरला होता. महात्मा गांधींनी आंबेडकर यांच्यातील मतभेदामुळे अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीवर दुसऱ्या गोलमेज परिषद कोणताही निर्णय होऊ शकला नाही. पुढे हिंदुस्थानातील निवडणुकीच्या आणि कायदेमंडळातील जागा वाटपाच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी ब्रिटिश सरकारने लोथियन कमिटीची नियुक्ती केली. या कमिटीने आपला अहवाल इंग्लंडच्या सरकारला सादर केला. या कमिटीच्या शिफारशीच्या आधारे इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १७ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा जाहीर केला. या निवाड्यानुसार डॉ. आंबेडकरांनी मागणी केल्याप्रमाणे अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली होती.

म. गांधींनी 'काँग्रेस हीच मुसलमान वर्ग व इतर अल्पसंख्याक वर्गाची प्रतिनिधी आहे व सरकारने जे प्रतिनिधी निवडले ते जनतेचे खरे प्रतिनिधी नव्हेत.' अशी भूमिका गांधींनी घेतल्यामुळे वातावरण तापले.

गाधींनी अस्पृश्यांचे स्वतंत्र राजकीय अधिकार नाकारले. पण ते मुसलमान, शीख, युरोपियन यांना राजकीय संरक्षण देण्यास तयार झाले.' महात्मा गांधी यांनी दुसऱ्या गोलमेज परिषदेमध्ये अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाला विरोध केला होता.

दुसऱ्या गोलमेज परिषदेवरून भारतात येत असताना मध्येच म. गांधींनी आपल्यावरील विरोधाच्या बाबतीत इंग्रज सरकारला इशारा देताना भारतात पुन्हा कयदेभंगाची चळवळ सुरू करण्याची धमकी दिली. म्हणून भारतात येताच इंग्रज सरकारने गांधींना अटक करून येरवडा जेलमध्ये ठेवले.

**पुणे करार :**

आपल्या माताच्या विरोधी इंग्रज सरकारने जातीय निवाडा केल्यामुळे या निवाड्याच्या विरोधात आमरण उपोषण करणार असल्याचा खुलासा म. गांधी यांनी दि. १८ ऑगस्ट १९३२ रोजीच्या पत्राद्वारे ब्रिटिश पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांना कळवला. पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांनीही म. गांधींना दि. ८ सप्टेंबर १९३२ रोजी पत्र लिहून आपला जातीय निवाड्याच्या विरोधात असलेला दृष्टिकोन कसा चुकीचा आहे, हे स्पष्ट करणारे पत्र लिहिले. इंग्रज सरकारने जातीय निवाड्यानुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिलेले होते. या अस्पृश्याच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या प्रश्नावर महात्मा गांधी व अस्पृश्यांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात पुणे करार झाला. पुणे कराराने अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदारसंघ काढून घेऊन राखीव जागा देण्यात आल्या. प्रत्येक मतदारसंघात अस्पृश्य हे अल्पसंख्याकच आहेत. त्यामुळे फक्त अस्पृश्यांच्या मतावर कोठेही निवडणुका जिंकणे अवघड झाले. यासाठी अस्पृश्य उमेदवाराला सवर्णाच्या मतावर अवलंबून राहावे लागले व सवर्णही आपल्या हिताच्या दृष्टीने सोयीच्या उमेदवारालाच निवडून देऊ लागले. त्यामुळे विधिमंडळात अस्पृश्यांचे प्रश्न मांडणारे किंवा अस्पृश्यांची बाजू घेणारे प्रतिनिधी पुढे आले नाहीत. एकंदरीत, पुणे करारामुळे म. गांधीचे प्राण वाचले तरी अस्पृश्यांचे मात्र खूप नुकसान झाले.

२६ सप्टेंबर १९३२ रोजी ब्रिटिश मंत्रिमंडळाने पुणे करारावर ब्रिटिश लोकसभेकडून शिक्कामोर्तब करून तो मंजूर करण्यात आला. पुणे करारामुळे डॉ. आंबेडकर हे अस्पृश्यांचे राष्ट्रीय नेते आहेत हे जगन्मान्य होऊन त्यांच्या कार्याला अधिक गती व मान्यता मिळू लागली. पुढे अस्पृश्यांच्या राजकीय हिताच्या दृष्टीने डॉ. आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' व 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' पक्षाची स्थापना केली.

**स्वतंत्र मजूर पक्ष :**

इ.स. १९३५ च्या कायद्यान्वये होणाऱ्या प्रांतिक विधानमंडळाच्या निवडणुका जवळ येताच डॉ. आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. १९३५ च्या कायद्यान्वये जे राजकीय हक्क मिळाले ते तर त्यांना मिळवता येतीलच पण स्पृश्य लोकांकरिता जे राजकीय हक्क मिळाले त्यांना मतांचा पाठिंबा देऊन इतर उमेदवारही आपण निवडून देऊ शकू हे विचार मनात येताच डॉ. आंबेडकरांनी राजकीय पक्ष जातीय पायावर न उभारण्याचे ठरवले. आतापर्यंत अस्पृश्यांचा लढा मर्यादित स्वरूपाचा होता त्याला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी कामगार व शेतकरी यांच्या लढ्याशी अस्पृश्यांचा लढा संलग्न करण्याचे ठरवले.

या निवडणुकीत स्वत: स्वतंत्र मंजूर पक्षातर्फे निवडून आलेले बळवंत वराळे म्हणतात, राखीव जागेसाठी उभे असलेल्या १५ पैकी १३ जण निवडून आल्या आणि साधारण जागेसाठी उभे असलेले तिघेही निवडून आले.

इ.स.  १९३७ ची निवडणूक झाल्यानंतर बहुमत मिळालेल्या कॉंग्रेसने मंत्रिमंडळ बनवण्यास नकार दिला. पुढे जुलै १९३७ नंतर कॉंग्रेसने मंत्रिमंडळ बनवले. विधिमंडळात विरोधी सदस्य म्हणून विधिमंडळातील अर्थसंकल्प, कामगार कायदा, दारूबंदी विधेयक, महारवतन बिल याविषयक कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. विधिमंडळाबाहेरही त्यांनी असे तडाखेबाज कार्य केले. त्यांनी १९३८ च्या सुरुवातीला शेतकऱ्यांचा एक मोर्चा खोतीच्या प्रश्नासंबंधी विधानमंडळावर नेला होता. तसेच, या दरम्यान १२ व १३ फेब्रुवारी १९३८ रोजी ग्रेट इंडियन पेनीन्सुला रेल्वेतील दलितवर्गीय कामगारांची परिषद मनमाड येथे भरली होती, या परिषदेला अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकर हजर होते.

इ.स. १९३८ मध्ये औद्योगिक विवादाचे विधेयक विधिमंडळात आले. या बिलात कामगारांचा संप काही विशिष्ट परिस्थितीत बेकायदा ठरवण्यात आला होता. या विधेयकाला डॉ. आंबेडकरांनी विधिमंडळात व बाहेर प्रखर विरोध केला. यासाठी त्यांनी १६ नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबईत कामगारांचा यशस्वी संप घडवून आणला आणि या औद्योगिक विधेयकाला त्यांनी 'काळा कायदा' म्हणून घोषित केले.

**मजूरमंत्री :**

मार्च १९४२ मध्ये भारताला अधिक राजकीय अधिकार देण्यासाठी सर स्टॅफोर्ड क्रिप्स हे इंग्लंडहून भारतात आले होते. पुढे जुलै १९४२ मध्ये गव्हर्नर जनरलने डॉ. आंबेडकरांना आपल्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर घेतले व त्यांना मजूर खाते देण्यात आले. डॉ. आंबेडकरांना मजूर खात्याबरोबरच बांधकाम खातेही देण्यात आले होते.  डॉ. आंबेडकरांकडे त्यावेळी कोळसाखाणी, प्रिंटिंग स्टेशनरी, लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांच्या संस्थानात असलेल्या प्रशिक्षण केंद्रातून तांत्रिक शिक्षण देणे, प्रसिद्धी व लष्करी भरती, गृहबांधणी व सार्वजनिक बांधकाम, पिलानी येथील प्रशिक्षण केंद्र ही सर्व खाती मजूर खात्याव्यतिरिक्त सोपवण्यात आली होती. सिव्हिल पायोनियर फोर्सचेही खाते १९४३ च्या शेवटी त्यांच्याकडे देण्यात आले होते.

त्यांनी खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांना बाळांतपणाची रजा व तीही पगारी मिळण्याची सोय करणारे विधेयक संमत करून घेतले. पुढे  फेब्रुवारी १९४६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी मजुरांचा १० तासांचा दिवस कमी करून ८ तासांचा करणारे महत्त्वाचे विधेयक संमत करून भारतीय मजुरांच्या जीवनात क्रांतिकारी सुधारणा घडवून आणली. चहामळ्यांमध्ये काम करणार्या मजुरांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून 'इंडियन टी कंट्रोल दुरुस्ती बिल' मंजूर करून घेतले.

**अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन :**

क्रिप्स मिशनची योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवडली नाही. डॉ. आंबेडकरांनी क्रिप्स मिशनपुढे अस्पृश्यांची राजकीय हक्कांची कैफियत स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मांडली तेव्हा क्रिप्स डॉ. आंबेडकरांना म्हणाले की, स्वतंत्र मजूर पक्ष हा काही जातीय राजकारणाचा पाठपुरावा करू शकत नाही. तेव्हा तुम्ही दुसऱ्या जातीय संस्थेतर्फे अस्पृश्यांची कैफियत मांडा. ही गोष्ट तात्त्विक व तांत्रिकदृष्ट्या डॉ. आंबेडकरांना पटल्यामुळे त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष विसर्जित करून नागपूर येथे 'ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना केली. राजकारणात जातीयवाद आणू नये, या धोरणाने डॉ. आंबेडकरांनी १९३६ सालात भारतीय स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. पण कॉंग्रेस व सरकार यांच्या अडेलतट्टू धोरणामुळे इ.स. १९३७ सालानंतर राजकारणात जातीयवाद धुमाकूळ घालू लागला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनाही जातीयवादाचा मार्ग स्वीकारणे अटळ होऊन

बसले. म्हणूनच त्यांनी १९४२ सालात या फेडरेशनची स्थापना केली. फेडरेशनच्या स्थापनेनंतर बाबासाहेबांनी वेगवेगळ्या प्रांतांचे दौरे केले. डॉ. आंबेडकरांनी मद्रास प्रांताचा दौरा केला तेव्हा मद्रास येथे त्यांचा सत्कार करून त्यांना मानपत्र देण्यात आले.

इ.स. १९४६ च्या विधानमंडळाच्या निवडणुकांमध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने आपले उमेदवार उभे केले. परंतु, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या उमेदवारांना या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे उमेदवार मुंबई प्रांतात जे उभे होते ते सर्व पडले. मद्रास व पंजाब प्रांतात एक-दोन उमेदवार यशस्वी झाले. फेडरेशनला आलेल्या अपयशामुळे कार्यकर्त्यामध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाले. दि. २२ डिसेंबर १९४८ रोजी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने मोठी जाहीर सभा झाली. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी कार्यकर्त्यांना संदेश दिला व मार्गदर्शन करून धीर दिला.

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया :**

डॉ. आंबेडकरांनी दि. ३० सप्टेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे 'अखिल भारतीय श्येड्युल्ड कास्ट फेडरेशन'च्या कार्यकारिणीची बैठक घेतली व या बैठकीत काँग्रेसला विरोधी पक्ष स्थापन करण्याचे आणि त्या पक्षाला 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हे नाव देण्याचे ठरले. तसेच, या पक्षात येण्याविषयी डॉ. आंबेडकरांनी आचार्य अत्रे, एस. एम. जोशी यांना पत्रे लिहिली होती. परंतु, ती त्यांना देण्याअगोदरच डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हा पक्ष त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर अस्तित्वात आला.

डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेण्याच्या आदल्या दिवशीच 'अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष' स्थापन करण्याची घोषणा नागपूर येथेच १३ ऑक्टोबर १९५६ रोजी केली. त्यांनी स्वत:च रिपब्लिकन पक्षाची घटनाही लिहिली होती. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व साध्य करणे हेच रिपब्लिकन पक्षाचे ध्येय व उद्दिष्ट राहील. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याची घोषणा केल्यानंतर पुढे दोन महिन्यांच्या कालावधीत बाबासाहेबांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या अनुयायांनी कर्मवीर दादासाहेब गायकवाड, एन. शिवराजन, आदी नेत्यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना ऑक्टोबर १९५८ मध्ये नागपूर येथे केली.

**धर्मांतर :**

दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक येवले येथे मुंबई इलाखा दलितवर्गीय परिषद भरली होती. या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, 'हिंदू म्हणून घेत मी मरणार नाही'. 'हिंदू धर्माचा त्याग केल्यानंतर कोणता धर्म स्वीकारायचा हे प्रत्येकाच्या मर्जीवर अवलंबून आहे. फक्त समानतेचे हक्क मिळतील असाच धर्म त्यांनी स्वीकारावा,' असे आंबेडकरांनी स्पष्ट केले. डॉ.आंबेडकरांच्या मनात बौद्ध धर्माने अगदी लहानपणापासूनच जागा केली होती. 'दादासाहेब केळूसकरांनी १९१८ मध्ये प्रसिद्ध केलेले मराठीतील बुद्धांचे चरित्र बाबासाहेबांना ते मॅट्रिक झाल्यानंतर त्यांच्या सत्कार समारंभात भेट म्हणून दिले होते.' यातूनच बाबासाहेबांचे मन बौद्ध धर्माकडे आकर्षित झाले होते. हे आकर्षण वाढत गेले तरी कोणत्या धर्मात प्रवेश करायचा या संदर्भातील निर्णय बाबासाहेबांनी त्वरित जाहीर केला नाही. प्रत्येक धर्माचा अभ्यास करून २१ वर्षांनी धर्मांतर करण्याचा निर्णय घेतला.

नागपूरला बौद्ध धर्माची व नागवंशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याने दीक्षा समारंभासाठी नागपूर हे ठिकाण निवडले. 'दीक्षा देण्यास योग्य असा बौद्ध धर्मातील श्रेष्ठतम पंडित आणि सर्वात वयोवृद्ध बुद्ध अनुयायी पूज्य भिक्खु चंद्रमणी महास्थवीर यांची निवड केली. दीक्षेची तारीख १४ ऑक्टोबर १९५६ 'विजयादशमी' ही निश्चित केली. हा समारंभ सकाळी ९.०० ते ११.०० दरम्यान झाला. रविवार, दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब यांनी महास्थवीर भिक्खु चंद्रमणी यांच्या हस्ते बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. या कार्यक्रमासाठी अदमासे ५ ते ६ लक्षापर्यंत जनसमुदाय उपस्थित झाला होता. त्यापैकी जवळजवळ ३ ते ४ लक्ष लोक बाहेरगावचे होते. धर्मांतराच्या अगोदरच्या दिवशी दि. १३ ऑक्टोबरला डॉ. आंबेडकरांनी वार्ताहरांना मुलाखत दिली. त्यात ते म्हणतात, बौद्ध धर्म स्वीकारून मी हिंदू समाजाच्या दृष्टीने एक उपकारक कृत्यच करत आहे. कारण बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचेच अंग आहे.'

'मला बौद्ध धर्म का आवडतो? सध्याच्या जागतिक परिस्थितीत तो किती उपयुक्त आहे?' या विषयावर बाबासाहेबांचे भाषण १२ मे १९५६ रोजी 'बीबीसी'वर झाले. त्यात ते म्हणतात, जगातील इतर धर्म परमेश्वर, आत्मा आणि मृत्यूनंतरची मानवाची स्थिती यासंबंधी विचार व उपदेश करतात. पण या तीन गोष्टी शिवाय मानवी जीवन सुखमय व्हायला जी तत्त्वे कारणीभूत आहेत ती तत्त्वे बौद्ध धर्माने सांगितली व उपदेशिली. ती तत्त्वे म्हणजे प्रज्ञा, करुणा व समता! मनुष्याने बुद्धिनिष्ठ (अंधचालीरीती व अलौकिक घटना यांना बळी न पडता) राहावे, प्राणिमात्रांवर प्रेम करावे आणि त्यांच्याशी आपुलकीने व समपातळीने वागावे हा या तीन तत्त्वांचा अर्थ! याप्रमाणे सर्व मानव वागू लागले तर जग स्वर्गमय होईल. ही श्रेष्ठतम तत्त्वे बौद्ध धर्म शिकवतो म्हणून तो मला आवडतो. हा धर्म जगातील सर्व समाजांना स्थैर्य आणू शकेल. परमेश्वर व आत्मा यांच्यासंबंधीची विचारसरणी या बाबतीत निरुपयोगी आहे अशी माझी श्रद्धा आहे म्हणून मला हा धर्म आवडतो.

दि. १३ मे १९३६ रोजी धर्मांतराचा तात्त्विक दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी मुंबईत एक सभा घेऊन जे भाषण डॉ. आंबेडकरांनी केले ते 'मुक्ती कोण पथे?' या शीर्षकाखाली छापले आहे. शेवटच्या मुद्यात त्यांनी भगवान गौतम बुद्धांनी भिक्षु संघास जो धर्मोपदेश केला तो दिला आहे. तो असा, तुम्ही दिव्याप्रमाणे स्वयंप्रकाशित व्हा! परप्रकाशित राहू नका. स्वत:वरच विश्वास ठेवा. दुसऱ्या कोणाच्या अंकित होऊ नका. सत्याला धरून राहा. सत्याचाच आश्रय करा व दुसऱ्या कोणाला शरण जाऊ नका. मीदेखील बुद्धाच्या शब्दाचाच आश्रय करून तुम्हांला असा निरोप देतो की, तुम्हीच आपले आधार व्हा, स्वत:च्या बुद्धीला शरण जा, दुसऱ्याचा कोणाचाही उपदेश ऐकू नका, दुसऱ्या कोणाला वश होऊ नका, सत्याचा आधार घ्या, सत्याला शरण जा, दुसऱ्या कशासही शरण जाऊ नका, हा भगवान बुद्धाचा उपदेश तुम्ही या प्रसंगी ध्यानात ठेवाल तर माझी खात्री आहे की, तुमचा निर्णय चुकीचा होणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत: बौद्ध धम्माची दीक्षा घेतली व आपल्या लाखो बांधवांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. अशा प्रकारे स्वत:च्या उन्नतीचा मार्ग त्यांनी आपल्या लाखो बांधवांना दाखवला.

**शैक्षणिक कार्य :**

शिक्षणाचे महत्त्व जाणून त्यांनी विद्या मिळवण्यासाठी अपार कष्ट घेतले. अठरा-अठरा तास अभ्यास केला. शिक्षणाने माणसाला माणूसपण मिळते. त्याच्या अस्तित्वाची त्याला ओळख पटते हे डॉ. आंबेडकरांनी स्वानुभवावर जाणले होते. ते म्हणतात, उपसमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच, शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो.

फेब्रुवारी १९२० मध्ये स्थापन केलेल्या व १९२४ मध्ये मध्यवर्ती केलेल्या 'बहिष्कृत हितकारणी सभे'च्या माध्यमातून त्यांनी शैक्षणिक कार्याची सुरुवात केली. या सभेची ध्येये व उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती–

१. वसतिगृहे उघडून दलितवर्गामध्ये शिक्षणाच्या प्रसाराचे प्रचलन करणे किंवा त्यासाठी अशाच प्रकारची आवश्यक किंवा इष्ट वाटणारी साधने उपयोगात आणणे.

२. वाचनालये, समाजकेंद्रे आणि वर्ग किंवा अभ्यासमंडळे उघडून दलितवर्गांमध्ये संस्कृतीच्या प्रसाराचे प्रचालन करणे.

३. औद्योगिक आणि कृषी शाळा सुरू करून दलितवर्गांच्या आर्थिक स्थितीप्रमाणे प्रगती आणि सुधारणा करणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश दिला. बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून त्यांनी 'जनता शिक्षण संस्था' स्थापन (People's Education Scoeicty ) करून त्याद्वारे सिद्धार्थ व मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. एप्रिल १९४६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. मुंबईत सिद्धार्थ महाविद्यालय त्यांनी सकाळच्या वेळेत सुरू केल्यामुळे विद्यार्थांना नोकरी करता–करता शिक्षण घेणे सोपे झाले. तर मिलिंद कॉलेज औरंगाबाद येथे काढल्यामुळे मराठवाड्यातील खेडोपाडी राहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा लाभ घेता आला. ही खेड्यातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली.

मिलिंद महाविद्यालयाची कोनशिला बसवण्याच्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाषण केले. ते म्हणतात, 'अध्यक्ष महाराज ज्या कॉलेजची कोनशिला बसवण्याची मी तुम्हाला विनंती करत आहे ते हे कॉलेज १९ जून १९५० रोजी अस्तित्वात आले आहे.' दि. २० जून १९५० रोजी औरंगाबाद येथे पी. ई. एस. महाविद्यालय अस्तित्वात आले. पुढे दि. १ सप्टेंबर १९५१ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते या महाविद्यालयाची कोनशिला बसवण्यात आली आणि पुढे १९५५ मध्ये याच महाविद्यालयाचे नामकरण मिलिंद महाविद्यालय असे करण्यात आले.

या शिलान्यासप्रसंगी केलेल्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात, 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या स्तरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे, हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते, पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे, खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागेल. तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाजपद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले, त्यांच्या स्वत:च्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्वाचे आहे याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यांवर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे'.

दलित समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी त्यांना आत्मभान येण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरील संस्थांची निर्मिती केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व कार्याचा आवाका प्रचंड मोठा होता. भारतीय समाजाचे असे एकही अंग नाही ज्याला त्यांनी स्पर्श केला नाही. मानवी जीवनाशी संबंधित धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक विषयावर समाजाच्या सर्व अंगाचा अभ्यास करून त्यांनी मुलभूत विचार मांडले. त्या विचाराला आपल्या लिखाणातून, साहित्यातून, भाषणांतून लोकांसमोर मांडले व आपल्या कार्यातून ते सत्यात उतरवले. तसेच, ते विचार चिरकाल टिकतील अशी राज्यघटनेतून तरतूद करून ठेवली. आज असंख्य लोक त्यांच्या विचारांना स्वत:चा जीवन मार्ग समजून आपले जीवन घडवत आहेत. राष्ट्रउभारणीसाठीही त्यांच्या विचारांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. बदलत्या परिस्थितीत दिवसेंदिवस त्यांच्या विचारांची गरज भासत असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास येत आहे. स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय ही मुल्ये त्यांच्या विचारांच्या गाभ्याशी आहेत. त्यांच्या विचारांत या मुल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांचे हे विचार त्यांची भाषणे त्यांनी निर्माण केलेले साहित्य, वृत्तपत्रे, व त्यांचे कार्यात प्रतिबिंबित होतात. त्यांच्या विचारांनी इतिहास घडविला आहे. या विचारांना ऐतिहासिक महत्त्व आहे. आजही त्यांचे विचार विविध चळवळी व आंदोलनाचा भाग बनलेले आहेत.

**वृत्तपत्रे:**

अस्पृश्यांच्या हिताकरिता, समाजपरिवर्तनवादी विचारांच्या प्रतिपादनाकरिता, शोषितांच्या प्रबोधनाकरिता, उत्थानाकरिता अस्पृश्यांचे स्वतंत्र वृत्तपत्र असावे या निकडीमधून छत्रपती शाहू महाराजांच्या देणगीतून 'मूकनायक'चा जन्म झाला. इ.स. १९२० च्या जानेवारीत 'मूकनायक' पाक्षिक सुरू केले. पहिल्या अंकाच्या संपादकीयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच, त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग याच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही'. मूकनायकच्या पहिल्या १३-१४ अंकात बाबासाहेबांनी लिहिले. पण पुढे ते परदेशात गेल्यावर मूकनायक बंद पडले. पुढे महाडची कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद झाल्यानंतर जेव्हा चळवळीला जोम वाढू लागला त्यावेळी त्यांनी एप्रिल १९२७ मध्ये ङ्गबहिष्कृत भारतफ हे वृत्तपत्र स्वत:च्या संपादकत्वाखाली सुरू केले. या वृत्तपत्राने वर्षभराच्या काळात संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. दि. ३ फेब्रुवारी १९२८ च्या अंकात बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे 'बहिष्कृत भारत'च्या झंजावाताने महाराष्ट्रातील हिंदू समाजात एक प्रकारचे तुफान आले होते, असे दिसून येईल.

बहिष्कृत भारत सुमारे दोन वर्षे चालले व १९२९ साली बंद पडले. 'बहिष्कृत भारत'मधील सर्व ३३ अग्रलेख हे मुख्यत: दलित समाजाला त्यांचे वाजवी हक्क मिळवून देणे आणि त्यांना स्वत्त्वाची जाणीव करून देणे हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून लिहिलेले आढळतात. बाबासाहेबांनी 'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत'व्यतिरिक्त 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' अशी आणखी दोन वृत्तपत्रे चालवली. २४ नोव्हेंबर १९३० रोजी 'जनता'चा पहिला अंक प्रकाशित झाला. पुढे ४ फेब्रुवारी १९५६ रोजी 'जनता'चे 'प्रबुद्ध भारत'मध्ये रूपांतर झाले. अशा प्रकारे 'मूकनायक पासून ते प्रबुद्ध भारत'पर्यंत डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रीय जीवनस्वप्न त्यांच्या वृत्तपत्रातून प्रकट होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहीलेले ग्रंथ :**

डॉ. आंबेडकरांचे वृत्तपत्रीय लिखाण जसे महत्त्वपूर्ण आहे, तसेच, त्यांनी विविध क्षेत्रांत केलेले

लिखाणही महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक, संविधानिक व सांस्कृतिक क्षेत्रातही विविधांगी वैचारिक लिखाण केले. संबंधित क्षेत्रात मुलभूत विचार मांडले. या ग्रंथांतून त्यांच्या भाषणातून अगाध बुद्धिमत्तेचे दर्शन घडते. त्यांनी लिहिलेले काही महत्त्वाचे ग्रंथ पुढील प्रमाणे विशद करता येतील -

इ.स. १९१५ - कोलंबिया विद्यापीठ एम.ए. पदवीसाठीचा प्रबंध 'ॲड्मिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी' हा ४२ पृष्ठांचा शोधनिबंध आहे. या शोधनिबंधात डॉ. आंबेडकरांनी इ.स. १७९२ ते १८५८ या कालखंडातील ईस्ट इंडिया कंपनीचा राज्यकारभार आणि वित्त यासंबंधीच्या धोरणातील बदलांचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. हे बदल भारतीय जनतेला कसे अन्यायकारक ठरले याचे विदारक चित्र यात साकरले आहे.

१) इ.स. १९१६ - भारतातील जाती: त्यांची घडण, उत्पत्ती आणि प्रसार (Castes in India: Their Mechanism, Genesis and Development) हा निबंध दि. ९ मे १९१६ रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्राध्यापक डॉ. ए. ए. गोल्डनवायझर यांच्या मानववंशशास्त्राच्या परिषदेत वाचला. पुढे हा निबंध पुस्तक रूपाने प्रकाशित झाला.

२) इ.स. १९१७ - कोलंबिया विद्यापीठ पीएच.डी. प्रबंध 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' (The Evolution of Provincial Finance in British India) या ग्रंथाची पृष्ठ संख्या सुमारे २५० आहे. या ग्रंथात ब्रिटिश, केंद्र सरकार आणि त्या वेळची घटकराज्ये यांच्यातील आर्थिक संबंध १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ कालखंडामध्ये कस-कसे विकसित झाले, याची मीमांसा केली आहे.

३) इ.स. १९२३ - डी.एस्सी. पदवीसाठी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सने मान्य केलेला 'रुपयाचा प्रश्न : उद्गम आणि उपाय' (The Problem of Rupee : It's Origin and It's Solution). यात इ.स. १८०० ते १८९३ या कालखंडामध्ये भारतीय रुपयाची, चलनाचे परिणाम म्हणून कशी जडणघडण होत गेली याचे सखोल विवेचन सादर केले.

४) इ.स. १९३६ ॲनिहिलेशन ऑफ कास्ट - १९३६ साली जात पात तोडक मंडळाच्या वार्षिक सभेसाठी त्यांना बोलावण्यात आले होते. या सभेसाठी त्यांनी हे अध्यक्षीय भाषण लिखित स्वरूपात तयार केले होते. पण त्याना हे भाषण त्यातील क्रांतीकारी विचारावर जातपात तोडक मंडळाने आक्षेप घेतल्याने त्यांना हे भाषण देता आले नाही पुढे ते पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले.

५) इ.स. १९४० - थॉट्स ऑन पकिस्तान- या ग्रंथात त्यांनी हिंदू- मुस्लिमातील संघर्ष विचारात घेऊन मुस्लिमासाठी स्वतंत्र राष्ट्राच्या बाजूने विचार मांडले.

६) इ.स. १९४५ - व्हॉट काँग्रेस ॲण्ड गांधी हॅव डन टू द अन्टचेबल्स? - महात्मा गांधी व कॉग्रेस पक्षाने अस्पृश्य साठी स्वीकारलेल्या धोरणांचा समाचार घेतला आहे.

७) इ.स. १९४६- 'हू वेअर शूद्राज'?- शूद्र वर्णाच्या उत्पत्तीचे व स्थितीचे विवेचन या ग्रंथात केले आहे.

८) इ.स. १९४७ - स्टेट्स ॲण्ड मायनॉरिटीज - हा राजकीय अर्थशास्त्रावरील ग्रंथ असून त्यामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय अर्थ व्यवस्थेसाठी विकासाची अर्थनीती काय असावी याचे विवेचन केले आहे. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गरिबी, विषमता, व शोषण यांच्या निर्मूलनाचा आग्रह धरला आहे.

९) इ.स. १९४८ – 'द अन्टचेबल्स : हू वेअर दे?' – या ग्रंथात अस्पृश्य कोण होते व ते अस्पृश्य का बनले या प्रश्नाची मिमांसा केली आहे.

१०) इ.स. १९५० – बुद्धा ॲण्ड द फ्युचर ऑफ हिज रिलिजन – या ग्रंथामध्ये बौध्द धर्म आणि इतर धर्म ( ख्रिस्ती, इस्लाम, हिंदू) याची तुलना करून बुद्ध धर्म हा अधिक विवेकी व मानवतावादी व म्हणून श्रेष्ठ असल्याचे मत बाबासाहेबांनी मांडले आहे.

११) इ.स. १९५५ – थॉट्स ऑन लिंग्विस्टिक्स स्टेट्स– या ग्रंथामध्ये भाषावार राज्य रचनेविषयीचे आपले विचार त्यांनी मांडले आहेत.

१२) १९५१ 'द राईज ड फॉल ऑफ हिंदू वुमन' हा दीर्घ लेख कलकत्याच्या महाबोधी मासिकात प्रसिद्ध झाला. पुढे पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाला. या पुस्तकात प्राचीन काळी स्त्रियांच्या दर्जा उच्च होता पण मनुस्मृतीनंतर तो दर्जा खालावला. बुद्धाच्या कालखंडात स्त्रियांचा दर्जा उच्च होता. स्त्रियांच्या पतनास मनुस्मृती कारणीभूत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

१३) इ.स. १९५७ – बुद्धा ॲण्ड हिज धम्मा – या ग्रंथात गौतम बुद्धाची मध्यवर्ती शिकवण स्पष्ट केली आहे. तसेच बुद्धाच्या शिकवणीतील काही भागाचा नव्याने अन्वयार्थ लावलेला आहे. तसेच सद्य:काळात बौद्ध धर्माची प्रासंगिकताही प्रतिपादन केली आहे.

आपल्या ग्रंथसंपदेतून त्यांनी अनेक विषय हाताळले. त्यांपैकी १) रिव्हॉल्युशन ॲण्ड काउंटर रिव्हॉल्युशन इन एन्शिएंट इंडिया, २) बुद्धा ॲण्ड कार्ल मार्क्स, ३) रिडल्स ऑफ हिंदुइझम हे महत्त्वाचे ग्रंथ अपूर्णच राहिले. याशिवाय म. फुले यांचे चरित्र, महात्मा गांधींवर समीक्षात्मक पुस्तक, आर्मी इन इंडिया अशी कितीतरी ग्रंथसंपदा प्रकाशित होऊ शकली नाही. ही फार मोठी वैचारिक हानी म्हणावी लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, इ. विषयावर मुलभूत संशोधन करून ही ग्रंथ संपदा निर्माण केली. आज या ग्रंथातील विचार त्या त्या क्षेत्रातील मुलभूत सिद्धांत म्हणून ओळखले जातात. त्याचा अभ्यास संबंधित अभ्यास शाखेतून केला जातो.

हिंदू समाजात पीडित, दलित लोकांना व समस्त स्त्रीजातीला ज्ञानाची संजीवनी पाजून जिवंत केले आणि आपल्या मानवी हक्कांसाठी लढण्यास सिद्ध केले. अशा महामानवाचे महापरिनिर्वाण दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १९९० या वर्षी मरणोत्तर भारत रत्न हा सर्वोच्च बहुमान प्रदान केला गेला.

मात्र मृत्यूनंतरही डॉ. आंबेडकरांच्या अद्वितीय बुद्धिमत्तेचा व कर्तृत्वाचा दीपस्तंभ भारतात अखंड तेवत राहील व पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करत राहील यात तीळमात्र शंका नाही.

**स्वंय – अध्ययन प्रश्न क्र. २**

१) राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांची परिषद ......... या ठिकाणी भरवली.

अ) निपाणी        ब) कागल

क) माणगाव        ड) वडगाव

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ मध्ये दलितांच्या मुक्तीसाठी ........... सत्याग्रह केला.

अ) महाड    ब) काळाराम

क) गोलमेज परिषद    ड) वरील पैकी नाही

३) डॉ. आंबेडकरांनी महाडच्या सत्याग्रहासाठी महार स्त्रियांना तमाशात नाचवतात म्हणून ......... यांची मदत नाकारली.

अ) पठ्ठे बापूराव    ब) गणपत पाटील

क) विठाबाई    ड) वरीलपैकी सर्व

४) 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा!' हा संदेश ......... यांनी दिला.

अ) पंडित नेहरू    ब) लोकमान्य टिळक

क) महात्मा गांधी    ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

५) डॉ. आंबेडकर यांनी ......... नावाची शिक्षण संस्था स्थापन केली.

अ) जनता शिक्षण संस्था    ब) रयत शिक्षण संस्था

क) चोखामेळा शिक्षण संस्था    ड) वरीलपैकी नाही

६) राजश्री शाहू महाराजांच्या देणगीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ......... हे वृत्तपत्र सुरू केले.

अ) मूकनायक    ब) बहिष्कृत भारत

क) जनता    ड) प्रबुद्ध भारत

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी .......... येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.

अ) नागपूर    ब) अमरावती

क) मुंबई    ड) वरीलपैकी नाही

८) पुणे करार ........ यांच्यात झाला.

अ) गांधी -आंबेडकर    ब) नेहरू- आंबेडकर

क) रॅम्से मॅक्डोनाल्ड-आंबेडकर    ड) वरीलपैकी नाही

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ......... या वर्षी मरणोत्तर भारत रत्न हा सर्वोच्च बहुमान प्रदान केला गेला.

अ) १९९०    ब) १९९१

क) १९९२    ड) १९९९

### ४.२.३ – **भारतीय राज्य घटना** (Indian Constitution)

**भारतीय राज्यघटना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यातील अनुभव, ज्ञान, अभ्यास व संवाद बुद्धी ही संविधान निर्मितीच्या वेळी पणाला लावली. भारतीय समाज व अर्थव्यवस्था त्यातील शोषण व्यवस्था, जातीव्यवस्था याचा संपूर्ण अभ्यास त्यांना होता. वंश, लिंग, धर्म, जात इत्यादी भेद विचारात न घेता स्वतंत्र व सार्वभौम भारताच्या सर्व जनतेचे हित साधणारी राज्यघटना तयार करायची होती. त्यांनी शोषित समाज व्यवस्था बदलण्यासाठी संविधानिक तरतुदी आणि संविधानात्मक संस्थांची निर्मिती केली. शोषितांना स्वातंत्र्य, समता, न्याय आणि मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी आणि हे हक्क टिकवण्यासाठी घटनात्मक उपाययोजना केली. राजकीय लोकशाहीबरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही कशी आणता येईल यासाठी प्रयत्न केले.

घटनेची कलमे तयार करताना डॉ. बाबासाहेबांनी जे परिश्रम केले त्याला तोड नाही. 'ते रात्री दोन-तीन वाजेपर्यंत दररोज जागरण करत असत आणि प्रत्येक कलमाची भाषा सोपी व कायदेशीर व्हावी म्हणून प्रत्येक कलमासाठी ते आलटून पालटून खर्डा तयार करीत असत. त्यावेळी त्यांच्या गुडघ्यांचा आजार बळावला होता. ते संदर्भ ग्रंथाचा भार आसपासच्या टेबलावर ठेवीत असत व लंगडत जाऊन संदर्भ ग्रंथ शोधून काढत असत', चांगदेव भगवानराव खैरमोडे ही माहिती डॉ.आंबेडकरांच्या चरित्र ग्रंथात देतात. डॉ. आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील कष्ट व संविधान सभेतील विचार व कार्य पाहता त्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतात.

मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकरांनी आपले सारे बुद्धी कौशल्य आणि सामर्थ्य या कामकाजात पणाला लावले होते. तांत्रिक बाजू सांभाळतानाच त्यात सामाजिक आशय ओतण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांमुळे शक्य झाले. त्यांचे हे कार्य मोलाचे ठरले आहे.

संपूर्ण देशाचे चित्र डोळ्यासमोर ठेवून त्यांनी हे कार्य केले. डॉ. टी. टी. कृष्णम्माचारी यांनी भारतीय संविधान सभेतील भाषणात या कार्याविषयी जे गौरव उद्गार काढले ते असे. 'संविधान सभेने मसुदा समितीवर ७ सदस्य नियुक्त केले होते. त्यापैकी एकाने या सभागृहाचा राजीनामा दिला आणि त्याची जागा दुसऱ्याने घेतली. एकाचा मृत्यू झाला आणि त्याची जागा रिक्त राहिली. एक दूर अमेरिकेत निघून गेला आणि ती जागा भरली गेलीच नाही. आणि अन्य एक किंवा दोन व्यक्ती दिल्लीपासून बऱ्याच दूर होत्या आणि त्यांची प्रकृती त्यांना उपस्थित राहण्यास अनुमती देत नव्हती. म्हणून सरते शेवटी असे घडले की, संविधानाचा मसुदा तयार करण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व डॉ. आंबेडकरावर आले. कदाचित सभागृहाला या वास्तव्याची जाणीव असावी आणि डॉ. आंबेडकरांनी हे उत्तरदायित्व हे कार्य अत्यंत योग्य प्रमाणे पार पाडले यात मला तीळ मात्र ही शंका नाही. म्हणून आम्ही त्यांचे ऋणी आहोत.'

**राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया**

१९४५ दुसरे महायुद्ध संपले आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांनी १९४६ कॅबिनेट मिशन (त्रिमंत्री योजना) हे शिष्टमंडळ भारतात पाठवले. भारताचा भावी राज्यकारभार चालवण्याच्या दृष्टीने संविधान निर्मितीसाठी एक संविधान सभा स्थापन करावी, असे या योजनेत सुचवण्यात आले. संविधान सभेच्या स्थापनेसाठी निवडणुका घेण्यात आल्या. काँग्रेसच्या विरोधामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई विधान

मंडळातून निर्वाचित होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांनी बंगाल विधान मंडळातून श्री. जोगेंद्रनाथ मंडल आणि इतर अनुसूचित जातींच्या सदस्यांच्या पाठिंब्यावर संविधान सभेत प्रवेश मिळवला. भारताच्या फाळणीनंतर पूर्व बंगाल पाकिस्तानमध्ये गेल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घटना परिषदेतील सदस्यत्व संपुष्टात आले. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे कायदे पंडित संविधान सभेत असले पाहिजेत यासाठी त्यांना मुंबई प्रांतातून संविधान सभेवर घेण्यात काँग्रेसने पुढाकार घेतला. ते आंबेडकर पुढे संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष झाले.

संविधान सभेचे कार्य ९ डिसेंबर १९४६ रोजी सुरू झाले. २९६ सदस्य संविधान सभेवर निवडून आले होते. त्यापैकी २०७ जण या सभेला उपस्थित होते. प्रामुख्याने अनुपस्थितांमध्ये मुस्लिम लीगच्या सदस्यांचा समावेश होता. १० डिसेंबर १९४६ रोजी अध्यक्षांच्या निर्वचना संबंधी नियम पारित केले. त्या नियमानुसार ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांना संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून निर्वाचित केले. अशा तऱ्हेने संविधान सभेचे कार्य सुरू झाले.

**संविधानाचे ध्येय आणि उद्दिष्टांवत प्रस्ताव :**

१३ डिसेंबर १९४६ ला पंडित नेहरूंनी संविधानाच्या ध्येय आणि उद्दिष्टांबाबत प्रस्ताव मांडला. पंडित नेहरू, श्री. पुरुषोत्तमदास टंडन, अध्यक्ष राजेंद्र प्रसाद यांची भाषणे झाली. १६ डिसेंबर १९४६ पर्यंत संविधान सभेची बैठक स्थगित करण्यात आली. १६ डिसेंबर १९४६ ला संविधान सभेच्या बैठकीची सुरुवात झाली. मुस्लिम लीगने वेगळ्या पाकिस्तानची मागणी केली होती. तर संस्थानाचे प्रतिनिधीही या प्रक्रियेमध्ये सामील झाले नव्हते. बंगालमध्ये वगैरे हिंदू मुस्लिमांचे दंगे सुरू झाले होते. अशा राजकीय परिस्थितीमध्ये संविधान सभेचे काम सुरू झाले होते व त्यातच बॅरिस्टर जयकर यांनी संघराज्याच्या संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत हिंदुस्थानातील संस्थांने आणि मुस्लिम लीग घटनेच्या प्रस्ताविकेवरील चर्चेत सहभागी व्हावेत म्हणून ही चर्चा पुढे ढकलावी असा प्रस्ताव सभेमध्ये मांडला होता. या प्रस्तावाने सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले. अशाच तणावपूर्ण वातावरणात अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी अनपेक्षितपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपले म्हणणे मांडण्यास आमंत्रित केले.

अशा तणावाच्या परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोलण्यासाठी उभे राहिले. त्यावेळी डॉ. आंबेडकर आपल्या विरोधकांच्या संबंधाने काही तरी बोलतील व विरोधक त्याचे भांडवल करून काहीतरी आगळीक करतील असे त्यांच्या सहकाऱ्यांना वाटू लागले होते. पण असे काहीही झाले नाही. डॉ. आंबेडकरांच्या या भाषणाने सर्व कटूता गळून पडून राज्यघटनेची निर्मिती आपण करू शकतो असा विश्वास सर्व सदस्यात निर्माण झाला. त्यांच्या भाषणातून ते म्हणतात, 'मी हे जाणतो की आपण राजकीय, आर्थिक, आणि सामाजिकदृष्ट्या विघटित आहोत. आपण युद्धसज्य अशा छावण्या आहोत. मी ही अशाच युद्धसज्य अशा एका छावणीचा नेता आहे. परंतु, हे असतानाही काळ आणि परिस्थिती अनुकूल असेल तर या जगातील कोणतीही शक्ती या देशाला एकात्म होण्यापासून प्रतिबंधित करू शकणार नाही. अशी माझी पक्की धारणा आहे'. या भाषणांनी सभागृहात प्रचंड टाळ्यांचा वर्षाव झाला. या घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार असलेले श्री. एन. व्ही. गाडगीळ म्हणतात, त्यांचे भाषण मुत्सद्यासारखे होते. त्यांच्या भाषणात कटुतेला कोठेही स्थान नव्हते. त्यांचे भाषण मूलगामी आणि विवेकाला आव्हान करणारे होते. त्यामुळे संपूर्ण सभागृह त्यांचे भाषण जीवाचे कान करून ऐकत होते. त्यांच्या भाषणानंतर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सभागृहाच्या परिसरात त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. त्यांच्या या भाषणाने एकसंघ राष्ट्र निर्मितीचे

काम कितीही मतभेद असले तरी आपण करू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्या या भाषणातून निर्माण झाला. व राज्यघटना निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला.

**संविधानाची प्रास्ताविका :**

कोणत्याही देशाची राज्यघटना ही समाजाच्या विविध व महत्त्वपूर्ण उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी निर्माण झालेली असते. म्हणून राज्यघटनेला समाजाचा मूलभूत कायदा असे म्हटले जाते. राज्यव्यवस्थेच्या विविध उद्दिष्टांच्या समग्र परंतु संक्षिप्त स्वरुपाच्या निवेदनाला उद्देशपत्रिका/सरनामा/प्रास्ताविका असे म्हटले जाते. घटनेची उद्देशपत्रिका म्हणजे राज्यघटना निर्मितीचा आशय स्पष्ट करणारी चावी आहे. उद्देशपत्रिका म्हणजे सारांश रूपातील घटनाच होय! एकात्म राष्ट्र निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाचे तत्त्व या श्रेष्ठतम मानवी मूल्यांचा अंगीकार केला आहे. आपल्या संविधानाच्या उद्देशिकेमध्ये संपूर्ण घटनेचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

**उद्देशिका**

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकास:

सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य;

दर्जा व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता याचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधान सभेस आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करत आहोत.

ही भारतीय राज्यघटनेची उद्देशिका आहे. या उद्देशिकेमध्ये राज्यघटनेची मूलभूत तत्त्वे आणि उद्दिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेबरोबरच ही उद्देश पत्रिका मंजूर केली आहे. या सरनाम्याद्वारे भारतीयांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधूत्वाची शाश्वती देण्यात आली आहे.

**संविधान सभेच्या कार्याचा आढावा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना तयार करताना भूतकाळातील परिणाम करून गेलेल्या घटनांचा मागोवा घेत, वर्तमानाचे नीट आकलन करून घेत आणि भविष्याचा वेध घेत भारताची राज्यघटना लिहिली. नवीन राज्यव्यवस्था, राज्ययंत्रणा यांची रचना त्यांनी केली. लोकांच्या सामाजिक, आर्थिक जीवनात रक्ताचा थेंबही न सांडता क्रांतिकारी परिवर्तने आणता येतील, असे शासनाचे स्वरूप किंवा प्रणाली त्यांनी राज्यघटनेमार्फत दिली. सामाजिक, आर्थिक, क्रांतिकारी विचारांना संविधानिक नैतिक आधार देणाऱ्या सर्वोत्तम लोकशाहीचा आविष्कार त्यांनी राज्यघटनेतून घडविला.

घटना परिषदेचे कामकाज २ वर्ष ११ महिने व १८ दिवस चालले. या काळात घटना समितीच्या एकूण ११ वेळा अधिवेशने झाली. या कालखंडात प्रत्यक्ष काम १६५ दिवस चालले. त्यातील ११४ दिवस घटनेच्या मसुद्याचा विचार करण्यासाठी खर्ची पडली.

मसुदा समितीचे निवड २९ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. या समितीने १४१ दिवसांत मसुदा तयार केला. प्रस्तावित घटनेच्या मसुद्यात ३४३ कलमे आणि १३ परिशिष्टे होते. या कलमांना ७६३५ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आणि २४७३ दुरुस्त्या मान्य करण्यात आल्या. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान संविधान सभेने स्वीकारले. हे संविधान २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आले. संविधान सभेने मान्य केलेल्या राज्यघटनेत ३९५ कलमे २२ भाग आणि ८ परिशिष्टे समाविष्ट करण्यात आली. राज्यघटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद या संदर्भात म्हणतात की, 'डॉ. आंबेडकरांची प्रकृती साथ देत नसतानाही अत्यंत दुष्कर असे विद्वत् परिश्रम घेतले आणि त्यांच्या परिश्रमाने त्यांनी केलेल्या कार्याला तेजोवलय प्राप्त झाल'.

केवळ कायद्याच्या तांत्रिक तरतुदींमुळे डॉ. आंबेडकर शिल्पकार ठरत नाही तर संपूर्ण भारतातील लोकांच्या भविष्याचा विचार करीत घटनेत तरतुदी केल्या आहेत. त्यांनी एकसंघात्मक देश निर्माण करण्याचे स्वप्न या राज्यघटनेत ग्रंथित केले आहे.

राज्यघटनेच्या उद्दिष्टांच्या ठरावापासून ते घटनेला संविधान सभेची मान्यता मिळेपर्यंत डॉ. आंबेडकरांनी केलेली भाषणे त्यांच्या राष्ट्र निर्मितीच्या ध्यासाचा आविष्कार होता. नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य, केंद्र आणि राज्याचे अधिकार, अल्पसंख्यांक जमातीचे संरक्षण आणि मागास जाती जमातीसाठी विशेष तरतुदी, राष्ट्रपतींचे स्थान, अधिकार आणि राज्यपाल नियुक्ती, अधिकार, न्यायालयाच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या तरतुदी, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायतीच्या तरतुदी, लोकसेवा आयोग रचना स्वरूप व कार्य, जल आयोग रचना सुरू व कार्य, ऊर्जा आयोग रचना, स्वरूप व कार्य, राज्य, राज्यातील राजभाषा, संघराज्याची भाषा अशा अनेक विविध तरतुदी करताना या देशाच्या एकसंघतेचा विचार सतत डोळ्यासमोर ठेवून त्यांनी कार्य केले. विशाल देशाची घटना बनवताना या देशाला राष्ट्र बनवले आहे.

**मार्गदर्शक तत्त्वे :**

राज्यघटनेत केवळ मूलभूत अधिकाराचा समावेश केला नाही तर व्यक्तीला केवळ तिच्या भौतिक गरजा भागवण्यासाठी हे मूलभूत अधिकार सोडून देण्याची पाळी कशी येणार नाही, याचाही सखोल विचार केला आहे. त्या दृष्टीने राज्याला कोणत्या सूचना देणे गरजेचे आहे आणि धोरण ठरवताना राज्याने कोणती खबरदारी घेणे आवश्यक आहे यासंबंधी मार्गदर्शन या घटनेने मार्गदर्शक तत्त्वाच्या रूपाने केले आहे. मार्गदर्शक तत्त्वे ही राज्यघटनेने विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांना केलेल्या आज्ञा आहेत. सत्तेवर येणाऱ्यांनी या आज्ञांची अंमलबजावणी केली नाही तर कोणालाही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**घटनात्मक नीतिमत्ता:**

राजकीय व्यवस्थेत वावरणाऱ्या पर्यायाने तिचा उपभोग घेणाऱ्या गटाने दुसऱ्यांच्या हक्क आणि स्वातंत्र्याचे दमन करू नये. प्रत्येकाने कायद्याच्या चौकटीत राहून आपली वर्तन शैली निश्चित केली पाहिजे. डॉ. आंबेडकर हे बौद्ध धर्म परिषद आटोपून कोलंबोहून मुंबईस परत येत असताना दिनांक १० जून १९५० रोजी त्यांचे त्रिवेंद्रम येथील लेजिस्लेटिव्ह चेंबरमध्ये भाषण झाले. त्यावेळी त्यांनी घटना व घटनात्मक नीती यावर विचार मांडले. 'प्रत्यक्ष घटनेपेक्षा घटनेप्रमाणे वागण्याची नीती जनतेत असणे या गोष्टीला फार महत्त्व आहे. देशांमध्ये पार्लमेंटरी लोकशाही पद्धत यशस्वी व्हायची असेल तर सरकार व जनता या उभयतांनी घटनेतील काही संकेत आणि नीती यांचे पालन करणे आवश्यक आहे. सरकार बनविण्याच्या पद्धती विषयी आदर, कायद्याचे पालन, स्वतंत्र विचार करण्याची सवय व बहुसंख्येच्या नियमांचे पालन, देशातील बहुसंख्य

लोकांचा आपल्यावरील विश्वास उडाला आहे असे दिसून आल्यास घटनात्मक नीतिस अनुसरून सरकारने आपल्या अधिकार पदाचा त्याग केला पाहिजे. अल्पसंख्यांकांबद्दल आदर बाळगला पाहिजे व शेवटची गोष्ट म्हणजे राज्य शासन नि:पक्षपाताने चालवले पाहिजे. हीच ती घटनात्मक नीतीमत्ता होय!'

घटना समितीच्या सदस्यांनी १७ नोव्हेंबर १९४९ च्या बैठकीत सुज्ञ सभासदांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मसुदा प्रारूप घटना निर्मितीच्या अद्वितीय कार्याचा गौरव करत असताना डॉ. आंबेडकरांच्या अद्वितीय बुद्धिमत्तेचे, कायदा व घटना यासंबंधीच्या विशाल व सखोल ज्ञानाचे, लोकशाहीनिष्ठ संसदीय राज्यपद्धतीविषयक दूरदृष्टीचे, प्रश्न सोडविण्याच्या तत्परतेचे, समर्पक प्रश्नोत्तरे देण्याऱ्या वाक्चातुर्याचे, समुचित निष्कर्षाप्रत पोचण्याच्या बुद्धी कौशल्याचे, विषयाचे मुद्देसुद विश्लेषण करणाऱ्या वैज्ञानिक दृष्टीचे, वेळेत कार्यपूर्तीसाठी अविश्रांत परिश्रम घेण्याच्या वृत्तीचे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या जागरूक व दूरदृष्टी, दूरदर्शी देश प्रेमाचे व तेजस्वी राष्ट्रभक्तीचे मनापासून कौतुक केले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे महान शिल्पकार म्हणून मान्य केले.

२५ नोव्हेंबर १९५० च्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेच्या भाषणात संविधानाच्या यशस्वीतेसाठी म्हणतात, 'माझ्या मते संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचा अमंल हा संपूर्णत: संविधानाच्या स्वरूपावर आवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग, जसे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका निर्माण करून देते. राज्याच्या या विभागाचे कार्य लोक आणि लोकांनी स्वत:च्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष यावर आवलंबून राहणार आहे'.

याच दिवशीच्या संविधान सभेमध्ये संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून संविधान यशस्वी होण्याच्या मूलभूत पूर्वअटी त्यांनी सांगितल्या आहेत. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात, '.... जसे राष्ट्र असते तशी राज्यघटना बनते. सचोटीचे, दानतीचे आणि लायकीचे लोकप्रतिनिधी जर निवडून आले तर सदोष घटनासुद्धा यशस्वी करून दाखवतील. पण प्रतिनिधी तसे नसतील तर नुसती घटना राष्ट्राला तारू शकणार नाही. घटना म्हणजे काय? तर एक यंत्र, निर्जीव वस्तू, तिच्यात जीव येतो ती चालविणाऱ्यांमुळे! आज भारताला कशाची गरज असेल तर राष्ट्रहिताचे कंकण बांधलेल्या प्रामाणिक कार्यकर्त्यांची! देशात फुटिरता वृत्ती सर्वत्र दिसत आहे. जातीभेद आहेत, भाषाभेद आहेत, प्रांतभेद आहेत, या सर्वांच्यावर दृष्टी ठेवून राष्ट्राचा व्यापकपणे विचार करणारी शीलसंपन्न माणसे आज हवी आहेत. ती भरपूर प्रमाणात मिळतील, अशी आशा करू या. आपल्या स्वातंत्र्य युद्धाचा इतिहास हेच सांगत आहे की, नवे प्रसंग आले की नवे कार्यकर्ते पुढे येतात. वर्तमानात व भविष्यात अनेक प्रसंग येतील अनेक कार्यकर्ते, नेते निर्माण होतील पण त्याची जबाबदारी आहे की, राष्ट्राचा व्यापक विचार करून देशाच्या अखंडतेचा सार्वभौमत्वाचा विचार करण्याची!'

६ जून १९५२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने एलएल. डी. (Doctor of Law) ही सन्माननीय पदवी प्रदान केली. आपला माजी विद्यार्थी स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचा महान शिल्पकार झाला म्हणून कोलंबिया विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हा संस्मरणीय सन्मान केला. खरे तर डॉ. आंबेडकरांच्या या अभूतपूर्व सन्मानातून स्वतंत्र व सार्वभौम भारत राष्ट्राचा सन्मान झाला होता. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने राज्यघटनेचा स्वीकार केला.

**स्वंय – अध्ययन प्रश्न क्र. ३**

**योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर बंगाल विधान मंडळातून ............आणि इतर अनुसूचित जातींच्या सदस्यांच्या पाठिंब्यावर संविधान सभेत प्रवेश मिळवला.

अ) श्री. जोगेंद्रनाथ मंडल ब) बॅरिस्टर जयकर

क) सरदार वल्लभभाई पटेल ड) वरील पैकी नाही

२) .................. सदस्य संविधान सभेवर निवडून आले होते.

अ) २०० ब) २९६

क) २८७ ड) २०८८

३) घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष ............ होते.

अ) डॉ. आंबेडकर ब) पंडित नेहरू

क) राजेंद्र प्रसाद ड) सरदार वल्लभभाई पटेल

४) घटना परिषदेचे अध्यक्ष पद ......... यांनी भूषविले.

अ) डॉ. राजेंद्र प्रसाद ब) डॉ, बाबासाहेब आंबेडकर

क) पंडित नेहरू ड) वरीलपैकी नाही

५) संविधान सभेने ............. या दिवशी संविधान स्वीकारले

अ) २६ नोव्हेंबर १९४९ ब) २६ जानेवारी १९४९

क) २६ जुलै १९५० ड) वरील पैकी नाही.

**४.३– पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

१) बहिष्कृत-समाजातून बाहेर टाकलेले

२) निरूपण- एखाद्या गोष्टीचे स्पष्ट, अर्थ न बदलू देता केलेले स्पष्टीकरण किंवा वर्णन

३) अग्निदिव्य- सत्यता सिद्ध करण्यासाठी केलेले कठोर परिश्रम

४) प्रबंध- एखाद्या विषयावर केलेले सुसंगत सविस्तर व शिस्तबद्ध लेखन किंवा विवेचन

५) कैफियत- एखाद्या घटनेची किंवा परिस्थितीची हकीगत स्पष्ट करणे

६) एझिक्यूटिव्ह कौन्सिल - १९४२ साली ब्रिटीश काळात ही प्रशासन संस्था कार्यरत होती. व्हाइसरॉयला सल्ला देणारी आणि भारतीय प्रशासकीय निर्णय घेणारी १२ अधिकाऱ्यांची समिती होती. या कौन्सिलवर काही भारतीय सदस्यही होते.

७) महापरिनिर्वाण- केवळ मृत्यू नाही तर सर्व प्रकारच्या शारीरिक, मानसिक, बंधनापासून मुक्ती ही संज्ञा महापुरुषाच्या व गौतम बुद्धाच्या संबंधाने वापरतात. मोक्ष प्राप्तीची अवस्था ही संज्ञा दर्शवते.

८) मूलभूत सिद्धांत - कोणत्याही गोष्टीचा पाया असणारे तत्त्व किंवा नियम ज्यावर एखाद्या गोष्टीची रचना किंवा विचार आधारीत असतो.

९) राज्यघटना- एखाद्या देशाचा मूलभूत कायदा ज्यावर त्या देशाच्या राज्यव्यवस्थेची उभारणी आणि संचलन होते.

१०) मानवी हक्क- प्रत्येक व्यक्तीला केवळ माणूस म्हणून जन्मत: मिळणारे मूलभूत अधिकार हे हक्क जात, धर्म, लिंग, वंश, भाषा, देश, आर्थिक स्थिती किंवा इतर कोणत्याही आधारे नाकारले जाऊ शकत नाहीत.

११) खर्डा - कच्चे टिपण

**४.४ स्वंय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**स्वंय - अध्ययन प्रश्न क्र. १**

१) महू

२) संकपाळ

३) कृष्णाजी अर्जुन केळूसकर

४) महाराज सयाजीराव गायकवाड

५) राजर्षी शाहू महाराज

**स्वंय-अध्ययन प्रश्न क्र. २**

१) माणगाव

२) महाड

३) पठ्ठे बापूराव

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

५) जनता शिक्षण संस्था (People's Edcuation Society)

६) मूकनायक

७) नागपूर

८) गांधी -आंबेडकर

९) १९९०

**स्वंय-अध्ययन प्रश्न क्र. ३**

१) श्री जोगेंद्रनाथ मंडल

२) २९६

३) डॉ. आंबेडकर

४) डॉ. राजेंद्र प्रसाद

५) २६ नोव्हेंबर १९४९

**४.५ सारांश**

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य, मागासलेल्या जाती व स्त्रियांच्या अफाट जनसमुदायाला गुलामगिरीतून मुक्त केले. त्यांना स्वतंत्र व समतेचे अधिकार प्रदान केले. देशातील सात कोटी अस्पृश्यांना संघटित करून त्यांच्या अंगी नवे सामर्थ्य, स्वाभिमान निर्माण केले. त्यांचे व्यक्तिमत्त्व, विचार आणि कृती यांचा संगम असलेले होते. देशातील अस्पृश्यांना 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा!' हा संदेश त्यांनी दिला.

डॉ. आंबेडकर एक लोक विलक्षण बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. प्रज्ञासूर्य प्रकांडपंडित व अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे धनी होते. कायदेपंडित, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, तत्त्वज्ञ, ग्रंथ लेखक, राष्ट्रभक्त, आंदोलक, जलतज्ज्ञ, पत्रकार, स्त्री उद्धारक, संसदपटू, कृषीतज्ज्ञ, इतिहास तज्ज्ञ, धर्म चिकित्सक अशा एक न अनेक ज्ञान पैलूंनी पुनीत झालेले महामानव होते. त्यांचा विविध क्षेत्रातील ज्ञानानुभव आजही समाजासाठी उपयोगी आहे. राष्ट्राला कोणती दिशा द्यायची याचा अचूक आराखडा त्यांच्या सर्वस्पर्शी विचारांत आढळतो. या विचारांच्या गाभ्याशी व्यक्तीचे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मानवी मुल्यांची बैठक आहे. या मुल्यांवर आधारित घटना निर्मिती केली व राष्ट्राला दिशा दिली. त्यांच्या कार्यात आणि त्यामागील यशात भविष्यातील भारतीय लोकशाहीची सुरक्षितता, सफलता व न्यायप्रियता अंतर्भूत होती.

त्यांचे विचार समाजाला नवचैतन्य देणारे आणि त्यांच्यात प्रेरणा निर्माण करणारे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञान व सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात केलेले कार्य हे जगातील मोठे आश्चर्य आहे. अलौकिक प्रज्ञा, प्रचंड ज्ञाननिष्ठा, कोणतेही दडपणाला बळी न पडण्याची खंबीर व स्वाभिमानी मनोवृत्ती, कोणाचीही भीड न ठेवता स्वमतावर खंबीर पाय रोवून उभे राहण्याची वृत्ती, सततचे परिश्रम, निर्भयी व बंडखोर वृत्ती इत्यादी गुणांमुळे त्यांनी या देशातील दलित समाजात स्वाभिमान जागा करण्याचे आणि त्यांच्या मुक्तीचे प्रचंड क्रांतिकारी व ऐतिहासिक स्वरुपाचे महान कार्य केले आहे.

**४.६ सरावासाठी स्वाध्याय) टिपा लिहा.**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण

२) महाडचा सत्याग्रह

३) मंदिर प्रवेशाचे लढे

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रे

५) धर्मांतर

६) राज्यघटना

**क) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेसाठी दिलेल्या लढ्याचे वर्णन करा.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय कार्याचा आढावा घ्या.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथ लेखनावर प्रकाश टाका

**ड) खालील प्रश्नाची विस्तृत उत्तरे लिहा.**

१)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन कार्याचे टीकात्मक परीक्षण करा.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनात्मक कार्याचा सविस्तर आढावा घ्या.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य स्पष्ट करा.

**४.७ संदर्भ ग्रंथ**


१) डॉ. प्रल्हाद लुलेकर, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन्स, पुणे, पुनर्मुद्रण, २०१५.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, भाग १, भाग २, भाग ३, प्रकाशक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००२.

३) प्रा. व्ही. बी. पाटील, विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन्स पुणे, दुसरी आवृत्ती, २०१०.

४) भारताचे संविधान, संपादक प्रदीप गायकवाड, दिक्षाभूमी संदेश नागपूर, दहावी आवृत्ती, २००६.

५) प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे, राज्यशास्त्रज्ञ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद, २०१६.

६) चांगदेव भगवानराव खैरमोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, खंड-९, द्वितीय आवृत्ती, सुगावा प्रकाशन, १९९८.

७) चंद्रकांत खंडागळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर (विचार आणि चळवळी), प्रकाशक मायादेवी चंद्रकांत खंडागळे, सांगली, द्वितीय आवृत्ती २०२२


❒❒❒